(**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**)

नियम 289 च्या प्रस्तावासंबंधी

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मी नियम 289 अंतर्गत प्रस्ताव दिलेला आहे. एक दोन दिवसात राज्यामध्ये भयानक अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आज सकाळी आपण विशेष बैठक बोलावलेली आहे.त्यामुळे त्यांनी हा विषय नियमित बैठकीत उपस्थित करावा.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माझे म्हणणे ऐकून घ्यावे. या राज्यामध्ये अत्यंत भयंकर आणि भयानक अशी घटना घडली असून लोकशाहीला संपूर्णपणे काळिमा लावणारी घटना या राज्यामध्ये घडलेली आहे. या राज्यात आणि केन्द्रात ज्या पक्षाने पाच वर्षे राज्य केले होते त्या पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस आणि जे खालच्या सभागृहाचे गट नेते होते व सध्या विधानसभेचे सन्माननीय सदस्य असलेले श्री.गोपीनाथ मुंडे यांनी पत्रकार परिषद घेऊन वर्तमानपत्रात जाहीर वक्तव्य केलेले आहे की, "भारतीय जनता पक्षात लोकशाही नाही. राज्य स्तरावर आणि केन्द्रीय स्तरावर भारतीय जनता पक्षात लोकशाही नाही, लोकशाहीचा अस्त झालेला आहे, लोकशाहीचा अंत झालेला आहे अशा परिस्थितीमध्ये या पक्षात मला काम करणे अडचणीचे झालेले आहे त्यामुळे सर्व पदांचा मी राजीनामा देत आहे." त्यांनी सर्व पदांचा राजीनामा दिलेला आहे.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य कोणत्या विषयावर बोलत आहेत.?

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : जो पक्ष लोकशाही मानणारा होता तोच आता लोकशाही मानत नाही, असे त्यांनी सांगितलेले आहे.

श्री.दिवाकर रावते :सभापती महोदय, सन्माननीय सदस्य कोणत्या विषयावर बोलत आहेत

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, हा विषय अत्यंत गंभीर असल्यामुळे त्यांना बोलू द्यावे.

उपसभापती : हा विषय गंभीर आहे हे मला मान्य आहे त्याचप्रमाणे कामकाज पत्रिकेवर दाखविलेल्या लक्षवेधी सूचना देखील महत्वाच्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी दुपारी 1.15 वाजता नियमित बैठकीमध्ये हा विषय उपस्थित करावा.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना तिसरी व चौथी अगोदर घेण्याबाबत

श्री.आर.आर.पाटील :सभापती महोदय, खालच्या सभागृहात माझे प्रश्न असल्यामुळे तिसरी आणि चौथी लक्षवेधी सूचना अगोदर घेण्यात याव्यात अशी माझी आपणास विनंती आहे.

उपसभापती : ठीक आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय उपमुख्यमंत्री याठिकाणी उपस्थित आहेत त्यांच्या संदर्भात मला औचित्याचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे. तेव्हा हा मुद्दा मांडण्यास आपण मला परवानगी द्यावी.

श्री.आर.आर.पाटील : खालच्या सभागृहात प्रश्नोत्तरे झाल्यानंतर मी पुन्हा येथे येणार आहे.तेव्हा आपण हा मुद्दा मांडावा.

श्री.दिवाकर रावते : ठीक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : पालथी, ता.धरणगाव जि.जळगाव येथील ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत भाग घेतल्याबद्दल स्थानिक लोकप्रतिनिधींनी श्री.साळुंखे यांना जीवे मारण्याची दिलेली धमकी

मु.शी : पालथी, ता.धरणगाव,जि.जळगाव येथील ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत भाग घेतल्याबद्दल स्थानिक लोप्रतिनिधींनी श्री.साळुंखे यांना जीवे मारण्याची दिलेली धमकी या विषयाबाबत प्रा.सुरेश नवले व श्री.राजन तेली,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो .

मौजे पालथी, ता. धरणगाव, जि. जळगाव येथील श्री. चंद्रशेखर शामराव साळुंखे यांनी ग्रामपंचायत निवडणुकीत भाग घेतल्याच्या कारणावरुन स्थानिक लोकप्रतिनिधी व त्यांच्या समवेतील 200 जणांनी श्री. साळुंखे यांच्या घरात घुसून दिनांक 20 मार्च 2008 रोजी रात्रो 9 च्या सुमारास त्यांना जातीवाचक शिवीगाळ करुन जीवे मारण्याची दिलेली धमकी, यासंबंधी धरणगाव पोलीस ठाण्यामध्ये अनुसूचित जाती/जमाती अत्याचार प्रतिबंधासंबंधीच्या कायद्याखाली दिनांक 21 मार्च2008 रोजी गुन्हयाची नोंद होऊनही अपराध्यांविरुध्द कोणतीही कारवाई न होणे, अत्याचार करणारे गुन्हा दाखल होऊनही मोकळे फिरत असल्यामुळे धरणगाव, एरंडोल भागातील तसेच अनुसूचित जाती जमातीच्या नागरिकांमध्ये पसरलेली प्रचंड दहशत, गुन्हेगारांना अटक करुन कारवाई करण्याबाबत शासनाकडून होत असलेल्या दुर्लक्षामुळे शासनाबाबत सर्व सामान्य जनतेमध्ये पसरलेला असंतोष, अत्याचार करणा-यांना तात्काळ अटक करुन कठोर कारवाई करण्याची होत असलेली मागणी व याबाबत शासनाने तातडीने करावयाची व केलेली कारवाई "

श्री.आर.आर.पाटील (उप मुख्यमंत्री) :सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे..

<u>निवेदन</u>

(प्रेस :कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदना नंतर

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, अत्यंत गंभीर विषयाकडे मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. स्थानिक लोकप्रतिनिधींनी व त्यांच्या बरोबर असलेल्या 200 जणांनी श्री.साळुंखे यांच्या घरावर रात्री 9.00 वाजता___हल्ला केला होता. त्याचप्रमाणे त्यांना अर्वाच्य शिवीगाळ करुन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो फेकून दिला होता.

यानंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नवले ....

सभापती महोदय, 8 एप्रिल पर्यंत अटक करण्यात येऊ नये असा दिलासा आरोपीला न्यायालयाने दिला होता. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, संबंधित आरोपी हे आमदार असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्यात आलेली नाही का ? तसेच ते न्यायालयामध्ये अपिलात गेलेले आहेत परंतु सर्वसामान्य आरोपीला तो न्यायालयात गेल्यानंतरही अटकेची कारवाई केली जाते त्याप्रमाणे दरम्यानच्या काळात सदर आरोपीला ताबडतोब अटक करून ...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे, माझा हरकतीचा मुद्दा हा सन्माननीय सदस्य प्रा. नवले यांनी आता जो उल्लेख केला आहे त्या संबंधातच असल्याने मला आपण माझा हरकतीचा मुद्दा उपस्थित करण्यास परवानगी द्यावी. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.नवले यांनी आता बोलताना '... आरोपी हे आमदार असल्याने...' असा उल्लेख केला. मला त्यासंबंधातच आपल्याला सांगावयाचे आहे. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.नवले हे ज्या आमदारांचा उल्लेख येथे करू इच्छित आहेत ते आमदार या सदनाचे सदस्य असतील तर हरकत नाही, त्यावर आपण केव्हाही येथे चर्चा करू शकता. परंतु ते जर या सदनाचे सदस्य नसतील, विधान सभेचे सदस्य असतील तर या सभागृहामध्ये अशी चर्चा त्यांच्याविषयी होऊ शकत नाही. ते कोण आमदार आहेत हे प्रथमतः समजले पाहिजे. ते विधानसभा सभागृहाचे सदस्य असतील तर त्यांना त्याबद्दल खुलासा करण्याचा अधिकार प्राप्त होतो. परंतु या सदनाची ती व्यक्ती सदस्य नसल्याने ती येथे उपस्थित राहू शकत नाही आणि त्यामुळे त्या व्यक्तीविषयी येथे चर्चा झाल्यास त्याबाबतचा खुलासाही तिला येथे करता येणार नाही. त्यामुळे त्या बाबतीतील चर्चा येथे करणे हे आपल्या प्रथा, परंपरा, संकेत आणि नियमामध्ये देखील बसत नाही. ही आजपर्यंतची आपली प्रथा आहे. तरी आपण याबाबत निर्णय द्यावा.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जो मुद्दा येथे उपस्थित केला आहे त्याबाबत मी आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, सन्माननीय सदस्य प्रा. नवले यांनी येथे आमदार म्हणून कोणाचेही नाव घेतलेले नाही. या ठिकाणी अशा प्रकारे दोन्ही बाजूचे सदस्य एखाद्या खासदाराचे, आमदाराचे नाव न घेता केवळ खासदार किंवा आमदार असा उल्लेख करतात की लगेचच त्या माणसाचेच नाव समोर येते अशातीलही भाग नाही. तेव्हा त्यांनी येथे केवळ 'आमदार' म्हणून उल्लेख केला आहे तेव्हा त्यात आक्षेप घेण्यासारखे काहीच नाही इतकेच माझे म्हणणे आहे.

..... बी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, शासनाने या लक्षवेधी सूचनेवर जे निवेदन दिलेले आहे, उत्तर दिलेले आहे त्यातच 'आमदार' असा उल्लेख आहे तरीही मी या ठिकाणी 'लोक प्रतिनिधी' असा उल्लेख करतो. सभापती महोदय, तर मी असे सांगत होतो की, लोक प्रतिनिधींनी अशा प्रकारचे वर्तन करणे हे अत्यंत अशोभनीय आहे. एकीकडे आम्ही दलितांचे उद्धारक आहोत, मित्र आहोत असे म्हणावयाचे आणि दुसरीकडे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा फेकून देऊन अर्वाच्च भाषेत त्यांचा उद्धार करावयाचा, शिवीगाळ करायची ... तरीही त्यांचा पक्ष सांगत राहतो... अर्थात तो त्यांच्या पक्षाचा प्रश्न आहे. तेव्हा माझा प्रश्न असा आहे की, ताबडतोब सदर लोक प्रतिनिधींला अटक करून त्याचेवर पुढील कारवाई आपण करणार काय ? कारण जिल्हा न्यायालयाने दिलेली 8 तारखेची मुदत आता संपलेली आहे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, या संदर्भात मी खालच्या सदनामध्येही उत्तर दिलेले आहे की, या बाबतीत एक गोष्ट लक्षात घेण्याची आवश्यकता आहे. यातील जे फिर्यादी आहेत त्यांच्या विरूद्ध श्रीमती शोभाताई पाटील यांनी शिवीगाळ केल्याचा गुन्हा 1 वाजता नोंद केला आहे. त्यानंतर फिर्यादी आहेत त्या श्री.चंद्रशेखर साळुंखे यांनी विरोधी नोद करून 2 वाजता ॲट्रॉसिटी गुन्हा नोंद केला आहे. पोलिसांनी ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल केला असला तरी या बाबत अधिक खोलात जाण्याची आवश्यकता आहे. आरोपीला 8 एप्रिल पर्यंत अटक करू नये म्हणून जिल्हा कोर्टाने सांगितले होते म्हणून त्यांना अटक केली नव्हती. परंतु दरम्यानच्या काळात आरोपी जामिनासाठी हायकोर्टामध्ये गेलेला आहे. सभापती महोदय, एखादी गोष्ट कोर्टाच्या निदर्शनास आणल्यानंतर कोर्टाने काही बाबतीत स्टे दिल्यानंतर हायकोर्टामध्ये बेलसाठी अपील केल्यानंतर संबंधिताला अटक करण्याची घाई कोठल्याही प्रकरणामध्ये केली जात नाही. त्यामुळे याही प्रकरणामध्ये अधिक तपास करण्याची गरज आहे असे मला वाटते. ....

(यानंतर सौ.रणदिवे .... सी 1 ..

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.आर.आर.पाटील . . . . .

या सर्व घटनेचा वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून तपास केला जाईल. हाय कोर्टामध्ये जामिनाच्या बाबतीत कोणता निर्णय होतो, ते पाहून पुढील सर्व कारवाई केली जाईल.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, या केसमध्ये संबंधित आरोपी उच्च न्यायालयामध्ये गेलेला आहे. परंतु त्यांना अद्यापपर्यंत उच्च न्यायालयाकडून अंतरिम स्थगिती मिळालेली नाही. जर एखादा सर्वसामान्य आरोपी बेलसाठी उच्च न्यायालयामध्ये गेला असता आणि तो जर त्याला अद्यापपर्यंत मिळाला नसता तर कदाचित त्या माणसाला आतापर्यंत अटक देखील केली असती. त्यामुळे या केस मध्ये देखील संबंधितांना ताबडतोब अटक करण्याची आवश्यकता आहे. माझा असा प्रश्न आहे की, संबंधित लोकप्रतिनिधींचे नाव काय आहे ? ते कोणत्या पक्षाचे आहेत ? तसेच त्यांना पुन्हा उच्च न्यायालयातून सुप्रीम कोर्टामध्ये जाण्याची संधी न देता त्यांच्यावर ताबडतोब कारवाई करणार आहात काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, संबंधित लोकप्रतिनिधी अगोदरच हाय कोर्टामध्ये गेलेले आहेत, त्यामुळे त्यांना सुप्रीम कोर्टामध्ये जाण्यासाठी संधी देण्याचा प्रश्न येत नाही. मघाशी सांगितल्याप्रमाणे या केसमध्ये जिल्हा कोर्टाने संबंधितांना 8 तारखेपर्यंत जामीन दिलेला आहे आणि त्यानंतर ते हाय कोर्टामध्ये गेलेले आहेत. याचा सरळ अर्थ आहे की, ही बाब उच्च न्यायालयाच्या कन्सीडरेशनमध्ये आहे. जेव्हा एखादी जामिनाच्या संबंधातील केस उच्च न्यायालयाच्या विचाराधीन असते, तेव्हा अटक करण्याची घाई केली जात नाही. मघाशी सांगितल्याप्रमाणे या केसमधील जे फिर्यादी आहेत, त्यांच्या विरोधात अगोदर कलम 509 खाली गुन्ह्याची नोंद झालेली आहे. त्यानंतर संबंधितांनी ॲट्रॉसिटीखाली गुन्ह्याची नोंद केलेली आहे. तेव्हा कलम 509 खाली गुन्ह्याची नोंद इ ाल्यामुळे ही ॲट्रॉसिटीखाली केस नोंद केलेली आहे काय ? हा देखील एक तपासणीचा भाग आहे. यामध्ये कोणावर अन्याय करता येणार नाही. याबाबतीत मला राजकीय अभिनिवेषातून एखादा निर्णय घेता येईल आणि त्यातून राजकीय फायदा देखील होईल. परंतु त्यामधून बाहेर चुकीचा संदेश जाईल. यामध्ये फिर्यादी श्री.चंद्रशेखर साळुंखे यांच्या म्हणण्यानुसार घरामध्ये येऊन मोडतोड केली, जातीवाचक शिवीगाळ केली. पण त्यांनीच आपल्या फिर्यादीमध्ये सांगितले आहे की, या घटनेच्या वेळी श्री.अशोक पाटील नावाचे गृहस्थ तेथे हजर होते. श्री.अशोक पाटील यांनी आपल्या जबाबामध्ये असे सांगितले आहे की, तेथे किरकोळ बाचाबाची झाली. सामानाची फेकाफेक झाली.

. . . .सी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील . . . .

पण मी जातीवाचक शिवीगाळ केल्याचे ऐकलेले नाही. त्याचबरोबर तेथे आमदार होते की नाही हे गर्दीमुळे मला दिसले सुध्दा नाही. त्यामुळे कोणावर तातडीने कारवाई करण्यापेक्षा, याच्या खोलात जाऊन चौकशी करणे योग्य होईल. चौकशीमध्ये कोणी दोषी आढळून आले तर निश्चितपणे कारवाई होईल.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, संबंधित आमदारांचे नाव काय आहे ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, संबंधित आमदारांचे नाव श्री.गुलाबराव पाटील असून ते शिवसेना पक्षाचे आहेत.

. . . .सी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : दिनांक 28 मार्च 2008 रोजी अंबाजोगाईच्या गट शिक्षणाधिकारी कार्यालयातील गटसमन्वयक म्हणून कार्यरत असलेल्या शिक्षकास झालेली मारहाण

मु. शी. : दिनांक 28 मार्च 2008 रोजी अंबाजोगाईच्या गट शिक्षणाधिकारी कार्यालयातील गटसमन्वयक म्हणून कार्यरत असलेल्या शिक्षकास झालेली मारहाण यासंबंधी सर्वश्री विक्रम काळे,जितेंद्र आव्हाड, प्रा.फौजिया खान,सर्वश्री अरुण गुजराथी, रणजितसिंह मोहिते-पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अंबाजोगाईच्या गट शिक्षणाधिकारी कार्यालयात गटसमन्वयक म्हणून काम करीत असलेल्या शिक्षकास दिनांक 28 मार्च 2008 रोजी वा त्यासुमारास जिल्हा परिषद कन्या शाळेतील शिक्षिका संगिता चाटे यांनी इतर सहा जणांच्या सहाय्याने एकतर्फी हल्ला चढवून काठी,दगडाने बेदम मारहाण करणे, हल्ल्यात शिक्षक रक्तबंबाळ होणे,चक्कर येऊन पडणे,गट शिक्षणाधिकाऱ्यांनी सदर घटनेबाबत कोणतीही कार्यवाही न करणे, गट शिक्षणाधिकारी कार्यालयातून शिक्षकास त्यांच्या कार्यालयात घेऊन गेल्यानंतर तेथे त्यांच्यावर पुन्हा हल्ला होणे,कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी या संबंधात बघ्याची भूमिका घेणे, सदर रक्तबंबाळ शिक्षकास पोलिसांच्या मदतीने स्वामी रामानंद तीर्थ शासकीय रुग्णालयात दाखल करणे, या प्रकरणामुळे शिक्षकांत पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत सविस्तर चौकशी करुन हल्ला करणारी शिक्षिका व तिला सहाय्य करणाऱ्या व्यक्तींविरुध्द कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही."

श्री.आर.आर.पाटील(उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

. . . .सी-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

21-04-2008 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) C-5

APR/ KTG/ SBT/ 11:10

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, दिनांक 28 मार्च 2008 रोजी आंबेजोगाई येथे शिक्षण क्षेत्राला काळिमा फासणारी घटना घडलेली आहे. गट शिक्षण अधिकारी कार्यालयामध्ये संबंधित

शिक्षक गटसमन्वयक म्हणून कार्यालयीन कामकाज करीत असताना, जिल्हा परिषद शाळेमध्ये नोकरी करीत असलेल्या एक महिला शिक्षका, त्यांचे पती, जे जिल्हा परिषद शाळेमध्ये सहशिक्षक आहेत, हे दोघे, त्यांची सासू आणि इतर काही जणांनी कार्यालयामध्ये येऊन संबंधित श्री.गंगणे या शिक्षकांला बेदम मारहाण केली. त्यामुळे त्या शिक्षकांचे नाक फॅक्चर झालेले आहे. हा सर्व प्रकार कार्यालयामध्ये झालेला असताना सुध्दा संबंधित गट शिक्षण अधिकाऱ्यांनी पोलिसांना ताबडतोब कळवावयास पाहिजे होते. तसेच मारहाण झालेल्या संबंधित शिक्षकांना दवाखान्यामध्ये न्यावयास हवे होते. परंतु तसे काहीही केलेले नाही. संबंधित शिक्षिकेच्या पतीला अटक झाली, तेव्हा ते चार दिवस पोलीस कस्टडीमध्ये होते. माझे म्हणणे आहे की, यापूर्वी हा प्रकार संबंधित शिक्षकाच्या बाबतीत घडला होता. याबाबत पोलीस केस देखील झालेली आहे. एखाद्या शिक्षकाने स्वत: शासकीय कर्मचारी असताना शासकीय कार्यालयात येऊन गोंधळ घालणे हे योग्य नाही. आपल्या कायद्यातील तरतुदीनुसार जर एखादा शासकीय कर्मचारी 48 तास तुरुंगामध्ये असेल तर त्याला सस्पेंड करण्याचा अधिकार शासनाकडे आहे. या केसमध्ये देखील संबंधित कर्मचारी 48 तासापेक्षा जास्त काळ तुरुंगामध्ये आहे. त्यामुळे या कर्मचाऱ्याला सस्पेंड करणार आहात काय ? तसेच संबंधित महिला शिक्षकेवर देखील पुढील काळामध्ये कारवाई करणार आहत काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, ही जी घटना घडलेली आहे, त्यात दोन शिक्षकांमध्ये भांडणे होणे हे शोभादायक नाही. याबाबतीत शिक्षक आमदारांनी दखल घेऊन अशा प्रकारे शिक्षक मारामारी करणार नाहीत या दृष्टीने शिक्षकांना जर मार्गदर्शन केले तर त्याची शासनाला आणि पोलीस दलाला मदत होईल. आमदारांकडे बदलीसाठी तक्रार केली म्हणून त्या शिक्षिकेने, तिच्या पतीने आणि त्याच्या मित्रांनी एका गट समन्वयकाला मारहाण केल्याची घटना घडल्याचे सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले, ते खरे आहे. याबाबतीत पोलिसांनी तातडीने गुन्ह्याची नोंद करुन . . . . ..

यानंतर कु.गायकवाड . . . .

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री.आर.आर. पाटील..

त्या शिक्षिकेचे पती व त्याचे मित्र यांना ताबडतोबीने अटक करण्यात आलेली आहे. कलम 353 अंतर्गत गुन्हा नोंदविलेला आहे. शिक्षिका व तिची सासू या दोघींना अंतरिम जामीन कोर्टाने दिलेला आहे व पोलीस स्टेशनमध्ये हजेरी लावण्यास त्यांना सांगण्यात आले आहे. तसेच 48 तासापेक्षा अधिक काळ अटकेत असणाऱ्या शिक्षिकास निलंबित केले जाईल व तशा प्रकारची कारवाई केली जाईल. तशा सूचना देण्यात येतील. तसेच या घटनेमध्ये संगिता चाटे या देखील समाविष्ट असल्यामुळे त्यांना देखील निलंबित करण्याच्या सूचना दिल्या जातील.

श्रीमती उषा दराडे : ज्या वेळी ही घटना घडली होती, त्यावेळी रात्री 12.30 वाजता मला त्या शिक्षिकेचा फोन आला होता. तिने सांगितले की, तिची फिर्याद पोलिसांनी घेतली नाही त्याबाबत मी स्वत : तेथील एसपी यांच्याशी बोलले. या प्रकरणात खरंच तिने मारले आहे की, तिच्या विरोधी कांगावा केला जात आहे याबाबत शहानिशा केल्याशिवाय तिला निलंबित केले जाणार नाही याची शासन हमी देणार आहे काय ?

श्री. आर.आर. पाटील : सभापती महोदय, शहानिशा करुनच त्या व्यक्तिच्या जखमा बघूनच पोलिसांनी गुन्हयाची नोंद केलेली आहे. याबाबत पुन्हा एकदा तपास करण्यात येईल.

श्रीमती उषा दराडे : महिला फिर्याद करण्यास गेली होती परंतु तिची फिर्याद नोंदवून घेतली नाही. याबाबत शासन काय करणार आहे ?

श्री.आर.आर. पाटील : सभापती महोदय, त्या महिलेने, तिच्या पतीने व पतीच्या मित्राने जाऊन मारले व त्यांना जखमी केले. त्यांच्या अंगावरील लॉकेट काढून घेतले, खिशातील पैसे काढून घेतले. त्यांचे लॉकेट व खिशातील पैसे खरोखरच गेलेले आहेत काय हे पाहणे हा तपासाचा भाग आहे. महिलेची तक्रार काय होती हे समजून धेतले जाईल व तिच्या तक्रारीमध्ये तथ्य असेल तर गुन्हयाची नोंद घेतली जाईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : पनवेल नगरपरिषद येथील प्रशासन अधिकारी यांनी नियमबाहयरित्या व्यवस्थापन करणे

मु. शी : पनवेल नगरपरिषद येथील प्रशासन अधिकारी यांनी नियमबाहयरित्या व्यवस्थापन करणे यासंबंधी स□मा□□□ीय सदस्य श्री. शिवाजीराव पाटील यां□ी दिलेली ल□वेधी सूच□ा.

श्री. शिवाजीराव पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अ□ुमती□ ि□यम 101 अ□ये पुढील तातडीच्या व सार्वजनि□□ महत्वाच्या बाबी□डे स□मा□□ीय शिक्षण मंत्र्यांचे ल□ वेधू इच्छितो आ□ि त्याबाबत त्यां□ी ि□वेद□ □रावे, अशी वि□ती □रतो.

"पनवेल नगरपरिषद प्रशासन अधिकारी यांनी पनवेल नगरपरिषद हद्दीतील सुमारे 11 शाळांच्या ऑडिटसाठी नियमबाहयरित्या पावती न घेता रुपये 22600 एवढी रक्कम घेणे, नगरपरिषद शाळेतील मुलांना वितरीत करावयाच्या साहित्याचे वितरण न करता सदर साहित्याचा वापर स्वत:च्या वाढदिवसाकरीता करणे, वाटपाचे धनादेश मुख्याध्यापकाचे नावे न काढता, स्वत:च्या नावे काढणे, तसेच शिक्षण सेवक नियुक्ती वेळी रुपये 10 हजार गैरमार्गाने घेणे, शिक्षकांना अपमानास्पद वागणुक देणे व नियमबाहयरित्या व्यवस्थापन करणे, सदर प्रकरणी मा. मुख्यमंत्री, शालेय शिक्षण मंत्री व संबंधित अधिकारी यांच्याकडे करण्यात आलेल्या तक्रारी, याबाबत शिक्षक कर्मचाऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

प्रा. वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, ल□वेधी सूच□ेसंबंधीच्या ि□वेद□ाच्या प्रती मा□□ीय सदस्यां□ा आधीच वितरीत □ल्या असल्यामुळे मी ते ि□वेद□ आपल्या अ□ुमती□ सभा□ृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : ि□वेद□ सभा□ृहाच्या पटलावर ठेव□ात आले आहे.

ि□वेद□

(प्रेस : येथे सोबतचे ि□वेद□ छापावे.

....

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव पाटील : सभापती महोदय, पनवेल नगरपरिषदेमधील एका अधिकाऱ्याने शाळांच्या ऑडिटसाठी नियमबाहय पावती न घेता रक्कम गोळा केलेली असल्याचे चौकशीमध्ये सिध्द झालेले आहे. त्याने एका शिक्षण सेवकाला नियमित करण्याकरिता 10 हजार रुपये घेतल्याचेही सिध्द झालेले आहे. गरीब मुलांच्या तोंडचा तांदूळ काढून स्वत:चा वाढदिवस त्यांनी साजरा केला होता हेही चौकशीमध्ये सिध्द झालेले आहे. या सर्व घटना सिध्द झालेल्या असताना त्यांची नियमाला सोडून केवळ बदली करण्यात आली आहे. म्हणून मॅटमध्ये त्यांची बदली रहीत केली आहे. अशा प्रकारे क्रिमिनल केसेस करणाऱ्या गट शिक्षण अधिकाऱ्यावर शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात येत आहे ? त्याच्यावर फौजदारी केस करुन त्यांना बडतर्फ करण्यात येणार आहे काय ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, या संदर्भात झालेली चौकशी व विभागीय चौकशी 8 दिवसाच्या आत पूर्ण केली जाईल. तसेच त्यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हा देखील दाखल केला जाईल. अशाप्रकारे शासनाकडून दखल घेण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, हिवाळी अधिवेशनमध्ये, हा प्रश्न मी उपस्थित केला होता. त्यावेळी चौकशी करु असे माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले होते. परंतु ही चौकशी अजूनही पूर्ण झालेली नाही. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात माननीय मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले होते की, संबंधित अधिकाऱ्याने सर्व गुन्हे केलेले आहेत. तसेच कार्यालयात कामाच्यावेळी वाढदिवस साजरा करण्यात आला होता. त्या दिवशी जेवण पुरविण्याचे कंत्राट शालेय पोषण आहार शिजवून देणारे कंत्राटदार यांनाच दिले आहे. अशा प्रकारचे गंभीर गुन्हे त्यांच्यावर असताना, त्यांना ताबडतोब निलंबित केले जाणार आहे काय ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, या घटनेमध्ये खिचडीच्या धान्याच व प्रशासकीय अधिकाऱ्याचा संबंध नाही. गोडाऊनमधील माल हा डायरेक्ट शिक्षण समितीमध्ये जातो. त्यामुळे यामध्ये काही तथ्या नाही तरी देखील मी कबुली दिल्या प्रमाणे, 8 दिवसाच्या आत स्वत: चौकशी करुन योग्य वाटेल ती कार्यवाही करण्यास शासन तयार आहे.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी निवेदनामध्ये असे कबूल केले आहे. आता शासन कशाची चौकशी करणार आहे ? चौकशी पूर्ण झालेली आहे. असे शासनाने पूर्णपणे कबूल केलेले आहे. संबंधित अधिकाऱ्याने, वाढदिवस साजरा करण्याकरिता कॉंट्रॅक्टरकडून जेवण बनवून घेतले होते. त्या अधिकाऱ्यास शासन पाठीशी का घालत आहे ? हा अधिकारी भ्रष्ट आहे. हिवाळी अधिवेशनामध्ये ज्यावेळी हा प्रश्न उपस्थित झाला होता त्याची बदली 5 किमी अंतरावरील सासवड येथील डी.एड. कॉलेजमध्ये करण्यात आली. त्याला ताबडतोब निलंबित केले जाणार आहे काय ? यामध्ये शासनास काय अडचण आहे ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, विभागीय कारवाई पूर्ण झालेली आहे. 8 दिवसाच्या आत त्यासंबंधी योग्य वाटेल ती कारवाई करण्यास शासन तयार आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, "जेवण पुरविण्याचे कंत्राट शालेय पोषण आहार शिजवून देणारे कंत्राटदार यांनाच दिलेले आहे.

यानंतर श्री. बरवड..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ...

आणि तो गुन्हा सिध्द झालेला आहे. असे असताना माननीय शिक्षण मंत्री असे म्हणत आहेत की, याचा संबंध नाही. हे विसंगत उत्तर आहे. लेखी निवेदनामध्ये शासनाने स्पष्ट म्हटले आहे की, संबंध आहे. अशा अधिकाऱ्याची चौकशी पूर्ण झालेली असताना त्याला आणखी वेळ देणे चुकीचे ठरेल. त्याला आजच्या आज निलंबित करणार काय ? कृपाकरुन त्यांना पाठीशी घालू नका.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, नगरपरिषद शिक्षण मंडळ, पनवेल आणि शिक्षण सभापती यांचे असे म्हणणे आहे की, अशा प्रकारची जी बाब आहे ती तपासून घेतली पाहिजे. कारण शिक्षक संघटना आणि शिक्षण सभापती असे दोन मतप्रवाह आहेत. म्हणून मी सांगितले की, आठ दिवसात स्वत: चौकशी करुन निलंबित करण्याची आणि बडतर्फ करण्याची आवश्यकता असेल तर तसे करण्यात येईल.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, प्रशासन अधिकारी यांनी स्वत: दमदाटी करुन दहशत निर्माण करुन, विद्यार्थ्यांची खोटी हजेरी लावण्यास संबंधित मुख्याध्यापकांना भाग पाडलेले आहे व ही त्यांनी केलेली कार्यवाही नियमबाह्य आहे. पुन्हा कशाची चौकशी करणार ? त्यांनी खिचडी धोटाळा केलेला आहे. दमदाटी केलेली आहे. गरीब मुलांच्या तोंडाचा धास काढून घेणाऱ्या अधिकाऱ्याची पुन्हा चौकशी करणे बरोबर नाही. त्यांना निलंबित करुन पुढची कार्यवाही करावी. त्यांना आजच्या आज निलंबित केले पाहिजे. शासन ते करणार काय ? अशा प्रकारच्या अधिकाऱ्यांना पाठीशी घालून त्या ठिकाणी काळ सोकावतो.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, माणूस कितीही मोठा असला तरी कोणालाही पाठीशी घालणार नाही. यामध्ये उच्च स्तरीय म्हणजे सहसंचालकांच्या स्तरावर चौकशी करुन जे जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

उपसभापती : यानंतर लक्षवेधी सूचना क्रमांक 2 घेण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, हिवाळी अधिवेशनात जे उत्तर दिलेले होते तसेच उत्तर या ठिकाणी दिलेले आहे. हा गंभीर प्रश्न आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, आम्हाला न्याय द्यावा.

उपसभापती : खिचडी एवढी शिजलेली आहे की, यापुढे बोलण्यासाठी काही राहिलेले नाही.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, मी प्रश्न विचारण्यासाठी उभा राहिलो होतो. मला प्रश्न विचारण्याची संधी द्यावी.

उपसभापती : माननीय मंत्रिमहोदयांनी चौकशी करतो असे सांगितले आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, गेल्यावेळी हेच उत्तर आलेले होते.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, शासनाने असे उत्तर दिले आहे की, जे प्रशासन अधिकारी दोषी आहेत त्यांच्यावर कारवाई करु. त्या ठिकाणी खोटी हजेरी दाखवली. एवढेच नव्हे तर महिला बचत गटाला दिले जाणारे जे पैसे संयुक्त खात्यात होते ते त्यांनी रद्द करुन त्यांनी स्वत:च्या नावे "सेल्फ" म्हणून चेक काढला हे खरे आहे काय ? यामध्ये फक्त प्रशासन अधिकारीच जबाबदार नाही तर या भ्रष्टाचारामध्ये, पैसे खाण्यामध्ये संबंधित प्रशासन अधिकारी कार्यालयातील लिपिक श्री. नामदेव पिचड यांच्या सह्यांची पैसे स्वीकारल्याबद्दलची कागदपत्रे त्या ठिकाणी आहेत. म्हणून प्रशासन अधिकाऱ्यांबरोबरच त्या संबंधित लिपिकाची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करणार काय ?

प्रा. पसंत पुरके : सभापती महोदय, यासाठीच मी गांभीर्याने उत्तर दिले की, यामध्ये जे जे दोषी असतील त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : दोडामार्ग तालुक्यातील काजू कलमे, सागाची झाडे, बांबूची बेटे यांना आग आल्यामुळे झालेले नुकसान

मु. शी. : दोडामार्ग तालुक्यातील काजू कलमे, सागाची झाडे, बांबूची बेटे यांना आग आल्यामुळे झालेले नुकसान यासंबंधी सर्वश्री गुरुनाथ कुलकर्णी, जितेंद्र आव्हाड, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"दोडामार्ग तालुक्यातील बोडदे-खोक्रल गावातील सुमारे 50 ते 60 एकर जमिनीत शेतकऱ्यांनी लागवड केलेली काजू कलमे, सागाची झाडे, बांबूची बेटे यांना आग लागल्यामुळे दिनांक 1 एप्रिल, 2008 रोजी सुमारे रुपये 20 लाखापेक्षा जास्त नुकसान होणे, त्यामुळे दरवर्षी मिळणाऱ्या उत्पन्नापासून शेतकरी वंचित राहणे, आगीमुळे आपद्ग्रस्त झालेल्या शेतीचा तातडीने सर्व्हे करुन शेतकऱ्यांना मदत देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ. राजेंद्र शिंगणे (पुनर्वसन राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुक्यातील आहे. राज्याचे माननीय महसूल मंत्री यांचा हा जिल्हा आहे. या जिल्ह्याचे पालकमंत्री सुध्दा माननीय महसूल मंत्री आहेत. 1 एप्रिल, 2008 रोजी जवळजवळ 50 ते 60 एकर क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर आग लागली आणि काजूची कलमे, सागाची झाडे, बांबूची बेटे यांना आग लागून 20 लाख रुपयांपेक्षा जास्त नुकसान झालेले आहे. उत्तरामध्ये शासनानेही मान्य केले आहे. शासनाचा हा कोणता नियम आहे किंवा ब्रिटन कोड आहे काय हे मला माहीत नाही. शेतकऱ्यांचे 24 लाख रुपयांचे नुकसान झालेले आहे तरीही त्यांना एकही पैसा अनुज्ञेय नाही असे शासन सांगत आहे. माझी माननीय मंत्रिमहोदयांकडे मागणी आहे. त्या ठिकाणी 24 लाख रुपयांचे नुकसान झालेले आहे त्यांना नुकसानभरपाई देणार काय ? नसेल तर का देणार नाही याची कारणे सांगावीत.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे : सन्माननीय सदस्यांनी दोडामार्ग तालुक्यातील बोडदे-खोक्रल या गावांमध्ये आग लागल्यामुळे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचे म्हटले आहे. यासंबंधी मी निवेदनामध्ये स्पष्ट खुलासा केलेला आहे. मागील काळात राज्यामध्ये अशा आगी लागल्यामुळे त्यात झालेले नुकसान हे नैसर्गिक आपत्तीमध्ये मोडत नसल्यामुळे त्यांना मदत दिली गेली नाही. दोडामार्ग तालुक्यातील बोडदे-खोक्रल याठिकाणी लागलेली आग वणव्यामुळे लागली असावी अशाप्रकारचा अंदाज महसूल खात्याच्या अधिका-यांनी व्यक्त केला आहे. कोकणामध्ये साधारणपणे आजुबाजूला गवत साठवून ठेवतात त्यामुळे आग लागते. या कारणामुळे दरवर्षी आग लागण्याच्या घटना घडतात. नैसर्गिक आपत्तीमुळे वीज पडणे, पूर येणे, या कारणांना आतापर्यंत मदत केली जात आहे. परंतु आग लागल्यामुळे झालेल्या नुकसानासाठी मदत केलेली नाही. त्यामुळे याप्रकरणी जे नुकसान झालेले आहे त्यासाठी मदत करता येणार नाही.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना दोडामार्ग तालुक्यातील असली तरी संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्हयात हा प्रश्न भेडसावत आहे. कोकणामध्ये आंबा, काजू ही नगदी पिके समजली जातात. त्या भागात अशाप्रकारे आगी लागल्यामुळे या पिकांचे नुकसान होते. याकरिता नुकसान भरपाई देण्याचे नवीन धोरण शासन स्वीकारणार काय ? ज्याप्रमाणे नैसर्गिक आपत्तीसाठी नुकसान भरपाई दिली जाते त्याप्रमाणे या आगींच्या संदर्भातही नुकसान भरपाई देण्यासाठी नवीन धोरण शासन जाहीर करणार काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत आणि सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितलेली वस्तुस्थिती आहे. कोकणात अशाप्रकारे आकस्मिक आगी लागतात. परंतु शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे महाराष्ट्रातील मराठवाडयातील शेतकरी असो किंवा विदर्भातील शेतकरी असो, कोणालाही मदत दिली जात नाही. सन्माननीय सदस्यांनी कोकणात काजूच्या बागांना, नारळाच्या बागांना आकस्मिक आग लागल्यामुळे लाखो रुपयांचे नुकसान होते ही वस्तुस्थिती सांगितली आहे. मराठवाडयात, विदर्भात देखील अशा आकस्मिक आगी लागतात. यावर्षी नाही तर अनेक वर्षापासून कडबा, गहू काढणीसाठी आला असताना आग लागते. यावर्षी मराठवाडयात व विदर्भात सोयाबीनचे पीक मोठया प्रमाणावर आल्यावर शेतक-यांनी

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे.....

सोयाबीन गंजीमध्ये घातले होते. नेमके त्यावेळी आगी लागल्याच्या घटना घडलेल्या आहेत. या आगीमुळे शेतक-यांचे कडब्याचे व सोयाबीनचे 3-4 लाखांचे नुकसान झालेले आहे. सन्माननीय या शेतक-यांना नुकसान भरपाई मिळण्यासाठी भावना व्यक्त केली आहे ती योग्य आहे. नैसर्गिक आपत्तीसाठी केंद्र सरकारचे धोरण आहे. याबाबत राज्य शासन गांभीर्यपूर्वक विचार करील आणि पुढील काळामध्ये अशाप्रकारच्या आगीमुळे शेतक-यांचे नुकसान होत असेल तर त्यासाठी मदत करण्याची भूमिका शासन घेईल आणि याबाबत लवकरात लवकर धोरण जाहीर करील.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या आगीमुळे तेथील शेतक-यांचे 24 लाख रुपयांचे नुकसान झालेले आहे तरी सुध्दा शासनाची अशापध्दतीची उदासिनतेची भूमिका असेल तर शेतकरी का आत्महत्या करीत आहेत ते यामधून स्पष्ट होत आहे. त्या भागातील शेतक-यांचे सर्वस्व गेल्यामुळे 24 लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे शासन मान्य करीत आहे आणि तरीही एक पैशाचीही मदत न देण्याची शासनाची भूमिका आहे ती योग्य नाही. शासन या शेतक-यांना मदत करणार काय असा माझा प्रश्न आहे.

डॉ.राजेंद्र शिंगणे : शासनाने शेतक-यांसाठी पीक विमा योजना सुरु केली आहे. पण दुर्दैवाने या योजनेचा शेतक-यांकडून फायदा घेतला जात नाही. अशाप्रकारच्या घटना कोकणात घडत असल्यामुळे पीक विमा योजनेचा फायदा घेण्यासाठी शेतक-यांना प्रवृत्त केले पाहिजे. कोकण, विदर्भ, मराठवाडा या भागातील शेतक-यांना पीक विमा योजनेखाली प्रयत्नपूर्वक बसविता आले तर या सर्व शेतक-यांना फायदा होऊ शकतो.

नंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

(डॉ. राजेंद्र शिंगणे)

हा प्रश्न वन खात्याशी संबंधीत असून तो महसूल व पुनर्वसन खात्याकडे वर्ग करण्यात आलेला आहे. तरी सुध्दा दोडामार्ग तालुक्यातील बोडदे-खोक्रल गावात आगीमुळे जे नुकसान झाले त्यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेल्या भावना लक्षात घेऊन तसेच वन विभागाला विचारात घेऊन त्यांच्या मार्फत सुध्दा मदत केली जाईल का हे तपासले जाईल. तसेच येथून पुढच्या काळात अशा प्रकारे कुणाचे नुकसान होत असेल तर त्याबाबतीत मदत करण्याचे शासनाचे निश्चितपणे धोरण राहील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : परभणी येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात मोतिबिंदू शस्त्रक्रिया केलेल्या रुग्णांना आलेले अंधत्व

मु. शी. : परभणी येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात मोतिबिंदू शस्त्रक्रिया केलेल्या रुग्णांना आलेले अंधत्व यासंबंधी सर्वश्री दिवाकर रावते, मधुकर सरपोतदार, अनिल परब, सुरेश जेथलिया, गोपीकिसन बाजोरिया, किशनचंद तनवाणी, डॉ. नीलम गो-हे, सर्वश्री परशुराम उपरकर व अरविंद सावंत,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"परभणी येथील जिल्हा शासकीय रुग्णालयांत दिनांक 24.12.2007 रोजी वा त्यासुमारास मोतिबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या सुमारे 33 रुग्णांनी शस्त्रक्रियेनंतर डोळेदुखीचा त्रास होत असल्याच्या तक्रारी वैद्यकिय अधिकाऱ्यांकडे करुनही त्याकडे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे कित्येक रुग्णांची दृष्टी गेल्याने व काहींना कायमचे अंधत्व आल्याने परभणीतील जनतेमध्ये निर्माण झालेले संतप्त वातावरण, मोतिबिंदू शस्त्रक्रिया करतांना योग्य ती काळजी न घेतल्याने कित्येक रुग्णांना कायमस्वरुपी अंधत्व आल्याने अशा प्रकारे बेजबाबदारपणे शस्त्रक्रिया करणाऱ्या डॉक्टरांची चौकशी करुन त्यांच्यावर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, त्याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे जनतेत निर्माण झालेला असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता या प्रकरणी शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ. विमल मुंदडा (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : जिल्हा शासकीय रुग्णालयामध्ये मोतिबिंदू शस्त्रसक्रिया शिबीर घेण्यात आले होते. त्यावेळी शस्त्रक्रिया केल्यानंतर 31 पैकी 26 रुग्णांचे डोळे गेले, अशा प्रकारचा हा विषय आहे. मोतिबिंदू शस्त्रक्रिया केलेल्या 31 पैकी 26 जणांचे डोळे जाणे ही राज्यातील अतिशय गंभीर घटना आहे. या संदर्भात कोणाला जबाबदार धरण्यात आलेले आहे. त्याठिकाणी मी स्वत: भेट दिली होती आणि माननीय मंत्री महोदयांनी देखील भेट दिलेली आहे. या प्रकरणी मी डॉ.लहानेंना देखील भेटलो. त्यांनी स्टर्लाइज यंत्रणा व्यवस्थित नसल्यामुळे असे घडू शकते असे सांगितले. ही व्यवस्था करण्याची जबाबदारी डॉक्टरांची असते काय ? तेव्हा या प्रकरणी ज दोषी असतील अशा व्यक्तीवर निलंबनाची कारवाई व्हावयास पाहिजे. तेव्हा याप्रकरणी कोणाला जबाबदार धरण्यात आलेले आहे व कोणावर कारवाई करण्यात आलेली आहे ? असा प्रकार होण्यामागची कारणमिमांसा काय आहे ?

डॉ. विमल मुंदडा : लक्षवेधीच्या निवेदनामध्ये सविस्तर माहिती दिलेली आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि मी भेट दिलेली आहे. तसेच वरिष्ठांनी सुध्दा या प्रकरणी दखल घेऊन योग्य ती उपाययोजना करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. या शस्त्रक्रियेच्या संदर्भात प्रिऑपरेटिव्ह केअर आणि पोस्ट ऑपरेटिव्ह केअर घेतली गेली होती. जी जी काळजी घ्यावयाला पाहिजे होती ती सर्व काळजी घेतलेली होती, तरी सुध्दा दुर्दैवाने ही घटना घडलेली आहे. अंधत्व निर्मूलन कार्यक्रमाच्या माध्यमातून अशा प्रकारचे कार्यक्रम घेतले जातात. ही दुर्दैवी घटना घडलेली आहे. मोतिबिंदूच्या 31 शस्त्रक्रिया झाल्या. 5 जणांचे डोळे चांगले झालेले आहेत. 10 जणांची व्हिजन चांगली आहे...

श्री. दिवाकर रावते : माननीय मंत्री महोदय उत्तर देत आहेत की दुरुस्ती सांगत आहेत ? 31 रुग्णांवर मोतिबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या. त्यापैकी 26 जणांची दृष्टी गेल्याचे निवेदनामध्ये स्पष्टपणे म्हटलेले आहे. 5 जणांचे डोळे चांगले आहेत, त्यामधील 10 कमी झालेले आहेत, असे उत्तर देण्यात येत आहे. तेव्हा माननीय मंत्री महोदयांना निवेदनामध्ये दुरुस्ती करावयाची आहे काय ?

नंतर श्री. भोगले....

अशुद्धीत मत/ मिनिट्स साठी नाही

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दोन प्रश्न विचारले आहेत. निवेदनामध्ये डॉक्टर व कर्मचाऱ्यांवर घडलेल्या घटनेबद्दल कोणती ॲक्शन घेतली हे नमूद केलेले आहे. हा अपघाताचा प्रकार असू शकतो.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, या प्रश्नाच्या डेप्थमध्ये जाणे आवश्यक आहे. सन्माननीय वैद्यकीय शिक्षणमंत्री याठिकाणी उपस्थित आहेत. डॉ.टी.पी.लहाने यांच्या अध्यक्षतेखाली जी चौकशी समिती नेमली आहे, त्या समितीचा अहवाल अद्याप प्राप्त झाला नाही का? आज राज्यातील अनेक हॉस्पिटल्समध्ये सीपीएस डीओएमएस डॉक्टर्स अशा प्रकारच्या सर्जरी करीत आहेत. अशा प्रकारच्या केवळ तीन पोस्ट करुन फार मोठा कार्यक्रम या डॉक्टरांकडे राबवावयास देता, त्याविषयीचे धोरण बदलण्यात येईल काय? सीपीएस डीओएमएस केलेल्या माणसाकडे तीन पोस्ट असतात. त्यापैकी एक सर्जरीची आणि दोन ऑप्थॉल्मॉलॉजीच्या असतात. त्यासाठी एक धोरण आखून सीपीएस डीओएमएस झालेल्या डॉक्टरांना निदान सर्जिकल प्रोसीजर करण्यासाठी डिसअलाऊ करणार आहात काय?

डॉ.विलम मुंदडा :पहिल्या प्रश्नाचे उत्तर अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी दुस-या प्रश्नाचे उत्तर द्यावे. सीपीएस आणि डीओएमएस कोर्स आपल्याकडे मान्यताप्राप्त आहेत.

श्रीमती फौजिया खान :सभापति महोदय, परभणी के जिला शासकीय अस्पताल में मोतीबिंदू का आपरेशन करने के बाद करीब 33 लोगों की दृष्टि चली जाना बहुत दु:खद घटना है. इस घटना के बाद सम्माननीय स्वास्थ्य मंत्री जी ने सही कदम उठाए हैं, उसके लिए मैं उनका अभिनंदन करना चाहती हूं. लेकिन मेरा प्रश्न यह है कि इस घटना के लिए सर्जन कैसे जिम्मेदार हो सकता है ? क्योंकि इसमें किसी एक या दो लोगों की दृष्टि नहीं गई है बल्कि 33 लोगों की दृष्टि गई है. इस घटना के लिए केवल सर्जन को निलंबित किया गया है. जबकि इस घटना में दो कारण हो सकते हैं, पहला कारण यह हो सकता है कि ड्रग में मिलावट हो और दूसरा कारण यह हो सकता है कि आपरेशन के समय पर्याप्त सावधानी नहीं बरती हो. अगर ये कारण होंगे तो इस घटना के लिए आरएमओ पर भी जिम्मेदारी आती है. चूंकि इस निवेदन में आरएमओ के बारे में कुछ नहीं कहा है, केवल सर्जन को ही निलंबित करने की बात कही गई है. जबकि आपरेशन के समय हाइजीन मेन्टेन करने की जिम्मेदारी आरएमओ की होती है. अत: क्या आरएमओ के खिलाफ कार्रवाई की जाएगी ?

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.7.....

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, व्यवस्थितपणे काळजी घेतली गेली आहे. दुर्दैवाने 31 जणांची दृष्टी गेली त्याबाबत कोणाकोणाला दृष्टी दिली हे मीसन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्या प्रश्नाला उत्तर देत असताना सांगितले. 30 लोकांना पुढच्या काळात डॉ.लहाने व त्यांचे सहकारी डॉ.वांगीकर यांनी दुसऱ्या डोळ्याला दृष्टी देण्याचा प्रयत्न केला आहे. कारणे दाखवा नोटीस कोणाला बजावण्यात आली ते निवेदनामध्ये नमूद केलेले आहे. केवळ चुका गृहित धरुन कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली नाही. प्रि-ऑपरेटिव्ह केअर, पोस्ट-ऑपरेटिव्ह केअर जबाबदारी निश्चित करावी, म्हणून कारवाई केली आहे. आर.एम.ओ.ना शो कॉज नोटीस बजावू, योग्य ती कारवाई करु.

(नंतर श्री.खर्चे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यातील आयटीआयना घरगुती दराने वीजपुरवठा करणे

मु.शी.: राज्यातील आयटीआयना घरगुती दराने वीजपुरवठा करणे या विषयासंबंधी सर्वश्री दिलीपराव सोनवणे, विक्रम काळे, रामनाथ मोते, चंद्रकांत रघुवंशी, प्रा. बी. टी. देशमुख वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील शासकीय व खाजगी संस्था संचलित विना अनुदानित औद्योगिक प्रशिक्षण केंद्राच्या वीज जोडणी व वीज बिलासंबंधी प्रचलित नियमात बदल होण्याची गरज, वीज जोडणीसाठी फार मोठा भार वीज मंडळाकडून मंजूर करुन घेणे, डी.जी.ई.टी ची अट शिथील करावयाची गरज, विज बिलाची आकारणी वाणिज्य वा औद्योगिक दराने न करता विना अनुदानित व्यवसाय शिक्षणासाठी सवलतीचे वीज दर असण्याची गरज, शेजारील कर्नाटक सरकारने वीज बिल व विज जोडणी यात दिलेली भरघोस सवलत परंतु राज्यात अनेक वर्ष अव्यवहार्य पध्दतीने व वीज न वापरता आलेली भरमसाठ विजबिले व त्यामुळे थकलेली वीज बिले माफ होण्याची गरज, याकरिता गत 8 ते 10 वर्षापासून संबंधित संघटना व लोकप्रतिनिधींनी सतत प्रयत्न करणे, त्यांच्या मागण्यांबाबत निर्णय न होणे, त्यामुळे विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान, शिक्षकांमध्ये व संस्थाचालकांमध्ये औद्योगिक प्रशिक्षण केंद्रे सुरु ठेवण्याबाबत निर्माण झालेले चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही."

श्री. दिलीप वळसे-पाटील (उच्च व तंत्रशिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवावे.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे : राज्यातील शासकीय व खाजगी आय.टी.आय.मधून गोरगरीब विद्यार्थी शिक्षण घेत असतात. या आय.टी.आय. संस्थांना जो विद्युत पुरवठा करण्यात येतो तो कमर्शियल दराने न करता भविष्यात घरगुती आकार लावून विद्युत पुरवठा करण्यात येणार काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : महोदय, यापूर्वीच्या काळात लो-टेन्शन कंझुमर कॅटेगरीजसाठी कनेक्टेड लोड किती आहे हे पाहून स्थिर आकार लावत होतो. परंतु दरम्यानच्या काळात एमईआरसीमध्ये काही हिअरिंग झाल्यानंतर सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्यानंतर ज्या सँक्शन लोड किंवा कॉंट्रॅक्टर लोड आहेत त्याप्रमाणे चार्ज करण्याचे ठरविले आहे. या लक्षवेधी सूचनेमध्ये प्रश्न उपस्थित केला की, केंद्रीय प्राधिकरण डीजीईटी यांनी एखाद्या आय.टी.आय. ला किती मोटर्स असल्या पाहिजेत यासंदर्भात बंधने घातली होती. म्हणून एखाद्या आय.टी.आय. ने 10 के.व्ही.चा लोड घेतला आणि 50 मोटर्स लावल्या त्यामुळे बिलामध्ये डिफरन्सेस होत होत्या. परंतु सुधारित दराप्रमाणे सँक्शन्ड लोडवर चार्ज करणार असल्यामुळे आय.टी.आय. साठी घरगुती दर लावला तर कदाचित ती वीज महाग पडेल परंतु सध्या यासंबंधीचे दर निश्चित केलेले असल्यामुळे प्रचलित परिस्थितीमध्ये सुधारणा करणे शक्य नाही.

उपसभापती : माननीय जलसंपदा मंत्री यांनी कामकाज पत्रिकेवर पुढे दर्शविलेले कामकाज "लक्षवेधी सूचनेसंबंधीची अधिक माहिती" अगोदर घ्यावे, अशी विनंती केलेली आहे. त्यांनी ती माहिती सभागृहासमोर ठेवावी.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: लक्षवेधी सूचनेसंबंधीची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

श्री. अजित पवार (जलसंपदा मंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने "रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यातील आंबिवली या गावानजिक नागेश्वरी नदीवर बांधण्यात आलेल्या धरणाबाबत" या विषयासंधी श्री. जयंत प्र.पाटील, प्रा. शरद पाटील, वि.प.स. यांनी दिनांक 13 मार्च, 2008 रोजी दिलेल्या लक्षवेधी सूचनेच्या चर्चेच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार माननीय सभापतींनी निदेश दिल्याप्रमाणे अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : लक्षवेधी सूचनेसंबंधीची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली.

अधिक माहिती

(प्रेस : कृपया येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

उपसभापती : आता सभागृहाची विशेष बैठक स्थगित होईल आणि दुपारी 1.15 वाजता सभागृहाची नियमित बैठक पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.43 ते 1.15 पर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

<u>नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाबाबत</u>

सभापती : आज माझ्याकडे नियम 289 अन्वयेचे दोन प्रस्ताव आलेले असून पहिला प्रस्ताव डॉ. नीलम गो-हे, श्री. दिवाकर रावते, श्री. अरविंद सावंत, डॉ. दीपक सावंत यांनी 10. 55 वा दिलेला असून दुसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णीचा असून त्यांनी तो 11.50 वा. दिलेला आहे. हा प्रस्ताव 289 चा कसा होतो यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी एक दोन मिनिटात आपले विचार व्यक्त करावेत. नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाला परवानगी दिल्यास त्यावेळी सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडता येतील.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, आज आम्ही नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव दिलेला असून प्रस्तावाचा विषय महाराष्ट्राला परिचित आहे. दिनांक 27.2.2008 रोजी सांगली येथे शिव प्रतिष्ठानचे संस्थापक गुरुवर्य श्री. संभाजीराव विनायक भिडे तसेच त्यांच्या सहकार्यांनी जोधा अकबर चित्रपट बंद पाडण्याच्या संदर्भात आंदोलन केले होते. त्यांनी केवळ जोधा अकबर चित्रपट बंद करण्यासाठी आंदोलन केले नसून छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर, सन्मान आणि विचारांचा प्रसार राजकारण मध्ये न आणता करीत असतात. दिनांक 27 मार्च, 2008 रोजी मी स्वत: त्या स्पॉटला भेट दिली असून श्री. भिडे गुरुजींशी बोलले आहे. श्री. भिडे गुरुजींना सांगलीचे पोलीस अधिक्षक श्री. कृष्ण प्रकाश यांनी ज्याला संतापजनक म्हणता येईल अशा प्रकारे लाठीमार केलेला आहे. हे करीत असतांना श्री. कृष्ण प्रकाश यांनी शिवस्मारकाला लाथ मारुन बुटांसह आत प्रवेश केला. त्याच बरोबर भिडे गुरुजींना रक्त बंबाळ होईपर्यंत मारहाण करण्यात आली. वैद्यकीय उपचाराविना गुरुजींना दोन ते अडीच तास रुग्णालयात तडफडत बसावे लागले होते. अनेक कार्यकर्त्यांनी मध्ये पडण्याचा प्रयत्न केला असता परंतु त्यांना मध्ये पडू दिले नाही. हा विषय सभागृहाला परिचित असतांना देखील एवढया दिवसानंतर या विषयासाठी आम्हाला नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव द्यावा लागतो याचे कारण असे आहे की, शिवसेना कार्याध्यक्ष श्री. उध्दवजी ठाकरे,

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हे सांगलीच्या दौ-यावर असतांना स्वत: श्री. भिडे गुरुजीनी त्यांना याबाबतीत सांगितले आहे... अडथळा.. सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे अशी माझी आपल्याला विनंती आहे. एका पोलीस अधिकाऱ्याला टारगेट करणे एवढाच माझा हेतू नाही. तर श्री. भिडे गुरुजी सारख्या राष्ट्रभक्त व्यक्तीला मारहाण करण्यात आली होती . ब्रिटीश काळात ज्या पध्दतीने मारहाण केली जात होती त्याच पध्दतीने श्री. भिडे गुरुजी यांना मारहाण केलेली असून त्यांची वैद्यकीय तपासणी झालेली नाही. आता अधिवेशनाचा शेवटचा आठवडा सुरु आहे. पत्रकार आणि फोटोग्राफरला मारहाण करण्यात आली होती. या संदर्भात श्री. भिडे गुरुजींना माननीय गृह मंत्र्यांनी आश्वासन दिले होते ते मी वर्तमानपत्रातून वाचलेले आहे. त्यांनी असेही म्हटले होते की ." बाहेरच्या लोकांनी सांगलीची उठाठेव करु नये ". सांगलीचे जिल्हाधिकारी श्री.चव्हाण यांचा या संबंधीचा एक अहवाल शासनाकडे प्राप्त झालेला आहे. उप मुख्यमंत्र्यांनी केलेल्या घोषणेनुसार कोल्हापूर रेंजचे महानिरीक्षक श्री. धिवरे यांनी सुध्दा शासनाकडे एक अहवाल दिलेला आहे. या विषयावर आम्ही एक लक्षवेधी सूचना दिली होती ती स्वीकृत करण्यात आलेली आहे त्याचप्रमाणे अर्धा तास चर्चेची सूचना दिली होती ती देखील स्वीकृत करण्यात आली आहे असे असतांना सातत्याने जर ही चर्चा दडपली जाणार असेल तर ही कोणत्या पध्दतीची लोकशाही आहे आणि ही कोणत्या पध्दतीने विधानमंडळाच्या कामकाजाचा आपण विचार करीत आहोत ?. श्री. भिडे गुरुजी यांनी परवाच्या भेटीत आम्हाला असे सागितले आहे की, त्यांचे अनेक समर्थक आत्महत्या करण्याच्या तयारीने मुंबईला येणार आहेत ,तेव्हा या विषयावर चर्चा होऊन आम्हाला निर्णायक उत्तर मिळाले पाहिजे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

सभापती : सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी देखील या संदर्भात या पूर्वी सागितलेले आहे की, या चर्चेच्या अनुषंगाने त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचे दडपण नाही आणि दडपण असण्याचे काही कारण नाही. कोणाच्याही दडपणाखाली सभागृहाचे काम चालत नाही. या ठिकाणी मी हा मुद्दा यासाठी स्पष्ट करु इच्छितो की, मघाशी सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केल्याप्रमाणे या विषयावर लक्षवेधी सूचना ॲडमिट करण्यात आली आहे त्याचप्रामाणे अर्धा तास चर्चासुध्दा ॲडमिट करण्यात आलेली आहे. त्याच प्रमाणे या विषयावर नियम 93 अन्वये सूचना देण्यात आली होती. परंतु ती सूचना स्वीकारण्यात आली नव्हती. याचे कारण असे की याच

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

विषयावरील लक्षवेधी सूचना मान्य केलेली असल्यामुळे अन्य आयुधाच्या माध्यमातून पुन्हा तोच विषय उपस्थित करणे योग्य नाही.

श्री.आर.आर.पाटील : या विषयावर अर्धा तास चर्चा घेण्यात यावी.

डॉ.नीलम गो-हे : अर्धा तास चर्चा न घेता एक तास चर्चा घेण्यात यावी.

सभापती : या विषयावर अर्धा तास चर्चा व लक्षवेधी सूचना दिली आहे असा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केलेला आहे

डॉ.नीलम गो-हे : आम्ही सर्वच आयुधांचा वापर करीत असतो.

सभापती : या विषयावर 23 एप्रिल 2008 रोजी लक्षवेधी सूचना घेण्यात येईल नियम 289 च्या प्रस्तावासबंधीचा विषय आजच्या कामकाजपत्रिकेवर नसल्यामुळे मी नियम 289 चा प्रस्ताव नाकारत आहे. तसेच या विषयावर माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे शासनाची उत्तर देण्याची तयारी आहे. तेव्हा 23 तारखेला लक्षवेधी सूचना घेण्यात येईल.

यानंतर दुसरा नियम 289 चा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री..गुरुनाथ कुलकर्णी यांचा आहे. त्यांनी थोडक्यात आपले म्हणणे मांडावे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, अत्यंत महत्वाच्या विषयाकडे मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. या सभागृहातील सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांची भारतीय जनता पक्षाच्या मुंबई विभागाचे अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल सर्व प्रथम मी त्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय,नियम 289 अन्वये एका अत्यंत महत्वाच्या विषयावर या ठिकाणी चर्चा उपस्थित करु इच्छितो आणि सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. ज्या पक्षाने या देशाचे नेतृत्व केले होते , ज्या पक्षाने या देशामध्ये एनडीएच्या नावाखाली सरकार चालविले होते, ज्या पक्षाने "Politics with difference, Party with difference." असे सांगितले होते.

सभापती : हा 289 चा प्रस्ताव कसा होऊ शकतो एवढेच सन्माननीय सदस्यांनी सांगावे.

श्री.. गुरुनाथ कुलकर्णी : मी तेच सांगत आहे. Politics with difference, Party with difference." असे ज्या पक्षाने सांगितले होते. पक्षाची शिस्त आहे व या शिस्तीच्या मर्यादेत राहूनच आम्ही पक्षाचे काम करीत असतो असे ज्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी संगितले होते, ज्यांनी नाकाने कांदे सोलून इतरांचे चारित्र्य हनन करण्याचा प्रयत्न केलेला आहे .....

(गोंधळ)..

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना मी सांगू इच्छितो की ...

श्री.गुरुनाथ कुलकर्णी :माझे म्हणणे सन्माननीय सदस्यांना ऐकावेच लागेल.

सभापती : हा 289 चा प्रस्ताव कसा होऊ शकतो एवढया मर्यादेत सन्माननीय सदस्यांनी एक दीड मिनिटामध्ये आपले म्हणणे मांडावे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मी थोडक्यात माझे म्हणणे मांडणार आहे.

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरूनाथ कुलकर्णी .....

सभापती महोदय, आजच्या वर्तमानपत्रांमध्ये मोठ्या हेडिंगमध्ये ...

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम उठून बोलतात.... अडथळा ...)

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण सारे जण अशा प्रकारे एकदम उठून बोलू लागलात तर मी सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांचे बोलणे ऐकू शकणार नाही तसेच सभागृहाचे कामकाज देखील करू शकणार नाही. मी सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांना विनंती करतो की, त्यांनी दिलेला प्रस्ताव नियम 289 चा कसा होतो हे एक मिनिटामध्ये सांगावे. .... (अडथळा)

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी ज्या प्रकारे येथे भाषण करीत आहेत ते गैर आहे....

सभापती : मी त्यांना सांगतो आहे की, त्यांनी केवळ 1 मिनिटामध्ये हा प्रस्ताव 289 खाली कसा येऊ शकतो हे सांगावे. .... (अडथळा)

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मला आपले संरक्षण मिळाले पाहिजे. ....

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, हे काय चालले आहे ? ...

सभापती : सर्व सन्माननीय सदस्यांनी प्रथमत: खाली बसावे, शांत बसावे. मी सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांना विनंती करतो की, त्यांनी एक मिनिटामध्ये हा प्रस्ताव नियम 289 खाली कसा येऊ शकतो एवढ्या पुरतेच सांगावे, त्यांनी अधिक भाषण करू नये. ...

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. ...

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, या सदनामध्ये अनेक प्रस्ताव अनेकजण मांडत असतात. तशाच प्रकारे सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांनी एक प्रस्ताव दिलेला आहे आणि अशा वेळी त्यांचे त्याबाबत काय म्हणणे आहे ते आपण सर्वांनी ऐकून घेतले पाहिजे, त्यासाठी त्यांना संरक्षण दिले पाहिजे. समोरच्या मंडळींचे आम्ही नेहमीच सर्व ऐकत असतो. तेव्हा आता या बाजूने देखील जे बोलले जात आहे ते त्यांनी ऐकून घेतले पाहिजे. या बाजूचे बोलणे ऐकूनच घ्यायचे नाही असे आपल्याला करता येणार नाही. आपण सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी हे काय सांगत आहेत ते ऐकून घेतले पाहिजे. ...

..... एल 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. ... अडथळा .... सभापती महोदय, सभागृहाचे नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री व गृहमंत्री यांनी आता या प्रस्तावा संबंधात बोलताना सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी काय बोलत आहेत ते ऐकून घेतले पाहिजे म्हणून सांगितले. ते आम्हालाही कळते. हे वरिष्ठ सभागृह आहे, वरिष्ठांचे सभागृह आहे. या सभागृहामध्ये जनतेच्या प्रश्नासंबंधात प्रश्न, प्रस्ताव वगैरे दिले पाहिजे, त्यावर बोलले पाहिजे असते. नियम 289 हा महत्त्वाचा नियम असून प्रश्नोत्तराचा तास स्थगित ठेवून त्या नियमाखाली चर्चा घेता येऊ शकते. तेव्हा ....

सभापती : मी सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांना सांगू इच्छितो की, जो निर्णय मी द्यावयाचा आहे त्यावर त्यांनी बोलणे बरोबर नाही. ... मी सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांनाही सांगू इच्छितो की, त्यांनी एक मिनिटामध्ये हा प्रस्ताव नियम 289 खाली कसा काय घेता येऊ शकतो एवढ्या पुरते सांगावे. ...

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, मी माझा हरकतीचा मुद्दा आपल्यापुढे मांडत आहे, आपण मला संरक्षण दिले पाहिजे. आपण मला माझा हरकतीचा मुद्दा मांडण्यासाठी परवानगी दिलेली आहे, आपण तो पूर्णपणे ऐकून घ्यावा. सभापती महोदय, प्रश्नोत्तराचा तास हा सभागृहाच्या कामकाजातील एक महत्त्वाचा तास आहे आणि हा प्रश्नोत्तराचा तास स्थगित ठेवून, बाजूला ठेवून अन्य त्यापेक्षाही गंभीर अशा प्रश्नाबाबत तातडीने चर्चा घडवून आणावी यासाठी नियम 289 खाली प्रस्ताव देता येऊ शकतो. म्हणजेच प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याइतका तातडीचा आणि तितकाच गंभीर असा विषय या प्रस्तावाचा असला पाहिजे. पण ज्या पद्धतीने आणि जो विषय सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांनी येथे छेडला आहे तो राजकीय विषय आहे, राजकीय पक्षाचा विषय आहे. त्यासाठी सदनाचा वेळ खर्च होऊ नये एवढीच माझी आपल्याला विनंती आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी हरकतीचा मुद्दा मांडला आहे. सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांनी नियम 289 खाली प्रस्ताव दिलेला आहे तो विषय नियम 289 खाली कसा काय घेता येऊ शकतो आणि तो विषय कोणता आहे ते सांगण्यासाठीच मी सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांना परवानगी दिलेली आहे आणि त्यांनीही केवळ त्या मर्यादेतच एक मिनिटामध्ये बोलावे. .... एल 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय असे जे नेते आहेत, त्यांच्या संबंधात आज वर्तमानपत्रात अगदी मोठ्या हेडींगमध्ये आलेले आहे की, 'श्री.गोपीनाथ मुंडे यांचा राजीनामा.' सभापती महोदय, श्री.गोपीनाथ मुंडे यांनी या राज्याचे नेतृत्त्व केलेले आहे. त्यांनी युती शासनाच्या काळात उपमुख्यमंत्री म्हणून या राज्यात सरकारचे नेतृत्त्व केलेले आहे. असे हे व्यक्तिमत्त्व आजही विधानसभेचे सदस्य आहे. ...

(यानंतर सौ.रणदिवे .... एम 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी . . . .

त्यांनी असे जाहीरपणे सांगितले आहे की, विधानसभेमध्ये माझा आवाज दोन महिने दबलेला होता. माझी मुस्कटदाबी झाली. मला तेथे बोलण्याची संधी दिलेली नाही.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. सन्माननीय सदस्यांनी 289 अन्वये या प्रस्तावावर का चर्चा करण्यात यावी, एवढयापुरतेच सांगावे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझा अधिकार आहे. संपूर्ण राज्याला ही गोष्ट समजली पाहिजे की, सन्माननीय सदस्य श्री.गोपीनाथ मुंडे यांच्यासारखा जो मास लीडर आहे, त्यांनी राजीनामा देताना सांगितले की,"भारतीय जनता पक्षामध्ये केंद्रीय पातळीवर लोकशाही नाही, तेथील लोकशाही संपलेली आहे आणि लोकशाही नष्ट झालेली आहे."अशा प्रकारे जर एक नेते बोलत असतील तर त्याची सदनाने दखल घेतली पाहिजे आणि त्यासंबंधात नियम 289 अन्वये चर्चा झाली पाहिजे अशी माझी मागणी आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, या सदनाचे ज्येष्ठ नेते सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथजी कुलकर्णी यांनी नियम 289 अन्वये एक प्रस्ताव दाखल केलेला आहे. आपण हा प्रस्ताव केवळ एका व्यक्तिपुरता मर्यादित ठेऊ नये. कारण या प्रस्तावाची व्याप्ती फार मोठी आहे. या राज्यामध्ये एक बहुजन समाजाचा माणूस विविध पदांवर काम करीत आहे, लोकांमध्ये काम करीत आहे. बहुजन समाजाचे नेतृत्व करीत आहे आणि बहुजन समाज ज्यांच्याकडे एक उद्याचे भवितव्य म्हणून पहात आहे, त्या माणसाचाच गळा लोकशाही मार्गाने घोटण्याऐवजी दडपशाही मार्गाने घोटण्याचे काम करीत असेल, हा पक्ष केवळ काही ठराविकच सर्वणांचा असल्यासारखा आहे आणि या पक्षामध्ये ज्यांनी जे काम केले आहे, त्या माननीय श्री.गोपीनाथ मुंडे यांच्या व्यथा आपण सर्वांनी ऐकल्यानंतर लोकशाहीच्या हिताच्यादृष्टीने या सर्वोच्य सभागृहामध्ये सदरहू विषयावर चर्चा होणे आवश्यक आहे. म्हणून याठिकाणी नियम 289 अन्वये जो प्रस्ताव देण्यात आलेला आहे, तो महत्वाचा आहे असे माझे म्हणणे आहे. याठिकाणी पक्षाचा नेता कोण आहे ? हे महत्वाचे नाही. जेव्हा बहुजन समाजाचा माणूस पुढे येतो आणि बहुजन समाजाचा चेहेरा नसलेला पक्ष, एका बहुजन समाजाच्या राजकीय नेत्याचा गळा घोटण्याचे काम करीत असेल तर त्यावेळी त्यांचे रक्षण करण्यासाठी याठिकाणी नियम 289 खाली जो प्रस्ताव देण्यात आला आहे, त्याबाबत चर्चा झाली पाहिजे. खऱ्या अर्थाने लोकशाहीच्या नावाखाली साधनशुचितेच्या नावाखाली सांगितले जाते की,.....

. . . .एम-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव . . . .

आमच्या पक्षामध्ये लोकशाही आहे, आमच्या पक्षामध्ये साधनशुचिता आहे, आमच्या पक्षामध्ये न्याय आहे, आमच्या पक्षामध्ये निर्णय आहे हे जे सांगत आहेत, त्यांचा बुरखा फाडण्याचे काम या प्रस्तावाच्या माध्यमातून व्हावयास पाहिजे. सभापती महोदय, यासाठी आपण नियम 289 अन्वये जो प्रस्ताव दिलेला आहे, तो आपण स्विकारला पाहिजे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, या सदनातील एक ज्येष्ठ सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. या राज्याचे . . . .

सभापती : सन्माननीय सदस्यांनी अर्ध्या मिनिटामध्ये आपले म्हणणे मांडावे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मला बोलावयास दिले तर अर्ध्या मिनिटामध्ये ते पूर्ण होईल. या राज्याचे ज्येष्ठ नेते आणि या देशातील ओ.बी.सीं.चे अग्रणी नेते यांच्या वक्तव्याबद्दल सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. तो प्रस्ताव नियम 289 अन्वये चर्चेसाठी का घेण्यात यावा एवढेच सांगण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मला आपले लक्ष दोन गंभीर मुद्यांकडे वेधावयाचे आहे. विधानसभेचे सन्माननीय सदस्य श्री.गोपीनाथ मुंडेसाहेबांनी त्यांच्या पक्षातील सर्व पदांचा राजीनामा दिलेला आहे. कोणत्याही पक्षातील नेत्याने राजीनामा द्यावा किंवा न द्यावा हा त्या पक्षाचा अंतर्गत मामला आहे. त्याबाबत सदनामध्ये चर्चा करण्याचे कारण नाही आणि मी येथे त्याबाबत बोलण्यासाठी उभा नाही. परंतु माननीय श्री.गोपीनाथ मुंडे यांनी जे दोन मुद्दे उपस्थित केलेले आहेत, त्याचा या सदनाशी संबंध येतो, त्यामुळे येथे त्या प्रश्नांची चर्चा करणे भाग आहे.

सभापती महोदय, पहिला मुद्दा म्हणजे पक्षांतर्गत लोकशाहीचा मुद्दा मांडला. त्यांनी असे सांगितले की, पक्षामध्ये मुस्कटदाबी होते आणि दुसरा मुद्दा म्हणजे पक्षांतर्गत लोकशाही संपुष्टात आलेली आहे. या देशातील राजकीय पक्षांची निवडणूक आयोगाच्या कायद्यानुसार त्यांची नोंदणी होते आणि मग त्यांना त्याची रेकग्नीशन मिळते. त्या कायद्यामध्ये स्पष्टपणे तरतूद आहे की, आमचा घटनेवर विश्वास आहे. लोकशाही, समजावाद, धर्मनिरपेक्षता यावर आमचा विश्वास आहे. असे प्रतिज्ञापत्रावर . . . .

सभापती : सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात म्हणणे मांडावे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी फक्त मुद्दा मांडत आहे. मी इतर काही बोलत ..

. . . .एम-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नाही. असे राजकीय पक्षाला प्रतिज्ञापत्रावर लिहून द्यावे लागते आणि त्यानंतरच त्या राजकीय पक्षाला निवडणूक आयोग मान्यता देत असते. अन्यथा निवडणूक आयोग ही मान्यता रद्द करते. एका राजकीय पक्षाच्या एका जबाबदार नेत्याने अतिशय महत्वाचे विधान केलेले आहे की, पक्षांतर्गत लोकशाही संपलेली आहे. हे विधान या राज्यातील एका नेत्याने केलेले आहे. त्यामुळे याबाबतीत येथे चर्चा होणे अतिशय आवश्यक आहे.

यानंतर कु.गायकवाड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी आपले विचार मांडावेत.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माझा दुसरा महत्वाचा मुद्दा आहे व तो अधिक गंभीर आहे. आपण मला बोलण्याकरिता दोन मिनिटे द्यावीत. या ठिकाणी मी एकही राजकीय वाक्य बोलणार नाही. 289 चा प्रस्ताव सभागृहामध्ये का उपस्थित केला पाहिजे हे मी या ठिकाणी सांगणार आहे. माननीय श्री. गोपीनाथ मुंडे यांनी असे विधान केले आहे की, त्यांना सभागृहामध्ये बोलू दिले जात नाही. सन्माननीय सदस्य श्री. मुंडे हे विधानसभेतील सदस्य असले तरी देखील त्यांच्या पक्षातील सदस्य देखील या सभागृहामध्ये आहेत. एखाद्या सदस्यास सभागृहामध्ये बोलू न देणे हा लोकशाहीवर आघात आहे. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांची देखील कशा प्रकारे मुस्कटदाबी झालेली आहे ते आम्ही पाहिलेले आहे. या सभागृहामध्ये जे सदस्य निवडून येतात त्यांना बोलण्याचे स्वातंत्र्य आहे की नाही हा मुद्दा महत्वाचा आहे.

सभापती : मी आपणास सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री. गोपीनाथ मुंडे हे विधानसभेतील सदस्य आहेत.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मुडे हे विधानसभेतील सदस्य आहेत हे मला मान्य आहे. परंतु या पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना सभागृहामध्ये बोलू दिले जात नाही. विधानपरिषदेमध्ये जे सदस्य आहेत त्यांच्या अधिकाराच्या रक्षणाचा हा मुद्दा आहे. ते देखील आमचे बांधव आहेत.

श्री. संजय दत्त : ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी या ठिकाणी नियम 289 अन्वये जो प्रस्ताव दिलेला आहे, त्याला पाठींबा देण्याकरिता मी उभा आहे.

आदरणीय नेते श्री. गोपीनाथ मुंडे हे महाराष्ट्र राज्यामधील एक ज्येष्ठ नेते आहेत. राज्यामधील राजकीय, सामाजिक चळवळीमध्ये त्यांचा महत्वाचा वाटा आहे. त्यांच्या सारख्या एखाद्या ज्येष्ठ नेत्याने आपल्याला दाबले जात आहे, आपला आवाज दाबला जात आहे असे जाहीरपणे सांगितले आहे. त्यामुळे असा आरोप करणे ही बाब पक्षांतर्गत राहत नाही. त्यांचे वक्तव्य हे जाहीर वक्तव्य आहे. काही मंडळींनी त्यांच्या सुरक्षिततेबाबत देखील चिंता व्यक्त केली होती. माझी विनंती आहे की, हा विषय महत्वाचा असल्यामुळे, हा प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन या विषयावर त्वरीत चर्चा घेण्यात यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी या ठिकाणी जो प्रस्ताव मांडलेला आहे, तो कसा अप्रस्तुत आहे हे सांगण्याकरिता मी उभा आहे. हा प्रस्ताव आणण्याची मनोभूमिका " स्वत:चे ठेवायचे झाकून " अशा पद्धतीची आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकत्र बोलतात.)

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, ..

सभापती : या विषयासंदर्भात बोलण्याकरिता आपल्या बाजूच्या चार सन्माननीय सदस्यांना बोलण्याची परवानगी दिलेली आहे. आता सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी त्यांचे म्हणणे मांडावे.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते या ठिकाणी सांगत आहेत की, स्वत:चे ठेवायचे झाकून... याबाबत मी सांगू इच्छितो की, आपले जे झाकलेले हाते ते आता उघडे झालेले आहे. ही आपली विवंचना आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आतापर्यंत काय झाकलेले आहे व काय उघडे आहे या बाबत मी काहीही बोललेलो नाही. तेव्हा सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी तरी माझे म्हणणे ऐकून घ्यावे. इतर सन्माननीय सदस्यांचे मी समजू शकतो. कालचा रविवार हा राजीनाम्यांचा रविवार होता. काल दोन ज्येष्ठ नेत्यांनी राजीनामा दिला होता. आपणही ही बातमी वर्तमानपत्रामध्ये वाचली असेल. माननीय श्री. दत्ता मेघे यांनी देखील काल राजीनामा दिला आहे.

यानंतर श्री. बरवड..

:

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात)

सभापती : नियम 289 अन्वये जो प्रस्ताव दिलेला आहे तो सन्माननीय श्री. गोपीनाथ मुंडे यांच्या संदर्भात आहे. अन्य सदस्यांच्या संदर्भात माझ्याकडे नियम 289 अन्वये प्रस्ताव आलेला नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, श्री. दत्ता मेघे हे या सदनाचे सदस्य नसल्यामुळे त्यांच्याबद्दल या ठिकाणी चर्चा उपस्थित करु शकत नाही.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, या सदनामध्ये आपण ज्या प्रस्तावावर चर्चा करण्यास परवानगी दिलेली आहे.....

श्री. दिवाकर रावते : माननीय सभापतींनी चर्चा करण्यास परवानगी दिलेली नाही.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, या प्रस्तावातील विषय हा नियम 289 च्या प्रस्तावाचा कसा होतो हे सांगण्यासाठी आपण परवानगी दिलेली आहे. या ठिकाणी जो प्रस्ताव आला आहे तो श्री. गोपीनाथ मुंडे यांच्या बद्दलचा आहे. सभागृहामध्ये त्यांना बोलू दिले जात नाही, दोन वर्षे मुस्कटदाबी झाली हा यातील महत्वाचा भाग आहे. या सदनाशी त्याचा एवढ्यासाठी संबंध येतो की, या सदनातील एकतृतियांश सदस्य विधानसभा सदस्यांकडून निवडून दिले जातात. त्यामुळे विधानसभा सभागृहामध्ये काही घडत असेल तर त्याचा या सभागृहाशी निश्चितपणे संबंध आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना या प्रस्तावावर बोलण्यासाठी परवानगी द्यावी. परंतु त्याच्या पलीकडे ते जे राजकीय बोलत आहेत ते रेकॉर्डवरुन काढून टाकावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी मुद्दा सोडून बोललो असे जर आपण सांगितले तर मी एका मिनिटात खाली बसेन. सभापती महोदय, मी आपणास नम्रपणे सांगतो की, मी विषय सोडून बोललो तर आपण लगेच सांगावे, मी खाली बसेन. मी एवढेच म्हणालो की, श्री. दत्ता मेघे हे आपल्या सदनाचे सदस्य नाहीत त्यामुळे त्यांच्या संदर्भात आपण चर्चा करु शकत नाही. आपण समजून घ्यावे. परंतु काल जे घडले तो प्रश्न त्यांच्या पक्षाचा अंतर्गत प्रश्न असल्यामुळे या विधिमंडळातील संकेताप्रमाणे, प्रथेप्रमाणे सभापती महोदयांनी मान्यता द्यावयाची की नाही हे सांगण्यासाठी आम्ही उभे असताना मी आपल्याला आवर्जून सांगू इच्छितो की, पध्दत आणि प्रथा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

अशी आहे की, विधानसभा सभागृहाचा सदस्य असेल तर त्यांच्या संदर्भात विधान परिषद सभागृहात आणि विधान परिषद सभागृहाचा सदस्य असेल तर विधानसभा सभागृहात त्यांच्या संदर्भात चर्चा करता येत नाही. सन्माननीय श्री. गोपीनाथ मुंडे यांच्यासंदर्भात भावना व्यक्त केल्या त्याबद्दल आभार मानतो. आपण विरोधी पक्षाचा एवढा आदर करता. भविष्यात आपण पक्ष सोडला तर त्यांच्याबरोबरच जाल याबद्दल धन्यवाद देतो. मी आदर व्यक्त करीत आहात असे जे म्हणालो त्याबद्दल सन्माननीय सदस्या श्रीमती दराडेताई यांना राग का ? उद्या आपल्या पक्षात काही झाले नाही तर त्यांच्याकडेच जावे लागेल. सभापती महोदय, मी आपल्याला एवढीच विनंती करतो की, सन्माननीय श्री. गोपीनाथ मुंडे यांनी काय केले आणि काय झाले हा वेगळा विषय आहे. ते विधानसभा सभागृहाचे सदस्य आहेत.

श्री. आर. आर. पाटील : ते महत्वाचे नाहीत काय ?

श्री. दिवाकर रावते : मी पुढे काही बोललो काय ? सभापती महोदय, आमच्या सभागृहाचे नेते आज इतके पॅनिक का होत आहेत ? सन्माननीय श्री. गोपीनाथ मुंडे यांनी असे जाहीर केलेले आहे की, मी थेट विधानसभेमध्ये यासंदर्भात बोलणार आहे. सन्माननीय श्री. गोपीनाथ मुंडे हे विधानसभा सभागृहाचे सदस्य असताना या सभागृहामध्ये त्यांच्या संदर्भात कोणतीही चर्चा किंवा खुलासा या ठिकाणी करु शकत नाही. ते आता विधानसभा सभागृहामध्ये भाषण करीत आहेत. संकेत मोडून एखादी गोष्ट करणे अनुचित ठरेल एवढेच मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी एवढे पॅनिक व्हावे अशी परिस्थिती नाही. श्री, दत्ता मेघे सुध्दा सन्माननीय सदस्य होते. म्हणून कोणाचाही अनादर होता कामा नये अशी माझी भावना आहे. त्यामुळे याबाबत चर्चा होऊ नये एवढ्यापुरती मी आपल्याला विनंती करतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी सभागृहात उपस्थित नसताना नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी मांडला. त्यावर या ठिकाणी चर्चा सुरु झाली. या ठिकाणी हा विषय नियम 289 च्या प्रस्तावाचा कसा होतो याची चर्चा सुरु असताना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

श्री. पांडुरंग फुंडकर .....

मी सन्माननीय श्री. गोपीनाथ मुंडे यांचे विधानसभा सभागृहातील स्टेटमेंट ऐकत होतो. त्यांनी असे जाहीर केले होते की, मी थेट सभागृहात जाऊन यासंबंधी खुलासा करीन. त्यांनी आता विधानसभा सभागृहात खुलासा केलेला आहे. त्यांनी सांगितले आहे की, माझे माननीय अध्यक्ष साहेबांसंबंधी काही मत नाही,

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

दूराग्रह नाही, त्यांनी माझ्यावर प्रेमच केले. सन्माननीय सदस्य श्री.एकनाथराव खडसे-पाटील यांच्यावर माझा आरोप नाही. परंतु गेली 3 वर्षे मी सभागृहामध्ये बोललो नाही, असे म्हटले होते. त्याबद्दल माझे काहीही म्हणणे नाही. विधानसभेमध्ये मला बोलू दिले नाही, असे जे छापून आले आहे, त्याबद्दल माझे काही म्हणणे नाही. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गोपीनाथ मुंडे यांनी राष्ट्रीय सरचिटणीस पदाचा दिलेला राजीनामा ही पक्षांतर्गत बाब आहे, अशा घटना सर्वच पक्षामध्ये घडतात. ते या सदनाचे सदस्य नसताना त्यासंबंधी नियम 289 अन्वये प्रस्ताव आणणे बरोबर नाही. त्यांनी खालच्या सदनात खुलासा केलेला आहे. त्यामुळे हा विषय येथेच संपविला तर बरे होईल अशी माझी आग्रहाची विनंती आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, एका अनावश्यक विषयाला या सर्वोच्च सभागृहात स्थान दिले गेले. या विषयाची बातमी आजच्या वर्तमानपत्रात आलेली आहे. या बातमीच्या आधारे नियम 289 अन्वये प्रस्ताव देण्यात आला आहे. यामधील पहिली गोष्ट अशी आहे की,...

श्री.आर.आर.पाटील : निदान आपण तरी त्यांच्यावर अन्याय करु नका.

श्री.पांडुरंग फुंडकर : त्यांच्यावर कोणीही अन्याय केलेला नाही, हे त्यांनी मान्य केलेले आहे, माननीय अध्यक्षांनी सुध्दा मान्य केलेले आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सन्माननीय उपमुख्यमंत्री हे या सदनाचे नेते आहेत. त्यामुळे आपण सदनाच्यावतीने भूमिका मांडली पाहिजे. आपल्याकडून ही अपेक्षा नाही.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय,....

श्री.मधुकर सरपोतदार : सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांचे वक्तव्य ऐकलेले आहे. आता आमचे आपण ऐकून घ्यावे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, आदरणीय सदस्य श्री.मधुकरराव सरपोतदार हे मघाशी सभागृहामध्ये उपस्थित नव्हते. शिवप्रतिष्ठानचे श्री.संभाजीराव भिडे गुरुजी यांना मारहाण झाल्यावर ते श्री.उद्धव ठाकरे यांना भेटले होते. सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गो-हे यांनी त्या विषयाच्या संदर्भात नियम 289 चा प्रस्ताव दिला होता, मग आजचा हा विषय नियम 289 चा का होऊ शकत नाही ?

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव आपण खाली बसावे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मी कोणाच्याही भाषणात व्यत्यय आणला नव्हता. मला सदनामध्ये येण्यास का उशीर झाला ते सांगतो. शासनाच्या मेहेरबानीमुळे माझ्यावर 1992-93 सालातील केसेस चालू आहेत. सत्र न्यायालयामध्ये सकाळी 11 वाजल्यापासून मी बसून होतो. आजचे हियरिंग संपल्यानंतर आता मी येथे आलो आहे. येथे आल्यानंतर दुसरे आश्चर्य पहावयास मिळाले आहे. सन्माननीय सदस्य श्री.गोपीनाथ मुंडे यांनी पक्ष नेतृत्वाचा राजीनामा दिलेला आहे. प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिलेला नाही किंवा आमदारकीचाही राजीनामा दिलेला नाही. तसेच त्यांनी इतर कोणत्याही पदाचा राजीनामा दिलेला नाही. ते एका मोठया पक्षाचे नेते आहेत, बहुजन समाजाचे नेते आहेत, त्याबद्दल आम्हाला काही म्हणावयाचे नाही. हा विषय नियम 289 मध्ये कसा बसतो हे सांगण्यासाठी येथे युक्तीवाद केला जात आहे, हा महत्वाचा प्रश्न आहे. कदाचित ते राजकारणाच्या दृष्टीने महत्वाचे असेल. परंतु त्यांनी आमदारकीचा राजीनामा दिला नाही. त्यामुळे त्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न येथे येत नाही. आपण नियम 289 मान्य करु नये. याबाबत सभागृहाच्या नेत्यांनीच विचार करावयास पाहिजे होता. परंतु त्यांनी राजकीय दृष्टीकोनातून हा विषय आणला आहे. आपल्याकडून अशी अपेक्षा नव्हती. आपण या सदनाचे नेते आहात. हा विषय मर्यादित स्वरुपाचा आहे. तो नियम 289 चा होऊ शकत नाही. धन्यवाद.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी आणि सत्तारुढ पक्षाच्या अन्य सन्माननीय सदस्यांनी हा विषय नियम 289 मध्ये कसा बसतो हे सांगण्यासाठी आपली मते मांडली आहेत. या प्रस्तावासंबंधी सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी देखील आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

नंतर श्री.शिगम

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी एक मुद्दा उपस्थित केला. मला असे वाटते की, कधी तरी 289च्या प्रस्तावाच्या संदर्भात माझ्या दालनामध्ये या सभागृहाचे नेते, विरोधी पक्षनेते, गटनेते यांच्या बरोबर एकत्रितपणे चर्चा केली पाहिजे. अनेक वेळा 289चे दोन, तीन, चार असे प्रस्ताव येतात. सभागृहाच्या कामकाजाला सुरुवात होण्यापूर्वीच्या आधी एक तास सभापतींकडे प्रस्ताव आला तर तो प्रस्ताव मी या ठिकाणी आपल्या समोर मांडतो आणि तो 289चा प्रसताव कसा होतो या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांचे म्हणणे ऐकून घेतो. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे तसेच सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितल्याप्रमाणे ज्या ज्या वेळी अशा तऱ्हेचा 289चा प्रस्ताव येतो त्यावेळी त्यावर दोन्ही बाजूकडून एका पेक्षा जास्त सन्माननीय सदस्य बोलतात. या अनुषंगाने तांत्रिकदृष्टया सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी मांडलेल्या प्रस्तावासंदर्भात मी निर्णय देत आहे...

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, आपण जो निर्णय देणार आहात तो आमच्यासाठी अन्यायकारक असता कामा नये..

सभापती : आजच्या कामकाजपत्रिकेवरील विषयामध्ये हा विषय नाही. म्हणून दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांचे म्हणणे ऐकल्यानंतर या विषयावर चर्चा करण्याकरिता मी परवानगी देऊ शकणार नाही. मी एवढेच सांगेन की, या निमित्ताने दोन्ही बाजूकडून झालेली चर्चा मी तपासून घेईन आणि त्यामधे एखादा शब्द गैर असेल तर तो काढून टाकीन.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सामाजिक हिताच्यादृष्टीने महत्वाचा प्रश्न असेल तरच आपण 289च्या प्रस्तावाला प्राधान्य द्यावे.

सभापती : सभागृहाचे नेते, विरोधी पक्षनेते, गट नेते यांच्या बरोबर जेव्हा चर्चा आणि विचारविनिमय करण्यात येईल त्यावेळी कोणत्या परिस्थितीमध्ये 289चा प्रस्ताव सभागृहासमोर आणावा आणि कोणत्या परिस्थितीमध्ये तो मी माझ्या दालनात नाकारावा यासंबंधीचे अधिकार मी निश्चित घेईन.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, आपण दिलेला निर्णय आम्हाला अमान्य असल्यामुळे आम्ही बहिर्गमन करीत आहोत.

(सत्ताधारी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य बहिर्गमन करतात.)

सभापती : आता मी प्रश्नोत्तराकडे वळतो.

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

नागपूर जिल्ह्यातील सावनेर येथील नगरपरिषद हायस्कुलला आग लागून झालेले नुकसान

(१) * ३८७२६ श्री. सुधाकर गणगणे , श्री. संजय दत्त , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. सुरेशदादा देशमुख : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील सावनेर येथील १८८२ साली ब्रिटीशकाळीन बांधण्यात आलेली नगरपरिषद हायस्कुलला दिनांक ११ डिसेंबर, २००७ रोजी वा त्यासुमारास आग लागून सुमारे १० लाखांचे नुकसान झाले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेला लागलेली आग संशयास्पद आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत उच्चस्तरीय चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने आग लागण्यामागील कारणे काय आहेत व दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.आर.आर.पाटील : (१) आग लागली हे खरे आहे. तथापि सदर आगीत रु. ५,६७,७५०/- चे नुकसान झाले आहे.

(२) नाही.

(३) व (४) दि. ११/१२/२००७ रोजी पहाटे २.४५ वा. सावनेर येथील नगरपरिषद हायस्कूलची इमारत क्र.१ ला आग लागून सदर आगीत शिक्षण अभियानाची ७५०० पुस्तके, थोर पुरुषांचे ग्रंथ, शालेय पुस्तके, चेक बुक, व्हाऊचर बुक, कॅश बुक, लाकडी फर्निचर इत्यादी साहित्य तसेच रु.६०००/- ची रोकड जळून असे एकूण रु. ५,६७,७५०/- चे नुकसान झाले आहे. सदर आग ही शॉर्ट सर्कीटमुळे लागल्याबाबत अग्निशमन दलाने अहवाल दिला आहे. सदर आग ही संशयास्पद नसल्याने कोणीही व्यक्ती दोषी असल्याचे आढळून आलेले नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, मी देखील बहिर्गमन करतो.

(उपप्रश्न विचारण्यात आले नाहीत.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मु.पो.ता.साखर खेडा (जि.बुलढाणा) येथील अण्णा भाऊ साठे मराठी प्राथमिक शाळेत संस्था चालकाने एका विद्यार्थीनीशी केलेले अश्लील चाळे

(२) * ३९७०७ श्री.सय्यद पाशा पटेल , श्री. जगदीश गुप्ता , श्री.केशवराव मानकर , श्री. श्रीकांत जोशी : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.पो.ता. साखर खेडा (जि.बुलढाणा) येथील अण्णा भाऊ साठे मराठी प्राथमिक शाळेत दिनांक २३ जानेवारी, २००८ रोजी वा त्यासुमारास इयत्ता चौथी मध्ये शिक्षण घेणाऱ्या एका विद्यार्थीनीशी अश्लील चाळे केल्या प्रकरणी संस्थाचालक श्री.रंगनाथ भिकाजी बोरकर यांना ग्रामस्थांनी व महिलांनी मारहाण करुन धिंड काढली व शाळेची मोडतोड केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाचा तपास पूर्ण झाला आहे काय, असल्यास तपासाचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, दोषी व्यक्तीविरोधात काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

श्री.आर.आर.पाटील : (१) बलात्काराची घटना दि.२४/०१/२००८ रोजी घडली परंतू आरोपीची धिंड काढण्यात आली नव्हती.

(२) होय, आरोपीने अल्पवयीन विद्यार्थीनी वय वर्ष ९ हिच्यावर बलात्कार केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

(३) व (४) आरोपीविरुध्द पोलीस ठाणे साखरखेडी येथे दि. २५/०१/२००८ रोजी भादवि चे कलम ३७६, ३५४, ५०६ अन्वये गु.र.नं. ०७/०८ दाखल केला व दि. २५/१/२००८ रोजी आरोपीस अटक करण्यात आली. तपासाअंती पुराव्यासह आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र दि. १९/०३/२००८ रोजी दाखल केले आहे.

श्री. पाशा पटेल : या निमित्ताने संबंधित शाळेची परवानगी रद्द करण्यात येईल काय ?

श्री. आर.आर.पाटील : विचार केला जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अकोला जिल्हाकारागृहात अधीक्षकांच्या दंडेलशाही व भ्रष्टकारभाराबाबत

(३) * ३९१७० श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. विनोद तावडे : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हाकारागृहात अधीक्षकांच्या दंडेलशाही व भ्रष्टाचाराला कर्मचारी व कैदी कंटाळले असून त्यांनी कारागृहातील भ्रष्टाचाराची-गैरप्रकारांची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी राज्याच्या गृहमंत्र्यांसह कारागृह महानिरीक्षकांकडे नोव्हेंबर, २००७ च्या दुसऱ्या आठवड्यात केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कैद्यांना नियमाप्रमाणे सुविधा मिळत नाही, भोजन निकृष्ट दर्जाचे असते तर काहींना मारहाण करून त्यांच्या मनात प्रचंड भीती व दहशत निर्माण केली जात आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणांची सखोल चौकशी करण्यात आली काय, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

श्री.आर.आर.पाटील : (१) हे खरे नाही. अकोला जिल्हा कारागृहातील अधिकारी व कर्मचारी यांनी मा.गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे ऑक्टोबर, २००७ मध्ये केलेल्या निनावी तक्रार अर्जाची प्रत दिनांक २९ नोव्हेंबर, २००७ रोजी कारागृह महानिरीक्षकांकडे प्राप्त झाली आहे.

(२) व (३) दिनांक ०३ ते ०४ डिसेंबर, २००७ रोजी कारागृह उपमहानिरीक्षक, पूर्व विभाग, नागपुर यांनी अकोला जिल्हा कारागृह येथे दिलेल्या भेटी दरम्यान बंद्याकडे चौकशी केली, परंतु कोणत्याही बंद्यांनी जेवण निकृष्ठ दर्जाचे मिळते अशी तक्रार केलेली नाही. सदर अर्जातील अन्य मुद्दयांबाबत चौकशी करण्यात येत आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी विचारलेल्या प्रश्न भाग (१) च्या संदर्भात विसंगत उत्तर दिलेले आहे. प्रश्न भाग (1)च्या छापील उत्तरामध्ये सुरुवातीलाच "नाही" असे उत्तर देण्यात आलेले आहे आणि त्याच उत्तरामध्ये पुढे " ऑक्टोबर, 2007 मध्ये केलेल्या निनावी तक्रार अर्जाची प्रत दिनांक 29 नोव्हेंबर, 2007 रोजी कारागृह महानिरीक्षकांकडे प्राप्त झाली आहे." असे म्हटलेले आहे. यामधील खरे उत्तर कोणते ?

....नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पहिल्या प्रश्नास "हे खरे नाही" अशा प्रकारचे लेखी उत्तर दिले आहे. परंतु त्याच उत्तरात पुढे असे म्हटले आहे की, "निनावी तक्रार अर्जाची प्रत दिनांक 29 नोव्हेंबर, 007 रोजी कारागृह महानिरीक्षकांकडे प्राप्त झाली आहे. प्राप्त झालेल्या निनावी तक्रार अर्जातील तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय ? असल्यास सदरहू चौकशीत काय निष्पन्न झाले आहे व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

श्री. आर.आर.पाटील : या निनावी तक्रार अर्जाच्या अनुषंगाने प्राथमिक चौकशी केलेली आहे. त्या चौकशीच्या दरम्यान श्री. एस.सी.पवार, अधीक्षक आणि श्री. वासुदेव ब. राठोड, रक्षक यांचा गैरकारभारात महत्वाचा सहभाग असल्याचे आढळून आले असल्यामुळे त्यांची विभागीय चौकशी करण्याची आवश्यकता आहे. सदरहू विभागीय चौकशीच्या सूचना तातडीने दिल्या जातील. श्री. पवार आणि श्री.राठोड हे तेथे कार्यरत असताना या कारागृहातील कर्मचा-यांवर आणि कैद्यांवर प्रेशर आणण्याची शक्यता असल्यामुळे उद्याच्या उद्या त्यांच्या तेथून बदल्या करण्यात येतील.

श्री. पांडुरंग फुंडकर : प्राथमिक चौकशीमध्ये श्री.पवार आणि श्री. राठोड दोषी आढळून आले आहेत असे माननीय उप मुख्यमंत्र्यांनी कबूल केले आहे. म्हणून त्यांची बदली करुन चालणार नाही. त्यांना तातडीने निलंबित करण्यात यावे. श्री. पवार आणि श्री. राठोड यांना ताबडतोबीने निलंबित करुन तद्नंतर त्यांची विभागीय चौकशी करण्यात येईल काय ?

श्री. आर. आर. पाटील : ही डिटेल केस मी बघितली आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यानी सूचना केली आहे त्याप्रमाणे श्री. पवार, अधीक्षक आणि श्री. राठोड, रक्षक यांना निलंबित करुन तद्नंतर त्यांची विभागीय चौकशी पूर्ण केली जाईल.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, उत्तर में यह लिखा है कि " कोणत्याही बंद्यांनी जेवण निकृष्ठ दर्जाचे मिळते, अशी तक्रार केलेली नाही ". भोजन ठीक तरह से नहीं मिलना गंभीर बात है. इसलिए जब कैदी शिकायत करेंगे तब कार्रवाई की जाएगी, यह कहना ठीक नहीं है. क्या इस प्रकार के मामले में जांच अपने आप नहीं होनी चाहिए ?

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील : कारागृह महानिरीक्षकांकडे निनावी तक्रार अर्ज प्राप्त झालेला आहे त्यात जवळपास 29 प्रकारच्या तक्रारी नमूद करण्यात आल्या आहेत. फर्निचरमध्ये भ्रष्टाचार झाला आहे, बदलीवर असलेल्या पोलीस कर्मचा-यांच्या निवासस्थानाच्या वाटपामध्ये मोठया प्रमाणात अनियमितता झाली आहे, अशा 29 तक्रारी निनावी अर्जात नमूद केल्या आहेत. या प्रकरणाची प्राथमिक चौकशी केली असता त्यात सदर अधिकारी आणि कर्मचारी दोषी आढळून आले आहेत. त्यामुळे त्यांना निलंबित करुन तद्नंतर त्यांची विभागीय चौकशी पूर्ण केली जाईल तसेच निनावी अर्जातील सर्व 29 तक्रारींची देखील चौकशी करण्यात येईल.

3...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बोर्डिवे (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) येथील मशिदजवळ बांधण्यात आलेल्या ब्रिजचे स्टिल व सिमेंट कॉंक्रीट निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

(४) * ४०४५४ श्री.परशुराम उपरकर , डॉ. दीपक सावंत , श्री. अरविंद सावंत : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोर्डिवे (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) येथील मशिदजवळ बांधण्यात आलेल्या ब्रिजचे स्टिल व सिमेंट कॉंक्रीट निकृष्ट दर्जाचे असल्याची तक्रार ग्रामस्थांनी माहे फेब्रुवारी, २००८ मध्ये शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) तद्नुसार यात दोषी असणाऱ्या ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविशेठ पाटील, श्री.छगन भुजबळ यांच्याकरिता : (१) निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

कुडाळ तालुक्यात बोर्डिवे हे गाव नसून कणकवली तालुक्यात बोर्डिवे हे गाव आहे.

(२) (३) व (४) या विधान परिषद प्रश्नाचे अनुषंगाने चौकशी करणेचे आदेश देण्यात आले आहे.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, बोर्डिवे, ता.कुडाळ जि.सिंधुदूर्ग येथील मशिदजवळ बांधण्यात आलेल्या ब्रिजचे स्टील व सिमेंट कॉंक्रीटचे काम निकृष्ट दर्जाचे असल्यामुळे त्यासंबंधीची चौकशी करण्यात यावी अशा प्रकारचे निवेदन ग्रामस्थांनी फेब्रुवारी, २००८ मध्ये शासनाकडे केली आहे हे खरे आहे काय असा प्रश्न विचारण्यात आला होता, परंतु त्या प्रश्नास शासनाकडून " निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही " असे उत्तर दिले आहे. या कामाची चौकशी करण्यात यावी म्हणून मी दिनांक १६ ऑगस्ट, २००७ रोजी शासनाकडे पत्र दिले आहे. तसेच तेथील ग्रामस्थांनी फेब्रुवारी २००८ मध्ये शासनास निवेदन दिले आहे. परंतु शासनाकडून

४...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. ४०४५४....

श्री. परशुराम उपरकर....

निवेदन प्राप्त झाले नाही असे उत्तर दिले आहे. शासनाने पूर्णपणे चुकीचे उत्तर दिले आहे. या संदर्भात मी दिनांक १६ ऑगस्ट, २००७ रोजी पत्र दिले आहे, त्या पत्राच्या अनुषंगाने चौकशी केली जाईल काय ?

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. उपरकर यांचे या विषयासंबंधीचे पत्र शासनास प्राप्त झाले आहे. परंतु सदरहू पत्र प्राप्त होण्यापूर्वी या कामांचे देयक अदा केले गेले होते तसेच त्यावेळी ९५ टक्के काम देखील पूर्ण झाले होते. फक्त रेसिंग व लेव्हलींगचे काम फक्त बाकी होती. सन्माननीय सदस्यांच्या पत्राच्या अनुषंगाने नोंद घेण्यात येऊन सदरहू कामाची तपासणी शासनाच्या प्रयोगशाळेकडून करुन घेण्यात आली आहे. सदरहू कामासंबंधी शासनाच्या प्रयोगशाळेचा रिपोर्ट प्राप्त झाल्यानंतरच या कामाचे पेमेंट अदा केले गेले आहे. सन्माननीय सदस्यांच्या या संदर्भात अजून काही तक्रारी असतील तर त्या तक्रारी त्यांनी माझ्याकडे द्याव्यात, त्या तक्रारींची देखील चौकशी करण्यात येईल.

श्री. अरविंद सावंत : सदरहू कामासंबंधीचे ग्रामस्थांचे तक्रार निवेदन शासनास प्राप्त झाले आहे काय, असा प्रश्न विचारला असता शासनाने निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही, असे उत्तर दिले आहे. विधान परिषदेच्या सदस्यांनी यासंबंधी निवेदन शासनास दिले आहे आणि ते निवेदन शासनास प्राप्त झाले असतानाही शासनास निवेदन प्राप्त झाले नाही अशा प्रकारचे चुकीचे उत्तर शासनाने दिले आहे. शासनास चुकीचे उत्तर ज्या अधिका-यांनी दिले आहे त्या अधिका-यावर कारवाई करण्यात येईल काय ?

श्री. रविशेठ पाटील : ग्रामस्थांचे निवेदन प्राप्त झाले नाही अशा प्रकारचे लेखी उत्तर दिले आहे. सन्माननीय सदस्य श्री. उपरकर यांनी जे पत्र दिले आहे त्या पत्राच्या अनुषंगाने व्हिजीलन्स विभागाकडून तपासणी केली जाईल. परंतु मी पुन्हा या ठिकाणी नम्रपणे सांगू इच्छितो की, या विषयाच्या संदर्भात ग्रामस्थांचे निवेदन शासनास प्राप्त झालेले नाही....

यानंतर श्री. कानडे....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

SSK/ SBT/ KGS/ KTG/ MMP/ 14:00

ता.प्र.क्र. 40454.....

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, उत्तरामध्ये म्हटलेले आहे की विधानपरिषदेतील प्रश्नाच्या अनुषंगाने चौकशी करण्याचे आदेश दिलेले आहेत. प्रश्नाच्या अनुषंगाने आदेशित केलेल्या चौकशीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय ? असल्यास अहवालात काय म्हटले आहे ?

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, सरकारी प्रयोगशाळेत स्टील आणि सिमेंट यांची तपासणी केली असता त्यांचे प्रमाण बरोबर असल्याचे आढळून आले. चौकशीचा रिपोर्ट आल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नाशिक जिल्ह्यातील इगतपूरी जवळील दारणानदीच्या पात्रात पोस्टाचे लाखो रूपयांचे स्टॅम्प आढळून आल्याबाबत

(५) * ३९६९९ श्री. गुरुमुख जगवानी , श्री. प्रतापराव सोनवणे , श्री. श्रीकांत जोशी , श्री. विनोद तावडे , श्री. रामनाथ मोते : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील इगतपूरी जवळील दारणानदीच्या पात्रात पोस्टाचे लाखो रूपयांचे स्टॅम्प दिनांक ८ नोव्हेंबर, २००७ रोजी वा त्यासुमारास आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू तिकीटावर फॉरेन बिल असा उल्लेख असून अशोक स्तंभ मुद्रांकित करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक रोड येथील भारत प्रतिभूती मुद्रणालयातून यापूर्वी स्टॅम्प पेपर गहाळ होण्याचे प्रकार उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.आर.आर.पाटील : (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) व (५) या प्रकरणी घोटी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ११७/२००७ भा.दं.वि. कलम २५५, २५९, ४२०, ४६४, ४६७, ४६८, ३४ अन्वये अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरु आहे.

नाशिक येथील भारत प्रतिभूती मुद्रणालयातून स्टँप पेपर गहाळ होण्यासंदर्भात पोलीस स्टेशन नाशिक रोड येथे गु.र.नं. १५९/०२, भा.दं.वि.क. ४५७, ३८०, ३४ अन्वये दाखल आहे. त्यामध्ये ९ आरोपी निष्पन्न झाले आहेत. हा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे. या गुन्ह्यात जप्त करण्यात आलेले स्टँप व घोटी पोलीस ठाण्यातील उपरोक्त गु.र.क्र. ११७/२००७ मधील स्टँप यांचे तुलनात्मक परिक्षण करण्यात येणार आहे. त्यासाठी गुन्हा क्र. १५९/०२ मधील स्टँप तुलनात्मक परिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्याची विनंती संबंधित न्यायदंडाधिकाऱ्यांना करण्यात आलेली आहे.

श्री. गुरुमुख जागवानी : सभापती महोदय, मेरा माननीय मंत्री महोदय से स्पेसिफिक प्रश्न यह है कि क्या इगतपुरी में पुलिस को मिले हुए पोस्टल स्टॉम्प नाशिक प्रिंटिंग प्रेस में प्रिंट हुए है ? अगर हाँ तो क्या नाशिक प्रिंटिंग प्रेस ने इस बारे में कोई शिकायत दर्ज की है ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, डुप्लीकेट स्टॅम्प बनविलेले आहेत हे खरे आहे. १ कोटी १४ लाख २० हजार ४५० रुपयांचे डुप्लीकेट स्टॅम्प होते. संबंधितांनी भीतीपोटी हे स्टॅम्प नदीच्या पात्रात आणून टाकले. या केसमध्ये स्टॅम्प कोणी टाकले, कसे टाकले याचा तपास अतिशय गांभीर्याने सुरु आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. ३९६९९ पुढे सुरु..

श्री. प्रतापराव सोनवणे : सभापती महोदय, न्यायदंडाधिकारी यांना परीक्षणासाठी यासंबंधीचा अहवाल दिला होता काय ? यास्टॅम्पवर फॉरेन बिल लिहिलेली पोस्टाची तिकीटे असे लिहिले होते. त्यामुळे हे स्टॅम्प असली आहेत किंवा नकली आहेत यासंबंधीची माहिती उपलब्ध झाली काय ? गेले ५/६ महिने झाले तरी या केसचा तपास होत नाही म्हणून हा तपास केव्हा पूर्ण होणार आहे आणि तपासात दिरंगाई होण्याची कारणे काय ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, तपासामध्ये दिरंगाई झालेली नाही. स्टॅम्प गोणीतून आणून टाकलेले आहेत. अज्ञात इसमाने हे कृत्य केलेले आहे. बनावट स्टॅम्प आहेत. ते कोणी आणून टाकले आणि का टाकले याचा तपास सुरु आहे. प्रथमदर्शनी पुरावा नसल्यामुळे एक्सपर्ट मदतीसाठी दिले जातील आणि या कृत्याच्या पाठीमागे कोण आहे याचा शोध घेतला जाईल.

.....४

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

चारकोप (मुंबई) पोलीस ठाण्याच्या उपनिरीक्षक व शिपाई यांना लाच घेताना लाच-लूचपत प्रतिबंधक खात्याच्या अधिकाऱ्यांनी पकडल्याबाबत

(६) * ३९२९९ श्री. रामनाथ मोते , श्री. संजय केळकर , श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक २८ डिसेंबर, २००७ रोजी वा त्यासुमारास चारकोप (मुंबई) पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक श्री.रविंद्र मारुती रणशेवरे व शिपाई मदन शिवाजी थोरात या दोघांना एका प्राध्यापकाकडून लाच घेताना लाच-लूचपत प्रतिबंधक खात्याच्या अधिकाऱ्यांनी पकडले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाचा तपास पूर्ण झाला आहे काय, असल्यास, तपासाचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, त्यामध्ये दोषी आढळलेल्या व्यक्तींविरोधात काय कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री.आर.आर.पाटील : (१) चारकोप पोलीस ठाणे, मुंबई येथील श्री.रविंद्र रणशेवरे, पोलीस उप निरीक्षक व श्री.मदन थोरात, पोलीस नाईक यांना फिर्यादी श्री.सदानंद जाधव, प्राध्यापक, भवन्स कॉलेज, मुंबई यांचेकडून रु. ३०,०००/- लाच स्वीकारताना दिनांक २७ डिसेंबर, २००७ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी पकडले, हे खरे आहे.

(२), (३) व (४) सदर प्रकरणाचा तपास सुरु असून या प्रकरणातील फिर्यादी श्री.सदानंद जाधव, प्राध्यापक, भवन्स कॉलेज, मुंबई यांच्या विरुद्ध त्यांच्या नोकराच्या अपहरण प्रकरणात चारकोप पोलीस ठाणे, मुंबई येथे दाखल झालेल्या गुन्ह्याच्या तपासात त्रुटी ठेवण्यासाठी व केस कमकुवत करण्यासाठी आरोपी श्री.रविंद्र रणशेवरे, पोलीस उप-निरीक्षक यांनी फिर्यादी श्री.जाधव यांच्याकडे रु.३०,०००/- मागणी केलेल्या लाचेच्या अनुषंगाने ॲन्टी करप्शन ब्युरो येथे गु.नो.क्र.८५/२००७ कलम ७ लाचलुचपत प्रतिबंधक कायदा, १९८८ अन्वये दिनांक २७ डिसेंबर, २००७ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला. त्याअनुषंगाने दिनांक २७ डिसेंबर, २००७ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरोकडून आयोजित करण्यात आलेल्या सापळा कारवाईत श्री.रविंद्र रणशेवरे, पोलीस उप-निरीक्षक यांनी श्री.मदन थोरात, पोलीस नाईक यांच्या मदतीने रु.३०,०००/- लाचेची रक्कम स्वीकारली असता दोघांना रंगेहात पकडण्यात आले. सदर दोन्ही आरोपींना दिनांक २७ डिसेंबर, २००७ रोजी अटक करण्यात आली.

श्री.रविंद्र रणशेवरे, पोलीस उपनिरीक्षक व श्री.मदन थोरात, पोलीस नाईक यांना दिनांक २७ डिसेंबर, २००७ पासून शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, भवन्स कॉलेजचे प्राध्यापक श्री. सदानंद शांताराम पवार यांच्याकडून चारकोप पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक आणि पोलीस शिपाई यांनी ३० हजार रुपयांची लाच स्वीकारल्याच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. शासनाने संबंधित अधिकाऱ्यांनी श्री. सदानंद पवार यांच्याकडून ३० हजार रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडल्याचे मान्य केले आहे आणि त्यांना निलंबित करण्यात आलेले आहे. श्री. पवार यांच्याकडून कोणत्या प्रकरणात पोलीस

.....५

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती ? ज्या अधिकाऱ्यांनी लाच स्वीकारली त्या अधिकाऱ्यांविरुध्द यापूर्वी सुध्दा अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत हे खरे आहे काय ? याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, फिर्यादी सदानंद शांताराम पवार यांनी उमेश सिंग याला किडनॅप केल्याचा गुन्हा दाखल होता. त्यामध्ये केस विक करण्यासाठी आणि केसमधून नांव गाळून टाकण्यासाठी ५० हजार रुपयांची लाच मागितली. त्यातील ३० हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पोलीस निरीक्षकाला पकडले. त्याला निलंबित करण्यात आले आहे. एकंदरीत विभागात असलेला भ्रष्टाचार लक्षात घेऊन लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडून अलिकडच्या काळात अनेक ठिकाणी धाडी टाकल्या आणि सापळे रचून खूप मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार नियंत्रित करण्याचा प्रयत्न केला जातो.

नंतर श्री. भोगले

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मी सभागृहाच्या माहितीसाठी मुद्दाम सांगू इच्छितो की, गेल्या वर्षभरातील आकडेवारी लक्षात घेतली तर गेल्या वर्षात 48 वर्ग.1 च्या अधिकाऱ्यांना पकडण्यात आले. वर्ग.2 च्या 48, वर्ग.3 च्या 273 व वर्ग.4 च्या 8 अशाप्रकारे एकूण 553 अधिकारी/कर्मचाऱ्यांवर भ्रष्टाचाराबाबत गुन्हे नोंद करण्यात आले. काही जणांना अटकही करण्यात आली. यांच्यावरील केसेस लवकर चालतील आणि भ्रष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांना शिक्षा होईल यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, अँटी करप्शन ब्युरोकडे वर्दी दिल्यानंतर धाड टाकून भ्रष्ट अधिकाऱ्यांची धरपकड केली जाते. परंतु अनेक छोट्या मोठ्या शहरातील पोलीस ठाण्यामध्ये अशा घटना राजरोस घडत आहेत. फिर्यादी व आरोपीकडून देखील पैसे घेतले जातात. प्रत्येक प्रकरणात लाचलुचपत विभागाशी संपर्क साधणे संबंधितांना शक्य होतेच असे नाही. तेव्हा यावर नियंत्रण ठेवण्यासाठी शासन यंत्रणा उभी करणार आहे काय?

श्री.आर.आर.पाटील : पोलीस ठाण्यांमध्ये भ्रष्टाचाराचे प्रकार घडतात. तेथे गेल्या वर्षभरात 168 पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना पकडण्यात आले, त्यांना निलंबित केले आहे. ही गोष्ट खरी आहे की, वाढत असलेला भ्रष्टाचार आणि या बाबी अतिशय गंभीर आहेत. एका बाजूने चांगले वेतन देत असताना सुध्दा सर्वसामान्य माणसांची कामे फुकट होत नाहीत. पैसे दिल्याशिवाय फाईल हलत नाही, मदत केली जात नाही. राज्यात असलेले अँटी करप्शन ब्यूरो आणखी सक्षम केले जाईल. या कायद्यामध्ये त्यांना ज्या मर्यादा आहेत, कमी अधिकार आहेत ते सुध्दा वाढविण्याबाबत विचार केला जाईल. याबाबत मी राज्यातील लोकांना आवाहन करतो, भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांपुढे शरण जाऊन त्यांना पैसे देण्याऐवजी निर्भिडपणे पुढे आले पाहिजे, त्यांच्याविरुध्द तक्रार केली पाहिजे आणि या भ्रष्टाचाराच्या कॅन्सरवर सगळ्यांनी मिळून एकत्रितपणे उपाययोजना केली पाहिजे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी सविस्तरपणे उत्तर दिले आहे. प्रश्न असा आहे की, अँटी करप्शन ब्युरोच्या ट्रॅपमध्ये जे अधिकारी सापडतात त्या अधिकाऱ्यांवर त्यावेळी कारवाई होते परंतु नंतर सस्पेंड केले जात नाही. उदाहरण द्यायचे झाले तर माझ्या तालुक्यातील कॉटेज हॉस्पिटलचे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉक्टर, एक नायब तहसीलदार आणि खेड तालुक्याचे तहसीलदार यांना ट्रॅप केल्यानंतर त्यांच्याविरुध्दची पुढील कारवाई किती दिवसात करावी या संदर्भात शासनाच्या काही गाईडलाईन्स आहेत का?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, याबाबत मी आढावा घेतल्यानंतर माझ्या असे लक्षात आले की, लाच घेताना पोलीस खात्यातील माणूस सापडला तर सरसकट सस्पेंड केलेले आहे. एकही अपवाद केला नाही. अन्य विभागामध्ये मात्र लाच घेताना सापडल्यास काही काळानंतर निलंबन मागे घेतले जाते आणि निकाल लागेपर्यंत सेवेत घेतले जाते. या केसेस वर्षानुवर्षे चालत राहतात. निलंबित कर्मचाऱ्यांना पूर्ण वेतन द्यावे लागते. आज पूर्ण वेतन द्यावे लागले तरी चालेल. परंतु ज्यांच्यावर आरोप आहेत, जे आरोपी आहेत, ज्यांच्यावर संशय आहे, पूर्वी सापडले आहेत असे लोक कामावर असता उपयोगाचे नाही. अँटी करप्शन ब्युरोने ज्यांना ट्रॅपमध्ये रंगेहाथ पकडले, असे जे सेवेत आहेत, त्या संबंधित विभागांना सूचना देण्यात येतील, अशा कर्मचाऱ्यांना पाठिशी घालण्याची आवश्यकता नाही, जे पाठिशी घालतात त्यांना जबाबदार धरुन त्यांची ओपन चौकशी अँटी करप्शन ब्युरोकडून केली जाईल.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शिरुर (जि.पुणे) तालुक्यातील वसतिगृहातील मतिमंद मुलींचे गर्भाशय काढून टाकण्याची शस्त्रक्रिया केली जात असल्याबाबत

(७) * ३९९६७ श्री.राजन तेली : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरुर (जि.पुणे) तालुक्यात असलेल्या वसतीगृहातील मतिमंद मुलींचे लैंगिक शोषण होऊन त्या मुली-महिला गर्भवती राहू नयेत या मुली-महिलांचे गर्भाशय काढून टाकण्याची शस्त्रक्रिया केली जात असल्याचे माहे जानेवारी, २००८ मध्ये वा त्यादरम्यान उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणातील जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम, श्री.हर्षवर्धन पाटील यांच्याकरिता : (१) नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, प्रश्नाला जे उत्तर दिले आहे ते पूर्णत: चुकीचे आहे. अनेक वसतिगृहात लैंगिक शोषणाचे, अत्याचाराचे प्रकार घडत असतात. असे असताना कशाच्या आधारे मंत्रीमहोदयांनी "नाही" असे उत्तर दिले? या प्रकरणाची चौकशी केली आहे का? असल्यास चौकशीत काय आढळून आले?

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 39967.....

श्री. धर्मरावबाबा आत्राम : महोदय, शिरुर (जि. पुणे) येथील हा प्रश्न असून त्यासंबंधीची माहिती घेतल्यानंतर सन 2008 मध्ये हा प्रश्न विचारला आहे. यासंदर्भात कुठल्याही प्रकारे अन्याय झालेला नाही.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, शिरुरच्या या प्रश्नाबाबत गेल्या 15 वर्षांपासून मला माहिती आहे. अशा प्रकारची मतिमंद मुलांची काळजी घेणारे जी आधारगृह आहेत त्या आधारगृहातील मुलींची गर्भाशये काढून टाकली जाणे याबाबत सातत्याने वादविवाद होतात. मतिमंद मुलांचे जे आश्रम आहेत त्यासंबंधी मुलींची काळजी घेत असतांना त्यांची गर्भाशये काढून टाकली जात नाहीत याची देखील काळजी घेणे आवश्यक आहे. त्यांचे वैद्यकीय उपचार करुन त्यांचे आरोग्य सुरक्षित राहील यासंबंधी उपाययोजना करण्यासंबंधीचा अहवाल सभागृहाच्या माहितीसाठी मांडण्यात येणार काय ? प्रश्न असा आहे की, या मुलींचे ऑपरेशन करुन त्यांना दुसरीकडे खाजगी एनजीओंकडे पाठवून दिले जाते आणि त्या मुलींची गर्भाशये काढून त्यांची नावे बदलून तेथे अशा मुलींना ठेवतात. कारण अशा प्रकारे दुसरीकडेच ठेवल्यामुळे या मुलींचे आयडेंटिफिकेशन देखील ठेवत नाहीत. म्हणून यासंबंधीचा अहवाल सभागृहात मांडला जावा. तसेच त्या मुलींची ट्रान्सफर कुठे झाली आहे यासंबंधी सुध्दा ट्रेकिंग झाले पाहिजे. यादृष्टीने माननीय मंत्री महोदय प्रयत्न करणार काय ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : महोदय, सन्माननीय सदस्या यांनी अत्यंत चांगली सूचना केली आहे. यासंबंधीची संपूर्ण चौकशी करण्यात येईल व किती मुली ट्रान्सफर झाल्या व कोठे झाल्या यासंबंधीचा संपूर्ण तपशील घेण्यात येईल व जो अहवाल सन 1993 पासून मागितला आहे तो सभागृहासमोर ठेवण्यात काही अडचण नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबई पोलिसांचे विशेष पथक असल्याचे सांगून उल्हासनगर येथील लेडीज सर्व्हिस बारमध्ये महिला कर्मचाऱ्यांना मारहाण केल्याबाबत

(8) * 40751 श्री. अनिल परब , श्री.परशुराम उपरकर , डॉ. दिपक सावंत , श्री. दिवाकर रावते , डॉ. निलम गोऱ्हे : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबई पोलिसांचे विशेष पथक असल्याचे सांगून 31 जानेवारी, 2008 रोजी वा त्यासुमारास उल्हासनगर येथील लेडीज सर्व्हिस बारमध्ये धिंगाणा करुन तेथील महिला कर्मचाऱ्यांना मारहाण करणाऱ्या सुमारे 7 जणांच्या टोळींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त तोतया विशेष पथकाने आपण एका राज्य मंत्र्याचे खाजगी सुरक्षा रक्षक असल्याची बतावणी केली, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, गेले काही दिवसात उक्त टोळक्याच्या सांगण्यावरुन मुंबई व ठाणे परिसरातील अनेक बारवर पोलिसांनी छापे टाकले, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, या गंभीर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(5) असल्यास, याप्रकरणी नेमकी वस्तुस्थिती काय आहे ?

श्री.आर.आर.पाटील : (1) व (2) होय, हे खरे आहे.

(3), (4) व (5) याप्रकरणी मध्यवर्ती पोलीस ठाणे, उल्हासनगर येथे गु.र.क्र. 23/08, भा.दं.वि. कलम 143, 341, 342, 323, 504, 509, 170 नुसार गुन्ह्यातील तीन आरोपींना अटक केली असून, तीन्ही आरोपींना जामीन मिळाला असून आतापर्यंत केलेल्या तपासात अशा कथित टोळ्यांच्या सांगण्यावरुन मुंबई व ठाणे परिसरातील बारवर पोलीसांनी छापे टाकले ही बाब निदर्शनास आलेली नाही.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, हा विषय अत्यंत गंभीर आहे. राज्याचे माननीय गृह राज्यमंत्री उल्हासनगरला गेले असता त्यांच्या स्क्वॉडच्या विशेष पथकाने बारमध्ये जाऊन स्वत: तिकडून माननीय राज्यमंत्र्यांना फोन लावून दिला आणि अशा प्रकारे वेगवेगळया बारमध्ये जाऊन खंडणी उकळण्याचा व बारवाल्यांना मारण्याचे प्रयत्न केले. परंतु येथे उत्तरामध्ये मात्र माननीय मंत्री महोदयांनी "माझा संबंध नाही" असे उत्तर दिले आहे. परंतु स्टेशन डायरीप्रमाणे माननीय गृह राज्यमंत्र्यांच्या उपस्थितीत पोलीस अधिकाऱ्याला आलेल्या फोनची नोंद केलेली आहे काय ? या गोष्टीचे चित्रीकरण सीसीटीव्ही मध्ये झालेले आहे. आपण ज्या तपास अधिकाऱ्यामार्फत कारवाई केली आहे ती कारवाई सीसीटीव्हीचे चित्रीकरण बघून केलेली आहे काय ? आणि जे तीन आरोपी पकडले त्यांना सरळसरळ फसवणुकीसंबंधी 420 कलम लावून अटक करणार काय ?

श्री. आर.आर.पाटील : महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांच्या सुरक्षा रक्षकांना अटक होऊन त्यांच्यावर निलंबनाची कारवाई केली, हे खरे काय ?

श्री. आर.आर.पाटील : महोदय, अटक झालेल्यांमध्ये माननीय राज्यमंत्र्यांचा सुरक्षा रक्षक नव्हता. या प्रकरणात जे लोक होते ते सापडले असून जय नायर, करण शहा आणि यश देवेंद्र ठाकूर उर्फ मुन्ना हे असून बाकीच्या तीन आरोपींनी डमी नावे सांगितली असल्यामुळे त्या नावाच्या व्यक्ती आढळून येत नाही व त्यासंबंधीचा तपास सुरु आहे. यामध्ये गृह राज्यमंत्र्यांच्या सरकारी स्टाफ मधील कोणीच नाही.

.....4

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ MMP/

औरंगाबाद सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्यांची कामे सहकारी संस्थांना दीड कोटी रूपयांचे काम नियमबाह्य रित्या दिल्याबाबत

(9) * 39576 **श्री. श्रीकांत जोशी , श्री. जगदीश गुप्ता , श्री. प्रतापराव सोनवणे , श्री. गुरुमुख जगवानी , श्री. नितीन गडकरी : तारांकित प्रश्न क्रमांक 36195 ला दिनांक 23 नोव्हेंबर, 2007 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** :सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) औरंगाबाद सार्वजनिक बांधकाम विभागाने लाखो रूपयांची रस्त्यांची कामे सहकारी संस्थांना देताना दीड कोटी रूपयांचे काम नियमबाह्य रित्या देऊन गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(3) असल्यास, संबंधित दोषी व्यक्तिविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविशेट पाटील, श्री.छगन भुजबळ यांच्याकरिता : (1),(2) व (3) मजूर सहकारी संस्थांना एका वर्षात रु. 50 लाखापेक्षा जास्त रकमेची कामे देऊ नयेत, असा नियम असतांना काही मजूर संस्थांना दिड कोटी रुपयापर्यंतची कामे देण्यात आल्याचे प्राथमिक चौकशीत निदर्शनास आले आहे.

सदर प्रकरणी प्राप्त चौकशी अहवालानुसार झालेल्या अनियमिततेशी संबंधित दोषी अधिकारी /कर्मचाऱ्यांविरुध्द अधिक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांचेकडून दोषारोपपत्र मागविण्यात आली आहेत.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, यासंबंधीचे दोषारोप पत्र मागविण्यात आले असल्याचे म्हटले असून ते अद्याप प्राप्त झाले की नाही ? तसेच हे दोषारोप पत्र कोणत्या तारखेपासून मागविले आहे ?

श्री. रविशेट पाटील : महोदय, दोषारोप पत्र मागविले असून संबंधित अभियंत्यांवर कारवाई करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, दोषारोप पत्र आले की नाही ? आणि नसल्यास ते केव्हा येणे अपेक्षित आहे ?

श्री. रविशेट पाटील : महोदय, दोषारोप पत्र आलेले असून त्यात जी त्रुटी आहे ती 50 लाखापर्यंतची कामे सहकारी संस्थांना द्यावयाची आहेत. त्या सहकारी संस्थांना कामे देण्यासंबंधित ज्या अभियंत्यांच्या चुका झालेल्या आहेत त्यांच्या बाबतीत निर्णय घेतला असून त्यांच्याविरुध्द दोषारोप पत्र सादर करायला सांगितले आणि त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

(नंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रतापराव सोनवणे : सभापती महोदय, दक्षता आणि गुन्हे नियंत्रण महामंडळाने अहवाल दिलेला असून या अहवालामध्ये काय माहिती देण्यात आलेली आहे? तसेच 50 लाख रुपयांपेक्षा जास्त रक्कमेची कामे देण्यात येऊ नये असा नियम असतांना ज्या मजूर संस्थांना 1.5 कोटी रुपयांची कामे देण्यात आली त्या संस्थांची नावे काय आहेत? नियम बाहय कामे देण्याचा निर्णय कोणी घेतला व ज्यांनी अशा प्रकारचा निर्णय घेतला आहे त्यांच्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे?

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेली सर्व माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवली जाईल. ही कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या कामांची यादी न येता उपनिबंधकांकडून दिली जातात व त्यांच्याकडूनच ही कामे केली जात असतात.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी मान्य केले आहे की, संबंधित अभियंत्यांकडून चूक झालेली आहे. या कामामध्ये जाणीवपूर्वक भ्रष्टाचार झालेला आहे त्यामुळे ज्यांनी भ्रष्टाचार केलेला आहे अशा अधिका-यांना निलंबित करुन त्यांची चौकशी केली जाईल काय ?

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, या विषयासंदर्भात दोन खात्यांचा संबंध आहे. या विषयामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचा विषय येत नाही. तसेच या प्रकरणात कुठल्याही प्रकारचा गैरव्यवहार झालेला नाही.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : नागपूर मध्यवर्ती कारागृहात बंदी असलेले 13 नक्षलवादी आरोपी उपोषणास बसल्याबाबत

मु. शी. : नागपूर मध्यवर्ती कारागृहात बंदी असलेले 13 नक्षलवादी आरोपी उपोषणास बसल्याबाबत श्री कपिल पाटील, वि. प. स. यांनी दिलेला नियम 289 अन्वये प्रस्ताव.

श्री. आर.आर.पाटील (उप मुख्य मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री कपिल पाटील यांनी "नागपूर मध्यवर्ती कारागृहात बंदी असलेले 13 नक्षलवादी आरोपी उपोषणास बसणे" या विषयावर नियम 289 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

श्री. आर.आरपाटील : नागपूर मध्यवर्ती कारागृहात बंदी असलेले 13 नक्षलवादी आरोपी दि.9.4.2008 पासून उपोषणास बसले आहेत या उपोषण कर्त्यांच्या मागण्या पुढीलप्रमाणे आहेत :-

1) न्यायप्रणाली द्वारे ज्या नक्षलवाद्यांना आरोपातून मुक्त केले आहे व कारागृहातून सोडत असताना त्यांना पुन्हा अटक करणे, बंद करा व अशा प्रकारे अटक केलेल्या नक्षलवाद्यांना बिनाशर्त मुक्त करा.

2) महाराष्ट्र पोलीसांकडून सामाजिक संघटना व त्यांचे कार्यकर्ते यांना नक्षलसमर्थक व नक्षलवादी असल्याचे घोषित करतात. पोलीसांकडून त्यांचेवर नक्षलवादी असल्याचे खोटे आरोप लावले जातात व अशा लोकांना कारागृहात टाकले जाते. अशा कैद्यांना विनाशर्त मुक्त करा.

3) सर्व न्यायाधिन नक्षलवाद्यांना अंड बॅरेक मधून सामान्य बॅरेक मध्ये ठेवावे.

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील....

4) कारागृहात मुलाखतीची वेळ 30 मिनीटे असायला पाहिजे व वकिलां बारोबर असलेल्या मुलाखती दरम्यान मोकळया जागेचा वापर करण्याची परवानगी देण्यात यावी. खाद्यपदार्थ देण्याची सुविधा असली पाहिजे व त्या ठिकाणी टेलिफोनची सुविधा असली पाहिजे.

5) सर्व न्यायाधिन बंदी विशेषत: नक्षलवादी व भा.द.वि.302 खालील आरोपी यांना कारागृह गणवेश घालण्यास सक्ती करु नये.

6) पोलीस विभागाकडून लावण्यात येणारी भा ा.द.वि. धारा 110 रद्द करण्यात यावी. उपोषण कर्त्यांचे मागण्याचे स्वरुप पहाता या मागण्या मान्य करता येण्यासारख्या नाहीत. या 13 आरोपींविरुद्ध विविध पोलीस स्टेशन अंतर्गत गंभीर गुन्हे दाखल आहेत. संबंधित 13 जणांविरुध्द पुरावे आहेत किंवा कसे याबाबत सखोल चौकशी अपर पोलीस महासंचालक नक्षल विरोधी अभियान नागपूर हे करीत असून अद्याप चौकशी चालू आहे.

सभापती महोदय, या प्रकरणात 11 जणाविरुध्द गंभीर स्वरुपाचे गुन्हे नोंदवण्यात आलेले आहेत. या गुन्हयांमध्ये त्यांच्याकडे स्टेनगन आढळून आलेली असून कारखान्यात बंदूक तयार करतांना सुध्दा आढळून आलेले आहे. यातील एका नक्षलवाद्यानी तर 14 पोलिंसाना बॉम्बने ठार मारलेले आहे. अशांनी उपोषण केले असतील तर त्यांच्या उपोषणाची गय करण्याची बिलकूल आवश्यकता नाही आणि शासनातर्फे गय केली जाणार नाही. या प्रकरणात दोन विद्यार्थ्यांना पुस्तके विकत असतांना पकडण्यात आले असून त्यांच्याकडे काही आक्षेपार्ह पुस्तके सापडलेली आहेत. ही पुस्तके कोठे प्रकाशित झाली, कोणी प्रकाशित केली याबबतची कोणतीही माहिती नाही अशा प्रकारची पुस्तके दोन विद्यार्थ्यांकडे आढळून आलेली आहेत. लोकशाहीला आव्हान देणारी पुस्तके सापडलेली आहेत. एक वेळेस पुस्तक विक्रेत्याकडे पब्लीश न झालेली पुस्तके सापडली असती तर ती वेगळी बाब झाली असती परंतु या दोन विद्यार्थ्यांकडे पब्लीश न झालेली पुस्तके आढळून आलेली आहेत. 13 जणांपैकी 2 जणांचा शासन सहानुभुतीने विचार करेल. एक तर त्यांना अन्य जेंलमध्ये हलवण्यात येईल. आज या गुन्हेगारांवर नक्षलवादीचे कलम 18 प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यांना काही प्रमाणात सूट देण्याचा आणि सहानुभूतीचे धोरण शासन निश्चितपणाने स्वीकारेल.

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, उपोषणकर्त्यांच्या तीन मागण्या असून पहिली मागणी ज्यांना न्यायालयाने आधीच्या गुन्हयात पूर्णपणे मुक्त केलेले असतांना त्यांना फेर अटक करण्यात आलेली आहे. तसेच त्यांची दुसरी मागणी सामाजिक कार्यकर्त्यांच्या संदर्भातील असून तिसरी मागणी अंडा बॅरेक सेल मधून सामान्य बॅरेकमध्ये आणावे अशा प्रकारे त्यांनी तीन मागण्या केलेल्या आहेत.

यानंतर श्री. गायकवाड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील ...

माझे असे म्हणणे आहे की. त्यांच्यावर कितीही गंभीर स्वरुपाचे गुन्हे असले तरी सुध्दा जोपर्यत न्यायालयामध्ये हे आरोप सिध्द होत नाहीत तोपर्यंत त्यांना गुन्हेगार म्हणून वागणूक देणे आणि त्यांना अंडा बॅरेकमध्ये ठेवणे अत्यंत गैर आहे. त्याचबरोबर ज्या तीन मुलांच्या संदर्भात मी सातत्याने माझे म्हणणे मांडत आलेलो आहे की, ही मुले सांगलीची असून त्यांचा या नक्षलवादी चळवळीशी काहीही सबंध नाही. तेव्हा या मुलांवरील खटले ताबडतोबीने मागे घेण्यात येणार आहे काय ? त्याचबरोबर इतर जे संसदीय लोकशाही मानणारे नक्षलवादी आहेत त्या सर्वांशी तातडीने शासनाने डायलॉग केला पाहिजे. नेपाळमध्येसुध्दा संसदीय लोकशाही मानणारे सत्तेवर येण्याचा प्रयत्न करीत आहेत. तेव्हा अशा प्रकारच्या नक्षलवाद्यांशी डायलॉग करण्यात येणार आहे काय ? ज्यांच्या विरुध्द गंभीर स्वरुपाचे गुन्हे आहेत त्यांच्या बाबतीत मी काहीही बोलणार नाही.परंतु इतर नक्षलवाद्यांबरोबर डायलॉग करण्यात येणार आहे काय ? मी या ठिकाणी स्पेसिफिक प्रश्न विचारलेले आहेत. त्याची उत्तरे माननीय उपमुख्यमंत्र्यानी द्यावीत.त्यांनी ज्या मागण्या केलेल्या आहेत त्या बाबतीत मी पहिला प्रश्न विचारला असून ज्या तीन मुलांचा या चळवळीशी काहीही सबंध नाही त्यामुळे त्यांच्यावरील खटले विनाविलब काढून टाकण्यात येणार आहेत काय व त्यांचे उपोषण थांबविण्यात येणार आहे काय असा माझा दुसरा प्रश्न असून त्यांच्याशी डायलॉग करण्यात येणार आहे काय ? असा माझा तिसरा प्रश्न असा आहे की, त्यांच्याशी डायलॉग करण्यात येणार आहे काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, 13 पैकी 11 आरोपींकडे शस्त्र व बॉम्ब सापडले असून या आरापींनी बॉम्ब उडवून 14 पोलिसांना ठार केले होते. अशा हार्डकोअर नक्षलवाद्यांच्या बाबतीत त्यांच्याशी चर्चा करावी वा अन्य मार्ग काढावा अशा प्रकारची कोणाची अपेक्षा असेल तर ती कदापि मान्य करता येणार नाही. या नक्षलवाद्यांना अंडासेलमध्ये ठेवण्यात आलेले आहे. छत्तीसगडमध्ये आणि अन्य काही राज्यामध्ये तुरुंगावर हल्ले करण्यात आले होते आणि आत असलेले शेकडो नक्षलवादी तेथून पळून गेले होते. महाराष्ट्र सरकार हा धोका पत्करण्यास तयार नाही.अन्य कोणत्याही राज्यापेक्षा अहोरात्र कष्ट करुन ही नक्षल चळवळ रोखण्याचे काम महाराष्ट्रातील पोलीस करीत आहेत.ते नाऊमेद होतील अशा प्रकारचे धोरण पोलीस दलाला

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्वीकारता येणार नाही. जी माहिती शासनाकडे आलेली आहे त्याबाबतीत मी स्पष्टपणे सांगितलेले आहे त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्यांकडे जी माहिती आहे ती सुध्दा मी ग्राहय मानलेली आहे त्यामुळे या चळवळीतील जे दोन विद्यार्थी आहेत त्यांच्याकडे चुकीचे साहित्य सापडले होते ही वस्तुस्थिती आहे. कोणीही प्रसिध्द न केलेले, नक्षलवाद्यांना पाठिंबा देणारे , हे साहित्य कोठे छापलेले आहे याचा पत्ता नसलेले, सिस्टीमला उडवून टाका अशी भूमिका सांगणारे तीन तीन हजार प्रती त्यांच्याकडे सापडल्या असतील तर ते अत्यंत आक्षेपार्ह आहे. परतु हे विद्यार्थी आहेत हे लक्षात घेऊन या दोन विद्यार्थ्यांना अंडा सेलमधून बाहेर काढण्यात येईल व त्यांना वेगळया तुरुंगात ठेवण्यात येईल.त्यांच्यावर असलेल्या गुन्हयाच्या बाबतीत सुध्दा सहानुभूतीचे धोरण निश्चितपणे ठेवण्यात येईल.

ॲड.अनिल परब : सान्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी नियम 289 अन्वये जी सूचना दिली होती तिला अनुलक्षून आताच माननीय उपमुख्यमंत्र्यानी उत्तर दिलेले आहे.अंडा सेलमध्ये कोणाला ठेवावयाचे आणि कोणाला ठेवावयाचे नाही याचा निर्णय अधीक्षक घेत असतात . ज्या कैद्यांवर गंभीर स्वरुपाचे आरोप आहेत त्यांच्यावर हे गुन्हे सिध्द झालेले नसले तरी देखील ते घातक गुन्हेगाराच्या व्याख्येत बसतात. त्यामुळे या घातक गुन्हेगारांना अंडासेलमध्ये ठेवणे गरजेचे आहे. या घातक गुन्हेगारांना इतर गुन्हेगारांबरोबर जर ठेवण्यात आले तर यातून आणखी नक्षलवादी तयार होतील. त्यामुळे माननीय उप मुख्यमंत्र्यांनी जी भूमिका घेतलेली आहे ती योग्य असून या पेक्षा कठोर भूमिका त्यांनी घ्यावयास पाहिजे असे माझे मत आहे. त्याचबरोबर या प्रकरणातील जे दोन विद्यार्थी आहेत त्यांच्या बाबतीत वेगळा निर्णय घेणे योग्य होईल परंतु जे घातक गुन्हेगार आहेत त्यांना इतर गुन्हेगारांबरोबर न ठेवता स्वतंत्र ठेवले पाहिजे. अंडर ट्रायलमधील सर्व आरोपी जर एकत्र ठेवण्यात आले तर त्यातून आणखी नक्षलवादी तयार होण्याची शक्यता आहे.

(उत्तर दिले नाही)

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्र्यांनी योग्य निणर्य घेतल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. या संदर्भात मला त्यांना एक विनंती करावयाची आहे. मध्यंतरी आम्ही

श्री.मधुकर चव्हाण ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असे वाचले होते की , चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्हयामध्ये अगतिक कुटुंबातील जे विद्यार्थी आहेत त्यांना दोन तीन हजार रुपयांचे आमिष दाखवून नक्षलवादी आपल्या चळवळीमध्ये आणतात. दोन विद्यार्थ्यांच्या संदर्भात सहानुभूतिने पाहिले जाईल असा निर्णय आपण घेतलेला आहे. कायद्याच्या चौकटीत बसत असेल तर याबाबतीत माझे असे म्हणणे आहे की, ते प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या गुन्हेगार नसतील परंतु . कळत न कळत त्यांच्याकडून गुन्हा घडला असेल. तर त्यांना सोडून दिले पाहिजे व त्याच्यातून समाजामध्ये चांगला संदेश जाईल. त्या मुलांचे पुनर्वसन केले पाहिजे. त्याचबरोबर या नक्षलवाद्यांविरुध्द कठोर कारवाई केलेली आहे त्यामुळे या कारवाईशी आम्ही सहमत आहोत.

(उत्तर दिले नाही)

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, या सभगृहात मी अनेकदा हा प्रश्न मांडला होता. सांगलीतील जे विद्यार्थी आहेत व यांनी पुस्तके विकली आहेत. त्यांनी अनेकदा असे सागितले की आमचा या चळवळीशी काहीही संबंध नाही. जे पुस्तक पोलिसांनी अग्राहय ठरवले आहे ते पुस्तक लिहिणारे प्रसिध्द लेखक आहेत . त्यांना नक्षलवादी ठरविण्यात आलेले नाही. मात्र या लेखकांनी लिहिलेले पुस्तक विकणा-या विद्यार्थ्यांना नक्षलवादी ठरविण्यात आलेले आहे.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ....

मग त्यांनी लिहिलेल्या पुस्तिका विकणाऱ्या मुलांना तुम्ही नक्षलवादी कसे ठरविता हे मला समजत नाही. तेव्हा शासनाचे या संबंधात नेमके धोरण काय आहे ? सभापती महोदेय, मी मागील वेळेसही हा मुद्दा येथे उपस्थित केला होता की, जी पुस्तिका प्रसिद्ध आहे, ज्या पुस्तिकेबद्दल पोलिसांचा आक्षेप आहे, त्या पुस्तिकेच्या लेखकांबद्दल आपली भूमिका आपण स्पष्ट केलेली नाही. सभापती महोदय, ही सांगलीची मुले आहेत, विद्यार्थी चळवळीतील आहेत आणि त्यांचा नक्षलवादी चळवळीशी काहीही संबंध नाही. मी प्रश्नच विचारतो आहे. ... सभापती महोदय, हे सभागृह कशासाठी आहे ? आपण निरपराधांना तुरूंगात टाकणार असू, अंडा सेल मध्ये टाकणार असू...

सभापती : त्यासाठीच आपण नियम 289 खाली प्रस्ताव दिला होता त्यावर आपण येथे चर्चा केली आणि माननीय गृहमंत्र्यांना आपण या विषयावर निवेदन करण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी आज येथे निवेदन केले आहे... आता आपण विचारले की, सभागृह कशासाठी आहे ? हा जो प्रश्न आपण केला आहे तो योग्य नाही. ....एखाद्या प्रश्नावर तातडीने ...

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, पण मग हे सभागृह कशासाठी आहे ? ....

सभापती : सभागृह कशासाठी आहे हे समजून घेण्यासाठी आपण माझ्या दालनामध्ये या, तेथे मी आपल्याला ते समजावून देईन.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, आपल्या दालनामध्ये कशासाठी, या सभागृहामध्येच आपण ते सांगू शकता....

सभापती : मी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना सांगू इच्छितो की, आपण ज्या प्रकारे बोलता आहात ते योग्य नाही, बरोबर नाही. .... ज्यावेळेस ती परिस्थिती येईल तेव्हाच आपण तसे करू. .. यावेळेस नाही. ... आपण ज्याप्रकारे बोलत आहात ते बरोबर नाही. माननीय उपमुख्यमंत्र्यांना काही सांगावयाचे असल्यास मी त्यांना परवानगी देतो.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील जे काही आक्षेपार्ह बोलले आहेत ते रेकॉर्डवरून काढून टाकले पाहिजे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांचे शब्द रेकॉर्डवरून काढून टाकण्यात यावेत, ते रेकॉर्डवर असणे योग्य नाही. .... शेवटी सभागृहाचा डेकोरम टिकला पाहिजे. ..

..... एक्स 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी त्यांचे शब्द मागे घ्यावेत अशी माझी त्यांना विनंती आहे.

श्री. कपिल पाटील : कोणते शब्द ? मी फक्त एवढेच म्हटले आहे की, या सभागृहामध्ये मुस्कटदाबी होणार असेल तर ते बरोबर नाही. ... हे विचारण्याचा मला अधिकार नाही काय ?..

सभापती : हे सुद्धा तुमचे बोलणे योग्य आहे काय ? ... सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी येथे आक्षेपार्ह अशा पद्धतीचे जे वक्तव्य केले आहे ते मी सभागृहाच्या रेकॉर्डवरून काढून टाकतो. मी माननीय उपमुख्यमंत्र्यांना बोलण्याची परवानगी देतो.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनाही विनंती करीन की, एखाद्यावर पोलिसांनी अन्याय केला असेल तर जरूर तो आपण लक्षात आणून द्यावा. तसा तो आपण आणून दिलात ...

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, 6-6 महिने झाले आहेत या गोष्टीला ....

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, हे सभागृह कोठल्या आरोपींना सोडायला सांगण्यासाठी नाही. त्यासाठी न्यायालये आहेत. एद्याला अटक केल्यानंतर न्यायालयात देखील पोलिसांना त्याच्या विरोधातील सगळे पुरावे द्यावे लागतात. त्याचवेळेस न्यायालय त्या व्यक्तीला पोलीस कस्टडीत ठेवण्यास परवानगी देते. अटक केल्यापासून 48 तासांच्या आत हे आरोपी न्यायालयात दाखल करावे लागतात. पोलिसांनी काही चुकीचे केले तर न्यायालय आरोपींना बेल

(सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील उभे राहून बोलत असतात.... मात्र त्यांचे बोलणे ध्वनिक्षेपक बंद असल्याने ऐकू येत नाही ...)

देते. हे पाहण्याचा पूर्ण अधिकार हा न्यायालयाचा आहे आणि न्यायालयाचा हा अधिकार तुम्ही आणि मी येथे वापरावयास नको. न्यायालयांचे काम न्यायालयांना करू द्यावे. पण तरीदेखील ही सगळी केस बघितल्यानंतर पहिल्या तीन मुद्यांच्या बाबतीत जे मी आपल्याला सांगितले आहे त्यानुसार जे हार्डकोअर नक्षलवादी आहेत, ज्यांच्याजवळ शस्त्रे सापडली आहेत, ज्याने बॉम्ब उडवून महाराष्ट्राच्या पोलीस दलातील 14 पोलिसांना ठार केले आहे, अशा नक्षलवाद्यांबद्दल कोणी सहानुभूती दाखवित असेल तर सरकारला आणि महाराष्ट्रातील 10 कोटी जनतेला त्यांच्याबद्दल बिलकूल सहानुभूती वाटता उपयोगी नाही. तशी ती मलाही वाटत नाही. जे हार्डकोअर नक्षलवादी

..... एक्स 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहेत त्यांना अंडासेलमध्येच ठेवले जाईल. त्यांच्या विरोधात कठोर कारवाई किंवा जे काही करता येणे शक्य आहे ती केली जाईल. पण या 13 पैकी 2 जण, जे विद्यार्थी आहेत, ज्यांचा उल्लेख या सदनामध्ये वेळोवेळी सन्माननीय सदस्यांनी केला, त्यांच्याकडे केवळ पुस्तके सापडली आहेत. त्यांच्याजवळ पुस्तके सापडली असली तरी देखील, कोठलीही पुस्तके विकत असताना त्या पुस्तकांवर लेखकाचे नाव असण्याची आवश्यकता आहे, त्या पुस्तिकांवर लेखकाचे नाव नाही., त्यावर मुद्रकाचे नाव असण्याची आवश्यकता आहे, पण त्यावर मुद्रकाचे नाव नाही., प्रकाशकाचे नाव असण्याची आवश्यकता आहे, पण प्रकाशकाचेही नाव नाही. सभापती महोदय, काहीच न बघता, नक्षलवादी चळवळीला पूरक असणारी पुस्तके जर विक्री करण्याची परवानगी आपण दिली तर .... कृपया सभापती महोदय, मला माझे बोलणे पूर्ण करू द्यावे, ...

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना मी सांगू इच्छितो की, त्यांनी कृपा करून शांत व्हावे .... खाली बसावे. ...

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, नक्षलवाद उद्या वाढला तरी चालेल असा जर सदनाचा निर्णय असेल तर अशी खुलेआम पुस्तकांची विक्री, नक्षल चळवळीतील हत्यारे विकण्याची परवानगी देण्याची भूमिका आपण आपल्या राज्यात द्यावी लागेल. सभापती महोदय, या सिस्टीमवरच जे उठले आहेत त्यांच्या बाबतीत आपली वेगळी भूमिका राहील. मी तीन वेळा या सभागृहामध्ये सांगितले आहे की, यामध्ये जे दोन विद्यार्थी आहेत त्यांच्याबाबतीतही शासन सहानुभूतीने पाहील ...

(सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील उभे राहून बोलत असतात... पण त्यांचे बोलणे ध्वनिक्षेपक बंद असल्याने ऐकू येत नाही...)

सभापती महोदय, यांच्याबद्दल देखील सहानुभूतीने बघण्याची आवश्यकता नाही. शासन आपल्या भूमिकेशी ठाम आहे. .....

सभापती : ठीक आहे. यानंतर नियम 93 च्या सूचना घेण्यात येतील. ....

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, जे काही कायद्याने करण्याची आवश्यकता असेल ते सगळे केले जाईल. .... सभापती महोदय, बोलायला सगळ्यांनाच येते. मी पुन्हा एकदा सभागृहामध्ये सांगितले की, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी सांगितल्या क्षणी ...

..... एक्स 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील, ही अशी काही ॲथॉरिटी आहे की, पोलिसांनी पकडलेले सगळे आरोपी सोडले पाहिजेत. सभापती महोदय, इन्व्हेस्टिगेशन व्हावे लागते, आय.जी. पातळीवरील लोक तपास करीत आहेत. यातील वरिष्ठ अधिकारी तीन चतुर्थांश तास जंगलात काम करीत आहेत. तेथून त्यांनी हे तपासाचे काम करायचे आहे म्हणून या तपासाला देखील विलंब झालेला आहे असे मला वाटत नाही. पण तरीही हे विद्यार्थी निरपराध असतील तर केवळ पुस्तक विक्रीसारख्या गोष्टींवरून त्यांच्यावर अन्याय होऊ नये म्हणून 15 दिवसांच्या आत, त्यांना उद्याच्या उद्या त्या जेलमधून काढून दुसऱ्या जेलमध्ये हलविले जाईल आणि त्यांच्यावर ज्या केसेस आहेत त्याबाबतीत 15 दिवसात चौकशी पूर्ण करण्यात येईल तसेच त्यांच्याकडे बघण्याचा शासनाचा दृष्टीकोन सहानुभूतीचा राहील. ..

(यानंतर सौ. रणदिवे ..... वाय 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, ...

सभापती : आता नाही, नाही. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील, आपण खाली बसणार नाही काय ? आपण खाली बसणार नाही काय ?

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे.

सभापती : मी कायम संरक्षण देत आहे म्हणून तर याबाबत एवढी चर्चा झालेली आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, त्याबद्दल काही म्हणणे नाही. मी दोन विद्यार्थ्यांबद्दल बोललो आहे . . . .

सभापती : आता नियम 93 अन्वये सूचना घेण्यात येतील.

(सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील उभे राहून बोलतात. परंतु त्यांचा ध्वनिक्षेपक बंद असल्यमुळे ऐकू येत नाही.)

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, जे गोळीबारामध्ये मरत आहेत, त्याला जबाबदार कोण आहे ? नक्षलवाद्यांच्या गोळीबाराने जे मरत आहेत, त्यांना कोण जबाबदार आहे ?

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय . . . . .

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांचे कोणतेही वक्तव्य रेकॉर्डवर येणार नाही. सभापती या नात्याने सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील, मी तुम्हाला . . . . .

श्री.कपिल पाटील : मी या सरकारचा निषेध करुन सभात्याग करतो.

सभापती : ठीक आहे.

(यानंतर सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील सभात्याग करतात.)

. . . .वाय-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.सुरेश जेथलिया यांनी "महागाईच्या पार्श्वभूमीवर शासनाने साठेबाज व्यापाऱ्यांवर धाडी टाकण्याच्या निर्णयामुळे स्थानिक प्रशासन व स्थानिक पोलीस याचा फायदा घेऊन व्यापाऱ्यांना नाहक त्रास देत असल्यामुळे व्यापाऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी "राज्यात महसूल विभागात अप्पर जिल्हाधिकारी व उप जिल्हाधिकारी संवर्गातील अनेक पदे रिक्त असूनही ती न भरल्याने राज्याच्या महसूल यंत्रणेवर ताण पडत असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण यांनी "शेतकरी अपघात विमा योजनेतून आय.सी.आय.सी.आय. आणि नॅशनल या दोन विमा कंपन्यांनी अंग काढून घेतले असून सदर कंपन्यांकडे शेतकऱ्यांचे तब्बल 300 प्रस्ताव अडकून पडले असून कृषी आयुक्तांनी 2 वर्षाचा कालावधी लोटूनही त्यावर निर्णय न घेणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री.नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, जगदीश गुप्ता, गुरुमुख जागवाणी, केशवराव मानकर यांनी "राज्यात गोंदिया, वाशिम, हिंगोली, नंदूरबार या जिल्ह्यांची 10 ते 12 वर्षापूर्वी निर्मिती होऊनही तेथे अन्न व औषधी प्रशासन विभागाचे जिल्हा मुख्यालय नसल्याने व्यावसायिकांना जुन्याच जिल्हा मुख्यालयात जावे लागत असल्याने त्यांच्यात निर्माण झालेला असंतोष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी "सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील सुमारे 450 कामगारांना आजही मानवी विष्टा व मैला डोक्यावर वाहून नेण्याची प्रशासन सक्ती ....

. . . .वाय-3

सभापती . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करत असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, धन्यवाद.

सभापती : यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "दिनांक 19-4-2008 रोजी मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील बोरघाट येथे 50 टन वजनाचा मोठा कंटेनर नादुरुस्त होऊन तो रस्त्यावर आडवा झाल्याने या महामार्गावरील वाहतूक दिवसभर बंद पडल्याने वाहनांची झालेली कोंडी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, धन्यवाद.

सभापती : यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी "स्थानिक तरुणांना नोकर भरतीत 80 टक्के प्राधान्य देण्याचा शासन निर्णय असूनही बांद्रा येथील भविष्य निर्वाह निधी कार्यालयामध्ये कारकून पदासाठी घेतलेल्या लेखी परीक्षेत सुमारे 1100 परप्रांतीय विद्यार्थी उत्तीर्ण करुन घेण्यात येऊन सदर यादीत फक्त 70 मराठी तरुणांचा समावेश केल्याने स्थानिकांमध्ये पसरलेली संतापाची लाट" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, धन्यवाद.

सभापती : यानंतर सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी "राज्यात बिअरबार व परमिट रुमची परवानगी देताना 100 मीटरच्या आत शाळा किंवा मंदिर नसावे अशी अट असून सुध्दा कणकवली येथे बिअरबार साठी दिलेली परवानगी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, धन्यवाद.

सभापती : यानंतर सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी "दिनांक 17-4-2008 रोजी पेंडूर-मार्तोड, ता.वेंगुल येथे राबविण्यात येणाऱ्या जलस्वराज्य प्रकल्पाची बैठक आटोपून ...

. . . .वाय-4

सभापती . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परतताना शिवसेना शाखा प्रमुख श्री.गोविंद बाळकृष्ण गोवंडे यांना अडवून जमावाने केलेली बेदम मारहाण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, धन्यवाद.

यानंतर कु.गायकवाड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी : माननीय उपसभापती)

पृ. शी. : ठाणे शहरातील पाणीपुरवठयाकरिता शाई धरणाची आवश्यकता

मु. शी. : ठाणे शहरातील पाणीपुरवठयाकरिता शाई धरणाची आवश्यकता याबाबत श्री संजय केळकर वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री. संजय केळकर यांनी "ठाणे शहरातील पाणीपुरवठयाकरिता शाई धरणाची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, हा प्रश्न ठाणे जिल्हयातील पाणीपुरवठयाशी संबंधित आहे. या शहरामध्ये आज सतत लोकसंख्या वाढत आहे. शाई धरणास प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेली आहे. त्याचे सर्वेक्षण देखील पूर्ण झालेले आहे. ठाणे महापालिकेले व मुंबई महानगरपालिकेने व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून 60 टक्के रक्कम घेण्याचे प्रस्तावित केले आहे. या संदर्भात माझे 2 प्रश्न आहेत. शाई धरणाच्या संदर्भात वन जमिनीचा प्रश्न आहे, त्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे. सदर प्रकल्प पूर्ण करण्याकरिता 452 कोटी रुपये देण्यास ठाणे महानगरपालिकेने प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे याबाबत एमएमआरडीएच्या माध्यमातून किती निधी उपलब्ध होणार आहे ? माझा तिसरा प्रश्न आहे की, पोशीर धरणाचा देखील एक प्रस्ताव आहे. चार महानगरपालिका व दोन नगरपालिकांना या धरणामुळे फायदा होणार आहे.याबाबत एमएमआरडीए कडून काय कार्यवाही केली जाणार आहे ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, ठाणे महानगरपालिका व ठाणे शहराच्या दृष्टीने सन 2010 पर्यंत पाण्याचे नियोजन पूर्ण झालेले आहे. सन 2016 पर्यत नियोजन करण्याच्या दृष्टीने शाई धरणाचा विचार करण्यात येईल. या प्रस्तावाकरिता 452 कोटी रुपयाच्या खर्चाचे एस्टीमेट करण्यात आले आहे. तसेच सदर प्रकल्पासाठी लागणाऱ्या खर्चापैकी अंदाजे 60 टक्के रक्कम भरावे असे प्रस्तावित केलेले आहे. तसेच हा प्रस्ताव एमएमआरडीएकडे पाठविण्यात येईल. त्यांच्या बोर्ड मिटींगमध्ये, वार्षिक नियोजनामध्ये तरतूद करण्यात येईल. एमएमआरडीए सर्व पायाभूत सुविधा जसे रस्ते, पिण्याच्या पाण्याची सोय इत्यादींकरिता लागणारी रक्कम देण्याच्या दृष्टीने सकारात्मक निर्णय घेण्यात येईल. एमएमआरडीएच्या ठरावाच्या संदर्भात 60 टक्के रक्कम दिले जाणार आहे किंवा नाही याबाबत आता सभागृहात काही सांगणे उचीत होणार नाही. एमएमआरडीए पायाभूत सेवा सुविधा तयार करण्याकरिता निश्चितप्रकारे मदत केली जाईल. तसेच पोशीर धरणाबाबत सध्या काहीही निर्णय घेण्यात आलेला नाही.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : सामाजिक वनीकरण व वन विकास महामंडळातील मजुरांना कायम करणे

मु. शी. : सामाजिक वनीकरण व वन विकास महामंडळातील मजुरांना कायम करणे या बाबत डॉ. नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. बबनराव पाचपुते (वनेमंत्री) : सभापती महोदय, डॉ. नीलम गोऱ्हे यांनी " सामाजिक वनीकरण व वन विकास महामंडळातील मजुरांना कायम करणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या निवेदनामध्ये सविस्तर उत्तर दिलेले आहे. परंतु त्यामधून काहीही बोध होत नाही. या निवेदनामध्ये एक कमिटी स्थापन करण्यात येईल असे म्हटलेले आहे. तसेच यामुळे अतिरिक्त भार पडलेला आहे. वन कामगारांना काम करण्यामध्ये जी अडचण येत आहे, त्याबाबत माननीय मंत्री महोदयांनी निवेदनामध्ये सकारात्मक उत्तर द्यावे अशी माझी विनंती आहे.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या निवेदनामध्ये सविस्तर उत्तर दिलेले आहे. रोजगार हमी योजनेमध्ये काम करणारे किती मजूर आहेत, ते किती वर्षापासून कामावर आहेत, सामाजिक वनीकरणामध्ये किती मजूर कामावर आहेत याबाबत सर्व सविस्तर माहिती दिलेली आहे. यासंदर्भात सुप्रिम कोर्टाकडून निर्णय आल्यानंतर बॅकडोअर एन्ट्री करता येत नाही. तसेच विधी व न्याय खात्याकडे हा मुद्दा मांडण्यात आला होता. त्यांच्याकडून नकारात्मक उत्तर आलेले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांकडे देखील हा विषय मांडण्यात आला होता. तसेच या संदर्भात महाअभिलेखाकारांचा अहवाल आल्यानंतर, स्थापन करण्यात आलेल्या कमिटीच्या समोर हा मुद्दा मांडण्यात येईल. तसेच या संदर्भात माननीय आमदार व कार्यकर्त्यांना घेऊन हा प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न शासनाकडून केला जाईल.

---

93 चे निवेदन क्रमांक 3 बाबत

उपसभापती : 93 चे निवेदन क्रमांक 3 पुढे ढकलण्यात येत आहे. आता निवेदन क्रमांक 4 घेण्यात येईल.

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : भारताचे निवडणूक आयुक्त श्री. नवीन चावला यांनी मतदार ओळखपत्रावरील फोटो स्त्री व पुरुषांचे आहेत हे ओळखता न येत असल्याची दिलेली माहिती

मु. शी. : भारताचे निवडणूक आयुक्त श्री. नवीन चावला यांनी मतदार ओळखपत्रावरील फोटो स्त्री व पुरुषांचे आहेत हे ओळखता न येत असल्याची दिलेली माहिती याबाबत डॉ. दीपक सावंत वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राजेश टोपे (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, डॉ. दीपक सावंत यांनी "भारताचे निवडणूक आयुक्त श्री. नवीन चावला यांनी मतदार ओळखपत्रावरील फोटो स्त्री व पुरुषांचे आहेत हे ओळखता न येत असल्याची दिलेली माहिती " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

यानंतर श्री. बरवड..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, नियम 93 ची सूचना आणि या ठिकाणी निवेदनामध्ये दिलेल्या बाबी वाचल्या तर असे दिसून येईल की, या ठिकाणी माननीय मंत्रिमहांदयांनी जनरलाईज निवेदन केलेले आहे. मुख्य प्रश्न असा आहे की, ज्यावेळी लोक दुरुस्तीसाठी किंवा आपले नाव बदलण्यासाठी 8 नंबरचा फॉर्म भरुन देतात त्यांची नोंद ताबडतोब मतदार यादीमध्ये, त्याचा जो रोल असतो त्यामध्ये होणे आवश्यक असते. त्यानंतर जे ओळखपत्र काढून देतो त्या ओळखपत्राबरोबर जो फॉर्म असतो त्यामध्ये अनेक चुका असतात. त्या चुका दुरुस्त केल्या की नाही हे जोपर्यंत ओळखपत्र हातात येत नाहीत तोपर्यंत मतदाराला कळत नाही. त्यावरील फोटो ओळखता येणार नाही असा असतो. तो फोटो स्त्रिचा आहे की पुरुषाचा आहे हे समजत नाही. याबाबत मी आपल्याला अनेक पुरावे देऊ शकतो. एकदा 8 नंबरचा फॉर्म भरला की, रोलमध्ये त्याचे नाव आले पाहिजे आणि ओळखपत्रामध्ये तशी सुधारणा झाली पाहिजे. याबाबत राज्य शासन काय करणार आहे ? अधिकारी असे सांगतात की, जोपर्यंत राज्यशासन आम्हाला आदेश देत नाही तोपर्यंत संगणकीकृत रोलमध्ये दुरुस्ती करु शकत नाही. कारण ते सर्व संगणकीकृत प्रोग्रामिंग आहे. एका एका भागातील चार पाच इमारतीतील लोकांची नावे मतदार यादीतून गायब आहेत. याबाबत नेमकी काय यंत्रणा आहे आणि यामध्ये शासन काय सुधारणा करणार आहे ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी मुद्दाम सविस्तर माहिती सांगू इच्छितो. मतदार यादी तयार करण्याची जी प्रक्रिया आहे त्यामध्ये जी समरी रिव्हीजन असते किंवा जे संक्षिप्त पुनरीक्षण केले जाते त्यामध्ये विशिष्ट कालावधीमध्ये मोठ्या पध्दतीने जाहिरात करुन ज्यांना दुरुस्ती करावयाची असेल, मतदार यादीतील नाव दुरुस्त करावयाचे असेल तर ठराविक मुदतीमध्ये अर्ज स्वीकारतो. एखाद्याला ओळखपत्रामध्ये काही दुरुस्ती करावयाची असेल तर ठराविक कालावधीत समरी रिव्हीजन किंवा संक्षिप्त पुनरीक्षण करतो आणि त्या कालावधीमध्ये या दुरुस्तीच्या अनुषंगाने ॲडिशन, डिलिशन आणि करेक्शनच्या संदर्भात काम करीत असतो. या व्यतिरिक्त जी कंटीन्यू प्रोसेस आहे त्यामध्ये त्या त्या मतदारसंघामध्ये जे सेंट्रल पोलींग स्टेशन असते त्या ठिकाणी कोणत्याही दिवशी जाऊन आपल्या नावामध्ये दुरुस्ती करावयाची असेल किंवा नाव समाविष्ट करावयाचे असेल किंवा नाव कमी करावयाचे असेल तर या सर्व बाबतीत नमुना क्रमांक 8 भरुन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे .....

द्यावा लागतो. फोटो ओळखपत्रासाठी इपिक 1, 2, 3, 4 आहेत. जे इलेक्शन फोटो आयडेन्टीटी कार्ड आहेत त्यामध्ये जर कोणत्याही कारणाने फोटोमध्ये डिफेक्ट आला असेल किंवा काही कारणाने फोटो खराब झाला असेल तर या सगळ्या गोष्टी निवडणूक आयोगाच्या वतीने विनामूल्य केल्या जातात. ही एक कंटीन्यू प्रोसेस आहे. समरी रिव्हीजनच्या माध्यमातून हे काम चालते. इपिक 4 पध्दतीने फोटो आयकार्डमध्ये काही दुरुस्ती करावयाची असेल तर करु शकतो. त्याचबरोबर कोणत्याही दिवशी सेंट्रल पोलींग स्टेशनमध्ये जाऊन नमुना 8 भरुन देऊन दुरुस्ती करता येते. या एक महिन्याच्या कालावधीत त्यावर सूचना मागवून पुरवणी यादी तयार केली जाते. जी मुख्य मतदार यादी असते त्यामध्ये एक महिन्याच्या आत ही पुरवणी यादी समाविष्ट केली जाते. पुरवणी यादीमध्ये एक महिन्याच्या कालावधीमध्ये ज्या लोकांनी आपली नावे सुचविली असतील किंवा ॲडिशन, डिलिशन किंवा करेक्शन असेल तर ते करुन मुख्य यादीमध्ये समाविष्ट करण्याचे काम वेळोवेळी समरी रिव्हीजनमध्ये किंवा संक्षिप्त पुनरीक्षणमध्ये करीत असतो.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, आता डिलिमिटेशनचे काम झालेले आहे. त्यानुसार नवीन मतदार संघ जाहीर झालेले आहेत. पण आजही जुन्या मतदार संघाचे मतदारांना ओळखपत्र दिले जात आहे. 25 वर्षानंतर मतदार संघाची पुनर्रचना होणार नाही. अनायसे नवीन मतदार संघ जाहीर झाले आहेत, त्यामुळे लोकांना नवीन मतदार संघाप्रमाणे ओळखपत्र दिले पाहिजेत. लोकांच्या हातामध्ये चुकीचे ओळखपत्र जात आहे. त्यामुळे यासंदर्भात शासनाने केंद्रीय निवडणूक आयोगाकडे शिफारस करावी. जुने फोटो अतिशय घाणेरडे आहेत. या फोटोसाठी खर्च केला जात आहे त्यापेक्षा थोडासा अधिक खर्च केला तर रंगीत फोटो असलेले चांगले ओळखपत्र लोकांना मिळू शकते. शासनाने निवडणूक आयोगाला शिफारस केली तर ती मान्य होऊ शकते.

श्री.राजेश टोपे : सध्या नवीन मतदार संघ गृहित धरुनच नवीन ओळखपत्रे देण्याची कार्यवाही चालू आहे.

ॲड.अनिल परब : जुन्या मतदार संघाप्रमाणे ओळखपत्र दिले जात आहे.

श्री.राजेश टोपे : केंद्रीय निवडणूक आयोगाने नव्याने डायरेक्शन्स दिलेल्या आहेत त्याबाबतची माहिती मी देत आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने पुनर्रचित मतदार संघाबाबत राज्य निवडणूक आयोगाला सूचना दिलेल्या आहेत त्यानुसार राज्यात कार्यवाही सुरु आहे. ओळख पत्रात कलर फोटो असावा यासंबंधी सन्माननीय सदस्यांनी सूचना केली आहे, त्याबाबत राज्य शासनाकडून निवडणूक आयोगाला कळविण्यात येईल.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, सध्या जुन्याच मतदार संघनिहाय ओळखपत्रे दिली जात आहेत.

श्री.राजेश टोपे : दिनांक 1.1.2008 रोजी असलेल्या अर्हतेनुसार नवीन ओळखपत्र देण्याचे काम सुरु आहे. त्याबाबतची सर्वांना निमंत्रण पत्रिका येईल. यासाठी नवीन धडक कार्यक्रम चालू केलेला आहे. मतदारांना नवीन ओळख पत्र देण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरु आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>निवेदन क्रमांक 5, 6, 7, 8 आणि 9 बाबत</u>

उपसभापती : निवेदन क्रमांक 5 सहकार मंत्र्यांचे आहे.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, निवेदन क्रमांक 5 हे मला आताच प्राप्त झाले आहे. त्यामुळे हे निवेदन थोडया वेळाने घेण्यात यावे.

उपसभापती : ठीक आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी निवेदन क्रमांक 6 पुढे ढकलण्याबाबत विनंती केली आहे. त्यांची विनंती मी मान्य केली आहे. सन्माननीय गृह राज्यमंत्री सभागृहात उपस्थित नसल्यामुळे निवेदन क्रमांक 7 पुढे ढकलण्यात येत आहे. सन्माननीय सदस्य श्री.शरद पाटील यांचे निवेदन क्र.8 आहे, ते अनुपस्थित आहेत, त्यामुळे हे निवेदन पुढे ढकलण्यात येत आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी निवेदन क्रमांक 9 पुढे ढकलण्याबाबत विनंती केली आहे. त्यांची विनंती मी मान्य केली आहे. यानंतर निवेदन क्रमांक 10 घेण्यात येईल.

3...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : प्रतिक्षा नगर येथील संक्रमण शिबिराच्या पुनर्रचनेत 42 कोटींचा झालेला घोटाळा

मु. शी. : प्रतिक्षा नगर येथील संक्रमण शिबिराच्या पुनर्रचनेत 42 कोटींचा झालेला घोटाळा याबाबत सर्वश्री मधु चव्हाण, विनोद तावडे, संजय केळकर, रामनाथ मोते वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

ॲड.प्रितमकुमार शेगांवकर (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री मधु चव्हाण, विनोद तावडे, संजय केळकर, रामनाथ मोते यांनी " प्रतिक्षा नगर येथील संक्रमण शिबिराच्या पुनर्रचनेत 42 कोटींचा झालेला घोटाळा " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या निवेदनातील शेवटच्या परिच्छेदामध्ये " सदरहू प्रकरणी 19 अधिकारी/कर्मचा-यांवर म.ना.से. (शिस्त व अपिल) नियम 1979 च्या नियम 8 खाली विभागीय चौकशी सुरु करण्यासाठी दोषारोप पत्रे दिनांक 25.2.2008 रोजी देण्यात आले असून 15 दिवसात खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले आहे. तथापि, सदरहू अधिकारी/कर्मचारी यांनी मुदतवाढ देण्याची विनंती केली आहे." असे म्हटले आहे. ही मुदतवाढ देण्याचे कारण काय ? 2006 पासूनचे हे प्रकरण आहे. या अधिका-यांनी 42 कोटींचा घोटाळा केला आहे हे शासनाने मान्य केले आहे. हा घोटाळा किती कोटींचा आहे आणि अधिकारी व कर्मचा-यांना मुदतवाढ देण्याचे कारण काय ?

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. प्रितमकुमार शेगांवकर : या प्रकरणी घोटाळा झाल्याचे सिध्द झालेले आहे आणि त्याप्रमाणे कारवाई केलेली आहे. चौकशी पूर्ण झाल्यानंतर निलंबनाची कारवाई करण्यात येईल. या सर्व अधिका-यांच्या बदल्या केलेल्या आहेत. दोन अधिकारी मृत पावलेले आहेत, एक अधिकारी निवृत्त झालेला आहे. 19 अधिका-यांना नोटीस दिलेली असून त्यांची चौकशी चालू आहे. ही चौकशी दोन महिन्याच्या आत पूर्ण करण्यात येईल आणि त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 93च्या निवेदनासंबंधी

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय सभागृहामध्ये हजर नाहीत. मेळघाटचा अतिशय महत्वाचा विषय आहे.

उपसभापती : मी हा विषय उद्या तातडीने घेण्यासंबंधी सूचना देतो.

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय मंत्री महोदय बाहेर लॉबीत बसलेले मी पाहिले होते. 93च्या निवेदनाच्या वेळी मंत्री महोदय सभागृहामध्ये हजर नसण्याचा प्रकार प्रत्येक आठवड्यामध्ये एखाद्या वेळी तरी घडत असतो. सभापती महोदय, आपणाला मंत्री महोदयांना निलंबित करण्याचे अधिकार नाहीत.

उपसभापती : मी मंत्र्यांना निलंबित करु शकत नाही ही वस्तुस्थिती असली तरी मी निवेदन विलंबाने करण्याच्या सूचना देऊ शकतो.

श्री. दिवाकर रावते : माननीय मंत्री महोदय सभागृहामध्ये उपस्थित नसल्यामुळे आपण सभागृहाची बैठक 5 मिनिटांसाठी तहकूब करावी.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, आपण आम्हाला संरक्षण द्यावे. मी दिलेल्या 93च्या सूचनेवरील निवेदन आजच वितरित झाले पाहिजे.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, 16वे निवेदन घ्यावे.

उपसभापती : माझ्याकडे 11 निवेदने आलेली आहेत.

श्री. जयंत प्र. पाटील : मला 18 निवेदने मिळालेली आहेत.

उपसभापती : माझ्याकडे 11 निवेदने आलेली आहेत. त्यातील 1 ते 4 क्रमांकाची निवेदने झालेली आहेत. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी विचारलेल्या 93च्या सूचनेवरील निवेदने पुढे ढकलण्यासंबंधी त्यांनी विनंती केलेली आहे. त्यामुळे क्रमांक 6 चे निवेदन पुढे गेलेले आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती...

निवेदन क्रमांक 7 हे सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील,प्रा.शरद पाटील यांचे आहे. परंतु सन्माननीय गृह राज्यमंत्री सभागृहात उपस्थित नसल्यामुळे ते निवेदन नंतर घेण्यात येईल. यानंतर निवेदन क्रमांक 8 हे सन्माननीय सदस्य प्रा. शरद पाटील यांचे आहे. सन्माननीय सदस्य प्रा.शरद पाटील हे सभागृहात अनुपस्थित असल्यामुळे त्यांच्या निवेदनावरील चर्चा लॅप्स झाली आहे. यानंतर निवेदन क्रमांक 9 हे माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांचे आहे. परंतु आजची त्यांची निवेदन पुढे ढकलावीत अशा प्रकारची त्यांनी विनंती केली आहे. त्यामुळे त्यांची निवेदने नंतर घेण्यात येतील. यानंतर निवेदन क्रमांक 10 हे सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांचे आहे. त्यावर सभागृहात चर्चा झाली आहे. यानंतर निवेदन क्रमांक 11 सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांचे आहे. परंतु रोजगार हमी योजना मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील हे सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सदरहू निवेदन नंतर चर्चेला घेण्यात येईल. आता निवेदन क्रमांक 5 हे सन्माननीय सदस्य श्री. सय्यद पाशा पटेल यांचे आहे. आता त्या निवेदनावर चर्चा करु.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>निवेदन क्रमांक- 5 संबंधी</u>

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, मला संबंधित अधिका-यांकडून निवेदनासंबंधीची माहिती दिली गेली नाही, म्हणून त्या अधिका-याला 100 रुपये दंड करतो. यापूर्वी देखील मला विभागाच्या अधिका-याकडून निवेदनासंबंधीची माहिती दिली गेली नव्हती. सभापती महोदय, आपणाकडून निवेदनाचा क्रमांक पुकारल्यानंतर माहिती उपलब्ध नसली तर आम्ही देखील अडचणीत येतो. या निवेदनासंबंधी संबंधित अधिका-याकडून माहिती दिली गेली नाही म्हणून मी त्या अधिका-यास 100 रुपयांचा दंड आकारतो.

श्री. दिवाकर रावते : त्या अधिका-यास 100 रुपये दंडाची शिक्षा केली ही स्वागतार्ह गोष्ट आहे. परंतु यासंदर्भात माझी अशी मागणी आहे की, त्या अधिका-यास तातडीने शो-कॉज नोटीस द्यावी.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सदरहू संबंधित अधिका-यास 100 रुपये दंड करतो शिवाय त्यास शो-कॉज नोटीस सुध्दा देण्यात येईल.

उपसभापती : आपला फाईन करण्याचा निर्णय फाईन आहे. आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.30 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 02.56 ते 3.30 वाजेपर्यंत मध्यंतर)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सभागृहात आवश्यक ती गणसंख्या नाही.

उपसभापती : (गणना केल्यानंतर) सभागृहात गणपूर्ती नाही, घंटी वाजविण्यात यावी.

नंतर श्री. खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(घंटी वाजविल्यानंतर व आवश्यक ती गणपूर्ती झाल्यानंतर)

लक्षवेधी सूचनांबाबत

उपसभापती : सभागृहाच्या नियमित कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना उद्या घेण्यात येतील.

श्री. दिवाकर रावते : महोदय, वास्तविक शासनाच्या वतीने सभागृहात दिलगिरी व्यक्त केली पाहिजे. कारण कोरमअभावी सभागृह बंद पडण्याचे प्रकार अलिकडे वारंवार होत आहेत. मग सभागृहात कोरम ठेवणे ही जबाबदारी सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांची नाही काय ? तसेच सभागृहाचे नेते व माननीय उपमुख्यमंत्री सभागृहात बसलेले असतांना देखील सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित राहून कोरम ठेवत नाहीत, ही गंभीर बाब आहे. म्हणून माझी अशी विनंती आहे की, सन्माननीय सदस्यांच्या वतीने माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सभागृहात दिलगिरी व्यक्त करावी तसेच सभागृहाचे नेते उपस्थित असतांना सभागृहात उपस्थिती ठेवावी अशाही सूचना त्यांना द्याव्यात.

श्री. आर.आर.पाटील : महोदय, सभागृहाच्या उपस्थितीच्या माध्यमातून बऱ्याच वेळा टीकेची झोड उठविली जाते. आपणही वेळोवेळी निदेश देऊन आपली भूमिका स्पष्ट केलेली आहे. तरी सुध्दा कोरमअभावी सभागृहाचे कामकाज थांबवावे लागते, ही बाब निश्चितच भूषणावह नाही. आता देखील कोरम नसल्यामुळे पाच मिनिटांसाठी सभागृहाचे कामकाज स्थगित करावे लागले. वास्तविक या सभागृहाचा सदस्य व्हायला किती अहोरात्र कष्ट घेतले जातात तसेच आणखी काय काय करावे लागते ? आणि इतक्या कष्टातून तसेच नेत्यांकडे हेलपाटे घालायला जेवढा वेळ घालविला जातो तेवढा वेळ जरी सभागृहात घालविला तरी महाराष्ट्राचे कल्याण होईल. म्हणून भविष्यात यासंबंधीची योग्य दखल घेण्यात येईल. दुसरी गोष्ट म्हणजे संसदीय प्रणालीमध्ये ज्या वेगवेगळ्या बैठका होतात त्यात भाग घेत असताना कोरम ही केवळ सत्ताधारी पक्षाचीच नव्हे तर विरोधी पक्षाची देखील जबाबदारी असल्याचे तत्व आपण स्वीकारले आहे. तसेच कोरम ठेवून सभागृह चालविणे ही देखील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांची जबाबदारी आहे. म्हणून केवळ उपमुख्यमंत्रीच नव्हे मंत्री म्हणून नव्हे तर सभागृहाचा नेता या नात्याने मी सभागृहात दिलगिरी व्यक्त करतो.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : आता विशेष उल्लेख घेण्यात येतील.

विशेष उल्लेख

पृ.शी.: बॉम्बे हायकोर्टचे मुंबई हायकोर्ट असे नामकरण करणे

मु.शी.: बॉम्बे हायकोर्टचे मुंबई हायकोर्ट असे नामकरण करणे याबाबत श्री. दिवाकर रावते, यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो :--

"मुंबई उच्च न्यायालयाचे बॉम्बे हायकोर्ट नाव आजच्या क्षणापर्यंत असून बॉम्बेचे मुंबई नामकरण करुन एक तपापेक्षा जास्त कालावधी लोटला असून बॉम्बे हायकोर्टचे नामांतर मुंबई उच्च न्यायालय असे करण्याविषयी मी माननीय मुख्यमंत्र्यांना दिनांक 8 ऑगस्ट, 2005 रोजी लिहिले होते. तसेच प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग, मंत्रालय यांनी मला पाठविलेल्या दिनांक 24 ऑक्टोबर, 2005 रोजी असे कळविले आहे की, "बॉम्बे हायकोर्टचे नाव मुंबई हायकोर्ट असे बदलण्याच्या संदर्भात महाराष्ट्र शासनाने ना हरकत दर्शविली आहे व माननीय मुख्यमंत्र्यांच्या मान्यतेने केंद्रशासनास प्रकरण सादर करण्यात आले आहे."

महोदय, या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून एखादी गोष्ट शासनाला वारंवार कशा प्रकारे सांगावी लागते या खेदातून मी हा विशेष उल्लेख मांडत आहे. हा विषय जरी या शासनाच्या कार्यक्षेत्रात नसला तरी यासंबंधीचा निर्णय शासनाने घ्यावा आणि तसा प्रस्ताव केंद्राकडे पाठवावा, अशी माझी विनंती आहे. कारण सगळीकडे मुंबई हायकोर्ट असे नाव रुढ झाले असले तरी आजही मुंबई उच्च न्यायालयाचे नाव बॉम्बे हाय कोर्ट असेच ठळकपणे दिसते. यामागचे कारण असे आहे की, यासंबंधी केंद्रशासनाने या नावात बदल करण्यासाठी रितसर मान्यता दिलेली नाही. यासंदर्भात मी सातत्याने पाठपुरावा करीत आहे. 26 डिसेंबर, 2005 रोजी विधि व न्याय विभागाचे सचिव श्री. डोणगांवकर यांना पत्र देऊन मी यासंदर्भातील प्रस्ताव केंद्रशासनाकडे सादर करावा अशी विनंती केली होती. त्या अनुषंगाने मला दि. 24 ऑक्टोबर, 2005 रोजी कळविले आहे.

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

तसेच प्रशासकीय कामकाजाची पध्दत लक्षात घेऊन केंद्रशासनाकडे या प्रस्तावाचा पाठपुरावा करणे अत्यावश्यक आहे. कारण बॉंबेचे नामकरण मुंबई झाले असले तरी दिल्लीतील ज्येष्ठ अधिकाऱ्यांच्या अद्यापही ते नाव तोंडात रुळलेले नाही.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

बॉम्बे हायकोर्टाचा उल्लेख मुंबई हायकोर्ट असा केला जावा यासंदर्भात मी नेहमी पाठपुरावा करीत आलेलो आहे. या विषयाच्या संदर्भात मी 26 डिसेंबर 2005 रोजी सचिव श्री. डोणगावकर यांना दिले होते. 26 जानेवारी प्रजासत्ताक दिनाचा मुहुर्त साधुन मुंबई हाय कोर्ट असा उल्लेख करावा असेही श्री. डोणगावकर यांनी आपल्या पत्रात म्हटलेले आहे. या विषयाच्या संदर्भात मी माननीय मुख्यमंत्र्यांना जे 8 ऑगस्ट, 2005 रोजी जे पत्र लिहिले होते त्यासंदर्भात माननीय मुख्यमंत्रीमहोदयांचे मला उत्तर प्राप्त झालेले आहे तसेच सचिव श्री. डोणगावकर यांना 26 डिसेंबर, 2005 रोजी मी जे पत्र लिहिले होते त्यासंदर्भातही मला उत्तर प्राप्त झालेले आहे. त्यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे की, "बॉम्बे हायकोर्टाचे" नाव "मुंबई हायकोर्ट" करण्याबाबत आपण प्रकरण केंद्र सरकारकडे सादर केले असले तरीही, केंद्रीय प्रशासकीय कामकाजाची पध्दत लक्षात घेता, पाठपवुरावा करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण बॉम्बेचे नामकरण मुंबई झाले असले तरीही ते दिल्लीतील जेष्ठ अधिका-यांच्या अद्याप तोंडात रुळलेले नाही. अनेक उच्चपदस्थोंच्या तोंडीही मुंबईचा उल्लेख बॉम्बे होताना आपल्या लक्षात येत असतो म्हणूनच पाठपुराव्याशिवाय या नामकरणाचेमहत्व त्यांच्या लक्षात येणार नाही. कृपया आपण आवश्य यात लक्ष घालावे. माननीय मुख्यमंत्र्यांनाही तशी विनंती करावी व अशा कार्यक्रमास 26 जानेवारी, प्रजासत्ताक दिनासारखा उत्तम मुहुर्त असे शकत नाही असेही त्यांनी आपल्या पत्रात म्हटलेले आहे. या विषयाच्या संदर्भात मी सतत 2-3 वर्षापासून पाठपुरावा करीत आहे. मला एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, एलफिस्टन रोड, ग्रँटरोड या स्टेशनची नावे बदलण्याच्या संदर्भात सुध्दा मी सूचना केलेली आहे. त्यामुळे मला असे म्हणावयाचे आहे की, माननीय पंतप्रधान मुख्यमंत्र्यांसमवेत बैठक घेत असतात त्यामुळे त्या बैठकीत माननीय मंत्रीमहोदयांनी या विषयाचा उल्लेख केला तर निश्चित तातडीने कार्यवाही होईल त्यामुळे 15 ऑगस्ट पूर्वी "बॉम्बे हायकोर्टाचे " नाव "मुंबई हायकोर्ट" असे नामकरण व्हावे व त्यादृष्टीने पाठपुरावा करण्यात यावा. आपले अधिकारी सुध्दा विविध प्रश्नाच्या संदर्भात दिल्ली येथे जात असतात त्यामुळे त्यांनीही हा प्रश्न रेटून न्यावा व 2-3 वर्षापूर्वीच्या मागणीचा पाठपुरावा करुन न्याय मिळवून द्यावा अशी विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित.)

उपसभापती : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित.)

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : रायगड जिल्हयातील पेण तहसील कार्यालयाची झालेली दुरावस्था

मु. शी. : रायगड जिल्हयातील पेण तहसील कार्यालयाची झालेली दुरावस्था याबाबत श्री. जयंत प्र.पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

"ब्रिटीश काळात सन 1835 मध्ये निर्माण केलेल्या ऐतिहासिक चिरेंबदी पेण तहसील कार्यालयास आजमितीस 182 वर्षे पूर्ण झाली आहेत. काळानुरुप असंख्य उन्हाळे आणि पावसाळयाचा मार सहन करीत ही वास्तू आता जीर्ण झाली असून शेवटच्या घटका मोजीत आहे.

इमारतीतील रेकॉर्ड रुमची दयनीय अवस्था असून छप्पर विकलांग होऊन छप्पराचे वासे पार कुजले आहेत, रेकॉर्ड रुमच्या पश्चिम बाजूच्या छप्परावर प्रशासनाने प्लास्टिकचे कापड टाकून आच्छादले आहे. महत्वाचे महसुलाच्या नोंदीचे रेकॉर्ड या गळक्या छप्परामुळे पावसाळयात व झ ालेल्या महापुरातील अतिवृष्टीत अतोनात नुकसान झालेले आहे. काही रेकॉर्डच्या नोंदीचे कपटे आढळून आलेले दिसणे, फाटलेल्या अवस्थेतील रेकॉर्ड अशा दयनीय अवस्थेत या वास्तूचा दशावतार झाला आहे.

सतत गर्दीने तुडुंब असलेल्या या वास्तूची जीर्ण अवस्था एकदिवस अपघाताला निमंत्रण देऊ शकते. सबब पेण तहसील कार्यालयाची वास्तू नवयाने उभारण्याची गरज आहे. तरी या महत्वाच्या बाबीकडे लक्ष देऊन योग्यती कार्यवाही होण्यासाठी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाचे लक्ष वेधीत आहे."

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : नेर, तालुका खटाव,जिल्हा सातारा येथील मुलीवर दोन गुंडानी केलेला बलात्कार

मु.शी : नेर, तालुका खटाव,जिल्हा सातारा येथील मुलीवर दोन गुंडानी केलेल्या बलात्कारा सबंधी श्रीमती उषा दराडे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी विशेष उल्लेखांसबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी

श्रीमती उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) :सभापती महोदय, मी आपल्या अनुतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते :-

"मौजे नेर, तालुका खटाव, जिल्हा सातारा येथील त्याच गावातील दोन गुंडानी इयत्ता आठव्या इयत्तेत शिकत असलेल्या 13 वर्षीय मुलीचे दिनांक 5 डिसेंबर, 2007 रोजी अपहरण करुन तिच्यावर केलेला बलात्कार, सदर प्रकरणी मुलीची आई पुसेगाव पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करावयास गेली असता पोलिसांनी बलात्काराचा गुन्हा दाखल करण्या ऐवजी विनयभंगाचा गुन्हा दाखल करुन घेणे, कचरे कुटुंबियांना दिनांक 6.12.2007 रोजी जीवे मारण्याची धमकी देणे, दिनांक 7 डिसेंबर 2007 रोजी या दोन गुंडांनी कुमारी पुजा कचरे या विद्यार्थीनीचे अपहरण करुन तिची केलेली हत्या, अद्यापही मृत्यूमुखी पडलेल्या विद्यार्थ्याच्या शवविच्छेदनाचा अहवाल न देणे, त्या गुंडाविरुध्द बलात्कार व खुनाचा गुन्हा दाखल न करणे,त्यामुळे गावातील व परिसरातील जनतेत पसरलेला असंतोष, तसेच सदर ग्रामीण भागातील महिला तसेच मुलींना अन्यत्र दिवसा रात्री कामानिमित्त बाहेर वावरण्याबाबत निर्माण झालेली भीती व चिंतेचे वातावरण, या बाबत या घटनेस जबाबदार असलेल्या गुंडाची सीआयडीमार्फत चौकशी करुन कडक कारवाई करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची प्रतिक्रिया "

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : मराठी दिनाच्या निमित्ताने शांततेच्या मार्गाने गा-हाणे मांडणा-या पत्रकाराशी पोलिसांनी केलेली अन्यायकारक वर्तणूक

मु.शी : मराठी दिनाच्या निमित्ताने शांततेच्या मार्गाने गा-हाणे मांडणा-या पत्रकाराशी पोलिसांनी केलेल्या अन्यायकारक वर्तणुकी बाबत ॲड.अनिल परब,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : यानंतर माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

ॲड.अनिल परब (विधानसभेने निवडलेले) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडतो :-

दिनांक 27.2.2008 रोजी मराठी दिनाच्या निमित्ताने हुतात्मा चौकात मराठीच्या उध्दारासाठी सनदशीर मार्गाने गा-हाणे मांडायला आलेल्या ज्येष्ठ साहित्यिक श्री. अरुण साधू, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत आघाडीवर असलेले पत्रकार श्री. दिनू रणदिवे, कॉ. रोझा देशपांडे यांच्यासह अनेक ज्येष्ठ नागरिकांना पोलिसांनी कायद्याचा बडगा दाखवत उर्मट शब्दात या मान्यवरांची केलेली अवहेलना, शांततेच्या मार्गाने गा-हाणे मांडत असतांना त्यांच्यावर केलेली अन्यायकारक वर्तणूक, काही कारण नसतांना वातावरण तणावपूर्वक करण्याचा पोलीस करीत असलेला प्रयत्न, सनदशीर मार्गाने लोकशाहीत गा-हाणे मांडायला मराठी माणसांनाच चोरी असल्याचे या घटनेवरुन सिध्द होत असणे, या बाबत शासनाने आपली भूमिका स्पष्ट करावी.

सभापती महोदय, या विशेष उल्लेखाच्या सूचनेसंबंधी मी शासनाला अशी विनंती करतो की ज्येष्ठ पत्रकाराबरोबर पोलीस उर्मटपणे वागलेले आहेत त्यांची चौकशी करण्यात येऊन त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी . त्याचप्रमाणे ज्यावेळी अशा प्रकारचे आंदोलन जे कोणी ज्येष्ठ व्यक्ती करीत असतात त्यांच्याबद्दलची माहिती पोलिसांना अगोदरच करुन दिली पाहिजे. पोलीस तेथे गेल्यानंतर नेमके कोणाच्या विरोधात ते काय बोलत आहेत हेच कळत नाही. किंवा कोणाशी काय बोलत आहेत हे त्यांना कळत नाही. तेव्हा तेथे येणा-या ज्येष्ठ व्यक्तिची माहिती पोलिसांना अगोदर दिली जावी अशी मी सूचना करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : अल्पसंख्याक दर्जाच्या कायम विना अनुदानित संस्थेमधील व्यवस्थापन कोट्यातील विद्यार्थी इ.बी.सी.च्या सवलती पासून वंचित राहणे

मु.शी : अल्पसंख्याक दर्जाच्या कायम विना अनुदानित संस्थेमधील व्यवस्थापन कोट्यातील विद्यार्थी इ.बी.सी.च्या सवलती पासून वंचित राहण्याबाबत श्रीमती फौजिया खान,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : यानंतर माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती फोजिया खान (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडते :-

अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यासाठी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना सन 2007-2008 पासून अंमलात येत असणे, व्यवस्थापन कोट्याच्या संदर्भात अल्पसंख्याक दर्जा प्राप्त संस्था सार्वभौम असणे, सध्या राज्यात अल्पसंख्याक दर्जा प्राप्त अनेक संस्था कायम विना अनुदानित तत्वावर सुरु असणे अशा संस्थांमधून अनेक गोर गरीब विद्यार्थी शिक्षण घेत असणे परंतु कायम विना अनुदानित संस्थामध्ये फक्त शासकीय कोट्यातील विद्यार्थ्यानाच इ.बी.सी. ची सवलत लागू असणे, अल्पसंख्याक संस्थेंमध्ये बहुतेक विद्यार्थी व्यवस्थापन कोट्यातील असल्याने ते इ.बी.सी. च्या सवलती पासून वंचित असणे, पंतप्रधानांचा नवीन 15 कलमी कार्यक्रम आणि सच्चर समितीच्या शिफारशींना छेद देणारे हे धोरण असणे सबब, अल्पसंख्याक दर्जा प्राप्त कायम विनाअनुदानित संस्थांमधील व्यवथापन कोट्यातील विद्यार्थ्यांना इ.बी.सी.ची सवलत मिळण्याची नितांत गरज याकरिता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही "

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याचा मुद्दा

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला एक औचित्याचा मुद्दा मांडावयाचा आहे. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांची मी वाट पहात असल्यामुळे मी माझा मुद्दा मांडावयाचा थांबलो होतो. परंतु आता सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील या ठिकाणी उपस्थित असल्यामुळे मी एका अत्यंत गंभीर घटनेकडे त्यांचे लाक्ष वेधू इच्छितो त्या घटनेची नोंद सर्वानीच घेतली पाहिजे. या सभागृहातील सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांच्या संदर्भात महाराष्ट्र टाईम्स या वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेली बातमी मी वाचली असून माननीय उप मुख्यमंत्र्यांना मी फोन करण्याचा प्रयत्न केला होता परंतु ब्रिफींगमध्ये ते व्यस्त होते सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांच्या हत्येचा कट अशा प्रकारचा मथळा दिलेली ही बातमी होती. ते आमचे सहकारी असून त्यांच्या संदर्भात जर कोणी सुपारी घेऊन हत्या करणार असल्याची बातमी वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली असेल तर ती गंभीर बाब आहे. ही बातमी अशा प्रकारची आहे की, श्री.रमेश आंब्रे नावाचे कोणी व्यक्ती असून राष्ट्रवादीच्या नेत्याशी त्यांचे घनिष्ठ संबंध असून श्री. जितेंद्र आव्हाड यांना मारण्याचा कट केला होता ." यामध्ये मला एका गोष्टीचे वाईट वाटते . या बातमीत असा उल्लेख करण्यात आला होता, "राष्ट्रवादी नेत्याशी त्याने संधान साधून त्या नेत्याच्या मुलाच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा देणारे फलक लावले आहेत. " ठाण्यातील राजकारण मला माहीत नाही.त्याचबरोबर श्री.रमेश आंब्रे कोण आहेत हे सुध्दा मला माहीत नाही. परंतु अशा प्रकारचा कट रचण्यात आला असून त्याना अटकही झालेली आहे.या बातमीत लिहिल्या प्रमाणे 30 मार्च 2008 रोजी मंगतराम पेट्रोलपंपावर आलेल्या गुंडाना एटीसीच्या अधिका-यांनी अटक केलेली आहे. माननीय गृह मंत्र्याकडे ए.टी.सी.चा अहवाल देखील आलेला असेल. या सभागृहातील सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांच्या संदर्भातील ही गंभीर घटना आहे. त्यानंतर महाराष्ट्र टाईम्समध्ये ए.टी.सी.चा जो खुलासा आलेला आहे तो विचित्र आहे. त्यात असे म्हटलेले आहे की, "श्री.जितेंद्र आव्हाड यांच्या खुनाचा कटच नाही. त्यांनी आपली सिक्युरिटी वाढवून घेण्याकरिता काही केलेले आहे काय ? " अशा प्रकारचा जो वृत्तांत प्रसिध्द झाला आहे तो आणखी वेदना देणारा व चिंताजनक आहे. या सभागृहातील एका सन्माननीय सदस्यांच्या संदर्भातील ही घटना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असून माननीय गृह मंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत तेव्हा त्यांनी याबाबतीत खुलासा करावा. राष्ट्रवादीचे नेते कोण आहेत, एकमेकाला का गुंतविण्यात येत आहे, ए.टी.सी.च्या अहवालात काय म्हटलेले आहे,या बाबतीत त्यांनी खुलासा करावा. सभापती महोदय, ठाण्यातील हे प्रकरण असल्यामुळे त्यात आपण लक्ष दिले पाहिजे असे माझे प्रामाणिक मत आहे .

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ...

मी हा मुद्दा सकाळीच मांडणार होतो. परंतु माननीय उपमुख्यमंत्री हे सभागृहातून निघून गेले त्यामुळे ते येईपर्यंत मी थांबलो होतो. आता ते येथे उपस्थित असल्यामुळे मी हा मुद्दा येथे उपस्थित केला आहे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी उद्या याबाबत सविस्तर निवेदन करीन. मात्र माझ्याकडे आता या संबंधात जी प्राथमिक माहिती आहे त्यानुसार सांगावयाचे तर अशा पद्धतीचा कोणताही कट नव्हता. कपोलकल्पित अशा स्वरूपाची ही बातमी आहे आणि दुसरे म्हणजे एटीएसमध्ये जो तपास होतो तो आजपर्यंत तरी वर्तमानपत्रांतून लिक झालेला नाही. त्यामुळे ही जी काही बातमी आलेली आहे तिचा आणि एटीएसच्या तपासाचा काडीमात्र संबंध नाही. सभापती महोदय, याबाबत उद्या सविस्तर निवेदन करण्यात येईल.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, मलासुद्धा एक औचित्त्याचा मुद्दा मांडावयाचा आहे. शिक्षण क्षेत्रासंबंधात एक खळबळजनक अशी बातमी लोकमत आणि अन्य एका वर्तमानपत्रातून आली आहे की, शिक्षकांसाठी आचार संहिता लागू करण्याचा निर्णय शासनाकडून घेण्यात आलेला आहे. त्याद्वारा गुलामासारखी बंधने घालून शिक्षकांच्या एकूणच स्वातंत्र्यावर आणि हक्कांवर गदा आणण्याचा प्रयत्न शासनाकडून चालला आहे. त्याबद्दल सर्वत्र खळबळ माजली आहे. तरी त्याबाबत नेमकी वस्तुस्थिती काय आहे याचा खुलासा माननीय शिक्षण मंत्री करतील काय ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, शिक्षणासंबंधातील प्रस्तावावर सभागृहामध्ये चर्चा सुरू आहे. या चर्चेच्या दरम्यान भाषण करताना सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांच्या तोंडी आलेली ही सगळी वाक्य आहेत, ती बिलकूल निराधार आहेत, असत्य आहेत, कपोलकल्पित आहेत. म्हणून माझी विनंती आहे की, पत्रकार बांधवांनी देखील याची दखल घेणे गरजेचे आहे. दुसरे असे की, मी या चर्चेवर अजून उत्तर देण्याचे बाकी आहे. जी काही विधाने आलेली आहेत ती सारी सन्माननीय सदस्यांच्या तोंडची आहेत. या प्रस्तावावरील माझे उत्तर अजून झालेले नाही. तेव्हा मला खात्री आहे की, आमचे शिक्षक बांधव याबाबत जागरूक आहेत, ते अलर्ट राहतील.

उपसभापती : ठीक आहे. यानंतर शासकीय विधेयके घेण्यात येतील.

..... आयआय 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, 2007.

L.A.BILL NO. LXXIV OF 2007

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES ACT, 1960.)

डॉ. पतंगराव कदम (सहकार मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 74 - महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 74 - महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, ...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हे विधेयक येथे मांडण्याचा अधिकारच नाही असा माझा आक्षेप आहे आणि त्यासंबंधात मी माझे म्हणणे प्रथमत: येथे मांडणार आहे. विधेयकावरील माझे भाषण होईल ते वेगळेच आहे. सभापती महोदय, हे विधेयक जेव्हा या सदनामध्ये आले त्यावेळी दोन्ही सभागृहांची संयुक्त चिकित्सा समिती या विधेयकावर सखोल विचार करण्यासाठी नेमण्यात आली आणि त्या समितीचा मी एक सदस्य होतो. त्या समितीची 9 जानेवारी 2008 ला पहिली बैठक झाली. त्यामध्ये असे ठरले की, या संबंधात स्वामिनाथन समितीचा अहवाल आहे आणि तो अहवाल सर्व समिती सदस्यांना अभ्यासासाठी देण्यात यावा आणि त्यानंतर समितीमध्ये या विधेयकासंबंधात सविस्तर चर्चा केली जावी. त्याप्रमाणे तो अहवाल आम्हाला महिनाभराने देण्यात आला. तो आम्ही वाचला. त्यानंतर आम्हाला आमची मते मांडावयाची होती. कायद्यातील तरतुदीबाबत आमचे विचार मांडावयाचे होते. कारण ती संयुक्त चिकित्सा समिती होती. सभापती महोदय, ज्यावेळेस 10 मार्च ला हे अधिवेशन सुरू झाले त्यावेळी पहिल्याच दिवशी या समितीची दुसरी बैठक लावली गेली की ज्यामध्ये खऱ्या अर्थाने चर्चेला सुरूवात होईल ही अपेक्षा होती. त्या बैठकीनंतर मी सभागृहामध्ये सकाळीच माननीय सभापतींना विनंती केली की, आम्ही अधिवेशन

.... आयआय 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

काळामध्ये सभागृहाच्या कामकाजामध्ये व्यस्त असल्यामुळे अधिवेशन काळामध्ये अशा प्रकारच्या कोणत्याही बैठका लावण्यात येऊ नयेत. सभापती महोदय, माझ्या या मताशी पूर्ण सहमत होऊन माननीय सभापतींनी त्याबाबत स्पष्ट निर्देश दिले की, अधिवेशन काळामध्ये अशा पद्धतीच्या कोणत्याही बैठका, सदनामध्ये कबूल केले असेल त्या व्यतिरिक्त, लावल्या जाऊ नयेत. त्यानुसार या संदर्भात ही बैठक आम्ही रद्द करू असेही आम्हाला सांगण्यात आले. त्यानंतरही या समितीच्या बैठका या अधिवेशन काळात लावण्यात आल्या. त्यावेळी मी विधीमंडळाचे प्रधान सचिव श्री.कळसे साहेब यांना माननीय सभापतींच्या निर्देशांची आठवण करून दिली होती आणि याबाबतचे पत्र ताबडतोब निर्गमित करा म्हणूनही सांगितले. सभापती महोदय, हे सगळे बाजूलाच राहिले आणि या समितीच्या ज्या सगळ्या बैठका झाल्या आहेत, 10, 18, 27 मार्च आणि 15 एप्रिल रोजी ज्या बैठका झाल्या ..

(यानंतर सौ.रणदिवे .... जेजे 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

यातील चार बैठकांच्या वेळी मी सदनामध्ये भाषण करीत होतो, त्यामुळे मी संयुक्त समितीच्या बैठकीच्या वेळी हजर राहू शकलो नाही. हा सन्माननीय सदस्यांवर अन्याय आहे. मी त्या समितीचा सदस्य आहे, माझे समितीच्या सन्माननीय सदस्यांच्या यादीमध्ये नाव आहे. अशा वेळी मी जर समितीसमोर डिसेंट नोट दिलेली नसेल तर मग मला या सदनामध्ये भाषण करता येत नाही. अशा प्रकारची डिसेंट नोट किंवा त्या विधेयकाच्या संदर्भात विरोधी भूमिका मांडणारे एकही पत्र दिलेले नाही. कारण मी समितीच्या बैठकीमध्ये जी चर्चा झाली, त्यावेळी उपस्थित नव्हतो. त्यामुळे मला एखादी चर्चा रुचली नाही, पटली नाही तर त्याबाबतीत आपले मत व्यक्त करण्याचा जो मला अधिकार आहे, तोही बजावता आलेला नाही. योगायोगाने असे झाले आहे की, नियमानुसार आणि प्रथेप्रमाणे मला आता या विधेयकावर सदनामध्ये बोलता येणार नाही, मी येथे बोलूच शकत नाही आणि केवळ मला समितीच्या बैठकीसाठी जाता आले नाही म्हणून मी ती प्रथा हट्टाने मोडणारही नाही. पण मला माननीय मंत्री महोदयांना विचारावयाचे आहे की, याठिकाणी एक चांगल्या प्रकारचे विधेयक आणले जात आहे अशी जर तुमची भावना असेल तर मला माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, जानेवारीपासून मार्चपर्यंत या तीन महिन्याच्या कालावधीमध्ये समितीची कोणतीही बैठक घेतली नाही. तुम्हाला रिकाम्या वेळेतील तुमचे जे शेडयुल आहे, ते महत्वाचे वाटले. मग ते दिल्लीला जावयाचे असो किंवा इतर ठिकाणी जावयाचे असो. परंतु तुम्हाला हे विधेयक महत्वाचे वाटले नाही. मग चटावरचे श्राध्द उरकून घ्यावे, त्याप्रमाणे अधिवेशनाच्या कालावधीमध्ये सन्माननीय सदस्य येथे उपस्थित असतात. मग त्यांना पत्र पाठवून बोलावून घेतले जाते. खरे म्हणजे या विधेयकाच्या संदर्भात संपूर्ण चर्चा व्हावी यासाठी ही संयुक्त चिकित्सा समिती नेमली होती. अधिवेशनाच्या काळामध्ये चिकित्सा समितीच्या बैठकीमध्ये बिलावर तेवढी चर्चा होत नाही. कारण सन्माननीय सदस्यांचे सभागृहातील कामकाजाकडे लक्ष असते. म्हणून मी अत्यंत खेदाने नमूद करु इच्छितो की, या विधेयकाच्या संदर्भात नेमलेल्या संयुक्त चिकित्सा समितीच्या बैठकीमध्ये इच्छा असूनही मला भाग घेता आला नाही. माझ्या सूचना मांडता आल्या नाहीत.स्वामिनाथन् समितीच्या अहवालामध्ये विविध बाबी उपस्थित केलेल्या आहेत. त्यांनी संपूर्ण देशाच्या संबंधात अहवाल दिलेला आहे. त्याचा बेस हा महाराष्ट्रापेक्षाही बिहार, उत्तर प्रदेश, पंजाब,जम्मू-काश्मिर इ.राज्यांचाही उल्लेख केलेला आहे.आज क्रेडीट सोसायटीची काय परिस्थिती

. . . .2 जे-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

आहे ? याची सर्व माहिती या अहवालामध्ये दिलेली आहे. म्हणून ही सर्व माहिती दिल्यानंतर या विषयाचा अभ्यास करताना त्यामध्ये परिपक्वता यावी, यासाठी योग्य प्रकारे मार्गदर्शन व्हावे. आपण जे वाचले आहे, ते आपल्याला कळतेच असे नाही. अशा वेळी संयुक्त चिकित्सा समितीमध्ये सन्माननीय ज्येष्ठ सदस्य असतात, जे वर्षानुवर्षे समितीवर काम करीत असतात. काही सहकार क्षेत्रातील तज्ञ सन्माननीय सदस्य असतात. ते या समितीच्या बैठकीमध्ये आपली मते मांडतात, विचार मांडतात आणि ते विचार ऐकण्याची सन्माननीय सदस्यांच्या जीवनातील एक फार मोठी संधी असते. परंतु मला तो देखील अनुभवता आला नाही. या विधेयकाच्या संदर्भात काही सूचना करावयाच्या असतील तर त्या देखील करता आल्या नाहीत. म्हणून मी पुन्हा एकदा विनंती करु इच्छितो. अधिवेशनाच्या काळामध्ये अशा प्रकारे बैठका घेऊन असे सांगितल्यानंतर सुध्दा या बैठका घेण्यात आल्या आहेत. ठीक आहे. आता या बैठका झाल्या आणि त्या समितीचा अहवाल देखील सदनासमोर आलेला आहे. पण याबाबतीत वारंवार सांगून सुध्दा भविष्यामध्ये शासनाकडून ऐकले जाणार नसेल तर ते कितपत योग्य आहे ? असा प्रश्न निर्माण होतो. सभापती महोदय, आपण तर निदेश देण्याचे सोडूनच दिलेले आहे. म्हणजे आपली जर अशी आगतिकता असेल, तर मग सन्माननीय सदस्यांचे काय राहिले ? असा प्रश्न निर्माण होतो आणि तशी ती आगतिकता आहेच. हे उदाहरणच आहे. मी अत्यंत नम्रपणे सुचवू इच्छितो की, यापुढे भविष्यामध्ये अधिवेशन सुरु असताना कोणतीही बैठक घेण्यात येऊ नये. समितीच्या अहवालाच्या संदर्भात बैठक घेतली जाते, ते मला मान्य आहे. कारण संयुक्त चिकित्सा समितीच्या बैठकांमध्ये सर्व चर्च झालेली आहे आणि आता फक्त समितीने जो अहवाल तयार केलेला आहे, तो मंजूर करावयाचा आहे. अशा वेळी अधिवेशनाच्या काळामध्ये समितीची बैठक घेतली जाते, कारण समितीचा अहवाल तयार असतो.त्या साठी नाममात्र बैठक घ्यावी लागते. संयुक्त चिकित्सा समितीचे कामकाज वेगळया प्रकारचे असते. या समितीने तयार केलेला अहवाल मंजूर करण्यासाठीच दोन-तीन बैठका होतात. जेणेकरुन त्या मध्ये काही राहिलेले आहे काय ? त्यात काही सुधारणा करावयाची आहे काय ? यादृष्टीने त्यावेळी चर्चा होते. परंतु मला इच्छा असूनही या समितीच्या कामकाजामध्ये भाग घेता आला नाही. तसेच मी या समितीचा सदस्य असल्यामुळे आता मला सदनामध्ये बोलता येणार नाही अशी माझी विचित्र कोंडी झालेली आहे. माननीय मंत्री महोदय, मी आपला सन्मान करतो. परंतु व्यक्तीगत नाही, पण

. . . .2 जे-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यापुढे सदनाचे कामकाज सुरु असताना भविष्यामध्ये अशा प्रकारच्या बैठका घेतल्या जाणार नाहीत यादृष्टीने निश्चित स्वरुपामध्ये आपण निर्णय देणे आवश्यक आहे. आपण आमच्या अधिकारांचे रक्षक आहात. या सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांचे अधिकार सांभाळले गेले पाहिजेत आणि सभापती या नात्याने ही आपली जबाबदारी आहे. त्याबाबतीत आपण माननीय सभापतींच्या संमतीने योग्य ते निर्देश अवश्य द्यावेत, तसे निवेदन करावे अशी आपल्याला अत्यंत नम्रपणे विनंती करतो. धन्यवाद.

. . . .2 जे-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम (सहकार मंत्री) : सभापती महोदय, या सदनामध्ये जे विधेयक मांडण्यात आलेले आहे, ते अतिशय महत्वाचे आहे. सबंध देशामध्ये सहकार क्षेत्राला 100 वर्षे झाल्यानंतर यु.पी.ए.च्या अध्यक्षा माननीय श्रीमती सोनिया गांधी, या देशाचे पंतप्रधान माननीय डॉ.मनमोहन सिंग आणि या देशाचे कृषी मंत्री माननीय श्री.शरद पवार यांनी केंद्रीय मंत्रिमंडळाला देशाच्या माध्यमातून आणि विशेषत: महाराष्ट्र राज्याच्या माध्यमातून एक विनंती केली की, सहकार क्षेत्राला 100 वर्षे झालेली आहेत. अशा वेळी केंद्र शासनाने काहीतरी ठोस निर्णय घेऊन पुढच्या काळामध्ये सहकार क्षेत्राची वाटचाल आणि त्याची दिशा कशी असली पाहिजे याबाबतीत काही निर्णय घेतला पाहिजे. म्हणून केंद्र शासनाने प्रोफेसर वैद्यनाथन् यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. वैद्यनाथन समितीने संपूर्ण देशातील सहकार चळवळीच्या बाबतीत अभ्यास केला, विचार केला.

यानंतर कु.गायकवाड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम...

प्रो. वैद्यनाथन समितीने एक रिपोर्ट केंद्र शासनाला सादर केलेला आहे. हा अहवाल केंद्र शासनाने स्वीकारल्यानंतर निरनिराळया राज्यांशी याबाबत विचारविनिमय करुन एमओयू साईन करण्यात येईल. तसेच त्यासंबंधी ज्या अटी आहेत त्या अटी मान्य करुन राज्यात ज्या प्रायमरी संस्था आहेत त्यांची तूट भरुन देण्यास केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. केंद्र शासनाने जिल्हा बँकेमधील फ्रॉडची रक्कम सोडून इतर सर्व तोटा भरुन देण्याचे मान्य केले आहे. माननीय केंद्रीय अर्थ मंत्री व माननीय केंद्रीय कृषी मंत्र्यांनी राज्यातील सहकार मंत्र्यांच्या बैठका घेतल्या. त्यावेळी त्यांनी असे सांगितले होते की, राज्यामध्ये जो पर्यंत दुरुस्तीचा कायदा पास करुन घेतला जात नाही तोपर्यंत केंद्र शासनाकडून कोणतीही मदत दिली जाणार नाही. या दृष्टीकोनातून राज्य शासनाने दोन वेळा ऑर्डीनन्स काढला.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जी गोष्ट या ठिकाणी मांडली ती खरी आहे. संयुक्त चिकित्सा समितीच्या बैठकीकरीता या क्षेत्रात काम करणाऱ्या 20 तज्ज्ञ सदस्यांची नियुक्ती करण्यात आली होती. ही बैठक घेण्याकरिता माननीय सभापतींची लेखी परवानगी मागण्यात आली होती. त्यांनी लेखी परवानगी दिल्यानंतर संयुक्त चिकित्सा समितीच्या 6 बैठका घेण्यात आल्या होत्या. माननीय राज्यपाल तिसऱ्यांदा ऑर्डीनन्स काढण्याकरिता संमती देतील की नाही अशी शंका होती. आता 550 कोटी रुपयांचा पहिला हप्ता मिळालेला आहे. परंतु यामध्ये अडचण निर्माण होण्याची शक्यता होती. त्यामुळे या सर्व दृष्टीकोनाने, सद्हेतूने समितीचे नियम ठरलेले असताना देखील संयुक्त चिकित्सा समितीच्या 6 बैठका घाईने घेण्यात आल्या. या बाबतचा अहवाल विधानसभेमध्ये सादर केला होता. तो तेथे एकमताने मान्य झालेला आहे. आता ते विधेयक विधान परिषदेमध्ये 3 सुधारणा करुन मांडण्यात येत आहे. या विधेयकासंदर्भात 3 सुधारणा संयुक्त चिकित्सा समितीमध्ये सुचविण्यात आल्या होत्या. त्या सुधारणा मंजूर करण्यात आलेल्या आहेत.

सभापती महोदय, मंजूर करण्यात आलेल्या सुधारणांपैकी, पहिली सुधारणा अशी होती की, पूर्वी सोसायटीचा कोठलाही सभासदाला जिल्हा बँकेवर सदस्य म्हणून उभे राहावयाचे असेल व ती संस्था डिफॉल्टर असेल तर त्यास उभे राहता येत नव्हते. परंतु या तरतुदीमध्ये आता अशी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम...

सुधारणा करण्यात येत आहे की, ती व्यक्ती जर डिफॉल्टर नसेल तर त्या व्यक्तीस निवडणुकीमध्ये उभे राहता येईल. तसेच ती व्यक्ती डिफॉल्टर ससंस्थेची पदाधिकारी असता कामा नये. असे असल्यास त्या व्यक्तीला त्या संस्थेमधून राजीनामा द्यावा लागेल व त्यानंतर त्याला निवडणुकीमध्ये उभे राहता येईल. पूर्वी दामदुप्पटीचा आपण एक निर्णय घेतला होता. त्यामध्ये काही अडचण होती. त्यासंदर्भात दुरुस्ती मान्य केलेली आहे. त्या नुसार या राज्यामध्ये पुन्हा दामदुपटीची योजना सुरु राहील.

सभापती महोदय, सोसायटीच्या सेक्रेटरीचा एक विषय होता.प्रो. वैद्यनाथन समितीने सुचविल्याप्रमाणे एमओयु साईन केल्यास सेक्रेटरीचे अस्तित्व नष्ट होईल म्हणून या संदर्भात नाबार्डशी चर्चा केली. तसेच नाबार्डच्या चेअरमनशी देखील चर्चा केली आहे. येत्या 10 महिन्यामध्ये ही परिस्थिती सध्या आहे तशीच राहील. सन्माननीय सदस्यांनी सूचना केली होती. आम्हाला विश्वासात घेऊन सेक्रेटरीचे अस्तित्व वेगळे कसे राहील, त्याला कायद्याचा आधार कसा मिळेल या दृष्टीने सुधारणा करावी. या तीनही सुधारणा मंजूर केलेल्या आहेत. अनेक सुधारणांचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी केलेला आहे.

सभापती महोदय, इतर राज्यांच्या तुलनेत आपल्या राज्यातील परिस्थिती फार निराळी आहे. गुजरात राज्यामध्ये, सहकार मंत्र्यांची एक परिषद झाली होती. त्यावेळी माननीय मुख्यमंत्री म्हणाले होते की, आमच्या राज्यामध्ये सहकारखाते कसे चालते तुम्हाला माहीत आहे काय ? 30 -30 वर्षे निवडणुकाच झालेल्या नाहीत. काही राज्यांमध्ये सत्ता बदलली व दुसऱ्या पक्षाचे राज्य आले की, सहकार मत्री एक फटकारा द्यावयाचे व त्यामध्ये सगळया संस्था बरखास्त करायचे. अशा अनेक गोष्टी निरनिराळया राज्यामध्ये होत होत्या. महाराष्ट्र राज्याने एमओयु साईन केलेले आहे. 20 हजार सोसायटयांचे ऑडीट झालेले आहे. तसेच जिल्हा बँकेचे देखील ऑडीट सुरु झालेले आहे. जिल्हा बँक सक्षम होण्यास या निधीचा उपयोग होणार आहे. सहकार चळवळीला आता 100 वर्षे पूर्ण झालेली आहेत. सहकाराशिवाय अविकसित देशाला दुसरा पर्याय नाही असे माननीय भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी सांगितले होते. सहाकार चळवळ देशातील इतर राज्यामध्ये फारशी वाढली नाही. सहकार चळवळीचा 50 टक्के

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वाटा हा महाराष्ट्र राज्यामध्ये आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये एकंदर प्रौढ लोकसंख्येपैकी 70 टक्के लोक या ना त्या कारणाने सभासद झालेले आहेत. प्रचंड मोठया प्रमाणात व्याप असलेली ही सहकार चळवळ आहे. या बाबत उदाहरण द्यावयाचे असल्यास मी सांगू इच्छितो की, सध्या राज्यामध्ये 21 हजार प्रायमरी सोसायटया आहेत. 650 अर्बन बँका आहेत, 27 हजार पतसंस्था आहेत, 32 हजार हाऊसिंग सोसायटया आहेत. सूत गिरण्या, दूध संस्था आहेत. अशा प्रकारे सहकारी संस्थांचे खूप मोठे जाळे राज्यामध्ये आहे.

यानंतर श्री. बरवड..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम .....

कर्जमाफीचा काही फायदा या निमित्ताने या सगळ्या संस्थांना होणार आहे. म्हणून अशा पध्दतीचे शेतकरी आणि लोकांच्या हिताकरिता सहकार चळवळीला चांगली दिशा देणारे विधेयक या ठिकाणी मांडले आहे. हे विधेयक विधानसभेने संमत केले आहे. माझी या सदनातील सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, ...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय चांगले निवेदन करीत आहेत. परंतु एमओयूवर सही केल्यामुळे कोणते निर्बंध येणार आहेत हे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे. नवीन सुधारणामुळे काय होणार आहे, रिझर्व बँकेची कोणती बंधने येणार आहेत ते सांगावे.

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, आम्ही जी दुरुस्ती केली ती खरे म्हणजे करता येत नाही. हे जसे आहे तसे मान्य केले पाहिजे असा केंद्र सरकारचा आग्रह आहे. यामध्ये काही बंधने येणार आहेत. सोसायटीमध्ये बाहेरच्या कोणत्याही सदस्याला पैसे ठेवता येतील. त्याला सदस्य होता येईल. जिल्हा बँकेवर कोणतीही ॲक्शन घ्यावयाची असेल तर पूर्वी सहकार विभाग ॲक्शन घेत होते परंतु आता त्याच्या अगोदर रिझर्व बँकेची परवानगी घ्यावी लागणार आहे. नाबार्डची परवानगी घ्यावी लागणार आहे. वित्तीय बाबींच्या संदर्भात आमचा त्याला विरोध नाही. अर्बन बँकांच्या बाबतीत एमओयू साईन केला. जो टास्कफोर्स नेमणार आहोत त्यामध्ये आमचे दोन अधिकारी असतील तसेच रिझर्व बँकेचे दोन प्रतिनिधी असतील, स्टेट फेडरेशनचे 2 प्रतिनिधी असतील, नॅशनल फेडरेशनचे प्रतिनिधी असतील. आर्थिक शिस्त आणली पाहिजे याबद्दल आमचे दुमत असण्याचे कारण नाही. आमचे अधिकारी किंवा दुसऱ्यांचे अधिकारी हे महत्वाचे नाही. ही चळवळ सक्षम झाली पाहिजे आणि पुढे चांगली चालली पाहिजे यादृष्टीने हे विधेयक मान्य करण्यासाठी सभागृहासमोर मांडलेले आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती उषा दराडे)

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सहकार मंत्र्यांनी या ठिकाणी चांगले प्रवचन दिले. त्यांनी महाराष्ट्रातील सहकार चळवळ कशी स्वाहाकार बनली आहे आणि त्यावर इलाज कसा करावा तसेच स्वामीनाथन समितीच्या माध्यमातून केंद्र सरकारने मदतीचे जे आश्वासन दिले त्या मदतीचा पुरेपूर फायदा घ्यावा आणि सहकार जास्तीतजास्त वाढावा याबद्दल आपल्या प्रवचनामध्ये माहिती दिली त्याबद्दल त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत. या महाराष्ट्रामध्ये सहकार चळवळीला 100 वर्षे झाली. या 100 वर्षामध्ये सहकाराची परिस्थिती अशी का झाली याचा अंतर्मुख होऊन कोणी विचार केला काय ? तो विचार करत नाहीत. रोग झाला की इलाज करतो परंतु रोग होण्याची कारणे काय आहेत याचा विचार कोणी केला नाही. सहकार हे महाराष्ट्रातील खूप मोठे व्यापक क्षेत्र आहे. सहकारातून महाराष्ट्रातील अनेक लोक पद्मश्री झाले. अनेक प्रकारचे किताब त्यांनी मिळविले. अनेक संस्थाने उभी राहिली. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या मेहरबानीने देशातील संस्थाने संपली परंतु आज सहकाराच्या माध्यमातून सगळे संस्थनिक महाराष्ट्रामध्ये उभे राहिले आहेत. सहकारी बँकांचे कोट्यवधी रुपयांचे घोटाळे झाले. त्या प्रकरणांचे पुढे काय झाले हे लोकांना कळले नाही. किती हजार कोटी रुपयांचे घोटाळे झाले हे सगळ्यांना कळले परंतु त्याबाबत पुढे काय झाले, कोर्टामध्ये प्रकरणे जाऊन किती लोकांना सजा झाली, किती लोकांनी भ्रष्टाचार केला यासंदर्भातील माहिती महाराष्ट्रातील जनतेला आजही उपलब्ध नाही. या सगळ्यांवर इलाज म्हणून या ठिकाणी हे विधेयक आाण्ले आहे. हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे गेले होते. आपल्यावर दबाव होता तसेच लवकरात लवकर बिल मंजूर केले नाही तर आर्थिक मदत मिळणार नाही आणि सहकाराचे कल्याण होणार नाही असे जे सांगण्यात आले ते योग्य आहे. परंतु यातून नेमका काय संदेश देत आहोत याचाही विचार माननीय मंत्रिमहोदयांनी करण्याची आवश्यकता आहे. आज सर्व शेतकऱ्यांच्या बाबतीत जो निर्णय घेतलेला आहे त्याच्या पाठीमागे उद्देश चांगला आहे. शेतकऱ्यांनी कर्जबाजारी होऊ नये तसेच जे कर्जबाजारी झाले त्यांना कर्ज फेडता आले नाही तर त्यांनी आत्महत्या करु नये असा उदात्त हेतू आहे. तसाच आपला हेतू उदात्त यामध्ये आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबत नसतील तर त्याची कारणे काय आहेत याबद्दल शोध घेण्याचे काम सध्या चालू आहे. ते केव्हा पूर्ण होईल हे माहीत नाही. परंतु सहकारामध्ये जो भ्रष्टाचार आला

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार....

त्याच्यामुळे सहकारी बँका बुडित निघाल्या आहेत, अनेक ठिकाणी बँकेचे अध्यक्ष, संचालक, अधिकारी यांनी संपत्तीचा प्रचंड अपव्यय केला आहे. त्यामुळे त्या लोकांना काय शिक्षा होते ? काही नाही. या विधेयकाच्या दुरुस्तीतून सरकार काय मिळविणार आहे ? केवळ केंद्र सरकारकडून 550 कोटी रुपये मिळणार आहेत. तो पैसा मिळाल्यानंतर त्याचा कसा वापर करावा असा संभ्रम निर्माण झाला आहे. त्या पैशाचा विनियोग कशा प्रकारे केला जाईल याबाबतची भूमिका या विधेयकाच्या निमित्ताने शासनाने मांडली आहे. कोणाला कर्जातून मुक्त करु नये असे मी म्हणणार नाही. परंतु बँकांनी, पत संस्थांनी गैरव्यवहार करुन जनतेला वेठीस धरणे हा सुध्दा महाराष्ट्राला लागलेला रोग आहे. त्या रोगाचे निर्मूलन करणे आवश्यक आहे. या रोगाचे निर्मूलन करण्यासाठी कोणती उपाययोजना केली आहे काय, प्रभावी उपाय योजले आहेत काय ? कर्ज बुडविले तरी त्यांना मदत केली जाते असा आतापर्यंतचा अनुभव आहे. केंद्र सरकारने स्वामीनाथन कमिटी नेमल्यानंतर त्या कमिटीने संपूर्ण देशाबाबत अहवाल दिला आहे. मला कल्पना आहे की, महाराष्ट्रामध्ये सहकाराचे मोठे जाळे आहे. देशातील अन्य कोणत्याही राज्यामध्ये सहकाराच्या माध्यमातून इतके काम झालेले नाही याची मला पूर्ण माहिती आहे. या सहकाराच्या माध्यमातून अनेक लोकांनी चांगले काम केले आहे. राज्यात अनेक सहकार महर्षी झाले आहेत. आता सहकार महर्षींची संख्या वाढल्यामुळे सरकार अडचणीमध्ये येत आहे. शिक्षण संस्था खूप वाढल्या आहेत. त्यामुळे शिक्षणाची वाट लागत चालली आहे अशी भयानक स्थिती शिक्षण खात्याची आहे. सहकार क्षेत्रात निरनिराळे विषय येतात. पतपेढी असेल, सहकारी संस्था असेल, सहकारी कारखाना असेल, सहकारी बँक असेल अशा विविध माध्यमातून पैशाचे व्यवहार केले जातात. त्यातून गैरव्यवहार होत आहेत. त्याच्यावर इलाज करण्यात येणार आहे. हे विधेयक संयुक्त समितीकडे गेल्यामुळे आम्ही या विधेयकाचा बारकाईने अभ्यास केला नाही. परंतु सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी माहिती दिल्यानंतर मला मोठी काळजी वाटू लागली आहे. संयुक्त समितीकडे हे विधेयक पाठवून आपण चूक तर केली नाही ना असे वाटू लागले. या सभागृहात निदान सविस्तर चर्चा तरी झाली असती असा विचार माझ्या मानामध्ये आला आहे. सन्माननीय

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.मधुकर सरपोतदार.....

सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सदनाच्या काळामध्ये कोणत्याही समित्यांच्या बैठका घेण्यात येऊ नयेत अशी विनंती माननीय सभापतींना केली होती. त्याला मी पाठिंबा दिला होता. अनेक समित्यांच्या बैठका सदनाच्या काळात होतात. त्यामुळे सदनाचे कामकाज सोडून त्या बैठकांना जावे लागते. त्यामुळे सदनामध्ये काय घडते ते समजत नाही. ही गोष्ट अतिशय निषेधार्ह आहे, स्वागतार्ह नाही. आम्ही सदनामध्ये कामकाजात भाग घेण्यासाठी येतो. परंतु मघाशी सभागृहात कोरम नव्हता, त्यामुळे सदनाचे नेते श्री.आर.आर.पाटील यांना सभागृहात दिलगिरी व्यक्त करावी लागली. एवढी भयानक स्थिती या सदनाची झाली आहे. पुन्हा अशी स्थिती उद्‌भवू नये. येथे बसलेल्या प्रत्येक सदस्यांना सदनाच्या कालावधीत समितीच्या बैठकांना बोलवून तेथे त्यांना गुंतवणूक ठेवावे असे माझे मत नाही. येथे बसणा-या प्रत्येक सभासदाला कामकाजात भाग घेता आला पाहिजे आणि जास्तीत जास्त विषयात सहभागी होऊन विषयाला न्याय देण्याचे काम त्यांनी केले पाहिजे. तरच देशाची लोकशाही मजबूत होईल अन्यथा लोकशाही मजबूत होणार नाही.

सभापती महोदया, मुंबईतील गिरणी कामगारांसंबंधीचा प्रश्न सभागृहात चर्चेला आला होता. त्यावेळी सदनात 5 सदस्य सुध्दा उपस्थित नव्हते. ही शोकांतिका आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी बाहेर सहकार क्षेत्रात लक्ष द्यावे, बाहेर भ्रष्टाचाराने किती लोक बरबटलेले आहेत ते कळेल. मी कोणाचेही नाव घेणार नाही. सहकारावर आमच्यापेक्षा आपण अधिक चांगले प्रवचन देऊ शकता. माणूस अनुभवातून प्रवचन देऊ शकतो. पण सहकाराची अंमलबजावणी कशी होते हे पाहिले पाहिजे. आज सहकार क्षेत्रामध्ये काय चालले आहे ते पहावे. सहकार क्षेत्रात कोणतेही काम सहजासहजी होईल अशी परिस्थिती राहिलेली नाही. टेबलाखालून हातावर काही तरी ठेवल्यास काम होते. तुम्ही पैसे दिले तरच तुमचे काम होईल ही वस्तुस्थिती आहे.

नंतर श्री.शिगम

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी नोंद

(श्री. मधुकर सरपोतदार...)

ती कोणीही नाकारु शकणार नाही. जेथे भ्रष्टाचार नाही असे एकही खाते नाही. मी स्पष्ट बोलतो त्याबद्दल माननीय मंत्री महोदयांनी रागावू नये. परंतु हे कोणी तरी बोललेच पाहिजे म्हणून मला हे नाईलाजाने सांगावे लागत आहे. घरांचे रजिस्ट्रेशन असो, संस्थेचे रजिस्ट्रेशन असो, कारखान्यांचे रजिस्ट्रेशन असो,अन्य कोणत्याही प्रकारचे रजिस्ट्रेशन असो, त्या ठिकाणी भ्रष्टाचार झाल्या शिवाय रजिस्ट्रेशन होणार नाही अशी आजची परिस्थिती आहे. रजिस्ट्रेशनसाठी रोज खेपा माराव्या लागतात. या परिस्थितीवर मात करण्यासाठी आपण इलाज केला पाहिजे. आपण हा जो इलाज करीत आहात तो कर्जाच्या संदर्भातील आहे. एखादी संस्था आर्थिकदृष्टया कमकुवत झाली, डबघाईला आली तर तिला आर्थिकदृष्टया मदत करण्याची भूमिका आपण घेतलेली आहे. त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. डबघाईला आलेल्या संस्थेला आर्थिक मदत केल्यानंतर पुन्हा ती संस्था डबघाईला आली तर काय करायचे या प्रश्नाचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी आजच तयार करावे. सभापती महोदय, या सदनामध्ये आपण सर्व लोकप्रतिनिधी म्हणून येतो. प्रत्येक गोष्टीत सुधारणा कशी होईल हे पहाणे आपले काम आहे तसेच ती व्यवस्था खराब कशी होणार नाही हे देखील पहाणे आपले काम आहे. जोपर्यन्त माननीय सहकार मंत्री डॉ. पंतगराव कदम यांच्याकडे हे खाते आहे तोपर्यन्त ते याबाबतीत इलाज करु शकतात. कारण त्यांना स्वाहाकार करण्याची गरज नाही.

सभापती महोदय, आज गरिबाला शिक्षणासाठी पाऊल पुढे टाकणे अशक्य झालेले आहे. आपण हे राज्य कोणासाठी चालवितो ? कशासाठी चालवितो ? आपणाला स्वातंत्र्य कशासाठी पाहिजे होते ? या देशातील गरिबाला न्याय मिळण्यासाठी आपल्याला स्वातंत्र्य पाहिजे होते. ते स्वातंत्र्य मिळाले. पण गरिबाला न्याय मिळतो का ? स्वातंत्र्य मिळून 60 वर्षे झाली. त्यातील साडेचार वर्षे युतीचे राज्य होते. बाकीची 55 वर्षे आपण राज्य करीत आहात. ज्या ज्या वेळी दुखणे येते त्या त्या वेळी युतीकडे बोट दाखवून राणा भीमदेवी थाटाने येथे भाषणे केली जातात याचे मला आश्चर्य वाटते. मी या विधेयकाचे स्वागत करतो. हे विधेयक पास होऊ नये, ते पास होण्यामध्ये अडथळे निर्माण करण्याची आमची भावना नाही. परंतु भविष्यामध्ये सुधारणा व्हायला पाहिजे म्हणून आमचे विचार आम्ही बोलून दाखवितो. हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्यात आले होते. संयुक्त चिकित्सा समितीचा अहवाल या विधेयकाच्या प्रती बरोबर आम्हाला देण्यात आलेला

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर सरपोतदार...)

आहे. हा अहवाल आधी दिला असता तर चिकित्सा समितीचा अहवाल काय आहे आणि या विधेयकामध्ये काय तरतुदी आहेत याचा अभ्यास आम्हाला करता आला असता. आपणाला साडेपाचशे कोटी दोन टप्प्यामध्ये मिळणार आहेत. त्या पैशाचा अपव्यय होणार नाही, गरिबाला त्याचा फायदा कसा होईल हे पाहिले पाहिजे. जे लुटारु आणि चोर लोक आहेत त्यांना दूर ठेवून गरजू लोकांना या सहकारातून कसे सहाय्य होईल यादृष्टीने विचार करुन आपण मदत करावी अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

...नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम (सहकार मंत्री) : सभापती महोदया, या सदनाचे ज्येष्ठ सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी या विधेयकासंबंधी अतिशय चांगले विचार मांडले आहेत. त्यांनी विचार मांडताना सांगितले की, सहकार क्षेत्रात फार मोठया प्रमाणात भ्रष्टाचार सुरु आहे. मी या सदनास नम्रपणे सांगू इच्छितो की, सहकाराचा व्याप जबरदस्त मोठा आहे. 27 हजार पतसंस्थांपैकी 300 ते 400 संस्थांमध्ये गडबड झाली. यातील काही संस्था तर पैसे देऊ शकत नव्हते. या संस्थांच्या संदर्भात श्री. रत्नाकर गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली टास्क फोर्स नेमला. श्री. रत्नाकर गायकवाड यांची सहकार विभागातून एम.एम.आर.डी.ए.मध्ये बदली झाली असतानाही त्यांच्या अध्यक्षतेखाली टास्क फोर्स नेमला. या पतसंस्थांच्या बाबतीत टास्क फोर्सची दर आठवड्याला बैठक होत असते. अर्बन बँकेच्या संदर्भात शासनाने रिझर्व्ह बँकेबरोबर एम.ओ.यू.साईन केलेला आहे. रिझर्व्ह बँकेचा फायन्शीयल कंट्रोल अर्बन बँकावर आलेला आहे. एम.ओ.यू. साईन केल्यामुळे जिल्हा बँकावर देखील रिझर्व्ह बँकेचा कंट्रोल येणार आहे. महाराष्ट्रात सहकार चळवळीने ग्रामीण आणि शहरी भागात जो विकास केलेला आहे तो किंबहुना सरकारपेक्षा जास्त केलेला आहे. या राज्यात महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री कै.यशवंतराव चव्हाण यांनी 1962 साली महाबळेश्वर येथे झालेल्या शिबिरात कृषि औद्योगिक समाजरचनेची भूमिका घेतली. त्या भूमिकेमुळे आज महाराष्ट्रात 225 सहकारी साखर कारखाने निघाले. जिल्हा सहकारी बँका निघाल्या, खरेदी विक्री संघ निघाले, त्यामुळे सहकार क्षेत्राचा व्याप प्रचंड प्रमाणात वाढला आहे. या सहकारी संस्थांमध्ये कुठे काही घडत नाही असे मी म्हणणार नाही. मी सहकार मंत्री झाल्याबरोबर एक निवेदन केले होते की, ज्या सहकारी संस्था चांगल्या चालतील त्यांना मदत केली जाईल. त्या पतसंस्थांमध्ये थोडेफार दोष असतील तर त्या संस्थांना सुधारण्याची संधी दिली जाईल. परंतु जे लोक या सहकारी संस्था मोडावयास आणि हाणावयास निघाले आहेत, त्यांना खडयासारखे बाजूला फेकले जाईल. कोणत्याही सहकारी सस्थेत भ्रष्टाचार झाल्याची घटना आपल्या निदर्शनास आली तर ती घटना माझ्या निदर्शनास आणून द्यावी. भ्रष्टाचार करणाऱ्यांवर निश्चितपणे कारवाई केली जाईल. मग त्या संस्था सत्ताधारी पक्षाच्या ताब्यातील असतील वा अन्य कोणाच्या ताब्यातील असतील, अशा संस्थांना पाठीशी घातले जाणार नाही. या संस्थांमध्ये भ्रष्टाचार करणाऱ्यांवर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम...

कारवाई करण्यात येईल. दुसरे असे की, हे राज्य 1960 साली निर्माण झाले. केंद्रानंतर आर्थिकदृष्टया सबळ असलेले महाराष्ट्र राज्य आहे. या राज्यात 1983 पर्यंत 300 ते 400 पट इंडस्ट्रीज् वाढल्या. पण टेक्निकल नो हाऊ शून्य झाला. परंतु कै.वसंतदादा पाटील यांच्यासारखी एक सातवी नापास असलेली, स्ट्रॉंग कॉमनसेन्स असलेली, व्यवहारज्ञान असलेली व्यक्ती या राज्याच्या मुख्यमंत्री पदी आसनस्थ झाली. ते मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी असे धोरण जाहीर केले की, 10 टक्के मॅनेजमेंट कोटा आणि बाकीच्या सर्व जागा नियमाने आणि मेरीटवर भरल्या जातील. परंतु असे घडले की, इंग्लंड, अमेरिका यापेक्षा महाराष्ट्र टेक्निकल नो हाऊच्या बाबतीत पुढे गेला. महाराष्ट्रात 200 पेक्षा जास्त इंजिनिअरिंग कॉलेजेस निघालीत, 300 च्या वर पॉलिटेक्निक कॉलेजेस निघालीत. सरकारचा छदामही न घेता ही कॉलेजेस् काढली गेली. परंतु आज या कॉलेजची परिस्थिती फारच गंमतीदार झाली आहे. त्याबाबतीत मी काही भाष्य करु शकत नाही. केंद्र सरकार, राज्य सरकार, कोर्ट यांच्या नियमामुळे नेमके कोठे काय घडले आहे, त्याचे काय चालले आहे ही गोष्ट कोणालाही समजत नाही. जे विद्यार्थी या महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत आहेत, त्यांना काही माहिती मिळत नाही. शिक्षक काय शिकवितो आहे ते विद्यार्थ्यांना माहीत नाही. या क्षेत्रात सगळीकडे आनंदीआनंद चालला आहे. सगळा विचार केला तर जे काही काम चालले आहे, ते चांगले आहे. टेक्निकलच्या बाबतीत ए.आय.सी.टी आहे, राज्य शासन आहे. या सगळया एजन्सी कंट्रोल करण्यासाठी आहेत. या ठिकाणी नेहमी सांगितले जाते की, सहकार क्षेत्रात मोठया प्रमाणात भ्रष्टाचार होत आहे. ज्या सहकारी संस्थेत भ्रष्टाचार झाला आहे ती बाब माझ्या निदर्शनास आणून दिली तर त्या संस्थेतील संचालकांवर निश्चितपणे कारवाई केली जाईल. हा सहकार मंत्री कोणाचा मिंधा नाही. मला कोणाचे देणे घेणे नाही. या राज्यात मी 5 वर्षे शिक्षण मंत्री होतो, उद्योग मंत्री होतो. आमच्या नेत्या श्रीमती सोनिया गांधी यांनी सूचना केली की, शिक्षण विभाग हा तुम्ही घेतला पाहिजे. मला कोणत्याही मोठया पदाची अपेक्षा नाही. ज्या पदावर नियुक्ती केली जाते त्यापदावर प्रामाणिकपणे काम केले पाहिजे अशी माझी भूमिका असते. कोणत्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/

डॉ. पतंगराव कदम....

पदांवरुन काम केले पाहिजे याला महत्व नाही. परंतु जे पद मिळाले आहे, त्या पदावरुन उत्तम काम करणे, गतिमान काम करणे अशी माझी सवय आहे. म्हणून पुणे येथील सदाशिव पेठेमध्ये प्रचंड मोठी शैक्षणिक संस्था उभी केली. केंद्रात भारतीय जनता पक्षाचे सरकार असताना महाराष्ट्रातील एकाही शैक्षणिक विद्यापीठाला "ए" ग्रेड मिळाली नाही. परंतु त्या काळात भारती विद्यापीठाला "ए"ग्रेड मिळाली आहे. भारती विद्यापीठाला आता "ए" ग्रेड मिळाली असती तर तुम्ही बोलला असतात की, राज्यात आणि देशात तुमचेच सरकार आहे. म्हणून तुमच्या विद्यापीठाला "ए" ग्रेड मिळाली.

यानंतर श्री. कानडे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते आणि निवृत्तीवेतन विधेयकावर बोलत असतांना मला असे सूचित करावयाचे आहे की, सन्माननीय सदस्यांना विमानाच्या फेऱ्या वाढविण्याबाबत जो प्रयत्न माननीय अर्थमंत्र्यांनी केला त्या निर्णयाचे मी स्वागत करतो. पण माझी अशी विनंती आहे की, आपले राज्य प्रामुख्याने केंद्रशासनाच्या अनुदान व निधीवर चालत आहे आणि त्या अनुषंगाने केंद्रशासनाच्या ज्या विविध योजना आहेत त्यांच्या बाबतीत केंद्राकडे स्वत: सन्माननीय सदस्यांनाच पाठपुरावा करावा लागतो. त्यात नगरविकासासाठी असलेला निधी असेल, ग्रामीण विकासाचा निधी असेल अथवा ग्रामीण रस्त्यांसाठी असलेला निधी अशा विविध योजनांसाठी निधी मिळण्याबाबत पाठपुरावा करावा लागतो. मी अलिबाग नगरपालिकेच्या भुयारी गटार योजनेसंबंधीचा प्रस्ताव राज्यशासनाकडे सादर केला आहे. त्यासंदर्भात पाठपुरावा केला असता माननीय जलसंपदा मंत्री श्री. अजित पवार यांनी मला सांगितले की, आपण यासंदर्भात दिल्लीमध्ये देखील पाठपुरावा करावा. अशा प्रकारे केंद्रशासनाच्या योजना आपल्याला आणावयाच्या असल्या तरी लोकप्रतिनिधी म्हणून दिल्लीला जावे लागते व त्यासाठी दिल्लीच्या विमान फेऱ्या वाढविल्या पाहिजेत, अशी माझी मागणी आहे.

त्याचप्रमाणे माझी दुसरी सूचना अशी आहे की, माजी सदस्यांच्या बाबतीत मी सभागृहात अनेक वेळा मागणी केली की, माजी सदस्यांना सन्मानाची वागणूक मिळाली पाहिजे आणि माननीय मंत्री महोदयांनी सुध्दा त्या त्या वेळी आश्वासन दिले की, माजी सदस्यांना सन्मानाची वागणूक दिली जाईल. जिल्हाधिकारी आणि तहसीलदार यांच्या कार्यालयात आमदार गेल्यानंतर त्यांना माजी सदस्य म्हणून वेगळा प्रोटोकॉल असला पाहिजे. आपण देखील कधी तरी माजी सदस्य होणारच आहात, हे मी माननीय अर्थ राज्यमंत्र्यांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो. तसेच कायदा बनत असतांना या सदस्यांना एक जिल्हा दिला पाहिजे आणि यादृष्टीने अनेक वेळा सभागृहात माननीय मंत्री महोदयांनी आश्वासन दिलेले आहे. अनेक वेळा पुरवणी मागण्यांवर चर्चा करीत असतांना, विधेयकावर चर्चा करीत असतांना सातत्याने मी मागणी करीत आलो आहे. यासंदर्भात शासनाकडून आश्वासन दिले परंतु कार्यवाही मात्र कुठलीच होत नाही. साधा प्रश्न आहे तो म्हणजे माजी सदस्यांना टोलसंबंधीची सवलत दिली पाहिजे अशी मागणी अनेक वेळा सभागृहात केली व त्यासाठी केवळ एक परिपत्रक काढावयाचे आहे आणि त्याचा बोजा शासनावर कुठल्याही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील.....

प्रकारे पडणार नाही. परंतु ती सवलत देखील माजी सदस्यांना दिली जात नाही. म्हणून या विधेयकाच्या निमित्ताने मी शासनाला असे सांगू इच्छितो की, या सदनाच्या माजी सदस्यांना या राज्यामध्ये सन्मानाने वागणूक दिली पाहिजे. मी ऑस्ट्रेलियाच्या अभ्यास दौयावर असतांना तेथील पार्लमेंटमध्ये गेलो असता त्या ठिकाणी माजी सदस्यांना अत्यंत सन्मानाची वागणूक दिली जाते व विविध प्रकारच्या सवलती सुध्दा दिल्या जातात, महिन्याला 65 हजार रुपये निवृत्ती वेतन दिले जाते. तसेच तेथील पंतप्रधानांना भेटण्यासाठी त्यांना पास काढावा लागत नाही, केवळ सिक्युरिटी त्यांची तपासणी करतात, अशा प्रकारे वेगळीच सिस्टीम या देशात आहे. म्हणून माझी विनंती आहे की, आम्ही आमदार म्हणून परदेशात दौरा करुन आल्यानंतर आलेल्या अनुभवांचा अभ्यास माननीय मंत्री महोदय करतात की, नाही ? हा खरा प्रश्न आहे. ब्रिटीश पार्लमेंटच्य धर्तीवर आपल्या देशाची घटना निर्माण केली आहे परंतु त्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांना वागणूक मिळत नाही. आजही काही माजी आमदारांच्या पत्नीला रोजगार हमीवर काम करावे लागते असे दाखले सुध्दा मी देऊ शकतो. असे दृश्य पाहिल्यानंतर असे वाटते की, ज्या लोकांनी हे राज्य चालविले, जे लोकांमधून निवडून आले, ज्यांनी लोकांचे प्रश्न मांडले आणि कायदे बनविले.

यानंतर श्री. जुन्नरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील.....

आज माजी सन्माननीय सदस्यांचा सन्मान होतांना दिसत नाही. हे विधेयक संमत करीत असतांना अनेक वेळा यासंदर्भात चर्चा होत असते परंतु एकदा विधेयक मंजूर झाल्यानंतर सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनांचा विसर पडला जातो. त्यामुळे या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्या सूचनांचा समावेश येत्या पावसाळी अधिवेशनात होण्याची आवश्यकता आहे व त्यासंदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी सभागृहाला आश्वासन देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, रायगड जिल्हाधिकारी कार्यालयात एका काँग्रेसच्याच माजी आमदाराला शिपाई आत सोडत नव्हता, त्यावेळेस मी तेथेच उपस्थित होतो. हा सर्व प्रकार पाहिल्यानंतर मी त्या माजी सन्माननीय सदस्यांना जिल्हाधिका-यांकडे घेऊन गेलो. ज्या सन्माननीय सदस्यांनी आपल्या मतदारसंघातील जनतेची सेवा केलेली असते त्यांच्याशी जर अशा प्रकारे वागले जाणार असेल तर ते योग्य नाही एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. हे राज्य अधिकारी चालवतात की, लोकप्रतिनिधी चालवितात हे ठरवण्याची वेळ आलेली आहे. जर कायदे सन्माननीय सदस्य बनवतात तर तुम्ही अधिका-यांना का घाबरता असे मला या प्रसंगी विचारावयाचे आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य सूचना करतात त्याला मंत्रीमहोदय "होय" म्हणतात परंतु अधिकारी काही तरी सांगतात म्हणून त्याची अंमलबजावणी पुढे केली जात नाही. अधिकारी म्हणतील त्याला मंत्री महोदय "होय" म्हणतात त्यामुळे आता तरी माजी सन्माननीय सदस्यांच्या संदर्भात दुर्लक्ष होऊ नये, माजी सन्माननीय सदस्यांच्या संदर्भात माननीय अर्थमंत्र्यांनी ठोस असे आश्वासन विधेयकाच्या निमित्ताने सभागृहाला देण्याची आवश्यकता आहे. माजी सन्माननीय सदस्यांचे दु:ख मी या विधेयकाच्या निमित्ताने मांडलेले आहे त्यामुळे यासंदर्भात शासनाने सहानुभुतीने विचार करुन व मी ज्या सूचना मांडलेल्या आहेत त्या सूचनांचा समावेश विधेयकामध्ये करण्यात यावा एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (स्थानिक मुंबई प्राधिकरण) : सभापती महोदय, सभागृहात "सदस्यांचे वेतन व भत्ते" यासंदर्भातील विधेयक आल्यानंतर ते एक मिनिटात पास होते कारण सगळया सन्माननीय सदस्यांना वेतन व भत्त्यात वाढ व्हावी असे वाटत असते. माजी सन्माननीय सदस्यांच्या भावना या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी मांडलेल्या आहेत. मला आजी व माजी अशा दोन्हींचा अनुभव मिळालेला आहे. मी गेल्या दोन वर्षापूर्वी माजी सन्माननीय सदस्य होतो त्यावेळेला माजी सन्माननीय सदस्यांना कशा अडचणींना तोंड द्यावे लागते याचा अनुभव घेतलेला आहे. माजी सन्माननीय सदस्यांना 4000 रुपये पेन्शन आहे परंतु आता पेन्शनमध्ये वाढ झालेली आहे.

सभापती महोदय, या विधेयकाच्या संदर्भात मी एक दोन सूचना करणार आहे.सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्हयात विमानतळ नाही त्यामुळे आम्हाला गोवा विमानतळावरुन यावे लागते. किंवा गोव्या वरुन विमान पकडावे लागत असते. परंतु गोवा विमानतळावरुन प्रवास केल्यानंतर तो प्रवास राज्याबाहेरील विमान प्रवास धरला जातो. सन्माननीय सदस्यांना दिल्लीची एकेरी फेरी आहे. त्यामुळे कोकणातील सन्माननीय सदस्यांना ज्यावेळेस कोकणात जायचे असेल, सावंतवाडी, वेंगुर्ला येथे जावयाचे असेल तर त्याला गोव्यात उतरुन जावे लागते त्यामुळे गोवा विमानतळाची फेरी अंतर्गत धरली जावी अशी विनंती आहे.

माझा दुसरा मुद्दा असा आहे की, हे राज्य कोण चालवते? कायदे बनवण्याचे काम कोण करतो? सभापती महोदय, सन्माननीय सदस्य कायदे करीत असतात परंतु आम्ही ज्यावेळेस विमानातून प्रवास करतो तेव्हा सन्माननीय सदस्यांना "वाय" क्लास मध्ये बसावे लागते परंतु अधिकारी मात्र "जे" क्लास मध्ये बसत असतात. सन्माननीय सदस्यांना अधिका-यांच्या "जे" क्लासला ओलांडून "वाय" क्लासमध्ये शेपटाकडे बसावे लागते त्यामुळे आमची मागणी आहे की, कुठल्याही अधिका-याला "जे" क्लासमध्ये बसण्याची परवानगी देऊ नये. जर आपण अधिका-यांना "जे" क्लासमध्ये बसण्याची परवानगी देणार असाल तर सन्माननीय सदस्यांना देखील "जे" क्लास मध्ये बसण्याची परवानगी द्यावी.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ...

आपल्याला जो काही अनुभव आलेला आहे वा येत आहे तो लक्षात घेऊनसुध्दा शासन अशा प्रकारचे विधेयक आणते याचे मला आश्चर्य वाटते. सदस्यांना यातील गोष्टी कळता कामा नयेत असेच अधिका-यांना वाटत असले पाहिजे. या विधेयकावर बोलत असतांना मी दोन मागण्या केलेल्या आहेत. सिंधुदूर्ग जिल्हयासाठी गोवा किंवा बेळगाव या पैकी जे विमानतळ जवळ असेल त्या ठिकाणच्या फे-या अंतर्गत फे-यासाठी धरण्यात याव्यात .त्याचप्रमाणें सन्माननीय सदस्यांसाठी "जे" क्लासची तरतूद केली पाहिजे . आम्हालासुध्दा "जे " क्लासने विमान प्रवास करण्याची सवलत मिळाली पाहिजे. तिजोरीवर जर जास्त भार येत असेल तर आम्हालासुध्दा जे क्लासने विमान प्रवास करण्यासाठी परवानगी मिळावी असा आमचा हट्ट नाही. मग "वाय" क्लासनेच सर्वांनी प्रवास केला पाहिजे. अन्यथा आम्हाला "जे" क्लासने विमान प्रवास करण्याची सवलत दिली पाहिजे अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदया, यानंतर मला या विधेयकाच्या अनुषंगाने आणखी एक मागणी करावयाची आहे. जे सदस्य निवृत्त होतात त्यांना वैद्यकीय बिल सादर करीत असतांना त्रास सहन करावा लागतो त्याचप्रमाणे रेल्वेने प्रवास करीत असतांना स्वत:चे पैसे अगोदर खर्च करावे लागतात व नतर बिल सादर करुन पैसे घ्यावे लागतात. तेव्हा या निवृत्त सदस्यांना देखील कुपन्स दिली गेली पाहिजेत. त्यांना जर कुपन्स देण्यात आली तर त्यामुळे मोठया प्रमाणावर आर्थिक बोजा पडेल असे मला वाटत नाही. त्यांना कुपन्स देण्यात येतील असे कबूल करण्यात आले होते परंतु प्रत्यक्षात कुपन्स दिली गेली नाहीत .तेव्हा निवृत्त सदस्यांना प्रवासासाठी कुपन्स दिली गेली पाहिजेत. आपण कधी तरी निवृत्त होणार आहोत तेव्हा या मागणीचा आपण विचार केला पाहिजे. एखाद्या वेळी जर कुपन्सचा गैरवापर होत आहे असे आढळून आले तर ही सवलत काढून घ्यावी वा योग्य ती कार्यवाही करावी. निवृत्त सदस्यांनी अगोदर प्रवास करावयाचा आणि नंतर बिल सादर करण्यासाठी मुंबईला वा अन्य ठिकाणी जावे लागते हे त्यांना गैरसोयीचे होत आहे. 70 ते 75 व्या वर्षी हा त्रास त्यांना सहन करावा लागतो.मघाशी सन्माननीय सदस्यांनी असा उल्लेख केला होता की, एका निवृत्त सन्माननीय सदस्यांची पत्नी रोजगार हमी योजनेच्या कामावर काम करीत आहे.अशा प्रकारे या निवृत्त सदस्यांची नेहमीच अवहेलना होत असते तेव्हा वैद्यकीय बिलाच्या बाबतीत किंवा रेल्वेने प्रवास करीत असतांना कुपन्स देण्याच्या बाबतीत सदस्याना सन्मानपूर्वक वागविण्यात आले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ...

पाहिजे असे मला वाटते. निवृत्त सदस्यांना सुध्दा कुपन्स देण्यात येतील असे कबूल करण्यात आले होते परंतु ते अजूनही देण्यात आलेले नाहीत.तेव्हा त्यांनाही कुपन्स देण्यात यावीत.

सभापती महोदया, या विधेयकावरील चर्चेच्या निमित्ताने मी आणखी एक मुद्दा येथे मांडू इच्छितो. हा मुद्दा यापूर्वी देखील मांडण्यात आला होता व त्यासाठी शासनावर कोणताही आर्थिक बोजा येत नाही. टोलनाक्यावर सदस्यांचा नेहमीच अवमान केला जातो असे आम्ही या पूर्वी अनेकदा सांगितले होते. . मध्यंतरी त्याबाबतीत प्रोटोकॉलचा बॅज दिला जात होता . काही सन्माननीय सदस्य वा मंत्री महोदय त्यांच्या ऐ-या गै-यासाठी पोलिसांकडून प्रोटोकॉलचे बॅजेस घेत होते. अजूनही त्यांच्या गाडयावर जुने प्रोटोकॉलचे बॅजेस लावण्यात आलेले आहेत असे आपल्याला दिसून येईल. कोणीही आपल्या गाडयांवर ते बॅजेस लावत होते. जे खाजगी सचिव सुध्दा नव्हते त्यांच्या गाडयांवर प्रोटोकॉलचे बॅजेस लावलेले होते. त्याचा दुष्परिणाम असा झाला की, टोल नाक्यावर सदस्यांची अवहेलना व्हावयास लागली आहे. सभापती महोदया, सान्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी लोकसभेमध्ये तेथील सदस्यांना जो बॅज दिला जातो त्याची झेरॉक्स प्रत परवा येथे आणून दिली होती. त्यामध्ये निवृत्त झालेल्या सदस्यांनासुध्दा जो बॅज दिला जातो त्याची झेरॉक्स प्रत आणून दिली होती . अशा प्रकारे निवृत्त झालेला सन्माननीय सदस्य सुध्दा आपल्या गाडीवर बॅज लावू शकतो. एखादा सदस्य निवृत्त झाल्यानंतर दिल्लीला गेल्यानंतर व गाडीवर तो बॅज लावल्यानंतर त्यांचे वाहन सुरळीतपणे संसदेमध्ये जाते. खालच्या सभागृहाचे 289 सान्माननीय सदस्य आहेत आणि वरच्या सभागृहाचे 78 सदस्य आहेत या सर्व सन्माननीय सदस्यांसाठी बॅज तयार करण्यासाठी आपल्याला का भीती वाटते ? या संदर्भात माननीय सभापतींना आणि माननीय अध्यक्षांना यापूर्वी तीन वेळा पत्र दिली होती. आमच्याकडे बॅज न दिल्या गेल्यामुळे अधिकारी आम्हाला विचारतात की , "कोण आमदार आहेत, त्यांचे नाव काय आहे, आयकार्ड दाखवा " वगैरे वगैरे.अशा प्रकारे सन्माननीय सदस्यांना टोल नाक्यावर अवमानित व्हावे लागते. तेव्हा मी जे विषय मांडलेले आहेत त्याचीही अंमलबजावणी करण्यात यावी अशी मी अपेक्षा व्यक्त करतो आणि मला या विधेयकावर बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपल्याला धन्यवाद देऊन मी माझे भाषण संपवितो. जयहिंद जय महाराष्ट्र

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदया, सदस्यांचे वेतन व भत्यासबंधी जे विधेयक या ठिकाणी मांडण्यात आलेले आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे. या विषयावर सभागृहात अनेकदा चर्चा झालेली आहे.मूळात प्रश्न असा आहे की अधिकारी आणि आमदार यांच्यामध्ये पॅरिटी आहे . आमदार मोठा आहे की आय.ए. स. अधिकारी मोठा आहे हे अगोदर ठरविण्यात आले पाहिजे.जो पर्यंत आपण याबाबतीत काही ठरविणार नाही तोपर्यंत हा प्रश्न सुटणार नाही. अनेक वेळा या विषयाच्या संदर्भात असा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता की आमदार व अधिकारी यांच्या पैकी प्रोटोकॉलमध्ये कोण मोठा आहे ? तेव्हा विधिमंडळातील आमदार मोठा आहे की अधिकारी मोठा आहे हे एकदा ठरविण्यात यावे व त्याबाबतीत सभागृहात निवेदन करण्यात यावे असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदया. सिंधुदूर्ग जिल्हयातील विमान प्रवासाच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी मघाशी मुद्दा मांडलेला आहे. दिल्लीच्या चार विमान फेरीची सवलत सदस्यांना देण्यात येते . राज्यांतर्गत आता 12 फेरीची सवलत दिली जाणार आहे त्यामध्ये गोवा राज्याचा समावेश करावा अशी माझी शासनाला नम्र सूचना आहे. त्याचप्रमाणे आय.ए.एस.अधिकारी ए.सी.फर्स्ट क्लासमधून प्रवास करतात आणि आमदार मात्र सेकंड ए.सी.ने प्रवास करतात तेव्हा हा फरक का करण्यात आला आहे ? अधिकारी ज्याप्रमाणे या राज्याचे आहेत त्याप्रमाएणे आम्ही देखील या राज्याचे आहोत. ते ज्या प्रमाणे या राज्यातील प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करतात तसेच आम्ही देखील या राज्यातील प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत असतो.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

ते तर पगारी नोकर आहेत. शासकीय विश्रामगृहामध्ये आणि इतर सर्वत्र हाच अनुभव येतो. म्हणून मला या निमित्ताने आपल्याला नम्र विनंती करावयाची आहे की, एकदा ही संहिता निश्चितपणे ठरविली गेली पाहिजे की, आमदार आणि आयएएस अधिकारी यांच्यामध्ये मोठा कोण ? तेव्हा याचे आपण उत्तर द्यावे ही विनंती. सभापती महोदय, टोल नाक्याच्या प्रश्नावर तर नेहमीच येथे चर्चा होते. त्यामुळे त्याबाबत मी जास्त काही बोलत नाही. मात्र माजी आमदार आहेत त्या सगळ्यांचा आढावा आपण म्हणजे विधीमंडळाने घ्यावा आणि खरोखरी ते काय करतात आणि कोणत्या परिस्थितीत जीवन जगत आहेत याचीही माहिती घेणे आवश्यक आहे. जर त्यांची परिस्थिती खरोखरी हलाखीची असेल तर त्यांना मदत करणे हे आपले कर्तव्यच आहे ते आपण केले पाहिजे एवढे बोलून मी आपली रजा घेतो. धन्यवाद.

***

..... टीटी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पुष्कळ वर्षांपासून हा विषय येथे चर्चेला येतो आहे. तसा तो आजही आला आहे. आता सन 2008 चे वि.प.वि.क्रमांक 10 सदनामध्ये चर्चेला आले आहे आणि हे विधेयक आपल्याला पारित करावयाचे आहे. आज या विधेयकात एवढीच तरतूद आपण करीत आहोत की, सध्या विधीमंडळ सदस्याला 10 विमान प्रवास संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये करण्यास मिळत आहेत ती संख्या वाढवून 20 एकेरी प्रवास अशी सवलत दिली जाणार आहे. ही व्यवस्था चांगली आहे. प्रामुख्याने विदर्भ आणि मराठवाडा विभागातील जे आमदार आहेत त्यांना याचा निश्चितपणे फायदा होईल. मुंबईच्या आमदारांना मात्र विशेष फायदा यातून होत नाही. परंतु महाराष्ट्र राज्यामध्ये प्रवास करताना त्याचा जरूर फायदा होईल.

सभापती महोदय, या निमित्ताने माजी आमदारांच्या दृष्टीने येथे अतिशय महत्त्वाचा विषय निघाला आहे. ज्यावेळेस सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत हे या सदनाचे सदस्य होते, आमदार होते आणि ते येथून निवृत्त होणार होते तेव्हा हा विषय निघाला होता. ही गोष्ट 3-4 वर्षापूर्वीची आहे. त्यावेळी माननीय सभापतींनी मान्य केले होते की, लवकरच या बाबत एक बैठक घेऊन प्रोटोकोलच्या विषयाची तड लावू. मी मधून मधून हा विषय येथे काढत होतो. पण अजूनही याबाबत बैठक झालेली नाही. आता देखील मी माननीय सभापतींना या संदर्भात भेटणार आहे आणि त्यांना याची आठवण करून देणार आहे. मला हे समजत नाही की, हा इतका छोटा विषय आहे तर मग त्यामध्ये निकाल लावण्यास इतका कालावधी का लागतो ? यामध्ये असे कोण झारीतील शुक्राचार्य आहेत की ते हे होऊ देत नाहीत, किंवा हे सदस्यांना मिळू नये असा प्रयत्न करीत आहेत. काहीही असो, गेली तीन वर्षे हा प्रश्न मार्गी लागलेला नाही हेच खरे. त्यामुळेच आज कोणत्याही आमदाराच्या गाडीवर प्रोटोकोलचा बिल्ला लागलेला दिसत नाही. कशा प्रकारचा प्रोटोकोल असावा, तो छापायचा कसा या बाबत देखील चर्चा झालेली आहे. त्यावर इलाज व्हावा म्हणून मी मुद्दाम माजी संसद-सदस्यांना, माजी खासदारांना जो प्रोटोकोलचा बिल्ला असतो तो माननीय सभापतींकडे आणून दिला आहे. संसदेमध्ये असा निर्णय होऊ शकतो आणि तेथील माजी सदस्यांना अशा प्रकारे सवलत मिळू शकते. अशीच आणखी एक सवलत तेथे आहे. संसद सदस्याला संपूर्ण देशामध्ये रेल्वे प्रवास सवलत मिळण्यासाठी स्वत: सदस्य आणि त्याची पत्नी किंवा सहकारी अशा दोघांचा रेल्वे पास मिळत असतो. ...

(यानंतर सौ. रणदिवे .... यूयू 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या दोन्हींसाठी संपूर्ण देशामध्ये रेल्वे पास मिळतो आणि ते त्यांच्या ॲडेन्टीटी कार्डवर कुठेही जाऊ शकतात. जर एक व्यक्ती गेली तर फर्स्ट क्लास आणि दोन व्यक्ती गेल्या तर टू-टायर सेकंड क्लास अशी सवलत लोकसभेमध्ये मिळते. आपण महाराष्ट्र राज्यामधील लोकप्रतिनिधींना अशा प्रकारच्या कोणत्या सवलती देतो ? खरे म्हणजे वृत्तपत्रातून या सगळया गोष्टींवर बरीच टीका होते. लोकप्रतिनिधींचे वेतन वाढले तरी टीका होते. जरुर टीका व्हावी. पण त्याचबरोबर लोकप्रतिनिधी म्हणून जे प्रत्यक्षात काम करतात, त्यांना अनुभव येतो की, लोकप्रतिनिधी म्हणून त्यांना किती खर्च करावा लागतो ? याचा कोणी विचार करीत नाही. लोकसभेमध्ये लोकप्रतिनिधी म्हणून निवडून गेल्यानंतर महाराष्ट्रातून, मुंबईमधून, देशाच्या इतर भागातून त्यांना कितीतरी लोक भेटण्यासाठी येत असतात. अशा वेळी आपल्या बंगल्यावर लोक भेटावयास आले तर कमीतकमी त्यांना चहा तरी दिला पाहिजे. यासाठी किती खर्च होत असतो, याचा कोणी विचार करीत नाही. बरे, जनसंपर्क नसेल तर तुम्ही निवडून येऊ शकत नाही. अशा वेळी ज्यांना सातत्याने निवडणुका लढवावयाच्या आहेत, त्यांना जनतेशी संपर्क ठेवावाच लागतो. हा संपर्क ठेवावयाचा तर आपल्याला भेटावयास आलेल्या माणसाला केवळ पाण्याचा ग्लास देऊन चालत नाही तर कमीतकमी एक कप चहा तर द्यावाच लागतो. अशा प्रकारे लोकप्रतिनिधींना अनेक संकटांना सामोरे जावे लागते. लोकप्रतिनिधींना काही कामानिमित्ताने पोलीस स्टेशन जावयाचे असेल तर पटकन गाडीमध्ये बसून जावे लागते, कलेक्टर कार्यालयामध्ये जावयाचे असेल तर पटकन तेथे जावे लागते. कोणताही लोकप्रतिनिधी केवळ फोनवरुन सर्व कामे करु शकत नाही. त्याच्यासाठी लोकसंपर्क हे अतिशय महत्वाचे साधन आहे. या साधनाच्या बळावरच त्याचा पक्ष किंवा त्याचे स्वत:चे स्थान हे मजबूत किंवा कमजोर होते असे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर जेव्हा लोकप्रतिनिधींना सवलती दिल्या जातात, त्यावेळी सर्वंकश विचार करुन या सवलती देण्यात याव्यात असे मला मुद्दाम आग्रहाने सुचवावयाचे आहे. ज्याप्रमाणे आता सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत किंवा अन्य सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, टोल नाक्यावर गेल्यानंतर आमदारांना अपमानास्पद वागणूक मिळते. मी जेव्हा विधानसभेमध्ये होतो, त्यावेळी यासंबंधातील कायदा आला होता. टोलनाक्यावर पास देण्याचा प्रश्न येतो, परंतु तेथील सर्व माणसे कॉन्ट्रॅक्टरची असतात आणि बहुतांशी माणसे परराज्यातील असतात. त्यामुळे ते या राज्यातील आमदारांना फारसे ओळखत नाहीत. परंतु हल्ली तेथे मराठी ..

. . . .2 यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार . . . .

मुले दिसू लागली आहेत, ही आनंदाची गोष्ट आहे. ते पेपर वाचतात, त्यामुळे आमदारांना ओळखतात आणि तेथे गेल्यावर सांगतात की, साहेब, आपले नाव अमुक-अमुक आहे. कारण मी आपले पेपरमध्ये नाव वाचले होते, त्यामुळे तुम्ही जावे. अशा वेळी त्यांना कार्ड दाखविले तर ते बॅटरी लावून बघणार, त्यावर काय लिहिले आहे ते तपासणार अशा अनेक गोष्टी येतात. अशा प्रकारे जर अपमानास्पद वागणूक मिळणार असेल तर मग प्रोटोकॉल नसलेला परवडेल. या दृष्टीकोनातून महाराष्ट्र शासनाने विचार करावा. कमीतकमी जनतेचेच लोकप्रतिनिधी आहेत. या सदनामध्ये लोकराज्याच्या कल्पनेतून येतात, याठिकाणी येऊन लोकांचे प्रश्न सोडवावेत, राज्याचे प्रश्न सोडवावेत यासाठी आपण येथे येतो आणि काही वेळा हे प्रश्न सुटावेत म्हणून संघर्ष देखील करतो. माननीय मंत्री महोदयांनी प्रोटोकॉलच्या बाबतीत विधेयक मांडलेलेच आहे. या पार्श्वभूमीवर आमच्या ज्या सूचना आहे, आपण त्याचा विचार करावा आणि शक्यतो हे अधिवेशन संपण्यापूर्वी या संदर्भात निर्णय घेतला तर फार चांगले होईल. कारण यामध्ये तीन-चार वर्षे अशीच निघून गेलेली आहेत. नेहमी सांगितले जाते की, याबाबतीत निर्णय होईल. परंतु प्रत्यक्षात निर्णय होत नाही. या विषयाच्या संदर्भात माननीय सभापतींनी बैठक बोलवितो असे सांगितले होते. मी त्याबाबतीत त्यांना माहिती विचारणार आहे. याबाबतीत सध्या काय परिस्थिती आहे हे मला माहिती नाही. पण महाराष्ट्र राज्याचे एक मंत्री म्हणून आपल्यावर ही जबाबदारी आहे आणि आपण येथे जो मुद्दा उपस्थित केला, त्या अनुषंगाने मी येथे विषय मांडलेला आहे. लोकप्रतिनिधींना सवलती देत आहात ही चांगली गोष्ट आहे. पण याबाबतीत एक विचार व्हावा की, काही लोकांना परराज्यामध्ये जावे लागते, ज्याप्रमाणे मघाशी गोव्याच्या बाबतीत उदाहरण दिले आहे, त्यांना सुध्दा याचा फायदा व्हावा आणि सगळेच लोक जातात अशातला भाग नाही. काही ठराविक लोक बाहेर जातात, त्यांना ही सवलत देता आली तर त्याचाही विचार करावा. धन्यवाद.

. . . .2 यु-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, याठिकाणी जे विधेयक मांडलेले आहे. त्यामध्ये सध्या लोकप्रतिनिधींना ठराविक विमान प्रवासाच्या फेऱ्यांसाठी सवलत दिली जाते. परंतु आता त्यासंदर्भात फेऱ्या वाढविलेल्या आहेत, त्याबद्दल मी शासनाचे प्रथमत: हार्दीक अभिनंदन करतो.

सभापती महोदय, आता आमचे सहकारी सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील साहेबांनी सांगितले की, दिल्लीला सातत्याने जावे लागते. त्यामुळे दिल्लीच्या बाबतीत विमान प्रवासाच्या फेऱ्या वाढविण्याची गरज आहे. मी आपल्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो की, दिल्ली येथे जाण्यासाठी सध्या 4 फेऱ्यांची मर्यादा आहे, ती मर्यादा 10 फेऱ्यांपर्यंत केली पाहिजे. त्याचबरोबर सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार दादा यांनी एक मुद्दा सांगितला की, सातत्याने गेल्या अधिवेशनापासून सदनामध्ये एक मुद्दा उपस्थित झालेला आहे की, सन्माननीय सदस्यांच्या वाहनासाठी प्रोटोकॉलचा बॅच द्यावयास पाहिजे. याबाबतीत अनेक वेळा आश्वासने देण्यात आली. परंतु अद्यापपर्यंत त्याची पूर्तता झालेली नाही.

यानंतर कु.गायकवाड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ SBT/ KTG/ MMP/ प्रथम श्रीमती रणदिवे.. 16:55

श्री. विक्रम काळे..

आपल्या माध्यमातून माननीय मंत्रीमहोदयांना मी विनंती करतो की, या बॅजची आवश्यकता कशाकरिता आहे ? प्रत्येक पोलीस लोकप्रतिनिधींना ओळखत असेल असे काही नाही. आम्ही वेगवेगळया मतदारसंघामध्ये जात असतो, आम्हाला बऱ्याच ठिकाणी फिरावे लागते. त्यामुळे सर्वच जण आम्हाला ओळखत असतील असे काही नाही. त्यामुळे हा बॅज गाडीला असणे आवश्यक आहे. म्हणून या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी, अधिवेशन संपण्याच्या आत तातडीने कार्यवाही करावी अशी मी विनंती करीत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी या ठिकाणी विमान प्रवासासंदर्भातीन वर्गाचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, हा वर्ग देखील बदलला पाहिजे. विमानामध्ये अधिकाऱ्याना अमूक ठिकाणी बसवू नये असे आमचे म्हणणे नाही. मात्र आम्हाला किमान त्या अधिकाऱ्यांच्या बाजूला बसण्याची तरी व्यवस्था झाली पाहिजे.

तालिका सभापती : या सूचना ऑलरेडी आलेल्या आहेत.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, राज्यातील विश्रामगृहाबाबत देखील मी सांगू इच्छितो. आम्हाला अनेकवेळा मतदारसंघामध्ये फिरावे लागत असते. त्यावेळी विश्रामगृह अधिकाऱ्यांकरिता आरक्षित केलेले असल्याचे आम्हाला कळते. आमदार मोठे आहेत की, अधिकारी मोठे आहेत हेच आता कळत नाही. कोठल्याही विश्रामगृहामध्ये आपण जा. तेथील शिपाई किंवा मॅनेजर सांगतो की, साऱ्या साहेबांसाठी आरक्षित केलेले आहे. हे बुकिंग माननीय मंत्री महोदयांसाठी करण्यात आले असेल तर ठीक आहे. परंतु डेप्युटी इंजिनियर, एक्झिक्युटीव्ह इंजिनियर यांच्याकरिता बुकींग केले जाते. माननीय आमदारांना प्रथम संधी आहे की नाही ? तेथील शिपायांशी हुज्जत धालून किंवा भांडण करुन काहीच उपयोग नाही. बूकींग झालेले आहे असे कळल्यावर आम्हाला निपूटपणे निघून जावे लागतें. विश्रामगृहांचे जे मॉनेटरींग करणारे आहेत त्यांना माननीय मंत्रीमहोदयांनी सक्त सूचना द्याव्यात. विश्रामगृहामध्ये माननीय लोकप्रतिनिधींना प्रथम प्राधान्य मिळाले पाहिजे या दृष्टीने माननीय मंत्री महोदय सूचना देतील अशी मला अपेक्षा आहे. धन्यवाद.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, माननीय आमदारांकरिता विमान प्रवासाची सोय वाढविली जाते किंवा त्यांच्या सोयी सुविधांमध्ये वाढ केली जाते त्यावेळी मिडीयामध्ये असा समज निर्माण होतो की, आमदार म्हणजे जनतेच्या पैशावरील डाकू आहेत. मी सर्वच मिडीयाबाबत बोलत नाही. परंतु काही वर्तमानपत्रामध्ये अशा आशयाच्या बातम्या छापून येत असतात. त्यामुळे माननीय आमदारांच्या परिस्थितीबाबत जनसामान्यामध्ये जी इमेज तयार झालेली आहे, ती इमेज बदलण्याची आवश्यकता आहे, असे मला वाटते. जनतेला या सर्व गोष्टी समजून सांगण्याची गरज निर्माण झालेली आहे. तसेच याबाबत आपली प्रतिमा चुकीची आह`की बरोबर आहे याचा देखील विचार करण्याची आता वेळ आलेली आहे. आपल्याला ज्या गोष्टी व्यथा म्हणून वाटतात, त्याच गोष्टींवर समाज हसतो आहे.

सभापती महोदय, आताच येथे सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, काही लोक हे माननीय लोकप्रतिनिधींना ओळखत नाही. परंतु काही लोक मुद्दाम ओळख दाखवित नाहीत असे दाखवतात असे मला वाटते. त्यानंतर ते थट्टा करतात. त्यामुळे या सर्व गोष्टी सरळ नाहीत. यामध्ये राजकारण देखील असते.

सभापती महोदय, विमान प्रवासाबाबत मी सांगू इच्छिते की, विमान प्रवास वैयक्तिक कारणांकरिता करणारे फार कमी सन्माननीय सदस्य असतील. प्रत्येक सन्माननीय सदस्याला राजकीय कामाकरिता विमान प्रवास करावा लागत असतो ही वस्तुस्थिती आहे . ही बाब समाजापर्यंत पोहचविण्यास लोकप्रतिनिधी कमी पडत आहे असे मला वाटते आहे. वर्ष दोन वर्षापासून बोर्डीगकार्ड देऊन पैसे क्लेम करीत असतो. ई तिकीट ज्या वेळी काढले जाते त्यावेळी बोर्डींग कार्ड आपल्या हातात राहते व तिकीट आपल्याला मिळत नाही. पूर्वी विमानाच्या तिकीटाचे जॅकेट सबमिट करावे लागायचे. आता तसे केले जात नाही. तसेच आता फोनवरुन देखील तिकीट बूक करण्याची सोय उपलब्ध झालेली आहे. तसेच हे तिकीट आता बदलता देखील येते व त्याच तिकीटावर आपल्याला प्रवास करता येऊ शकतो. याबाबत मी आपल्याला उदाहरण देऊन सांगू इच्छिते. समजा आपण 15 तारखेला फोन करुन सांगितले, की आमचे 16 तारखेचे तिकीट

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ..

बदलावयाचे आहे. त्या प्रमाणे आपल्याला त्याच तिकीटावर प्रवास करता येतो. परंतु बोर्डींगकार्ड व इ- तिकीटावर वेगवेगळी तारीख असते. आम्ही एअर डेक्कन व इंडीगो या विमान कंपन्यामधील विमानांमधून प्रवास केलेला आहे. तारीख वेगवेगळी असल्यामुळे, प्रत्येक वेळी हा बदल झालेला आहे असे आम्हाला समजावून सांगावे लागते. म्हणून इ- तिकीटाची प्रक्रिया काय आहे हे आपण विधानमंडळामधील स्टाफला समजावून सांगणे आवश्यक आहे असे मला वाटते.

यानंतर श्री. बरवड..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

तिसरी सूचना प्रोटोकॉलबाबत करावयाची आहे. ज्या विमान कंपन्यांची कार्यालये मुंबईमध्ये आहेत ती कार्यालये मुंबईमधील आहेत की, वेगवेगळ्या देशातील आहेत असा प्रश्न पडतो. कोणत्याही विमान कंपनीला आमदार म्हणजे काय हे कळत नाही. मी दहा विमान कंपन्यांची नावे सांगू शकते. ते सांगतात की, Madam, please explain what is M.L.A.? ते फक्त खासदारांना ओळखतात. कारण ते केंद्राशी संबंधित आहेत. जेट एअरवेज किंवा इंडियन एअरलाईन्स अशा दोन चार कंपन्या सोडल्या तर इतर कंपन्या आमदारांना सुध्दा प्रोटोकॉलची सर्व्हीस देत नाहीत. ही सर्व्हिस मुद्दाम मिळावयास पाहिजे असे नाही तर वेळ आपल्या हातामध्ये नसतो. 200 लोकांची रांग पार करुन वेळेवर पोहोचता येत नाही. म्हणून ही सर्व्हिस आमदारांसाठी मिळावयास पाहिजे. विमान कंपन्यांनी आमदारांना या सर्व्हिसेस प्रोव्हाईड केल्या पाहिजेत. कंपन्या हे मान्य करावयास तयार नाही. काही लोकांनी कसा प्रोटोकॉल मिळविलेला असतो हे माहीत नाही. ते लोक प्रोटोकॉल घेऊन पुढे गेलेले असतात. आम्ही आमदार आहोत असे आम्हाला सांगावे लागते. ज्या ज्या कंपन्यांची उड्डाणे मुंबईतून होतात त्या विमान कंपन्याना शासनाचे व्यवस्थित पत्र गेले पाहिजे. एम.एल.ए. म्हणजे काय , एम. एल.सी. म्हणजे काय याची कल्पना नसत्यामुळे परत अशा घटना घडत राहतात. त्यामुळे त्यांना शासनाचे पत्र गेले पाहिजे. दिल्लीची तिकिटे वाढवून द्यावीत अशी मागणी होते. परंतु दिल्लीबरोबरच राज्याबाहेर कोणत्याही ठिकाणी ते दिले तर योग्य होईल. प्रत्येकाला दिल्लीतच जाण्याची आवश्यकता असेल असे नाही. दुसरीकडे चेन्नईला, भोपाळला जाणे भाग पडू शकते. म्हणून राज्याबाहेरचा प्रवास म्हणून यामध्ये दिल्ली अथवा राज्याबाहेरच्या प्रवासाची तिकिटे वाढवून द्यावीत.

सभापती महोदया, कारच्या टोलबद्दल सांगण्यात आले. त्याची पुनरावृत्ती मला करावयाची नाही. ठराविक मोठमोठे रुट सोडले तर महिला आमदारांना वेगळे अनुभव येतात. एका जिल्ह्यामध्ये असा अनुभव आला की, महिला आमदार असतात हेच टोल नाक्यावरील लोकांना समजत नाही. ते आत वाकून बघतात आणि साहेब कोठे आहेत असे विचारतात. समोर जो कार्यकर्ता बसतो त्याला ते आमदार समजतात किंवा काही वेळा ड्रायव्हरकडे संशयाने बघतात.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/ KGS/ KTG/

डॉ. नीलम गोऱ्हे .....

माझ्यासारखी पोक्त बाई दिसली तर आमदार असेल असे त्यांना वाटते. वर्तमानपत्रात फोटो बघत असतील किंवा चॅनेलवर पाहिले असेल म्हणून मला ओळखतात. परंतु बऱ्याचदा असे प्रकार घडतात. शिवशाहीचे सरकार असताना मला लाल दिव्याची गाडी होती. त्यावेळी मला असा अनुभव आला की, लाल दिव्याच्या गाडीमध्ये महिला पदाधिकारी असेल असे त्यांना वाटत नाही. ते विचारतात की, साहेब कोठे आहेत ? मी महिला आर्थिक विकास महामंडळाची अध्यक्ष होते. मला असे सांगावयाचे आहे की, महिला आमदारांच्या दृष्टीने टोल नाक्यावरील लोकांवर काही बंधने घालावीत.

सभापती महोदय, माझ्याकडे जे कार्ड आहे ते मी दाखविण्यासाठी आणलेले आहे. दोन ते अडीच वर्षामध्ये या कार्डची अवस्था अशी झालेली आहे की, दुष्काळी भागातून आल्याप्रमाणे त्याचे सगळे प्रिंट निघून जाते. हे कार्ड दाखवले तर लोक वेड्यासारखे बघतात. या कार्डावर काहीच नाही. मी सहा महिन्यापूर्वी विचार केला की, पाच वर्षे झालेली आहेत आणि कार्ड अगदीच वाईट दिसते म्हणून बदलून घ्यावे. आपल्या खात्याबद्दल मला तक्रार करावयाची नाही परंतु खात्यातून आमच्या पी.ए.ला असे सांगण्यात आले की, ताईंना पुढच्या टर्ममध्ये नवीन कार्ड मिळेल. दोन वर्षे, अडीच वर्षे झाल्यानंतर कार्ड खराब झाल्यामुळे ते दाखविण्यासाठी लाज वाटणार नाही असे व्यवस्थित कार्ड दिले पाहिजे. त्याची क्वालिटी चांगली असली पाहिजे. याचा आपण विचार करावा म्हणून मला याकडे आपले लक्ष वेधावयाचे आहे. कायमस्वरुपी आयकार्डची जी मागणी आहे ती योग्य आहे.

सभापती महोदया, वेगवेगळ्या प्रकारच्या तिकिटांबाबत मला सांगावयाचे आहे. परवा सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी निदर्शनास आणून दिले. अलीकडे विमान कंपन्यांची तिकिटे कमीजास्त होतात, एखाद्या दिवशी तिकिटाचे पैसे जास्त असतात तर एखाद्या दिवशी कमी असतात. परंतु तारखेप्रमाणे जी पहिली तिकिटे असतील तीच जोडावी असे सांगितले जाते. एखाद्याची 12 पेक्षा जास्त तिकिटे झाली असतील तर आपण कोणती तिकीटे क्लेम करावयाची, कोणती 12 तिकिटे द्यावयाची हे सन्माननीय सदस्यांना ठरवू द्यावे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे....

असा अनुभव मला अनुभव आला नाही, परंतु सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना आला आहे. त्यामुळे आम्ही दर 3 महिन्यांनी ते चेक करतो किंवा फेब्रुवारी महिन्यामध्ये चेक करतो. या सर्व गोष्टींची आवश्यकता आहे असे वाटत नाही.

सभापती महोदय, मी आणखी एक गोष्ट आपल्यामार्फत शासनाच्या निदर्शनास आणू इच्छिते. आमदारांना स्वयंशिस्त येणे आवश्यक आहे. अनेकजण नवीन आमदार होतात, जुने आमदार निवृत्त होतात. अनेक आमदारांनी 2-2 खोल्या, 4-4 खोल्या घेतल्या आहेत. लोकप्रतिनिधी या नात्याने आमदारांनी जबाबदारीची जाणीव ठेवली पाहिजे. काही आमदारांनी खोल्या भाडयाने दिल्या आहेत असे आता मला सांगितले जात आहे, त्याबाबत शासनाने स्टींग ऑपरेशन करावे. आमदार निवासामध्ये अनेक चमत्कारिक माणसे दिसतात. पार्कींग लॉटमध्ये आमदारांची गाडी गेली तर त्या लोकांना असे वाटते की, हे कोठून उपटसुंभ आले ? कारण त्यांनी भाडे भरले असल्यामुळे आपण डिस्टर्ब होतो असे त्यांना वाटते. आमदारांची स्टीकर लावलेली गाडी कम्पाऊंडमध्ये शिरत असेल तर आणि टॅक्सीतून एखाद्यी व्यक्ती बाहेर पडत असेल तर ते थोडा वेळ थांबत नाहीत, आमदार आत येत आहेत, त्यांना प्रथम आत येऊ द्यावे असे न करता रॉंग साईडने गाडी बाहेर काढून निघून जातात. याबाबत आमदार निवासातील सेवक बोलू शकत नाहीत, ते बोलले तर त्यांना मार पडण्याची शक्यता असते. त्यांना कोणतेही संरक्षण नाही. सभापती महोदया, मी मघाशी म्हटल्याप्रमाणे देशांतर्गत असलेल्या एअर लाईन्समध्ये आमदारांना प्रोटोकॉल सर्व्हिस मिळण्यासाठी शासनाने केंद्र शासनाकडे हा विषय मांडावा. इंटरनॅशनल एअर लाईन्समध्ये आमदारांना कोणी विचारीत नाही. सभापती महोदया, हे विधेयक मंजूर करण्यापुरते माझ्या भाषणातील सूचनांकडे पाहू नये. यासंबंधी बैठक होऊन पुढील अधिवेशनामध्ये बदल झालेला दिसला पाहिजे अशी मी विनंती करते आणि येथेच थांबते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, त्यादिवशी वेतन व भत्ते समितीच्या बैठकीत असे ठरले होते की, सदस्यांना विमानाच्या एकूण 30 फे-या द्याव्या. त्यापैकी 20 फे-या महाराष्ट्रात करता याव्यात अशी मागणी केली होती. सन्माननीय सदस्य श्री.काळे यांनी म्हटले होते की, 10 फे-या दिल्लीच्या करता याव्यात, अशाप्रकारची चर्चा झाली होती, आपण प्रोसिडिंग काढून पहावे. त्याप्रमाणे देशामध्ये कोठेही 30 फे-या द्याव्यात. मग कोणी संभाजीनगरला जाईल, कोणी बेंगलोरला जाईल, कोणी पुण्याला जाईल. पण आता वेगळया प्रकारचे विधेयक आणण्यात आले आहे. देशामध्ये अशी दोन ठिकाणे आहेत, एक हैद्राबाद आणि दुसरे गोवा. आंध्र प्रदेशच्या सीमेजवळ मराठवाडयातील आमदार आहेत. त्यांना हैद्राबादला विमानाने उतरुन कारने मराठवाडयात जाता येईल. कोकणातील सदस्यांना पणजीला विमानाने उतरुन कुडाळ, सावंतवाडी, रत्नागिरी येथे जाता येईल. आता आम्ही चर्चा करीत आहोत ते केवळ प्रोसिडिंगमध्ये येईल. सभापती महोदय, मी या विधेयकाला दुरुस्ती दिली होती. परंतु माझी सुधारणा नियमात बसत नाही, विधेयकाच्या स्कोपमध्ये बसत नाही असे मला कळविण्यात आले आहे. मी त्याबाबत तक्रार करीत नाही. पण आपण दिलेली सुधारणा वितरित करण्यात येईल असे मला सांगण्यात आले आहे. माझी सुधारणा जर का नियमात बसत नसेल तर ती वितरित तरी का केली ? उगाचच कागद तरी वाया का घालविले ? राज्यांतर्गत विमान फे-यांमध्ये पणजी आणि हैद्राबादचा समावेश करावा अशी माझी सूचना आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मधुकर चव्हाण...)

कलम 5 मधील पोट-कलम (1) (अ) मध्ये "राज्यातील" या मजुकरा पुढे "व शेजारी राज्यातील" असा मजकूर दाखल करण्यात यावा अशी सुधारणा मी दिलेली होती. त्या प्रमाणे सुधारणा झाली तर त्याचा फायदा सन्माननीय सदस्यांना घेता येईल. दुसरे असे की, म्हातारी मेल्याचे दु:ख नाही पण काळ सोकावता कामा नये. मध्यंतरी नागपूरहून येताना सन्माननीय राज्यमंत्री श्री. राजेश टोपे साहेब मला भेटले. त्यांचे पी.ए. एक्झिक्युटिव्हमध्ये बसले होते आणि ते मागे बसले होते. मला आठवते की, पूर्वी मंत्रालयाचे नाव सचिवालय असे होते. जेव्हा कै. शंकरराव चव्हाण हे या राज्याचे मुख्यमंत्री होते त्यावेळी त्यांनी सचिवालय हे नाव बदलून मंत्रालय केले. कारण सचिवालयामध्ये कारभार आम्ही करतो, निर्णय आम्ही घेतो, कायदा आम्ही बदलतो, राज्य कसे चालवायचे हे कॅबिनेट मंत्री म्हणून आम्ही ठरवितो आणि त्याची अंमलबजावणी सचिव पातळीवर होते. म्हणून त्यांनी नावामध्ये बदल केला. शेवटी आपण राजकर्ते आहोत. आपली इनडायरेक्ट डेमॉक्रसी आहे. आपण शेवटी रुलर या अर्थाने आहोत. रुलर पाठिमागे आणि अंमलबजावणी करणारे पुढे हे बरोबर नाही. मी अतिशय स्पष्टपणे सांगत आहे की, 20 ऐवजी 30 फे-या कराव्यात. मी दिलेली सुधारणा नियमाप्रमाणे आपणाला स्वीकारता येत नसली तरी पावसाळी अधिवेशनामध्ये या संबंधीचे बिल आणून 30 फे-या कराव्यात. मला देवगडातील पूर्वीचे साटम नावाचे आमदार आठवतात. त्यांची परिस्थिती बरोबर नाही. आज आमदाराला 2 हजार रु. पगार आणि इतर भत्ते मिळून रु. 50 ते 55 हजार रु. मिळतात. सहाजिकच 5 वर्षाच्या काळात आपण आपले राहाणीमान सुधारतो. परंतु माजी आमदार झाल्यानंतर एकदम पाच, साडेपाच किंवा सहा हजार रुपये मिळतात. आमदारकीच्या काळात स्टॅण्डर्ड ऑफ लिव्हिंग थोडेसे बदलेले असते. थोडे नीटनेटके रहावे, छोटे घर असेल तर कर्ज काढून मोठे घर घ्यावे, गाडी घ्यावी या गोष्टी ओघानेच येतात. परंतु आमदारकी गेल्या बरोबर त्याप्रमाणे राहाणीमान ठेवता येत नाही. आमदाराला वाहन भत्ता 25 हजार रु. मिळातो. आमदारकी गेल्यानंतर शून्य रक्कम मिळते. म्हणून आमदाराला कमीत कमी 10 हजार रु. मिळणे आवश्यक आहे. मी दिलेली सुधारणा आता सुधारता येत नसली तरी पावसाळी अधिवेशनामध्ये मी आता सुचविलेल्या सुधारणेचा विचार करुन नव्याने विधेयक आणावे अशी मी मंत्री महोदयांना विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी या विधेयकाच्या संदर्भात जे मुद्दे मांडले आहेत त्याचे मी समर्थन करतो. याचे कारण असे की, आमदाराला निवृत्ती वेतन म्हणून 8 हजार रु. मिळतात. आजच्या परिस्थितीमध्ये 8 हजार रुपयामध्ये आपण कसे काय भागवू शकतो हे आपण सर्वजण समजू शकता. मी महिन्याभरापूर्वी खादी बोर्डाच्या कार्यालयात गेलो होते. तेथे एक माजी आमदार आले होते.

....नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पडांगळे...

त्यांच्याकडे पाहिल्यानंतर ते माजी आमदार असे कोणालाही वाटणार नाही. त्या माजी आमदारांचे नाव मला माहिती आहे, परंतु त्यांचे नाव मी या ठिकाणी सांगू शकत नाही. त्या माजी आमदाराने अतिशय मळलेले कपडे घातलेले होते आणि त्यांनी खादी ग्रामोद्योगचे अध्यक्ष श्री. लक्ष्मणराव ढोबळे भेट घेतली. त्या भेटीत त्या माजी आमदारांनी श्री.लक्ष्मणराव ढोबळे यांच्याकडे दोन हजार रुपयांची मागणी केली. त्यांची दयनीय अवस्था पाहून श्री. ढोबळे यांनी आपल्या खिशातून एक हजार रुपयांची त्यांना आर्थिक मदत केली. एवढी दारुण अवस्था महाराष्ट्रातील काही माजी आमदारांची झालेली आहे. या विधानसभेचे माजी अध्यक्ष यांची देखील तशीच परिस्थिती आहे. सातारा येथील एका माजी विधानसभा अध्यक्षांना स्वत:चे घर नाही. ती व्यक्ती भाडयाने घर घेऊ शकत नाही. शासकीय विश्रामगृहात जाऊन जेवढा वेळ राहता येईल तेवढा वेळ ते तेथे राहतात. शासकीय विश्रामगृहात कोणी महत्वाच्या व्यक्ती आल्यातर त्यांना शासकीय विश्रामगृहातील देखील रुम खाली करुन द्यावी लागते अशी वाईट अवस्था त्यांची झालेली आहे. या विधेयकाच्या माध्यमातून माझी माननीय वित्त राज्यमंत्र्यांना विनंती आहे की, माजी आमदारांना किमान 15 हजार रुपये निवृत्तीवेतन देण्यात यावे.

सभापती महोदय, या ठिकाणी टोल नाक्यावरील कर्मचा-यांकडून विद्यमान आमदारांना तसेच माजी आमदारांना अतिशय अपमानास्पद वागणूक दिली जाते. या राज्यात मोठे टोल नाके आहेत तसेच लहानही टोल नाके आहेत. आमदारांच्या बाबतीत कदाचित मोठया टोल नाक्यांना सूचना दिल्या गेल्या असतील. परंतु ग्रामीण भागातील टोल नाक्यावर मात्र विद्यमान आमदारांना, माजी आमदारांना अतिशय वाईट वागणूक तेथील कर्मचा-यांकडून दिली जाते. टोल नाक्यावर वाहन थाबविल्यानंतर तेथील कर्मचा-यांना मी आमदार आहे असे तोंडी सांगितल्या नंतरही तेथील कर्मचा-यांकडून आमदारांचे आय.कार्ड मागितले जाते. त्या कर्मचा-याच्या हातात आय.कार्ड दिल्यानंतर तो कर्मचारी ते आय.कार्ड वरिष्ठांना दाखवितो. तेथील वरिष्ठ आय.कार्डची तपासणी करतात. आय.कार्डची तपासणी केल्यानंतर त्यांच्याकडून सांगण्यात येते की, आमदारांना टोल फ्री आहे असे कुठे लिहिलेले दिसून येत नाही. विद्यमान आमदारांना आणि माजी आमदारांना टोल द्यावा लागतो. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी लोकसभा आणि राज्यसभा सदस्यांच्या वाहनांसाठी स्टीकर्स दिलेले आहेत. त्याचप्रमाणे विद्यमान आमदारांना तसेच

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पडांगळे...

माजी आमदारांना त्यांच्या वाहनांसाठी स्टीकर्स देण्यात यावेत अशी सूचना केली आहे. त्यांच्या सूचनेप्रमाणे या राज्यातील विद्यमान आमदारांच्या वाहनांसाठी आणि माजी आमदारांच्या वाहनांसाठी स्टीकर्स दिले जावेत अशी माझी देखील माननीय वित्त राज्यमंत्र्यांना विनंती आहे.

सभापती महोदय, या सभागृहात नवीन सदस्य आलेले आहेत, त्यांना आमदार निवासातील सदनिका अद्याप दिल्या गेलेल्या नाहीत. मला तात्पुरत्या स्वरुपात दोन सदनिका उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत, परंतु सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे, श्रीमती अलका देसाई यांना अद्याप आमदार निवासामध्ये सदनिका दिल्या गेल्या नाहीत. काही विद्यमान सदस्यांना आमदार निवासातील तीन-तीन, चार-चार सदनिका वितरित केल्या आहेत. खरे तर ज्या सदस्यांकडे दोन सदनिकांपेक्षा जास्त सदनिका असतील त्यांनी स्वत:हून त्या सदनिका शासनाच्या ताब्यात दिल्या पाहिजेत. परंतु सदस्यांकडून त्या सदनिका शासनाकडे परत दिल्या जात नाहीत. म्हणून ज्या सदस्यांकडे आमदार निवासातील दोन पेक्षा जास्त सदनिका असतील, त्यांच्याकडून त्या सदनिका घेऊन ज्या सदस्यांना सदनिका दिल्या गेल्या नाहीत, त्यांना त्या उपलब्ध करुन द्याव्यात अशी माझी या निमित्ताने शासनाकडे मागणी आहे.

सभापती महोदय, विद्यमान सदस्यांसाठी विमान फे-यामध्ये वाढ करण्याचा निर्णय या विधेयकाच्या माध्यमातून शासनाने घेतलेला आहे. विद्यमान आमदारांना दिल्ली येथे विकास कामांचा पाठपुरावा करण्यासाठी वारंवार दिल्ली येथे जावे लागते. म्हणून दिल्ली फे-यांमध्ये वाढ करणे गरजेचे आहे. विद्यमान सदस्यांना दिल्ली येथे जाण्यासाठी कमित कमी 10 फे-याची सवलत दिली गेली पाहिजे अशी माझी या निमित्ताने माननीय वित्त राज्यमंत्र्यांना विनंती आहे.

सभापती महोदय, डॉ. दीपक सावंत यांनी सिधुदूर्ग जिल्हयात विमानतळ नाही. म्हणून त्या जिल्हयातील सदस्यांना गोवा विमानतळावरुन येण्याची आणि जाण्याची सवलत देण्यात यावी अशी सूचना केली आहे. त्यांनी केलेल्या सूचनेचा देखील शासनाने गांभीर्याने विचार करावा. त्याचप्रमाणे मराठवाडयातील काही जिल्हयांमध्ये विमानतळ नाही. त्यांना हैद्राबाद येथील विमानतळ जवळ पडते म्हणून त्या सदस्यांना हैद्राबाद विमानतळावरुन येण्याची आणि तेथेपर्यंत जाण्याची सवलत देण्यात यावी अशी मागणी करतो आणि माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

-------- यानंतर एएए-1वर

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान (नामनियुक्त) : सभापति महोदया, मुझे सिर्फ एक ही सुझाव देना है. एयर टिकट की सुविधा आमदारों की दी गई है, इस संबंध में मैं यह बताना चाहती हूं कि हम जैसे कुछ आमदार एयरपोर्ट से 200-250 किलोमीटर की दूरी पर रहते हैं और वहाँ से हमें बाय रोड एयरपोर्ट पर आना-जाना पड़ता है. इसलिए इस सुविधा में बाय रोड का माइलेज भी शामिल करना चाहिए, यह मेरा सुझाव है. मंत्री महोदय मेरे इस सुझाव पर विचार करें, ऐसा मेरा उनसे अनुरोध है. धन्यवाद.

....

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, या विधेयकाच्या अनुषंगाने मी थोडासा बाजूला जाऊन माझे विचार व्यक्त करणार आहे. मनोरा आमदार निवासातील दोन सदनिका मला मिळाल्या आहेत. आपापल्या सदनिकेतून सकाळ झाल्यानंतर सूर्याची किरणे बघावयाची वेळ असते. परंतु मनोरा आमदार निवास मात्र यास अपवाद आहे. मनोरा आमदार निवासातील सदनिकांमधून सकाळी झोपेतून उठल्यानंतर सूर्याची किरणे बघावयास मिळत नाही. मनोरा आमदार निवासाच्या बाजूला असलेल्या झोपडपट्टीतील लहान मुले तसेच माणसे सकाळी प्रातर्विधी करताना दिसून येतात. राज्य शासनाने हागणदारी मुक्त गाव अशी घोषणा केली आहे. परंतु मनोरा आमदार निवासाच्या समोर जी लहान मुले तसेच माणसे प्रातर्विधी करण्यासाठी बसलेले असतात, त्यांना बंदी घालण्यासाठी गांभीर्याने विचार करावा. ही माणसे त्या ठिकाणी प्रातर्विधी करण्यासाठी का बसतात, त्या लोकांना शौचालयाची व्यवस्था नाही काय, त्या झोपडपट्टीतील लोकांना सवय आहे म्हणून ती माणसे तेथे प्रातविर्धी म्हणून बसतात काय ? या गोष्टीकडे शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. भारतातील लोकांना सवयीच्या बाबतीत एक विनोद मी सांगू इच्छितो. भारत देशात रशियाचे अध्यक्ष आले होते. त्यांनी भारत देशाच्या पंतप्रधानांना सांगितले की, मला भारत देशातील ग्रामीण भाग बघावयाचा आहे. त्यांच्या इच्छेप्रमाणे भारताच्या पंतप्रधानांनी त्यांना भारतातील ग्रामीण भाग दाखविण्यास सुरुवात केली. त्यावेळी रशियाच्या अध्यक्षांना रस्त्याच्या दोन्ही बाजूस लोक प्रातर्विधी करताना दिसून आले. त्यावेळी त्यांनी भारताच्या पंतप्रधानाना विचारले की, तुमच्या देशात हे कसे काय चालते ? भारताच्या पंतप्रधानांनी त्यांना सांगितले की, आमच्या देशातील लोकांचा हा सवयीचा भाग आहे. त्या लोकांसाठी कितीही शौचालये बांधून दिली तरी ते लोक त्याचा उपयोग करीत नाही. काही कालावधीनंतर भारताचे पंतप्रधान रशियात गेले आणि त्यांनी देखील रशियाच्या पंतप्रधानाना रशिया देशाचा ग्रामीण भाग बघावयाचा आहे अशी इच्छा व्यक्त केली. त्याप्रमाणे रशियाचे अध्यक्ष आणि भारताचे पंतप्रधान रशियाचा ग्रामीण भाग बघण्यास गेले. ग्रामीण भागात फिरत असताना एका मोठया झाडाखाली एक व्यक्ती प्रातर्विधी करण्यास बसली होती. त्यावेळी भारताच्या पंतप्रधानांनी रशियाच्या अध्यक्षांना विचारले की, तुमच्या देशात असे चालते काय ? रशियाच्या अध्यक्षांनी सोबत असलेल्या कर्मचा-याला आदेश दिले की, हे रिव्हाल्वर घे आणि त्यास गोळया घाल. तो कर्मचारी त्या व्यक्तीस गोळया घालण्यास गेला, परंतु

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्या व्यक्तीस बघून त्याने रशियाच्या अध्यक्षांना सांगितले की, साहेब, मी त्या व्यक्तीवर गोळया मारु शकत नाही. रशियाच्या अध्यक्षांनी विचारले की, तुम्ही त्या व्यक्तीस गोळया का मारु शकत नाही ? त्या कर्मचा-याने सांगितले की, सदर व्यक्ती ही भारताची राजदूत असल्यामुळे मी त्यांना गोळया मारु शकत नाही. मनोरा आमदार निवासाच्या बाहेरच्या बाजूस जे लोक प्रातर्विधीसाठी बसतात तो त्यांच्या सवयीचा भाग आहे की, त्या ठिकाणी शौचालयांची व्यवस्था नाही, याची शासनाने माहिती घ्यावी आणि त्या ठिकाणी लोकांना प्रातर्विधी करण्यास बंदी घालण्यासंदर्भात शासनाने संबंधित विभागास सूचना द्याव्यात अशी माझी विनंती आहे.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला विनोदाचा विषय आणि विधेयक याच्याशी काहीही संबंध नाही. म्हणून त्यांनी जे उदाहरण दिले आहे ते रेकॉर्डमधून काढून टाकण्यात यावे अशी माझी विनंती आहे.

तालिका सभापती (श्रीमती उषा दराडे) : सन्माननीय सदस्यांनी विनोदाच्या माध्यमातून जो विषय उपस्थित केला आहे, त्या विषयाचा या विधेयकाशी काहीही संबंध येत नाही. त्यामुळे तेवढा विनोदाचा भाग रेकॉर्डमधून काढण्यात यावा.

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्व सन्माननीय सदस्यांशी निगडीत अशा विधेयकाच्या बाबतीत सन्माननीय सदस्य सर्वश्री. जयंत प्र.पाटील, मधुकर चव्हाण, डॉ.दीपक सावंत, डॉ.नीलम गोरे व इतर सदस्यांनी विचार व्यक्त केले आणि महत्वाच्या विषयात हात घातला. माजी सदस्यांच्या वेदनांच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी अतिशय विस्तृतपणे माहिती दिली. एक गोष्ट खरी आहे की, A thing which goes up, comes down. जी गोष्ट वर जाते ती गोष्ट कधी ना कधी खाली येते. माजी आमदार झाल्यानंतर त्यांचा मान, सन्मान रहावा, त्यांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये.

यानंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख ....

याविषयाच्या संदर्भात 4/5 प्रस्ताव आलेले आहेत आणि 4/5 सूचना सन्माननीय सदस्यांनी मांडल्या आहेत त्यांचा शासनाकडून अवश्य विचार केला जाईल. सर्व आजी आणि माजी सन्माननीय सदस्यांना सन्मानाची वागणूक मिळाली पाहिजे. समाजोपयोगी कामांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांना जावे लागते किंवा इतर सरकारी कार्यालयात जावे लागते त्याचप्रमाणे इतर ठिकाणी त्यांना जावे लागते तेथे त्यांना सन्मानाची वागणूक मिळाली पाहिजे याबाबतीत सर्व खात्यांना योग्य त्या सूचना देण्यात येतील. अनेक महत्वाचे विषय या बिलाच्या निमित्ताने मांडण्यात आले आहेत. राज्याबाहेरच्या ज्या विमान फेऱ्या आहेत त्याच्यामध्ये 2/3 शहरांचा समावेश आहे. कोकणात जायचेअसेल तर पणजी हा विमानतळ जवळ पडतो. लातूर,उस्मानाबाद येथे जायचे असेल तर हैद्राबाद विमानतळ जवळ पडतो. धुळे,नंदुबार साठी सुरत विमानतळ जवळ पडतो. याबाबतीत शासनाकडून निश्चितपणाने दखल घेतली जाईल. यासंबंधीची चर्चा मंत्रिमंडळाच्या बैठकीत झाली होती. पणजी, सूरत, बेळगांव आणि हैद्राबाद हे विमानतळ राज्यांतर्गत विमान प्रवास सेवेसाठी धरण्यात यावेत यासंबंधीचा समिती प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना आहेत. माननीय मंत्री वित्त यांच्या अध्यक्षतेखालील समितीसमोर हा प्रश्न मांडण्यात येईल आणि सर्व सन्माननीय सदस्यांच्या यासंबंधातील भावना लक्षात घेऊन सुधारित प्रस्ताव मान्य करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येतील. माननीय मंत्री वित्त या समितीचे अध्यक्ष आहेत. यासंबंधी कॅबिनेटमध्ये चर्चा झाली होती आणि वर उल्लेख केल्याप्रमाणे तीन विमानतळ हे राज्यांतर्गत प्रवासासाठी ग्राहय धरण्यात यावेत यासंबंधीचा प्रस्ताव समितीसमोर मांडण्यात येईल आणि पुढील अधिवेशनापूर्वी यासंबसंधी निर्णय घेतला जाईल.

सन्माननीय सदस्यांनी इतरही अनेक सूचना यानिमित्ताने केलेल्या आहेत. आमदारांना आता 8000 रुपये निवृत्तीवेतन मिळते. आमदारांच्या विधवा पत्नीला 4000 रुपये देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. इतर बऱ्याच समस्या माननीय सदस्यांनी सांगितल्या त्या विधानमंडळ सचिवालयाशी संबंधित आहेत. त्या विधानमंडळ सचिवालयाकडे वर्ग करण्यात येतील. आमदारांना मिळणाऱ्या बॅचेसच्या बाबतीत मुद्दा उपस्थित करण्यात आला. त्याचप्रमाणे ई-टिकेटींगच्या बाबतीत सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी मुद्दा उपस्थित केला. ई-टिकेटींगच्या बाबतीत तिकीट हरवले तरी प्रिंटआऊट मिळू शकते. त्याच्यामध्ये काही अडचण येण्याचे कारण नाही. विमानतळावर

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख ....

आमदारांना ओळखण्यामध्ये अडचण येते असे सांगण्यात आले. हा मुद्दा केंद्रीय विमानतळ प्राधिकरणाशी संबंधित आहे. केंद्राच्या सिव्हील एव्हीएशन डिपार्टमेंटला यासंबंधात कळविण्यात येईल. फोटोपासच्या बाबतीत गृहखात्याचा संबंध येत असल्यामुळे त्या विभागाशी संपर्क साधून पुढील अधिवेशनापूर्वी याबाबतीत निर्णय घेण्यात येईल. टोल टॅक्स भरताना अनेक अडचणी निर्माण होतात ही बाब निदर्शनास आणून देण्यात आली आणि ती वस्तुस्थितीला धरुन आहे. टोल टॅक्स गोळा करण्यासाठी जे कर्मचारी असतात त्यांना हिरवे कार्ड पिवळे कार्ड माहीत असते. मी एकदा गाडी बंद पडल्यामुळे खाजगी गाडीतून जात असताना माझे ओळखपत्र दाखविले परंतु मंत्र्याचे ओळखपत्र दाखविल्यावर कर्मचारी म्हणाला, हरा कार्ड कहाँ है. संबंधित खात्याला त्याप्रमाणे निदेश देण्यात येतील. त्यामुळे सन्माननीय सदस्यांना टोल टॅक्स भरताना अडचण येणार नाही. त्यांचा सन्मान राखण्याबाबत निदेश देण्यात येतील.

विमानातील क्लासच्या बाबतीत माझ्या माहितीप्रमाणे मंत्री आणि राज्यमंत्र्यांना विमान प्रवासात जे-क्लास मिळतो. राज्यमंत्री श्री. राजेश टोपे साहेब इकॉनॉमी क्लासमध्ये बसले होते असे सांगितले. कदाचित तिकीट संपली असली तरी असे घडणे शक्य आहे. पण मंत्री आणि राज्यमंत्री दोघेही विमानात जे-क्लाससाठी पात्र आहेत. आमदारांचा देखील या क्लासच्या बाबतीत विचार करण्यात येईल. कारण यासाठी आर्थिक भार किती पडेल या गोष्टीचा विचार करुन निर्णय घेण्यात येईल. हे विधेयक दोन बाबींशी संबंधित आहे. सन्माननीय सदस्यांना मी विनंती करतो की त्यांनी हे बिल मंजूर करावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्या निवृत्ती वेतन आणि भत्ते समितीकडे पाठविण्यात याव्यात अशी माझी सूचना आहे. समितीने शिफारशी कराव्यात. सगळे मुद्दे विधेयकावरील चर्चेच्या निमित्ताने आलेले आहेत. समितीने मंत्रिमंडळासमोर ठेवण्यासाठी अहवाल द्यावा आणि त्यामध्ये या मुद्यांचा अंतर्भाव असावा अशी माझी सूचना आहे.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केले आहेत ते निवृत्ती वेतन आणि भत्ते समितीसमोर ठेवण्यात येतील आणि त्यावर सकारात्मक विचार करण्यात येईल. मी पुन्हा एकदा सदनाला विनंती करतो की, त्यांनी सदरहू बिल मंजूर करावे.

सी.1....

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्रीमती उषा दराडे) : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ला सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे आणि श्री. मधुकर चव्हाण यांनी सुधारणा सुचविली आहे. परंतु ही सुधारण विधेयकाच्या कक्षेच्या बाहेर असल्यामुळे मी अनुमती नाकारीत आहे.

खंड 2 व खंड 3 संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.प.वि.क्रमांक-10 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : सन 2008 चे वि.प.वि.क्रमांक- 10 संमत झाले आहे.

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : आता नियम 260 अन्वये शिक्षणाच्या प्रस्तावावरील अपुरी राहिलेली चर्चा पुढे सुरु करण्यात येईल.

प्रा. वसंत पुरके(शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, कोणत्या तरी निश्चित अशा दिवशी हा विषय संपला पाहिजे. नाहीतर पुढील अधिवेशनापर्यंत हा विषय सुरुच राहील.

तालिका सभापती : विषय अत्यंत महत्वाचा आहे. अनेक चांगले मुद्दे येत आहेत. सन्माननीय सदस्यांना बोलू दिले पाहिजे.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, पुढील अधिवेशनापर्यंत ही चर्चा लांबवू नये अशी माझी विनंती आहे.

(**सभापतीस्थानी माननीय सभापती**)

सभापती : याविषयावर आणखी 8 सन्माननीय सदस्य बोलणार आहेत. माननीय शिक्षणमंत्र्यांनी जी गोष्ट सांगितली ती बरोबर आहे. म्हणून मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की त्यांनी थोडक्यात आपले विचार व्यक्त करावेत.

नंतर श्री. भोगले

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मी पुन्हा एकदा सदनाला विनंती करतो की, त्यांनी सदरहू बिल मंजूर करावे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती (श्रीमती उषा दराडे) : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ला सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे आणि श्री. मधुकर चव्हाण यांनी सुधारणा सुचविली आहे. परंतु ही सुधारण विधेयकाच्या कक्षेच्या बाहेर असल्यामुळे मी अनुमती नाकारीत आहे.

खंड 2 व खंड 3 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.प.वि.क्रमांक-10 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : सन 2008 चे वि.प.वि.क्रमांक- 10 संमत झाले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : आता नियम 260 अन्वये शिक्षणावरील अपुरी चर्चा पुढे सुरु करण्यात येईल.

प्रा. वसंत पुरके (शालेय शिक्षणमंत्री) : सभापती महोदय, कोणत्या तरी निश्चित अशा दिवशी हा विषय संपला पाहिजे. नाहीतर पुढील अधिवेशनापर्यंत हा विषय सुरुच राहील.

तालिका सभापती : विषय अत्यंत महत्वाचा आहे. अनेक चांगले मुद्दे येत आहेत. सन्माननीय सदस्यांना बोलू दिले पाहिजे.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, पुढील अधिवेशनापर्यंत ही चर्चा लांबवू नये अशी माझी विनंती आहे.

(**सभापतीस्थानी माननीय सभापती**)

सभापती : याविषयावर आणखी 8 सन्माननीय सदस्य बोलणार आहेत. माननीय शिक्षणमंत्र्यांनी जी गोष्ट सांगितली ती बरोबर आहे. म्हणून मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की त्यांनी थोडक्यात आपले विचार व्यक्त करावेत.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

कारण मागील तीन-चार दिवसांच्या कामकाजपत्रिकेवर हा विषय दर्शविण्यात येत आहे. आज कोणत्याही परिस्थितीत हा विषय संपवायचा आहे. उर्वरित सन्माननीय सदस्यांची भाषणे आणि माननीय शालेय शिक्षणमंत्र्यांच्या उत्तरासह हा प्रस्ताव आज संपवायचा आहे. आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये नियम 260 अन्वये आणखीही दोन प्रस्ताव दर्शविण्यात आले आहेत. उद्या दिनांक 22 एप्रिल, 2008 रोजी "जागतिक हवामानात होणाऱ्या बदलाचे परिणाम (ग्लोबल वॉर्मिंग)" यासंबंधीचा प्रस्ताव चर्चेला घ्यावयाचे ठरविले आहे. हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. म्हणजे हा चौथा प्रस्ताव चर्चेला येणार आहे. आज कामकाज सल्लागार समितीमध्ये शुक्रवार, दिनांक 25 एप्रिल, 2008 पर्यंतचे कामकाज निश्चित करण्यात आलेले आहे. त्यामध्ये दिनांक 24 एप्रिल, 2008 रोजी अंतिम आठवडा प्रस्ताव चर्चेला घेण्याचे निश्चित झालेले आहे. दिनांक 22 व 23 रोजी नियम 260 अन्वये प्रस्ताव चर्चेला घेण्यात येणार आहेत. म्हणजे एकूण 6 प्रस्ताव सभागृहापुढे चर्चेला यावयाचे आहेत. म्हणून मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, आजचे सदनाचे कामकाज ठरल्याप्रमाणे पूर्ण होण्यास मला सहकार्य करावे. नियम 260 अन्वये माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मांडलेल्या प्रस्तावावर उर्वरित सन्माननीय सदस्यांची भाषणे व माननीय मंत्रीमहोदयांचे उत्तर पूर्ण होईपर्यंत सभागृहाची वेळ यथायोग्य वेळी वाढविण्यात येईल.

श्रीमती उषा दराडे : शिक्षणासारख्या महत्वाच्या विषयावर कमीत कमी शब्दात आम्ही आमचे विचार मांडण्याचा प्रयत्न करु.

सभापती : या सदनाची पध्दत अशी होती की, एखादा नियम 260 अन्वये प्रस्ताव सभागृहापुढे चर्चेला आल्यानंतर अडीच तासाची वेळ निश्चित केली जात होती. निश्चित केलेल्या वेळेपैकी निम्मा वेळ सत्तारुढ पक्षाला, निम्मा वेळ विरोधी पक्षाला व मंत्रीमहोदयांचे प्रस्तावावरील उत्तराचे भाषण यासाठी 30 ते 40 मिनिटांचा कालावधी दिला जात असे. एखाद्या बाजूला तीनच वक्ते असतील तर अधिक वेळ मिळत असे, एखाद्या बाजूने दहा वक्ते बोलणार असतील तर त्याप्रमाणात वेळ विभागून दिली जात असे. सन्माननीय शालेय शिक्षणमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे वेळेचे बंधन नसेल तर प्रस्तावावरील चर्चा हे अधिवेशन संपेपर्यंत किंवा पुढील अधिवेशनापर्यंत देखील संपण्याची शक्यता नाही. म्हणून मी याठिकाणी आग्रहाची विनंती करीत आहे. राज्यातील

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

शिक्षण क्षेत्रातील अडचणीसंबंधी माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर आता जे सन्माननीय सदस्य बोलणार आहेत त्यांना माझी विनंती आहे की, कमीत कमी वेळेत अत्यंत चांगल्या पध्दतीने त्यांनी आपले विचार व्यक्त करावेत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, शुक्रवार, दिनांक 17 एप्रिल, 2008 रोजी या प्रस्तावावरील चर्चा सभागृहात सुरु असताना जे सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित होते त्यांनाच बोलण्याची संधी दिली जाईल असा निर्णय झाला होता.

सभापती : तेवढीच आठ नावे याठिकाणी आहेत. सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे, श्रीमती उषा दराडे, डॉ.दीपक सावंत, श्री.परशुराम उपरकर, ॲड.अनिल परब, सर्वश्री प्रतापराव सोनवणे, रामनाथ मोते, पाशा पटेल यांना बोलण्याची संधी दिली जाणार आहे, त्याशिवाय सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर व प्रा.सुरेश नवले यांना या प्रस्तावावर आपले विचार मांडण्यास अनुमती दिली जाईल.

दुसरा मी एक असा निर्णय घेतला आहे की, नियम 260 अन्वये सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय दत्त व इतर आणि सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर व इतर यांनी मुंबई शहरातील प्रश्नासंबंधी दोन वेगवेगळे प्रस्ताव दिलेले आहेत. हे दोन्ही प्रस्ताव एकत्रितपणे चर्चेला घेण्यात येतील. या संदर्भात मी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार, संजय दत्त यांच्याशी चर्चा केली. त्या चर्चेनुसार असे ठरले आहे की, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांची सदस्यत्वाची मुदत 24 एप्रिल, 2008 पर्यंतच आहे, त्यामुळे मुंबईच्या प्रश्नासंबंधी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव चर्चेला घेण्यात येईल, त्या प्रस्तावावरील चर्चेची सुरुवात सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार करतील.

(नंतर श्री.खर्चे....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

सभापती .....

असे माननीय विरोधी पक्षनेते श्री. फुंडकर यांनी सांगितले आणि सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी त्याला मान्यता दिली. म्हणून दोन्ही प्रस्ताव एकत्रितपणे घेऊन पहिले भाषण सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार हे सुरु करतील आणि दुसरे भाषण सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त हे करतील. अशा प्रकारे दोन्ही प्रस्ताव एकत्रित करुन चर्चेला घेण्यात येतील. माननीय मंत्री महोदयांचे उत्तर झाल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार आणि सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांना राईट ऑफ रिप्लायचा अधिकार दिलेला आहे. हे दोन्ही प्रस्ताव कदाचित उद्या चर्चेला येऊ शकणार नाहीत म्हणून परवा म्हणजेच 23 एप्रिल रोजी सभागृहाची विशेष बैठक घेऊन आपल्याला ही चर्चा करावी लागणार आहे. नंतरच्या वेळेत म्हणजेच त्याच दिवशी या दोन्ही प्रस्तावावरील चर्चा व उत्तर हे आपल्याला संपवावे लागणार आहे.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते आज जर सभागृहात उपस्थित राहणार नसतील अथवा सन्माननीय सदस्यांची भाषणे पूर्ण होईपर्यंत ते सभागृहात उपस्थित होऊ शकले नाहीत तर माननीय शिक्षण मंत्र्यांचे उत्तर होणार की नाही, हे सुध्दा सभागृहाला अवगत झाले पाहिजे.

सभापती : माननीय मंत्री महोदयांचे उत्तर आजच होणार आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : राज्यातील शिक्षण क्षेत्राची विश्वसनियता संपुष्टात येऊन शिक्षण क्षेत्राची झालेली वाताहात

मु.शी : राज्यातील शिक्षण क्षेत्रातील विश्वसनियता संपुष्टात येऊन शिक्षण क्षेत्राची झालेली वाताहात या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर,दिवाकर रावते, नितीन गडकरी,डॉ.दीपक सावंत,सर्वश्री विनोद तावडे, अरविंद सावंत, मधुकर चव्हाण, डॉ.नीलम गो-हे,सर्वश्री श्रीकांत जोशी,रामनाथ मोते, संजय केळकर,वि.प.स.याचा प्रस्ताव

चर्चा पुढे सुरु .....

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो प्रस्ताव मांडला आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, या प्रस्तावावर अनेक सन्माननीय सदस्य बोलले. राज्यात प्रत्येक मुलाला आणि मुलीला प्राथमिक शिक्षण मिळाले पाहिजे असा दंडक आहे, त्यासाठी स्वतंत्र खाते व योजनाही आहेत. शिक्षणासंबंधीच्या विविध योजना राबविण्यासाठी आपण अनेक कायदे केले आहेत. मुलांना विशेषत: आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या मुलांना शिक्षण देण्याचा राज्यशासनाचा मानस आहे आणि राज्यशासन त्यासाठी पैसे देखील वर्ग करते. किमान का होईना पण पैसे वर्ग करण्यात येतात. पण हे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण प्रत्यक्ष त्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहचते काय हा संशोधनाचा विषय आहे. या योजनेचे जे लाभार्थी आहेत त्यांना गणवेश मिळतात काय हा महत्वाचा भाग आहे. आज आपण पाहिले तर सन 2007-08 मध्ये साधरणपणे 56250 प्राथमिक शाळा आणि 68000 पेक्षा अधिक पटसंख्या आहे. शिक्षकांची संख्या 2 लाखाच्या आसपास असून 302,47,53,600/- रुपये इतका खर्च आपण करतो. त्याचप्रमाणे काही शाळा नगरपालिका व महापालिकेच्याही आहेत. मुंबई महानगरपालिकेच्या साधारणपणे 1600 शाळा असून काही खाजगी मान्यताप्राप्त शाळा देखील आहेत. राज्यशासनाच्या वतीने करोडो रुपये शिक्षकांच्या वेतनावर खर्च होतो. वास्तविक जेवढा खर्च शिक्षणावर व्हायला पाहिजे तितकाच किंवा त्यापेक्षा जास्त खर्च वेतन व वेतनेत्तर अनुदानावर होतो. केंद्रशासनाच्या सर्व शिक्षा अभियान योजनेमार्फत करोडो रुपये राज्याला येतात पण खरोखच हा पैसा विद्यार्थ्यांपर्यंत पोहचतो काय याचाही शोध घेण्याची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

आवश्यकता निर्माण झालेली आहे. राज्यशासनाने सन 2006-07 या आर्थिक वर्षात प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणावर 8 हजार कोटी रुपये खर्च केला आहे आणि केंद्रशासनाच्या माध्यमातून 604 कोटी एवढा निधी आपल्याला मिळाला आहे. मला सांगण्यास दु:ख होते की, एवढे सर्व असूनही राज्यात विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण 50 टक्के एवढे आहे. यासंदर्भात केवळ तुटपुंजा उपाययोजना केल्या जातात. परंतु शासनाकडून कायमस्वरुपी व ठोस अशी उपाययोजना मात्र होत असल्याचे दिसून येत नाही. कारण दहावीच्या वर्गापर्यंत 100 पैकी 50 टक्के एवढेच विद्यार्थी पोहचतात आणि शेवटी केवळ 48 टक्के विद्यार्थीच आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण करु शकतात. पाचवीतून आलेल्या मुलांचे प्रमाण 13 टक्के आणि मुलींचे प्रमाण 14 टक्के एवढे आहे. राज्यातील शाळांची परिस्थिती देखील बघण्यासारखीच आहे. आजही राज्यात पाण्याची सुविधा नसलेल्या शाळा 16 टक्के आहेत तर पाण्याची सुविधा असून पाणीच नसलेल्या शाळांचे प्रमाण 7 ते 8 टक्के आहे. शौचकुप सुविधा नसलेल्या 8 ते 9 टक्के असून वापरात नसलेल्या शौचकुपांची संख्या 6 टक्के आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ...

आपण जर विद्यार्थ्यांना बेसीक सुविधा देणार नसाल तर करोडो रुपये शिक्षणासाठी खर्चून सुध्दा त्याचा काही एक उपयोग होणार नाही. आपण शिक्षणासाठी जे पैसे देतो ते पैसे शेवटच्या घटकांपर्यंत जातात की, नाही हे पाहण्यासाठी मॉनिटरींग ॲथोरिटी जोपर्यंत असणार नाही तोपर्यंत त्याचा काही एक उपयोग होणार नाही. शैक्षणिक दृष्टया मागासलेल्या 103 विकास गटातील जिल्हापरिषदेच्या प्राथमिक शाळेतील पहिली ते चौथी वर्गाला गणवेष आणि लेखन साहित्य उपलब्ध करुन दिले जाते यासाठी 6,88,330 विद्यार्थ्यांना दोन गणवेष मिळणे आवश्यक आहे. परंतु असे असतांना या विद्यार्थ्यांना केवळ एकच गणवेष दिला जातो त्यामुळे या मुलांनी घातलेला गणवेष केव्हा धुवायचा, किती दिवसानी धुवायचा हा प्रश्न निर्माण होतो. करोडो रुपये गणवेषावर खर्च होतात त्यामुळे या शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांना दोन गणवेष दिले गेले पाहिजेत. आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना स्वेटर आणि उलनचे मोजे दिले जातात परंतु स्वेटर आणि उलनचे मोजे देण्याचे प्रमाण आता कमी झालेले आहे. 6,63,023 मुलींना रोजचा एक रुपया उपस्थिती भत्ता दिला जातो परंतु असे असतांनाही मुलींची उपस्थितीची संख्या कमी होत आहे हा खरा चिंतनाचा विषय आहे.

सभापती महोदय, शासनाने मोठया आशेने राजीव गांधी अपघात विमा योजना आणली आहे. या योजनेच्या संदर्भात या अगोदर कोणत्याही सन्माननीय सदस्यांनी विचार मांडलेले नाहीत. अपघाती मृत्यू झाला तर 30,000/- रुपये, कायमचे अपंगत्व आले तर 50, 000/- रुपये, एक डोळा गेला तर 20 हजार रुपये दिले जात होते. सायकल, पुस्तके चोरीला गेली तर त्यासाठी ओरिएन्टल इन्श्यूरन्सची योजना आणली गेली. या कंपनीला इन्श्यूरन्सपोटी शासनाने 2 कोटी 38 लक्ष 80 हजार रुपये मोजलेले आहेत. या योजनेच्या संदर्भात एकही विद्यार्थ्याला पैसे मिळालेले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. राजीव गांधीचे नाव सांगून योजना आणावयाची आणि एकाही विद्यार्थ्याला त्याचे पैसे द्यावयाचे नाहीत तर त्याला काय म्हणावयाचे? आपल्याकडे अशा प्रकारे काही लाभार्थ्यांची नावे आली असतील तर ती बोटावर मोजता येतील अशी आली असतील. त्यामुळे यासंदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी माहिती देण्याची आवश्यकता आहे. शासनाने विद्यार्थ्यांच्या संदर्भात एक मोठी घोषणा केली होती ती म्हणजे "शासन आदिवासी मुलींना ट्रेनिंग देऊन एअर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ...

होस्टेस बनवणार". सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात आदिवासी मुलींना एअर होस्टेस आणि पायलट बनवायचे असेल तर त्यांना फिजिक्स, केमिस्ट्री आणि बायोलॉजी तसेच फिटनेसच्या संदर्भतील विषय शिकवण्याची आवश्यकता आहे. जर मुलींना आपण 12 वी पर्यंत शिकवले नाही तर त्याचा काही उपयोग होणार नाही. केवळ राज्याच्या अर्थसंकल्पात आणि माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात या गोष्टींचा केवळ उल्लेख करुन आपण आदिवासींच्या मुलींना एअरहोस्टेस आणि पायलट बनवूशकणार नाही. जोपर्यंत आपण या मुलींना मूलभूत शिक्षण देणार नाही तोपर्यंत या घोषणेचा त्यांना काही एक उपयोग होणार नाही.

सभापती महोदय, माध्यमिक शाळेसाठी आपण पुस्तक पेढी नावाची योजना राबवत असतो. आदिवासी विभागाच्या सन 2006-2007 च्या अर्थसंकल्पात म्हटले आहे की, "या शैक्षणिक वर्षात पाचवीतील पात्र विद्यार्थ्यांना पुस्तक पेढी योजनेचा लाभ देण्यात येईल." परंतु आदिवासी उपयोजनेअंतर्गत तरतूद मंजूर करण्यात आलेली नाही. परवा मी माननीय मंत्रीमहोदयांना प्रश्न विचारला होता की, आदिवासी उपयोजनेचे पैसे परत गेले का त्यावेळी त्यांनी आदिवासी उपयोजनेचे पैसे परत गेले नाही फक्त सार्वजनिक खात्याचे पैसे परत गेलेले आहे असे त्यांनी सांगितले होते.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आणि आय.सी.डी.एस.चे पैसे परत गेलेले आहेत असे सागण्यात आले आहे अशा प्रकारे अनुक्रमे 42 लाख आणि 50 लाख रुपये परत गेलेले आहेत.आदिवासी विकास विभागाच्या 2007-2008 सालच्या कार्यक्रम अंदाजपत्रकाच्या पुस्तकातील पान नंबर 151 मध्ये विद्यार्थ्यांना द्यावयाच्या विद्या वेतनाचा उल्लेख करण्यात आला असून पाचवी ते सातवी पर्यंतच्या मुलांना 40 रुपये, आठवी ते दहावी पर्यंतच्या मुलांना 50 रुपये देण्यात येणार आहेत . परंतु तक्ता क्रमांक 13 मध्ये लाभधारकांची संख्या निरंक दाखविण्यात आलेली आहे. याचा अर्थ असा आहे की राज्यामध्ये लाभधारक विद्यार्थी नाहीत काय ? या विद्यार्थ्यांना विद्यावेतन देण्यासाठी तरतूद करण्यात आली असल्याचे सांगितले जाते परंतु प्रत्यक्षात ते दिले जात नाही. अशा प्रकारे या आदिवासी मुलांना केवळ गाजर का दाखविण्यात येत आहे ?

सभापती महोदय, यानंतर मी आय.सी.एस.ई. आणि सी.बी.एस.ई. शाळांसबंधीचा एक मुद्दा येथे मांडणार आहे आज या शाळांची संख्या वाढत आहे. सी.बी.एस.ई आणि आय.सी.एस.ई. च्या शाळा मुंबईच्या उत्तर विभागात 22 आहेत, दक्षिण विभागात 28 आहेत, पश्चिम विभागात 27 आहेत आणि ठाणे विभागात 19 आणि रायगडमध्ये 13 आहेत. त्या शाळेतून त्री भाषा सूत्र स्वीकारण्यात येणार असल्याचे आश्वासन देण्यात आले होते तेव्हा त्या बाबतीत पुढे काय झाले ? त्या संदर्भात करण्यात आलेली घोषणा केवळ हवेत विरण्यासाठी केली होती काय ? तेव्हा या संदर्भात अभ्यास करुन त्याची माहिती आम्हाला अवगत करुन द्यावी.त्याच प्रमाणे या शाळेत झेंडा वंदनाच्या कार्यक्रमाच्या संदर्भात परिपत्रक काढण्यात येणार होते त्या बाबतीत पुढे काय झाले आहे याची देखील माहिती आम्हाला देण्यात यावी.

सभापती महोदय, यानंतर मी दुसरा एक मुद्दा याठिकाणी मांडू इच्छितो. नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशन रिसर्च ॲन्ड ट्रेनिंग म्हणजेच एन.सी.ई.आर.टी.ची स्थापना 1961 साली करण्यात आली होती त्यांनी काही पुस्तके छापली आहेत.त्या संदर्भात मी आपल्याला एक उदाहरण देऊ इच्छितो .नेशनल कौंसिल ऑफ एज्युकेशन रिसर्च एंड ट्रेनिंग (NCERT) द्वारा प्रकाशित कक्षा 10 वी की पुस्तक में सामाजिक विज्ञान विषय के अन्तर्गत इतिहास की पाठ्य पुस्तक में भारत और समकालीन विश्व-2 में यह लिखा है :- चित्र 12 - भारत माता, अबनीन्द्रनाथ टैगोर, 1905 - ध्यान से देखें कि यहाँ दर्शाई गई माँ की छवि शिक्षा, भोजन और कपड़े दे रही है. एक हाथ में माला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उसके संन्यासी गुण को रेखांकित करती है. अपने पूर्ववर्ती रवि वर्मा की भाँति अबनीन्द्रनाथ टैगोर ने भी ऐसी चित्र शैली विकसित करने का प्रयास किया जिसे सच्चे अर्थों में भारतीय माना जा सके. त्यानंतर दुस-या चित्राबाबत असे म्हटलेले आहे की,

"चित्र 14 - भारत माता - भारत माता की यह छवि अबनीन्द्रनाथ टैगोर द्वारा चित्रित छवि के बिल्कुल विपरीत है. यहाँ भारत माता के हाथों में त्रिशुल है और वह हाथी व शेर के बीच खड़ी है. ये दोनों ही शक्ति और सत्ता के प्रतीक है. "

त्यानंतर खाली टिप्पणी दिली असून त्यात असे म्हटलेले आहे की,

"चित्र 12 और 14 को देखिए. क्या आपको लगता है कि ये तस्वीरें सभी जातियों और समुदायों को भाएंगी ? अपनी राय को संक्षेप में स्पष्ट कीजिए. "

अशा प्रकारे विद्यार्थ्यामध्ये वेगळी भावना निर्माण करण्याचे काम एन.सी.इ.आर.टी.करीत असते . त्याच्या झेरॉक्स प्रती माहितीसाठी मी आपल्याकडे पाठवत आहे. तेव्हा अशा प्रकारच्या पुस्तकाच्या संदर्भात कोणत्या तरी अध्यापकाला नेमून या पुस्तकात काय छापण्यात आलेले आहे हे शासनाने पाहिले पाहिजे. या विद्यार्थ्याकडून कोटयावधी रुपयांची फी घेतली जाते परतु एवढी फी घेतल्यानंतर देखील त्यांना कोणते विषय शिकवले जात आहेत याचा विचार केला गेला पाहिजे या विद्यार्थ्यामध्ये आदर निर्माण व्हावा या दृष्टीने शिक्षण दिले पाहिजे परंतु तसे न देता उलट प्रश्नचिन्ह निर्माण केले जात आहे.

सभापती महोदय, या विषयावर जर आपण मला वेळ दिला तर कमीत कमी एक तास मी बोलू शकतो. या राज्यातील शिक्षक कसे आहेत याबाबतीत नॅशनल युनिर्व्हसिटी ऑफ एज्युकेशन प्लॅनिग ॲन्ड ॲडमिनिस्ट्रेशने एक अहवाल दिला असून त्यात असे म्हटलेले आहे की 50 टक्के शिक्षक बारावीच्या पुढे शिकलेले नाहीत, पदव्युत्तर शिक्षण घेतलेले शिक्षक 8 टक्के आहे, पदवीपर्यंत शिक्षण घेतलेले शिक्षक 33 टक्के आहे आणि दहावी पर्यंत शिक्षण घेतलेले शिक्षक 37 टक्के आहे.

अशुधित प्रत / शिक्षणासाठी नाही

डॉ. दीपक सावंत ...

महाराष्ट्राची परिस्थिती या संदर्भात पाहिली तर आपल्याला मी सांगू इच्छितो की, महाराष्ट्रात 10वी पर्यंत शिकलेले शिक्षक हे 37 टक्के आहे, 12वी पर्यंत शिकलेले शिक्षक 58 टक्के आहेत आणि पदवीपर्यंत शिकलेले 33 टक्के तर पदव्युत्तर शिक्षण घेतलेले 8.5 टक्के शिक्षक आहेत. हे शिक्षक या विद्यार्थ्यांना शिकविणार असतील तर काय होणार ? सभापती महोदय, ज्या आदिवासी, आदिम जमाती आहेत त्यांच्या संदभ्रात काही गोष्टी मी येथे सांगू इच्छितो. गडचिरोली जिल्ह्यात दुसरी-तिसरीच्या विद्यार्थ्यांना भाजी-भाकरी हे शब्द लिहिता येत नाहीत. तेथील शिक्षक आणि विद्यार्थी या दोघांचीही स्थिती जवळपास सारखीच आहे. खरे तर या आदिवासी, आदिम जमातीतील मुलांना गणित, भूमिती, प्रमेय यांच्यामध्ये कसलाही इंटरेस्ट नसतो म्हणूनच त्यांना निसर्गाच्या जवळ नेऊन, घेऊन जाऊन त्यांच्या भाषेतून ज्या विषयात त्यांना रस आहे त्याचे शिक्षण देऊन त्यांच्यामध्ये शिक्षणाविषयी गोडी निर्माण करा, त्यांच्या डोक्यावर तुम्ही इतिहास, गणित लादू नका. त्यासाठी खास वेगळा असा अभ्यासक्रम तयार करा असे मला येथे आवर्जून सांगावयाचे आहे. सभापती महोदय, युनिसेफच्या अहवालात तर या संदर्भात म्हटले आहे की, मुळात शाळांच्या शिकविण्याच्या वेळेमध्ये शाळा शिकविणे ही चुकीची गोष्ट आहे. शिकण्यासाठी, शिकविताना वर्गामध्ये जे वातावरण आणि जो उत्साह पाहिजे असतो तोच नसतो, अत्यंत कंटाळवाण्या आणि निरस वातावरणामध्ये हे विद्यार्थी शिकत असतात. हे त्यांच्या क्वालिटी इम्प्रूवमेंट सेलच्या अहवालात म्हटले आहे. आताच आपण एक मोठा निर्णय घेतला. परवाची चर्चा झाल्यानंतर वैद्यकीय क्षेत्रातील 60 जागा वाढवून देणार असल्याचे मंत्र्यांकडून सांगण्यात आले. खरे तर हा मुलामा आहे, यातील सोने आणि पितळ कोठले आणि किती आहे हे लवकरच कळणार आहे. आपण या 60 जागाच का नक्की केल्या ? त्याचे उत्तर मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरामध्ये जरूर द्यावे. कारण एमसीआय मान्यता देणार आहे तर ती कोणत्या आधारावर आणि कोणत्या विषयांसाठी आहे त्याचीही माहिती आपण आपल्या उत्तरातून द्यावी ही विनंती. कारण माझे याबाबत असे मत आहे की, केवळ हा संप मिटविण्यासाठीच एक सन्मान्य तोडगा काढला आहे आणि संपकरी विद्यार्थ्यांची अगदी चांगल्या भाषेत सांगावयाचे तर 'बोळवण' केली आहे. आपल्याकडे डायरेक्टर ऑफ मेडिकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च सेंटर आहे. यामध्ये वैद्यकीय क्षेत्रात रिसर्च असे काय काय केले आहे ? कोणत्या भागामध्ये आपण रिसर्च केले तेही आपण आपल्या उत्तरात सांगावे. अभियांत्रिकी आणि वैद्यकीय

..... 3एच 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात, विशेषत: अभियांत्रिकी क्षेत्रात आयटीआय आणि आयआयएम या संस्था म्हणजे गुणवत्तेची बेटे आहेत. त्यामध्ये गुणवत्ता प्राप्त विद्यार्थीच जाऊ शकतात. परंतु सर्वसामान्य बुद्ध्यांकाचे विद्यार्थी त्यात जाऊ शकत नाहीत. आता आपण 27 टक्के आरक्षण मान्य केले आहे, याबाबत सुप्रीम कोर्टाचा निकाल आलेला आहे. आणि टप्प्याटप्प्याने आपण हे आरक्षण राबविणार आहात. हे धोरण राबविताना काय आणि किती अडचणी आपल्याला येणार आहेत ....

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी एक दोन मिनिटांत आपले भाषण आटोपते घ्यावे. मी यापूर्वी चार वेळा वेळ संपल्याची घंटी वाजविली आहे. आपल्याला वेळ अगोदरच कमी आहे हे त्यांनी लक्षात घ्यावे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आज आपल्याकडे 425 ची स्ट्रेंग्थ आहे. 27 टक्के आरक्षण ठेवल्यास ती स्ट्रेंग्थ 900 पर्यंत जाणार आहे. त्यासाठी मग आज आहेत त्यापेक्षा अधिक म्हणजे जवळपास 12 हॉस्टेल्स आयआयटीसाठी आहेत त्यातही वाढ करून 7 हॉस्टेल्स अधिक बांधवी लागतील. तसेच आपल्याकडे 5300 स्ट्रेंग्थ सध्याची आहे ती 1200 वाढणार आहे. हे सारे लक्षात घेता आयआयटीसाठी शिक्षक वर्गदेखील अधिक लागणार आहे, तो कोठून आणणार आहात? सभापती महोदय, दुसरा महत्त्वाचा प्रश्न हा आहे की, आज वैद्यकीय शिक्षणामध्ये खाजगी वैद्यकीय कॉलेजांमधून आकारण्यात येणाऱ्या फीवर नियंत्रण आणण्यासाठी आपण कायदा करणार आहाततर तो केव्हा आणि कसा करणार आहात ? याचे उत्तर उच्च शिक्षण मंत्र्यांनी येथे दिले पाहिजे. तसेच अभिमत विद्यापीठे आज सहज शक्य होत आहेत, त्यांनी किती डोनेशन्स घ्यावीत, किती रँकस्ला प्रवेश द्यावा वगैरेचे सगळे अधिकार त्यांच्याकडेच राहणार आहेत. ज्यावेळेस या अभिमत विद्यापीठाबाबत येथे चर्चा झाली होती त्याचवेळेस मी हे सर्व सांगितले होते. ....

(यानंतर सौ. रणदिवे .... 3आय 1 ...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

त्यावेळी मी यातील सर्व धोके सांगितले होते. आज सर्व खाजगी वैद्यकीय महाविद्यालये ही एकेक करुन अभिमत विद्यापीठे होत आहेत आणि ही महाविद्यालये, अभिमत विद्यापीठे झाल्यावर तुमचा त्यांच्यावर कसा कंटोल रहाणार आहे ? उद्याच्या काळामध्ये खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांचे स्तोम मोठया प्रमाणात वाढणार आहे आणि आपल्या शासकीय रुग्णालयातील डॉक्टर हे ग्रामीण भागामध्ये सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी कमी पडणार आहेत. याबाबतीत माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री श्रीमती विमलताई मुंदडा सांगतील की, आम्ही बी.ए.एम.एस.डॉक्टरांना तेथे आणू. ठीक आहे, त्या डॉक्टरांना तेथे आणा. परंतु माननीय मंत्री महोदयांना याची माहिती आहे की नाही ? याची मला कल्पना नाही. परंतु आपण सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाची अवहेलना करीत आहात. प्रत्येकाने आपापल्या पॅथीमध्ये प्रॅक्टीस करावी असा नियम असताना देखील आपण बी.ए.एम.एस.डॉक्टरांकडून ॲलोपॅथीची प्रॅक्टीस करुन घेणार आहात. अशा प्रकारचे शिक्षण देत आहात ? याचसाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण आणि एम.सी.आय. या दोन संस्था मातब्बर झाल्या आहेत आणि त्या माजलेल्या आहेत असे मी म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही.आज एम.सी.आय. आणि ए.आय.सी.टी. देखील सर्वांना हाताच्या बोटावर नाचवत आहे. जर मान्यता पाहिजे असेल तर अमुक इतके करोडो रुपये मोजा असे सांगितले जाते. आज बाकीची राज्ये पैसे मोजून आपापल्या मान्यता घेत आहेत. पण महाराष्ट्र राज्याला ते शक्य होणार नाही आणि त्यांनी तसे करु नये या मताचा मी आहे. एखाद्या कॉलेजला मान्यता हवी असेल तर आपण पैसे कशासाठी मोजावेत ? आपण आपल्या गुणवत्तेवर मान्यता मिळविली पाहिजे. कारण शेवटी हे उच्च शिक्षण आहे. आज उच्च शिक्षणासाठी विद्यार्थी बाहेर जात आहेत. अशा वेळी करोडो रुपये म्हणजे साधारणपणे 53 अब्ज डॉलर आपण बाहेर देत आहोत. आपल्याला हा फ्लो थांबवावयाचा असेल तर आपल्याला अशा प्रकारचे कायदे करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, दुसरा महत्वाचा मुद्दा असा की, व्ही.जे.टी.आय.कॉलेज मधील श्री.नारायण खेडेकर यांच्याविषयी अनेक तक्रारी आहेत. माननीय मंत्री महोदय, यासंबंधात काही करणार आहेत की नाही ? यासंदर्भात अनेक तक्रारी देऊनही, या सदनामध्ये याबाबत चर्चा करुन देखील हा प्रश्न सुटलेला नाही. तेव्हा आपण याबाबतीत नेमके काय करणार आहात ? आपण संबंधितांची चौकशी केली, त्याला एक वर्ष झाले. परंतु अजूनही त्याबाबतीत काही झालेले नाही ...

. . . .3 आय-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

म्हणून माझी आपल्याला अशी विनंती आहे की, याबाबतीत आम्हाला ताबडतोब काय इलाज करणार आहात ? काय कारवाई करणार आहात ? ते सांगावे. तसेच जे.जे.कला महाविद्यालयामध्ये अनेक अडचणी आहेत. पण आपण मला बोलण्यासाठी अजून वेळ दिला असता तर मी याबाबतीत आणखी बोलू शकलो असतो. मात्र वेळेअभावी मी माझे भाषण येथेच संपवितो. जय हिंद जय महाराष्ट्र.

. . . .3 आय-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : याठिकाणी सन्माननीय सदस्य सर्वश्री.प्रतापराव सोनवणे, रामनाथ मोते, प्रकाश शेंडगे यांना भाषणे करावयाची आहेत. पण मी सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोतेसाहेबांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे आणि सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी माझ्याकडे विनंती केलेली आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी अशी विनंती केली आहे की, मला तालिका सभापतीस्थानी येऊन बसणे सोयीचे व्हावे यासाठी प्रथम भाषण करण्यासाठी प्राधान्य देण्यात यावे. तसेच सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनीही विनंती केलेली आहे. त्यामुळे प्रथम मी सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांना भाषण करण्यासाठी परवानगी देतो. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल भाषण करतील.

. . . .3 आय-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी ज्यांना शिक्षणाच्या बाबतीत आद्य शिक्षक म्हणते . . . .

सभापती : सन्माननीय सदस्यांना भाषणासाठी दहा मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, मी एकाही वाक्याचे विश्लेषण न करता भाषण करण्याचा प्रयत्न करणार आहे. परंतु दोन मिनिटे इकडे-तिकडे झाली तर माफ करावे.

सभापती महोदय, शिक्षणाचे आद्य शिक्षक महात्मा ज्योतिबा फुले यांचे विचार सदनासमोर आणल्याशिवाय शिक्षणाच्या संबंधातील चर्चा पूर्ण होऊ शकत नाही असे माझे मत आहे. मला सर्वात महत्वाची बाब सदनाच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांनी असे म्हटलेले आहे की, "अभ्सासक्रमामध्ये मोडी, बाळबोध लेखन-वाचन, हिशोबाची माहिती, इतिहास, भूगोल, व्याकरण यांचे प्राथमिक ज्ञान, शेतकी विषयक प्राथमिक ज्ञान तसेच नीती व आरोग्याच्या बाबतीत सोपे धडे अंतर्भूत असावेत. शहरी भागातील अभ्यासक्रमापेक्षा खेडेगावातील शाळांमधील अभ्यासक्रम कमी असावा. मात्र व्यवहार उपयोगी होण्याच्या दृष्टीने या अभ्यासक्रमामध्ये कसलीही उणीव नसावी. विद्यार्थ्यांना शेतीच्या पाठाबरोबरच प्रत्यक्षात व्यवहारिक शिक्षण देण्यात यावे. यासाठी एक आदर्श छोटीशी योजना आखल्यास ती निश्चितपणे फायदेशीर होईल." असा दृष्टीकोन महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचारामध्ये दिसून येतो. तसेच याठिकाणी दुसरा विचार मांडावयाचा आहे की, सरकारी शाळांमधून शिष्यवृत्ती देण्याची जी पध्दत अवलंबिण्यात येते, ...

यानंतर कु.गायकवाड . . . .

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्रीमती उषा दराडे..

ती सदोष आहे . कारण त्यामुळे इतर वर्गाची जी आबाळ होते. तसेच ज्या वर्गामध्ये शिक्षणाची गोडी या आधीच निर्माण झालेली आहे त्याच वर्गाला व्यर्थ उत्तेजन दिले जाते. ही पद्धती अशा प्रकारे व्यवहारात आणावी की, ज्यामुळे, ज्या वर्गातील शिक्षणाची मुळीच प्रगती झालेली नाही. अशा वर्गातील मुलांच्या वाटयाला शिष्यवृत्या येतील. " सभापती महोदय, या दोन्हींचा मी या ठिकाणी उल्लेख केलेला आहे. कृषी क्षेत्र व कृषी विषयाच्या दृष्टीने अभ्यासक्रम आणण्याचा हा विषय अभ्यासक्रमात आणण्याच्या दृष्टीने आपण अजूनही चाचपडत आहोत. परंतु ज्योतिबा फुले यांनी हा विचार त्या काळात बोलून दाखविला होता. आपल्याला आजही नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांची समस्या भेडसावीत आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांनी ही समस्या त्याच वेळी ओळखून त्याबाबत काळजी व्यक्त केली होती.

सभापती महोदय, छत्रपती शाहू महाराज यांची भूमिका अशी होती की, बहुजन समाजाला शिक्षण देण्याकरिता त्यांनी मुक्त प्रवाह शिक्षण योजना आखून 1913 साला पासून सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा पाया खेडोपाडयामध्ये घातला. आज ज्या बहूजन समाजाच्या संस्था ज्ञानदानाचे कार्य करीत आहे, त्यांचे प्रमुख उद्दीष्ट हे शाहू महाराजांनी प्रज्वलित केलेल्या ज्ञानज्योतिमध्ये आहे. खेडोपाडी शिक्षणाचा प्रचार झाला पाहिजे ही संकल्पना शाहू महाराजांनी सन 1913 मध्ये मांडली होती.

सभापती महोदय, आज घटना दुरुस्ती करण्यात येत आहे. ही दुरुस्ती 0 ते 6 या वयोगटाला मुलभूत शिक्षण मिळणे आवश्यक आहे त्यापासून वंचित करणारी आहे. त्यामुळे 0 ते 6 या वयोगटातील मुलांना त्यांचा मुलभूत अधिकार म्हणून, शिक्षणाचा हक्क म्हणून त्यांना मुलभूत शिक्षण मिळाले पाहिजे. या दृष्टीने घटना दुरुस्ती करणे आवश्यक आहे. जी गोष्ट शाहू महाराजांना त्या काळी समजली होती, तीच गोष्ट आपल्याला आज समजत नाही. त्यामुळे आज शिक्षणाच्या प्रगतीच्या दृष्टीने राज्य व राष्ट्र दोन्हीही मागे आहेत असे मला वाटते.

सभापती माहेदय, आज जे विद्यार्थी घडत आहेत, त्यांच्यामधून ते जातीविरहित, धर्म विरहित, पंथ विरहित व देशावर प्रेम करणारे नागरिक निर्माण होतील काय याची देखील दखल घेण्याची आवश्यकता आहे असा उल्लेख शाहू महाराजांच्या काही भाषणांमधून येतो. डॉ. बाबासाहेब

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे..

आंबेडकर यांचे विचार मी आपल्याला सांगू इच्छिते " जो आपली बुद्धी जागृत ठेवून, आपले अधिकार काय आहेत, हक्क काय आहेत याची जाणीव करुन घेतो त्याला स्वतंत्र असे म्हणायचे" बुध्दीची व त्याच्या हक्कांची जाणीव होईल एवढे सक्षम व सुशिक्षित नागरिक बनविण्याचे काम आजचे शिक्षण करीत आहे काय याचा आढावा घेण्याची गरज आहे." विज्ञान ही महान शक्ती आहे, विद्यार्थ्यांनी या ज्ञानाची कास धरुन आपल्या देशाचा विकास व उद्धार करुन ध्यायचा असेल तर विद्यापीठाच्या कारभारामध्ये लक्ष देण्याची आवश्यकता आहे." देशाचा कारभार करणारा व ज्ञानाची कास धरुन देशाचा विकास करणारा विद्यार्थी आपल्याला तयार करावयाचा आहे. देशाच्या विकासासाठी शिक्षणाचा उपयोग झाला पाहिजे. केवळ त्याच्या उपजिविकेकरीता त्या शिक्षणाचा वापर होऊ नये. त्याची बुध्दी क्रय वस्तु होणार नाही. याची दक्षता घेण्याची आवश्यकता आहे परंतु या जबाबदारीपासून आपण दूर जात आहे काय याचा विचार करण्याची आज वेळ आलेली आहे.

सभापती महोदय, सार्वत्रिक, मोफत शिक्षण या विषयाला आजपर्यंत देशाने व राज्याने चर्चेमध्ये आणले परंतु हा विषय फारसा गांभीर्याने घेतला नाही. याचा परिणाम असा दिसून येत आहे की, सन 2001च्या सर्व्हेमध्ये बालकामगारांची संख्या 1.26 कोटी होती. त्यामध्ये 53 टक्के मुले होती व 43 टक्के मुली होत्या. 1996 चा बालकामगारांबाबतचा जो कायदा आहे त्याची कडक अंमलबजावणी करुन देखील ही परिस्थिती फारशी सुधारली नाही. सन 20 एज्युकेशन फॉर ऑल व सन 2010 मध्ये शिक्षणाचे सार्वत्रिकरण हे सर्व शिक्षण अभियानाचे स्वप्न असून सुध्दा ते आपण गाठू की नाही अशा प्रकारची शंका निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, खरे तर सर्वांना शिक्षणाचा हक्क दिलेला आहे. परंतु 6 ते 14 या वयोगटातील मुलांना हा अधिकार मर्यादित स्वरुपात देऊन चालणार नाही. या राज्यात जन्म घेणाऱ्या प्रत्येक बालकाला शिक्षण मिळाले पाहिजे. परंतु आपण ही जबाबदारी झटकून टाकत आहोत. बालक ही देशाची संपत्ती आहे. त्यामुळे प्रत्येक बालकाचे अज्ञान ही देशाची समस्या आहे, प्रत्येक नागरिकाची समस्या आहे. त्याच्याकरिता कल्याणकारी योजना आखत असताना, भारत 100 टक्के साक्षरच नव्हे तर सुशिक्षित देखील झाला पाहिजे या दृष्टीकोनातून योजनांची आखणी केली

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे..

पाहिजे. परंतु आपण अर्थसंकलामध्ये केवळ काही तरी शिक्षण देता आले पाहिजे या करिता तरतूद करीत असतो. असे न करता भविष्यातील गुंतवणूक म्हणून 10 ते 12 टक्क्यांपर्यत गुंतवणूक केली गेली पाहिजे. आजच्या जागतिकीकरणाच्या युगामध्ये, मुक्त अर्थव्यवस्थेमध्ये 6 टक्कयांची चर्चा करणे फायदेशीर नाही. अमेरीका, जापान या देशामध्ये हेच प्रमाण 12 टक्क्यांपर्यंत आहे. उच्च तंत्र शिक्षण घेण्याकरिता या देशातील त्यांची तेवढी ऐपत असते आणि

यानंतर श्री. बरवड..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे .....

जेव्हा तो नोकरीला जातो तेव्हा आयुष्यभराची कमाई चारपाच वर्षात करु शकतो. तशी स्पर्धा आपण आपल्या देशामध्ये करु शकतो. तेथील कारखानदारांनी, तेथील कंपन्यांनी त्या पध्दतीचे तंत्रशिक्षण त्या ठिकाणी सुरु केले. त्या पध्दतीची कॉलेजेस काढली. त्यादृष्टीने आपण पावले टाकण्याचा प्रयत्न करतो पण आपण यशस्वी होत नाही. त्याचे कारण असे आहे की, तेथील आर्थिक सामाजिक परिस्थिती वेगळी आहे आणि आपली आर्थिक सामाजिक परिस्थिती वेगळी आहे. या चातुर्वर्ण्य व्यवस्थेने माझ्या देशातील गरीब माणसाला गरीब ठेवलेले आहे. जातीच्या नावाखाली, वर्णभेदाच्या नावाखाली, श्रमाच्या नावाखाली त्याला दलित म्हणून बाजूला टाकलेले आहे. आपण ते करु शकत नाही. एवढे प्रयत्न करुनही साक्षरतेचे प्रमाण पुरुषांमध्ये 75.85 टक्के तर स्त्रियांमध्ये 54.16 टक्के आहे. निरक्षरांची संख्या 35 कोटीच्या वर आहे. म्हणजे साक्षरतेमध्ये सुध्दा स्त्रिया नाहीत. एक मुद्दा आपण या ठिकाणी समजून घेण्याची गरज आहे. आपले शिक्षण हे जेंडर सेन्सेटिव आहे की जेंडर बायस आहे ? जर विद्यार्थीनीना मुलांच्या तुलनेने बरोबरीचे शिक्षण देण्यामध्ये माझी समाजव्यवस्था कमी पडत असेल तर हे जे जेंडर बायस एज्युकेशन आहे ते बाजूला करुन कोठारी कमिशनने ज्या शिफारशी केलेल्या आहेत त्यांची इतक्या वर्षानंतर सुध्दा तंतोतंत अंमलबजावणी न करण्याचे तडाखे समाजाला बसत आहेत. माननीय मंत्रिमहोदय प्रा. वसंत पुरके यांना सांगू इच्छिते की, आपले विचार फार पुरोगामी आहेत. मी कालच्या महाराष्ट्र टाईम्समधील आपला लेख वाचला. आपली तळमळ फार मोठी आहे. परंतु या समाज व्यवस्थेला, या अर्थव्यवस्थेला, या प्रशासनाला आपण एकटे कारणीभूत असत नाही. तरी सुध्दा आपले विचार त्याच इच्छाशक्तीने पुढे नेणे, दामटून नेणे आणि या समाज व्यवस्थेमध्ये सक्षम विद्यार्थी तयार करण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न करणे गरजेचे आहे. हा विषयच इतका मोठा आहे की, यामध्ये स्त्री आणि पुरुष यांचे शिक्षणामध्ये काय स्थान आहे, ग्रामीण आणि शहरी शिक्षणामध्ये काय फरक आहे, शिक्षकांचा वैचारिक दर्जा काय आहे ? वैचारिक दर्जा सांगत असताना मला एक उदाहरण द्यावयाचे आहे की, माझ्या मुलीला शाळेतील शिक्षिकेने इयत्ता आठवीत असताना नवरा मेल्यानंतर कुंकू लावावयाचे नसते, केस कापावयाचे असतात याबाबत प्रश्न विचारला होता. त्यानंतर मी ती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे .....

शाळा सोडली होती. शिक्षकांचा वैचारिक दर्जा हा धर्मातील काही चुकीच्या रुढी आणि परंपरेच्या खाली जर अशा पध्दतीने दबलेला असेल तर धर्मनिरपेक्ष नागरिक निर्माण करणारे शिक्षण आपला समाज देऊ शकेल काय याचा सुध्दा आपल्याला विचार करावा लागेल. आपल्या शिक्षणामध्ये लैंगिक शिक्षणाच्या बाबतीत आपण एवढे अनभिज्ञ का आहोत ? आपण साधनशुचितेचा एवढा का विचार करत आहोत ? आतापर्यंत आपण लैंगिक शिक्षण, कृषी विषय, जेंडर सेसेटिव एज्युकेशन या सर्व गोष्टींचा आपण का विचार करत नाही ? आपल्या देशातील शिक्षण पध्दतीवर जगातल्या गॅट करार, संगणकीकरण, मुक्त अर्थव्यवस्था या सगळ्यांचा जो इतका वाईट परिणाम होतो त्याचा आपण कधी विचार करणार आहोत ? आज ज्या परीक्षा पध्दती आहेत त्या फक्त आपल्या स्मरणशक्तीच्या परीक्षा आहेत. हा नागरिक उत्कृष्ट आहे की नाही हे ठरविणाऱ्या या परीक्षा नाहीत. मी वाचल्यानंतर माझे किती लक्षात राहते हे फक्त त्याच्यातून कळते. एकदा तो माणूस समाजात गेल्यानंतर ते गुण समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी पुरेसे ठरणार आहेत काय ? म्हणून ही परीक्षा पध्दती पूर्णपणे अमुलाग्र बदलून टाकावयास पाहिजे. हे कसले गुण आहेत आणि कसले परसेंटेज आहे ? त्याच्या आधारावर आपण डॉक्टर्स आणि इंजिनिअर्स तयार करीत आहोत. मी एम.एसस्सी. आनर्स फिजिक्समध्ये केलेले आहे व नंतर मी वकील झाले. पण मी आज फिजिक्सचा एक डायग्राम काढू शकत नाही. माझ्या आयुष्यातील ती चार वर्षे जी गेलेली आहेत ती कशा पध्दतीने भरुन येणार आहेत ? अभ्यासक्रमामध्ये या सर्व पध्दतीचा जो अवलंब आपण परंपरेने करीत आहोत तो याचा विचार न करता करत आहोत त्यामुळे हे सगळे आपण बदलले पाहिजे आणि परीक्षा पध्दतीमध्ये आपण बदल केला पाहिजे. आम्हाला शिकवण्याची काय पध्दत आहे ? छडी मारुन शिकवण्याची आमच्या लहानपणची पध्दत आता लागू होत नाही. शिकविण्याची पध्दत काय आहे ? जर विद्यार्थ्याला झोप येत असेल असेल, त्याला गणित विषय जर आवडत नसेल तर कंपल्सरी गणित विषय का देतो ? इंग्रजी विषय आवडत नसेल तर इंग्रजी विषय का देतो ? या ठिकाणी सन्माननीय सदस्या यांच्याकडून मला एक सूचना मिळाली की, कोल्हापूरच्या एका कॉलेजमध्ये पैगंबरांविषयी अनुदगार काढल्याबद्दलचा उल्लेख आहे. हे कोणी बघत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP

श्रीमती उषा दराडे ....

शिक्षणामध्ये काय शिकवले जाते, कोण काय काढतो, कोण काय ठेवतो हे कोणी बघत नाही. शिक्षण हे आनंददायी असले पाहिजे, जिज्ञासा वाढविणारे असले पाहिजे. नैसर्गिक क्षमतांना फुलविणारे असले पाहिजे. ते घोकंपट्टीचे नसले पाहिजे. शिक्षकांची मानसिकता प्रयोगाने आणि अनुभवातून विद्यार्थी उभे करण्याची असली पाहिजे. जात धर्म आणि लिंगाच्या बाहेर जाऊन एक सक्षम नागरिक उभे करण्याची मानसिकता असली पाहिजे. अशा प्रकारची पध्दती आणण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. या ठिकाणी मी फार धाडसाने बोलणार आहे. सरस्वतीबद्दल या ठिकाणी उल्लेख झाला. सरस्वती ही कोणाची देवता आहे ? ज्या कलावंतीण आहेत, जे डोंबारी आहेत, पारधी आहेत, भिल्ल आहेत, घरकामगार आहेत, गिरणी कामगार आहेत त्यांच्या ज्या देवी आहेत त्या जानाई, भोनाई यांच्या नावाने वंदना होणार आहे काय ? म्हणून जी विद्या मुठभरांच्या हातात आहे अशा प्रकारचा एकदा विचार जर पुन्हा शिक्षण पध्दतीमध्ये लादण्याचा प्रयत्न होत असेल तर त्याचा आपण निश्चितपणे निषेध केला पाहिजे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे....

त्याचा आपण निश्चितपणे निषेध केला पाहिजे. त्या विचारापुढे झुकता कामा नये. याठिकाणी असा उल्लेख करण्यात आला की, She was the only man, Indiraji. का ? कर्तबगार केवळ पुरुषच असतो का ? बाई कर्तबगार नसते ? इंदिरा गांधी यांचे स्वतंत्र स्त्री म्हणून अस्तित्व स्वीकारण्याची मानसिकता आमच्या लोकप्रतिनिधींमध्ये नसेल तर शासन समाजाला जेंडर सेसेंटिव्ह शिक्षण कसे देणार ? म्हणून हे जे वाक्य आहे ते अत्यंत खेदजनक आहे. अनेक ठिकाणी शिवरायांच्या मूर्ति उभ्या राहिल्या आहेत. जिजामातेसंबंधी अशीच असती आई अमुची सुंदर रुपवती, आम्हीही सुंदर झालो असतो, वदले छत्रपती, असे उद्गार वारंवार काढले जातात. कारण महिलांकडे पाहण्याचा दृष्टीकोन जिजामातेने शिवरायांना दिला. आजच्या शिक्षणातून हा दृष्टीकोन मिळत नाही. आजही समाजामध्ये महिलांकडे पाहण्याची पुरुष प्रधान संस्कृती आहे ती नष्ट करण्यासाठी शासन कमी पडत आहे. याठिकाणी तुकोबाराया कसे होते ते शिकविण्याची चर्चा झाली. तुकोबाराया विद्यार्थ्यांना शिकवायलाच पाहिजेत. परंतु समिक्षेच्या दृष्टीकोनातून शिकविले पाहिजे. तुकोबाराया वैकुंठला गेले. याठिकाणी माननीय उपमुख्यमंत्री नाहीत. शासन कोणत्या एव्हिडन्स ॲक्टमध्ये, कोणत्या सीआरपीसीमध्ये वैकुंठ शोधणार ? ज्यांना तुकोबारायांची गाथा पाण्यात बुडवावयाची होती त्यांनी तुकोबांना वैकुंठाला पाठविले. हा विचार विद्यार्थ्यांना शिकवावा. फक्त सीतामातेने आक्रोश केला म्हणून धरणीकंप झाला आणि सीतामाता अंतर्धान पावली असे शिकवू नये. पुरुष प्रधान संस्कृतीमुळे सीतामातेला त्रास झाला हे शासनाने शिकविले पाहिजे. क्रिटिसिझम करुन इतिहास शिकविण्याची गरज आहे. कोणी कोणाच्या भोवती मर्यादेच्या रेघा मारावयाच्या ? अंबारीचा हत्ती नसे अंबारीचा स्वामी, लक्ष्मणाची रेघ आली उर्मिलेच्या कामी. सीतेला रेघ मारायची आणि उर्मिलेने वनवास भोगायचा ? हा इतिहास, हे रामायण, हे महाभारत शिकवू नये. आता भारतात 35 टक्के तरुणांची लोकसंख्या आहे. त्यांना हे शिकवून पुन्हा एकदा देशाला परंपरावादी करण्याचे स्वप्न पाहिले जात असेल तर अमेरिका, जपान, चीन या देशांशी आपण तुलना कशी करणार आहात ?

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे....

सभापती महोदय, कुटुंब व्यवस्थेविषयी मला फार दु:ख वाटते. कुटुंब व्यवस्थेबाबत जाणीवपूर्वक उदाहरणे दिली जातात. आजकाल स्त्रिया नोक-यांमध्ये, शिक्षणामध्ये पुढे आल्याने, महिलांमुळे कुटुंबाची व्यवस्था मोडकळीस आली आहे, अशी भीती परंपरावादी लोकांकडून व्यक्त केली जाते. त्यांच्याकडून अपेक्षा काय करावयाची ? सभापती महोदय, या निमित्ताने मी मला एक गझल आठवते.

जखमा अशा सुगंधी झाल्यात काळजाला,
केलेत वार ज्यांनी तो मोगरा असावा,
अंदाज आरशाचा वाटे खरा असावा,
बहुतेक माणसाचा तू चेहरा असावा.

सभापती महोदय, बायका शिकल्यामुळे कुटुंब व्यवस्था मोडीत निघाली असे जर कोणाला वाटत असेल तर त्यांनी आरशामध्ये आपला चेहरा पहावा, तो चेहरा माणसाचा आहे की नाही असा प्रश्न स्वत:ला पडल्याशिवाय राहणार नाही. सभापती महोदय, जगामध्ये 500 विद्यापीठे अशी आहेत की त्याच्या जवळपास देशातील एकही विद्यापीठ पोहोचू शकत नाही. आपल्याकडे वित्तीय अरिष्ट आहे असे कारण सांगितले जाते. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी उच्च शिक्षण घेणा-यांची फार चांगली आकडेवारी सांगितली. परंतु उच्च शिक्षण देण्याची जबाबदारी कोणाची आहे ? कंपन्यांची, कारखान्यांची, शासनाची, विद्यार्थ्यांची की पालकांची ? आपण अमेरिकेची कॉपी करण्याचा प्रयत्न करीत असतो. अमेरिकेमध्ये कंपन्यांनी, उद्योगपतींनी शिक्षण संस्था किंवा विना अनुदानाची विद्यापीठे उभी केली आहेत. तेथे विद्यार्थ्यांना घडविले जाते. कारण 2-4 वर्षामध्ये ते विद्यार्थी तेवढाच नफा त्या कंपन्यांना देतात. पुन्हा ते विद्यार्थी नको असतील तर दुसरीकडे जातात. आपल्या देशाला ते परवडणारे नाही. आज केंद्र व राज्य शासन या जबाबदारीतून अंग काढून घेत असल्याचे दिसत आहे. हे चुकीचे पाऊल आहे. ही जबाबदारी शासनाची आहे. शासनाने या विना अनुदानित विद्यापीठांवर अंकुश ठेवला पाहिजे. तो ठेवल्याचे दिसत नाही. तरच ग्रामीण भागामध्ये विमुक्त, भटक्या जमातीतील, साळी, माळी, भिल्ल, पारधी समाजाची मुलगी

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे.....

डॉक्टर, इंजिनिअर होऊ शकेल. आज तसे होऊ शकत नाही. आज केवळ घोषणा होऊ शकतात. सन्माननीय शिक्षण मंत्र्यांनी मला सांगावे की, मागील दोन वर्षात विमुक्त जाती व जमातीच्या किती मुलांची फी भरली आहे ? शासन या समाजातील मुलांची फी भरेल असे सांगितले होते. पण सांगण्यास खेद होतो की, शासन या मुलांची फी भरु शकलेले नाही. हा धोरणाचा प्रश्न आहे. हे धोरण शासनाने स्वीकारण्याची गरज आहे. हे धोरण श्री.अटलबिहारी वाजपेयी यांच्या काळात स्वीकारले होते. सभापती महोदय, जागतिक बँकेचा एक अहवाल आहे. त्या अहवालामध्ये 40 टक्के लोकांचे उत्पन्न 1 डॉलरपेक्षा कमी आहे, 40 टक्के लोकांचे उत्पन्न 2 डॉलरपेक्षा कमी आहे असे म्हटले आहे. एका डॉलरची किंमत 50 रुपये गृहित धरली तरी 80 टक्के समाज हा शिक्षण घेऊ शकत नाही, उच्च शिक्षण घेऊ शकत नाही. ही परिस्थिती असताना शासनाने विना अनुदान तत्वावर विद्यापीठे स्थापन करण्याची परवानगी दिली आहे. त्यांच्या नियम क्रमांक 22/2 नुसार विद्यापीठ गुंडाळण्याचीही परवानगी दिलेली आहे. ती विद्यापीठे अफाट नफा कमवून गुंडाळली जातील.

नंतर श्री.शिगम

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पण माझी बिचारी डोंबा-याची मुलगी कधीही इंजिनिअर होऊ शकणार नाही. जर एखाद्या आई-वडिलांनी आपली मालमत्ता विकून आपल्या मुलीला चांगले शिकवले आणि तिला नोकरी मिळाली नाही, उत्पन्नाचे साधन मिळले नाही तर ते पालक उद्ध्वस्त होतात, ती विद्यार्थीनी उद्ध्वस्त होते. सरकारचा खर्च झालेला नसतो, कंपन्याचे काहीही जात नाही. हे परिणाम आम्हाला नको आहेत. म्हणून या गोष्टींकडे पहाणे गरजेचे आहे. म्हणून शिक्षणाचा खर्च एकूण बजेटच्या किमान 6 टक्के होणे गरजेचे आहे. दुसरे म्हणजे शिक्षण क्षेत्रामध्ये नियोजनाचा अभाव आहे. वैद्यकीय महाविद्यालयांना आपण परवानगी दिली.

सभापती : सन्माननीय सदस्यांना भाषणासाठी जो वेळ दिलेला होता त्यापेक्षा त्यांनी 7-8 मिनिटे अधिक वेळ घेतलेला आहे. कृपया सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण आटोपते घ्यावे. मी सर्वच सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की त्यांनी शक्यतो 8 ते 10 मिनिटांमध्ये आपले भाषण संपविले पाहिजे.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, मी दोन मिनिटामध्ये माझे भाषण संपविते. माननीय राज्यपालांनी फेब्रुवरी 2004मध्ये वैद्यकीय शिक्षणाबाबत नेमलेल्या समितीचा आयसीडब्ल्यूआरअेचा अहवाल प्रसिध्द झालेला आहे. त्या अहवालामध्ये खाजगी संस्थांतील वैद्यकीय अभियांत्रिकी शिक्षणाचा दर्जा घसरलेला असल्याचे स्पष्टपणे म्हटलेले आहे. त्याकडे विचारपूर्वक लक्ष देण्याची गरज आहे. उच्च शिक्षणाच्या संदर्भातील एक महत्वाची बाब मला या ठिकाणी निदर्शनास आणून द्यावयाची आहे. सभापती महोदय, विद्या भारती नावाची अखिल भारतीय संस्था 1978मध्ये स्थापन झाली. आज 14 हजारापेक्षा जास्त शाळा आणि लाखो विद्यार्थी त्या संस्थेमध्ये शिक्षण घेत आहेत. 80 हजारापेक्षा जास्त शिक्षकांना तेथे शिक्षण दिले जाते. हे शिक्षण काय दिले जाते ? तर कडवा हिंदुत्ववादी बनविण्यावर भर दिला जातो. जसे मदरशामध्ये मुस्लिमाना शिक्षण दिले जाते त्याच पध्दतीचे शिक्षण या ठिकाणी दिले जाते. सरस्वती वंदना करण्याचे शिक्षण शिक्षकांना सक्तीने शिकविले जाते. मौलाना आझाद, झाकीर हुसेन, अरुणा असफअली, न्यायमूर्ती छगला, फक्रुद्दीन अली अहमद यांच्या अस्तित्वाला नाकारले जाते. दिनांक 20.1.2001 ला गुजरात सरकारने एक जी.आर. काढला. आर.एस.एस.चे साधना नावाचे मासिक आहे. या मासिकाचे वर्गणीदार

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती उषा दराडे...)

कम्पलसरी केले जावे अशा प्रकारच्या सूचना देण्यात आल्या. सभापती महोदय, शिक्षण क्षेत्रामध्ये जातीयवादाचे जे अतिक्रमण होत आहे त्याचा उल्लेख मी याठिकाणी थोडक्यात केलेला आहे. विद्याभारतीची जी पुस्तके आहेत त्यामध्ये संस्कार सौरभ, गौरव गाथा, इतिहास गा रहा है अशी प्रकारची पुस्तके आहेत. वाजपेयी सरकार आल्यानंतर मुरली मनोहर जोशी आणि बाकीच्यांनी अभ्यासक्रम बदलण्याच्या संदर्भात कसे कसे प्रयत्न केले त्याचे मी एक उदाहरण देते. या पुस्तकामध्ये दोन-तीन उल्लेख आहेत. भारतीय स्वातंत्र्यांच्या लढयातील सर्वात मोठे नेते हे डॉ. हेगडेवार होते, असा उल्लेख आहे. 1942ची गोष्ट मी सांगते. 1942च्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये संघ परिवार उतरणार नाही, सांस्कृतिक चळवळ आमच्या दृष्टीने महत्वाची आहे असे डॉ. हेगडेवार यांनी जाहीर केले होते. 1942च्या "चले जाव" आंदोलनामध्ये मी सहभागी होणार नाही असे अटलबिहारी वाजपेयींनी स्वत: लिहून ठेवलेले आहे. सभापती महोदय, इतिहास बदलण्याचे काम या देशामध्ये जाणीवपूर्वक होत आहे. उत्तरेतील काही राज्यांमध्ये अशा त-हेने पाठ्यपुस्तकामध्ये जाणीवपूर्वक बदल केला गेला. मी मघाशी सांगितल्या प्रमाणे उत्तर प्रदेश आणि मध्यप्रदेश मधील पाठ्यपुस्तकामध्ये, "महिलांच्या शिक्षणामुळे कुटुंब व्यवस्था उद्ध्वस्त होते" असा उल्लेख आहे. ज्योतिष शास्त्राला विज्ञान म्हणून गणण्याचा प्रयत्न केला गेला. कुतूब मिनार हा कुतूबुद्दीनने नाही तर समुद्र गुप्ताने निर्मिलेला आहे अशा प्रकारचा इतिहास लिहिलेला आहे. श्री.ओक हे तर असे म्हणतात की, ताजमहाल हे मंदिर आहे. अशा प्रकारे हा जो इतिहास बदलण्याचा प्रयत्न होत आहे, हे जे आक्रमण होत आहे ते तुम्ही रोखणार आहात की नाही, हा खरा प्रश्न आहे. वाजपेयी सरकारने एक कमिटी नेमली होती. त्या कमिटीमध्ये बिर्ला आणि अंबानी यांना घेतले होते. अमेरिकेमध्ये ज्या पध्दतीचे शिक्षण मिळते तसे शिक्षण येथे मिळाले पाहिजे अशी त्यांची भूमिका होती. जवळपास 94 टक्के लोकांना तंत्रशिक्षणापासून दूर ठेवले पाहिजे, त्या 94 टक्के लोकांना निम्नश्रेणीचे, तृतिय श्रेणीचे शिक्षण दिले पाहिजे. फक्त 6 टक्के लोकांना उच्च आणि तंत्र शिक्षण मिळाले पाहिजे म्हणजे मूठभर लोकांच्याच हातामध्ये सत्ता आणि शिक्षण असले पाहिजे आणि

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती उषा दराडे....)

बाकीचे सर्व गुलाम अशी भूमिका घेतली गेली. म्हणजे पूर्वी जशी चातुर्वर्ण व्यवस्था होती तशा प्रकारची व्यवस्था शिक्षणामध्ये आणण्याचा प्रयत्न त्या काळात झाला आणि तो अजून आपण मोडून कढलेला नाही.

....नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे....

हा धोका आपण अनुभवला तर बहुजनांची मुले, दलितांची मुले, विमुक्त जाती व भटक्या जमातीतील मुले हद्दपार होत आहेत असे चित्र देशाच्या पुरोगामित्वाला न साजणारे आहे. मी ॲग्रो बाबतीत विशेष उल्लेख उपस्थित केला म्हणून त्याबाबतीत मी काही जास्त बोलणार नाही. जोतिबा फुले यांनी शिक्षणाचा बाबतीत जसा ध्यास घेतला होता तसा घ्यास माननीय शिक्षण मंत्री प्रा.वसंत पुरके यांनी देखील घ्यावा असे मला वाटते. माननीय शिक्षण मंत्र्यांना विचारु इच्छिते की, ऊस तोड कामगारांच्या मुलांसाठी शाळा द्यावयाच्या नाहीत असा शासनाने निर्णय घेतला आहे. शासनाने ऊस तोड कामगारांच्या मुलांसाठी शाळा दिल्याच नाहीत तर शाळा द्यावयाच्या नाहीत असा जी.आर. तुम्ही कसा काय काढू शकता ? ऊस तोड कामगारांच्या मुलांसाठी फक्त दोन शाळा दिलेल्या आहेत. एक शाळा तांदळा येथे आहे आणि दुसरी शाळा परळी येथे आहे. त्या शाळांमध्ये फक्त प्राथमिक शिक्षण दिले जाते. त्या ठिकाणी माध्यमिक महाविद्यालय काढण्याचा अधिकार नाही. सर्व शिक्षा अभियानाने सांगितले आहे की, बीड जिल्हयात मोठया प्रमाणात ऊस तोड कामगार आहेत. दरवर्षी शासन 3.50 कोटी रुपये खर्च आहे. 300 रुपये दरमहा पालकांना देता आहात. या ठिकाणी कायमच्या शाळा का बांधल्या जात नाहीत ? आता शासनाने जी.आर.काढला आहे की, ऊस तोड कामगारांच्या मुलांसाठी शाळा द्यावयाच्या नाहीत. यासंबंधी शासनाचा पूर्वीचा जी.आर.असा होता की, 10 ऊस तोड कामगारांना शाळा देऊ. त्यासाठी 20 लाख रुपयांचे बजेट ठेवण्याचा देखील निर्णय शासन पातळीवर घेतला गेला होता. माझ्याकडे या शाळासंबंधीचे दोन्ही जी.आर.उपलब्ध आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांकडे हा विषय आहे, तो विषय काढून घ्यावा. ऊस तोड कामगारांच्या मुलांसाठी शाळा न देण्याचा जो शासनाने निर्णय घेतला आहे, तो बीड जिल्हयावर अन्याय करणारा आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर,ज्योतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज यांच्या विचारांप्रमाणे जगले पाहिजे आणि शिक्षण क्षेत्राच्या बाबतीत मुलभूत बदल घडवून आणले पाहिजेत. शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण केले पाहिजे अशी विनंती करते. मी सभागृहाचा जास्त वेळ घेतल्यामुळे मी क्षमा मागते आणि सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी उपलब्ध करुन दिली त्याबद्दल मी आपले आभार मानते आणि माझे भाषण पूर्ण करते.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, ग्रामीण भागात शिक्षणाची दुरावस्था कशी आहे ही गोष्ट सांगण्याचा मी या प्रस्तावाच्या निमित्ताने प्रयत्न करणार आहे. आम्ही सगळे ग्रामीण भागातून आलेलो आहोत. माझ्या गावात इयत्ता 7 वी पर्यंत शाळा आहे. त्या शाळेत 4 शिक्षक आहेत. त्यात 2 शिक्षक हे कायम गैरहजर असतात. जे 2 शिक्षक कार्यरत आहेत ते 11 कि.मी.अंतरावरुन रोज शाळेत येतात. बस उशिरा आली की, आमच्या गावातील शाळा उशिराने सुरु होते. बस लवकर असेल तर आमच्या गावातील शाळा लवकर सुटते. निलंगा तालुक्यात नदीवाडी नावाचे गाव आहे. त्या गावात इयत्ता 4 थी पर्यंत शाळा आहे. त्या शाळेत शिक्षक 2 आहेत. हे दोन्ही शिक्षक नदीच्या पलिकडे राहतात. शाळा ही नदीच्या अलिकडे आहे आणि शिक्षकांची निवासस्थाने ही नदीच्या पलिकडे आहेत. ज्या दिवशी पाऊस पडतो, त्या दिवशी शाळेला सुटी असते. माझ्या विभागात रामवाडी नावाचे आदर्श गाव आहे. आदर्श गाव म्हणून राज्य सरकारकडून या गावास पारितोषिक मिळालेले आहे. या ठिकाणच्या शाळेत वर्ग पाच आहेत. वर्ग खोल्या चार आहेत. शिक्षक तीन आहेत आणि विद्यार्थी 80 आहेत. या शाळेत इयत्ता 1 ली ते 4 थीचे वर्ग जिल्हा परिषदेमार्फत चालविले जातात. तर संस्थेला सहभाग घेऊ देत नाही काय अशी मी तेथे विचारणा केली असता मला सांगितले गेले की, प्राथमिक शिक्षण हे सरकारच्या ताब्यात आहे. प्राथमिक शिक्षणात सगळयात जास्त सहभाग सरकारचा आहे. राज्य शासनाने प्राथमिक शिक्षण तुमच्या हातात ठेवले आहे ते विद्यार्थ्यांचे बरे करण्यासाठी ठेवले आहे की, विद्यार्थ्यांचे वाटोळे करण्यासाठी ठेवले आहे? डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले होते की, शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. हे दूध जे सेवन करतील त्या व्यक्ती घुरघूर केल्याशिवाय राहणार नाही. शेतक-यांचे मुले आणि गरिबांची मुले शासनाच्या अंगावर गुरगुर करुन येऊ नये म्हणून तुम्ही प्राथमिक शिक्षण आपल्या ताब्यात ठेवले आहे क्‍ाय ? ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची शासनाने माती करुन टाकली आहे. ग्रामीण भागातील मुलांचे शिक्षणाचे प्रमाण कमी होऊ लागले आहे. ग्रामीण भागातील प्रत्येक मुलांच्या पालकांना वाटू लागले की, मुले रानात गेली की माती झाली. ग्रामीण भागातील मुलांना शिक्षण मिळत नाही म्हणून त्यांच्या पालकांना आत्महत्या करावी लागते किंवा त्यांना उघडे तरी रहावे लागते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना वर्गात येण्यासाठी गणवेश

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल...

नसतो. त्या विद्यार्थ्यांनी फोडणीचे खावयाचे नाही. ज्वारीच्या पिठाची भाकरी आणि त्याच पिठाचे पिठले जाते. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये मजुरांची मुले शिक्षण घेत असतात. त्या मजुराला वर्षाला 20 हजार रुपये पगार असतो.....

यानंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल.....

शासनाला खरोखरच मुलांना शिकवायचे आहे काय ? गावात शिकवितो म्हटले तर परिस्थिती अशी आहे. तुमच्या लोकांचे चोचले पुरविण्यासाठी सरकारने हायटेक कॉलेज काढले. मॉडेल स्कूल आहेत. 1000 कोटी रुपये खर्च करुन 450 शाळा बांधल्या जाणार आहेत. आमच्या गावात एवढा खर्च केला असता तर 100 शाळा चांगल्या निघाल्या असत्या. माझ्या गावात शिकलेले पोरग बाहेर जाऊ शकत नाही. शिकविण्यासाठी नीट शिक्षक नाहीत, बसायला जागा नाही. सांगली जिल्हयातील माझ्या एका कार्यकर्त्याच्या पोराला इंजिनिअर करण्याचे ठरविले. चांगला कार्यकर्ता असल्यामुळे मुलाला मुंबईला कॉलेजला ॲडमिशन घेण्यासाठी मी संस्था चालकांचे पाय धरले. पोराला चांगले शिकण्यासाठी कॉलेजमध्ये घातल. इथल कॉलेज, इथली पोर बघून पोरग दुसऱ्या दिवशी पळून गेले. स्मार्ट स्कूल तयार करणार आहात. त्याच्यापेक्षा स्मार्ट खोली घेतली पाहिजे. त्याच्यामध्ये प्रोजेक्टर बसवा, जगात काय काय चालले आहे ते बघण्यासाठी संगणक द्या. धनदांडग्यांना काय द्यायचे आहे ते द्या. आम्ही सुध्दा देशाचे नागरिक आहोत. आम्ही कर भरतो. गावातील लोक अडाणी ठेवू शकणार नाही. मी शिक्षणमंत्र्यांना यानिमित्ताने विनंती करणार आहे. सर्व शिक्षा अभियान योजना सुरु झाली. बघण्याची दृष्टी बदलली. चांगली पुस्तके आणली पण शाळा बंद होण्याच्या आधी पुस्तके वाटली. पोर पुस्तके वाचायला तयार आहेत, अभ्यास करायला तयार आहेत पण पुस्तके वाटली ती शाळा बंद होण्याच्या आधी. सभापती महोदय, जिल्हा परिषद क्षेत्रामध्ये जी परमिट रुम आहेत त्या परमिट रुमच्या बाहेर 80 टक्के मोटरसायकली शिक्षकांच्या असतात. सावकारी धंदे शिक्षकांचे आहेत. एलआयसीचे एजंट शिक्षक आहेत. शिक्षक आपल्या पत्नीच्या नावाने एजन्सी घेतो. पगार कमी नाही. पगार भरपूर झाला....

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. परमिट रुमच्या बाहेर शिक्षकांच्या मोटारसायकली असतात असा जो उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केला आहे तो योग्य नाही. शिक्षकांवर असे आरोप करणे बरोबर होणार नाही. म्हणून हे वक्तव्य सदनाच्या कामकाजातून काढले पाहिजे.

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की त्यांनी शिक्षकांच्या बाबतीत वापरलेले शब्द मागे घ्यावेत.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, मी शब्द मागे घेतो. परंतु मी शासनाला विनंती करतो की, मी जे सांगितले ते पाहण्यासाठी एक समिती गठीत करा आणि ही परिस्थिती नसेल तर मी माझे सदस्यत्व रद्द करा. माझे शब्द मी मागे घेतो राग मानू नका, परंतु त्यामागील भावना मी सांगत आहे. सगळयाच पोरांचे बाप हरकतीने मरुन चालले आहेत.

नंतर श्री. भोगले

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल...

एक पिढी बरबाद करायचे पाप तुमच्या हातून होऊ लागले आहे. ते बोलू द्या. मताच्या राजकारणात करणार काहीच नाही. बोलायची तरी संधी द्या. यावर हरकत घेऊ नका. गावातील सगळ्या शिक्षणाची वाट लागली आहे. एकेकाळी शिक्षक गावात रहायचे. शिक्षक जर गावात राहिला तर किमान मुलांना कळले नाही तर विचारत तरी होते. आमच्या काळात शिक्षक चौकात बसलेले असले तर आम्ही खेळायला जाणारी मुले गुरुजीकडे पळत जात होतो. आता संध्याकाळी 5 नंतर गुरुजी हे गुरुजीच नाही. शाळा सुटल्यानंतर आम्हाला उचलून न्यावे लागते. कशी सुधारणा होणार? भीती आहे का कुणाची? कोणाची भीती नाही. आमच्या गावात शाळेत समिती आणली. शिक्षण समिती आणली आहे त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी. शालेय समिती. बाकी काही नाही. तू समितीवर आहे ना. संध्याकाळी तू आणि मी, या पलिकडे काहीच नाही. खऱ्या अर्थाने आमची मुले शिकावी असे वाटते का? आमची मुले शिकावी असे वाटत असेल तर बघा. हजारो वर्षे तुमचे नाव लोक घेतील. असे करता येते का बघा. ज्या शिक्षकाची ज्या गावात बदली झाली आहे त्याच गावात त्याचे घर असले पाहिजे. एवढे करता का तुम्ही? त्याची मुले सुध्दा त्याच शाळेत शिकली पाहिजेत. दुसरीकडे शिकता कामा नयेत. नाही तर या शिक्षकाने रहायचे आमच्या गावात आणि त्याची मुले शहरात. त्यामुळे त्याचे मन लागत नाही. शिक्षणाकडे लक्ष असत नाही. आम्ही बोलायला गेलो तर शिक्षक आमदार मोर्चे काढायला तयार आहेत. म्हणून आता गावातील मुलांनी शिकावे असे वाटत असेल तर असे करता येते का बघा. ज्या गावात बदली त्याच गावात तो राहिला पाहिजे. तालुका बदलीने बदली व्हावयास पाहिजे. पारितोषिक हा विषय महत्वाचा आहे. मी खूप लोकांना विचारले. हे पारितोषिक म्हणजे काय असते हो? कोणाला ठावूक नाही. एक-एक शिक्षक पारितोषिक मिळालेला बघितल्यानंतर असे पारितोषिक आयुष्यात नाही मिळाले तर बरे अशी पाळी आलेली आहे. पारितोषिक नसेल तर बघण्याची दृष्टी बदलून जाईल. सगळ्यात महत्वाची गोष्ट म्हणजे पारितोषिक द्यायची पध्दत बदला. ग्राम शिक्षण समिती सक्षम करावी. ग्राम शिक्षण समितीच्या हातामध्ये शिक्षकाच्या वेतनवाढीचे अधिकार असले पाहिजेत. त्या समितीच्या सूचनेवर त्या शिक्षकाची बदली व्हावयास पाहिजे. एखाद्या वेळेला तो निलंबित सुध्दा व्हावयास पाहिजे. अशा समितीमध्ये कोण असले पाहिजेत? ज्याच्या घरामध्ये कोणी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल.....

तरी शिकले आहे. ज्याला शिक्षणाची किंमत माहिती आहे. ज्याने आपल्या कुटुंबाला शिकवून सिध्द करुन दाखविले आहे असे लोक या समितीवर असले पाहिजेत. त्याचबरोबर पालक मेळावे कधीतरी घेतले पाहिजेत. पालक येतच नाहीत.

(नंतर श्री.खर्चे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल.....

महोदय, सगळी पोरं आजच्या काळात इंग्रजीमध्ये शिकू लागली आहेत. राज्यात जिकडे तिकडे इंग्रजीचे वारे का आले हेच मला समजत नाही. ज्याच्या शेतात फक्त दोन एकर ऊस असेल असा गावातील माणूस सुध्दा आपल्या मुलांना इंग्रजीत शिकविण्यासाठी लातूरला शिकण्यासाठी ठेवायला लागला आणि महिन्याला सहा ते आठ हजार रुपये खर्च करायला लागला. दुर्दैव एवढेच की, इंग्रजी शाळेत शिकणारी मुले घरी आल्यानंतर, इकडे तर आईला आणि बापालाही इंग्रजी येत नाही त्यामुळे त्यांची पंचाईत व्हायला लागली. या इंग्रजीकडे लोक का चालले तर ज्या भाषेमध्ये आपल्याला रोटी मिळते तीच भाषा आज शिकत आहेत, हेच त्याचे उत्तर असावे. मग कसेही करुन इंग्रजी शिकू लागले. एक गोष्ट माझ्या लक्षात आली आहे की, या इंग्रजी शिक्षणामुळे आपल्याला खरोखरच स्वत:मध्ये बदल करता येतो काय ? आपल्या संस्कारांमध्ये बदल करता येतो काय ? त्याचे उत्तर नाही असेच येईल. दहा-पंधरा वर्षापूर्वी निलंगा गावात नवीन रेस्ट हाऊस बांधण्यात आले होते. त्यावेळी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांची मी एक बैठक घेतली व ती बैठक जवळपास दोन तास चालली होती. परंतु काही वेळानंतर बैठकीतून एक-एक माणूस उठून बाहेर जायला लागला. मी म्हणालो की, हे लोक थोड्या थोड्या वेळाने सारखे बाहेर का जात आहेत तर त्यावर एक जण म्हणाला की, दोन तास बसून असल्यामुळे लोक बाथरुमला जातात. मी त्यांना म्हणालो की, बाथरुमसाठी बाहेर कशाला जातात, या रेस्ट हाऊसमध्येच जा की. त्यावर ते लोक म्हणाले की, नाही, येथे नाही, हे रेस्ट हाऊस घाण होऊन जाईन, त्यापेक्षा बाहेरच बरे आहे. अशा प्रकारचे संस्कार त्या लोकांमध्ये होते, शाळेत शिकणाऱ्यांना असे संस्कार मिळतात काय हा भाग महत्वाचा आहे. दुसरे म्हणजे माझा मुलगा गावातच जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकत होता, तो बारावीपर्यंत पास झाला परंतु बारावीमध्ये नापास झाला. त्याला बारावीनंतर कोकणात पाठविले. कोकणातील एका चांगल्या शाळेत त्याच्यावर एवढे चांगले संस्कार झाले आणि तो तेथे चार वर्षामध्ये इतका तयार झाला, इतके संस्कार झाले की, बी.एससी. ॲग्रीकल्चर होऊन सिम्बॉयसिसमधून एम.बी.ए. सुध्दा झाला. अशा प्रकारे शिकत असतांना मुलांवर चांगले संस्कार केल्यानंतर काय होऊ शकते याचे हे उदाहरण आहे. नापास झालेला मुलगा सिम्बॉयसिसमधून एम.बी.ए. ची परीक्षा पास होऊन वर्षाला 14 लाख

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल.....

रुपये पगाराने आयसीआयसीआय मध्ये सिलेक्ट होतो. अशा प्रकारच्या सुधारणा शिक्षणाच्या माध्यमातून करता येतात का, याचाही मंत्री महोदयांनी विचार करावा, असे केले तर नक्कीच आमच्या मुलांमध्ये सुधारणा झाल्याशिवाय राहणार नाही. एका गावात एक नवीन ॲग्रीकल्चर स्कूल ओपन झाले. शाळेला सुरुवात झाली परंतु त्या शाळेकडे बघण्याची दृष्टी योग्य अशीच पाहिजे. परंतु असे न होता ज्यांनी ही शाळा काढली, त्याची 200 एकर जमीन आहे, लातूरला मजूर मिळत नाहीत आणि त्या शाळेत शिकणाऱ्या मुलांना मजूर म्हणून शेतावर काम करुन घेण्यासाठी ही शाळा काढली अशा दृष्टीने त्या शाळेकडे पाहिले जाते, हे योग्य नाही. वास्तविक ॲग्रीकल्चर कॉलेज असो अथवा मेडिकल कॉलेज असो त्यात शिक्षण घेतल्यानंतर जसे मेडिकलमधून सुटल्यानंतर एक वर्ष इन्टर्नशीप करावी लागते त्याचप्रमाणे शेतकरी शाळेतून बाहेर पडल्यानंतर प्रत्यक्ष शेतावर काम करणे बंधनकारक असले पाहिजे. एका ॲग्रीकल्चर कॉलेजमध्ये एम.एससी. पी.एच.डी. झालेल्या प्राध्यापकाचे भाषण चालू होते तो मुलांसमोर बोलत असतांना नांगराला लावायचे ते ..... काय म्हणतात त्याला..... असे म्हणत होता, परंतु त्याला योग्य शब्द आठवत नव्हता. एक ॲग्रीकल्चर कॉलेजचा प्राध्यापक असताना त्याला नांगराला लावतात ते "दोरखंड" हा शब्द आठवत नव्हता, एवढी साधी गोष्ट त्याच्या लक्षात येत नव्हती, हेच दुर्दैव आहे. म्हणून ॲग्रीकल्चर कॉलेजमधून शिक्षण घेतलेल्या मुलांना दोन वर्षे प्रत्यक्ष शेतावर काम करायला सांगावे, तरच त्याला प्रॅक्टीकल नॉलेज येईल. ॲग्रीकल्चरच्या संदर्भातील एक उदाहरण मी देऊ इच्छितो. ते म्हणजे ज्यावेळी आपल्या देशात गॅट करार, डंकेल प्रस्ताव आला. 148 देशांच्या भाषेत तयार झालेला प्रस्ताव होता व त्यासंबंधी जवळपास दहा ते वीस कॉलेजेसमध्ये मी भाषण दिले होते. त्यावेळेस भाषण सुरु असतांना सर्व एम.एससी. पी.एच.डी. झालेले जवळपास 125 प्राध्यापक भाषण ऐकण्यासाठी आलेले होते. शेती शास्त्रात अत्युच्च पदावर बसलेले हे लोक होते. मी त्यांना विचारले की, आपल्यापैकी किती लोकांनी डंकेल प्रस्तावाचा ड्राफ्ट वाचलेला आहे? त्यावर त्यांच्यापैकी फक्त दोनच लोकांनी हात वर करुन सांगितले की, आम्ही वाचलेला आहे. मी म्हणालो की, आपण डंकेल प्रस्तावाचा ड्राफ्ट वाचला की केवळ विश्लेषण वाचले आहे ?

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल ....

शेती शास्त्रात एमएचसी, पीएच.डी केलेल्यांनी डंकेल अहवालाचा ड्राफ्ट वाचला नसेल तर त्याचा काही एक उपयोग नाही. जर इंजिनिअरला ओळंबा कसा लावतात हे जर माहिती नसेल तर त्या इंजिनिअरचा सुध्दा काही एक उपयोग नाही. खरे म्हणजे विद्यार्थ्यांना आत्मनिर्भर बनवण्याच्या संदर्भातील शिक्षण मिळाले पाहिजे. शिक्षणामध्ये व्यावसायिकता आणली तर त्याचा फायदा विद्यार्थ्यांना होऊ शकेल. विद्यार्थ्यांना वस्तुस्थिती दर्शक शिक्षण मिळाले पाहिजे. नाही तर काऊ म्हणजे गाय, काऊ म्हणजे गाय असे पाठयांतर करणारे शिक्षण देऊन काही फायदा होणार नाही त्यासाठी विद्यार्थ्यांना वस्तुस्थिती दर्शक शिक्षण मिळण्याची आवश्यकता आहे.

सभापती : सन्माननीय सदस्यांना भाषणासाठी जो वेळ देण्यात आला होता त्यापेक्षा त्यांना अधिक वेळ दिला गेला आहे त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी कृपया एक मिनिटात आपले भाषण पूर्ण करावे.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, या विषयावर मला खूप काही बोलावयाचे आहे. शिक्षण हा विषय ग्रामीण भागाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आहे. शिक्षणाच्या विषयावर सन्माननीय सदस्यांना अधिक वेळ बालू द्यावे, ज्यांनी ज्यांनी नावे भाषणासाठी दिलेली आहेत त्यांना बोलू द्यावे, ज्यांनी नावे दिली नाहीत आणि त्यांना जर विचार मांडावयाचे असतील तर त्यांना सुध्दा विचार मांडू दिले जावेत तसेच या सभागृहात आता जे सन्माननीय सदस्य उपस्थित नाहीत आणि त्यांना जर विचार मांडावयाचे असतील तर त्यांनाही विचार मांडू दिले जावेत असे या सभागृहाचे नेते श्री. आर.आर.पाटील यांनी त्या दिवशी विचार मांडले होते परंतु आता ते येथे नसल्यामुळे त्यांच्या विचारांची हत्या झालेली आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

प्र. वसंत पुरके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माननीय उपमुख्यमंत्र्यांच्या संदर्भात जे शब्द उच्चारले आहे ते कामकाजातून काढून टाकण्यात यावे अशी विनंती आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी माननीय उपमुख्यमंत्र्यांच्या संदर्भात जे शब्द उच्चारले आहेत ते कामकाजातून काढून टाकले जातील. आता सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी विचार मांडावेत.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, शिक्षणावर चर्चा होत असतांना प्राथमिक शिक्षणाला उच्च शिक्षणाचा पाया म्हटले जाते. प्राथमिक शिक्षणाला भावी पिढी निर्माण करणारे शिक्षण म्हटले जाते. म्हणून शिक्षणावर राज्यशासन, केंद्रशासन हजारो कोटी रुपये दर वर्षी खर्च करीत असते. शिक्षणावरील वेतनेतर खर्चा व्यतिरिक्त 40 ते 50 टक्के खर्च हा शिक्षणाच्या खरेदीवर होत असतो. अशा पध्दतीने खरेदीवर खर्च होत असतांना जिल्हापरिषदेच्या किंवा अन्य शाळा खरेदी करतांना या गोष्टींचा उपयोग शिक्षणासाठी होईल का हे न बघता शिक्षणासाठी आवश्यक नसलेल्या गोष्टी खरेदी करीत असतात. सिंधुदुर्ग जिल्हयातील एक शाळेने पाणी शुध्द करण्याचे यंत्र 11 हजार रुपयांमध्ये खरेदी केले. या यंत्रांची आरसी प्रमाणे किंमत फक्त दोन ते अडीच हजार रुपये आहे. या शाळेने पिण्याच्या पाण्याचे शुद्धीकरण यंत्र घेतले परंतु त्या यंत्राच्या रिपोअरींगसाठी आता एजन्सी मिळत नाही. सभापती महोदय, ज्या गोष्टींचा शिक्षणामध्ये उपयोग होणार नाही अशा गोष्टींची खरेदी आता मोठया प्रमाणात सगळीकडे होत आहे. अशा प्रकारच्या अनेक खरेदी 12 वा वित्त आयोग, सर्व शिक्षा अभियान किंवा राज्यशासनाच्या किंवा जिल्हा परिषदेच्या फंडातून केली जात आहे. आज शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शिकवण्यापेक्षा खरेदीवर जास्त लक्ष केंद्रीत केले जात आहे. ग्रामीण भागात शिक्षकांना "गुरुजी" म्हटले जात असे परंतु आता शिक्षकांना "सर" म्हटले जाते. आता हे सर वेळेवर येतात आणि पाच वाजेची बस कशी मिळेल याकडे लक्ष देत असतात. पूर्वी जसे शिक्षक गावात राहत होते तसे आताचे शिक्षक गावात राहत नाहीत त्यामुळे प्रत्येक शिक्षकाला गावात राहून शिक्षणाचे योगदान देणे सक्तीचे केले पाहिजे. आता शिक्षक हा पेशा झाला असून तो समाजसुधारक राहिला नाही. वेळेत यावयाचे आणि वेळेत घरी कसे जाता येईल हेच फक्त शिक्षकांचे काम झालेले आहे. शिक्षक हे तालुक्याच्या बैठकीसाठी उपस्थित राहण्याचेच काम करीत आहेत. तालुक्यांच्या बैठकांना उपस्थित राहण्यामध्येच शिक्षकांचा वेळ निघून जात आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीपाठी नाही

श्री.परशुराम उपरकर ...

जिल्हा परिषदेमध्ये बैठका सुरु असल्यामुळे अनेक शिक्षक आज राजकारणामध्ये सुध्दा उतरु लागले आहेत. ब-याच वेळा आपली बदली होऊ नये म्हणून त्याला सभापती काही तरी सांगत असतात किंवा सदस्य काही तरी सांगत असतात व त्याचे ऐकून शिक्षक राजकारणात सहभागी होऊ लागले आहेत वा राजकीय स्वरुपाच्या बैठका लावण्यास देखील शिक्षक पुढाकार घेऊ लागले आहेत. त्यामुळे शिक्षणाचा दर्जा घसरत चालला आहे.सभापती महोदय, जर विद्यार्थ्यांना चांगले दर्जेदार शिक्षण द्यावयाचे असेल तर शिक्षणावर वा शिक्षकांवर लोकप्रतिनिधींचा दबाव असता कामा नये.शिक्षकांना हव्या असलेल्या ठिकाणी बदली करुन घेण्यासाठी ते दबाव आणत असतात. अनेक शिक्षकांना शहराच्या जवळ असलेल्या शाळेतच बदली करुन घ्यावयाची असते. जवळच्या शाळेत बदली झाली तर तो लवकर शाळेत येऊ शकतो व लवकर घरी जाऊ शकतो. अनेक शिक्षकांनी घरे बांधण्याकरिता कर्जे घेतलेली आहे परंतु त्यांनी शहरामध्ये घरे बांधलेली आहेत त्यामुळे हे शिक्षक शहरात राहतात. ग्रामीण भागात जर त्याची बदली झाली तर तो बदली रद्द करुन घेत असतो.नवीन धोरणानुसार दहा वर्षे झालेल्यांची तालुक्यात बदली केली जाते आणि वीस वर्षे
झालेल्या शिक्षकांची जिल्हयात बदली केली जाते. आपल्याला जे ठिकाण सोयीचे आहे अशा ठिकाणी बदली करण्याकरता हे शिक्षक जिल्हा परिषदेच्या पदाधिका-यांकडे व सभापतीकडे वारंवार मागणी करीत असतात. त्यामुळे अनेक शिक्षक राजकारणात येण्याचा प्रयत्न करीत असतात.

सभापती महोदय, सर्व शिक्षा मोहीमेतर्गत 2005 सालापर्यंत 2 हजार 155 कोटी रुपये या राज्यात खर्च करण्यात आलेले आहेत. परंतु सर्व शिक्षा मोहीमेअंतर्गत अनेक योजना हाती घेता येण्यासारख्या आहेत. मी आपल्याला एक उदहारण देऊ इच्छितो. मी जिल्हा परिषदेचा सदस्य असतांना स्थायी समितीमध्ये एक विषय उपस्थित करण्यात आला होता . त्यानुसार सर्व शिक्षा अभियानांतर्गत अपंग विद्यार्थ्यांना रॅम्प बांधण्यासाठी पाच हजार रुपये देण्याची योजना आखण्यात आली होती. एकदा एका शाळेत रुम्प बांधण्यात आल्यानंतर पुन्हा दुस-या वर्षी त्या शाळेत रॅम्प बांधण्यासाठी पुन्हा पाच पाच हजार रुपये देण्याची योजना आखण्यात आली होती.तेव्हा स्थायी समितीमध्ये आम्ही शिक्षण अधिका-यांना असा प्रश्न विचारला होता की, "एका शाळेत अपंग विद्यार्थी नसतांनासुध्दा रॅम्प बांधण्यासाठी पाच हजार रुपये खर्च केले होते. परतु पुन्हा तेथे रॅम्प

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बांधण्याची गरज काय आहे ? तेव्हा त्या अधिका-याने असे सांगितले की शासनाच्या गाईड लाईन्सप्रमाणे आम्हाला रॅम्प बांधावे लागणार आहेत. तेव्हा या मध्ये योग्य ती सुधारणा करण्यात आली पाहिजे असे मला वाटते.

सभापती महोदय, काही शाळांमध्ये टी.व्ही. देण्यात आलेले आहेत परंतु त्यातील काही टी.व्ही बंद पडलेले आहेत. काही ठिकाणी ते अडगळीत पडलेले आहेत. रेट कॉन्ट्रॅक्टने टी.व्ही. खरेदी करीत असतांना ती कंपनी कशी आहे, त्या कंपनीचे टी.व्ही. कोणत्या दर्जाचे आहेत इत्यादी बाबी न पाहता टी.व्ही.ची खरेदी करण्यात आलेली आहे. तेव्हा याबाबतीत योग्य ती काळजी घेण्यात आली पाहिजे.

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा येथे मांडावयाचा आहे. विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी काही वेळा माननीय शिक्षण मंत्र्यांकडून चिठ्ठी दिली जाते.परंतु शिक्षण अधिकारी असे सांगतात की "ही चिठ्ठी कच-याच्या डब्यात टाक आणि प्रवेशासाठी किती पैसे देणार आहे हे सांग." अशा प्रकारे शिक्षणाचे बाजारीकरण झालेले आहे. लहान शिशूमध्ये प्रवेश घेत असतांना, पहिलीमध्ये प्रवेश घेत असतांना किंवा उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेत असतांना पैसे द्यावे लागतात . त्याशिवाय प्रवेश दिला जात नाही.तेव्हा हे प्रकार थांबविण्यात यावे अशी मी माननीय शिक्षण मंत्र्यांना विनंती करतो.

सभापती महोदय,यानंतर मला दुसरा मुद्दा मांडावयाचा आहे. नियम 93 च्या सूचनेच्या माध्यमातून "धुरंधर नेता" अशा प्रकारचे पुस्तक खरेदी करण्याचा मुद्दा सभागृहात उपस्थित करण्यात आला होता. मंत्री महोदयांनी सांगितले की, त्यांना अधिकार असल्यामुळे हे पुस्तक विद्यार्थ्यासाठी निवडण्यात आले होते. परंतु पुस्तक निवडत असतांना कोणची पुस्तके घ्यावीत यासाठी काही तरी निकष ठरविण्यात आले पाहिजे. त्याचबरोबर यासंदर्भात योग्य तो अंकूश ठेवण्यात आला पाहिजे . अशा प्रकारचे पुस्तक खरेदी केल्यानंतर विद्यार्थी बिघडतील काय, त्यांना चांगले ज्ञान मिळेल काय ? याचा विचार केला पाहिजे व त्या दृष्टीने निकष ठरविण्यात आले पाहिजेत असे मला वाटते. अन्यथा काही गुंड प्रवृत्तीचे राज्यकर्तेसुध्दा आहेत त्यांची पुस्तके आणली तर या विद्यार्थ्यावर वेगळा परिणाम होण्याची शक्यता आहे.तेव्हा अशा प्रकारची पुस्तके खरेदी करीत असतांना कोणत्या प्रकारची पुस्तके खरेदी करावीत याचे निकष ठरवून त्यानुसार या

VTG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 18.50

श्री.परशुराम उपरकर ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पुस्तकाची एक सूची तयार करावी व त्याला मान्यता घेतल्यानंतरच पुस्तके खरेदी करण्यास परवानगी देण्यात यावी असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे..

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा याठिकाणी मांडावयाचा आहे. आज अनेक शाळेतील विद्यार्थ्यासाठी मुतारी व संडासची पुरेशा प्रमाणात सोय नसते तेव्हा या सोयी त्या देण्यात आल्या पाहिजेत. मध्यंतरी राजीव गांधी पेयजल योजना आखण्यात आली होती त्यानुसार एक वर्ष ती योजना सुरु होती परंतु नंतर ती योजना बंद झाली त्यामुळे मुलांना पिण्याचे पाणी देण्यासाठी कोणत्याही प्रकारवची योजना राबवली जात नाही.

सभापती महोदय, या चर्चेत भाग घेत असतांना मला असे सांगावयाचे आहे की राज्यामध्ये आय.टी.आय. प्रत्येक तालुक्यात निर्माण करण्यात आले आहेत. त्यानुसार सिंधुदूर्ग जिल्हयात कोटयावधी रुपये खर्च करुन प्रत्येक तालुक्यात आय.टी.आय. निर्माण करण्यता आले आहेत परंतु त्या ठिकाणी शिकविण्यासाठी शिक्षकच नाहीत. सिंधुदूर्ग जिल्हयात फोंडा तालुक्यात इंटेरिअर डेकोरेटरचा कोर्स सुरु करण्यात आला आहे परंतु हा कोर्स नळ कारागीर शिकवत आहे. इंटेरिअर डेकोरेटरचा या नळ कारागीराशी काहीही सबंध नाही परंतु तो हा कोर्स शिकवत आहे. त्यामुळे आय.टी.आय.मध्ये कमी मुले प्रवेश घेतात . फोंडा येथील आय.टी.आय. ची क्षमता 158 विद्यार्थ्याची असतांना प्रत्यक्षात 57 मुले शिक्षण घेत आहे. त्या ठिकाणच्या शिक्षकांवर व यंत्रसामुग्रीवर होणारा खर्च पहिल्यानंतर त्या तुलनेने कमी विद्यार्थ्यानी प्रवेश घेतला आहे तेव्हा याही बाबतीत सुधारणा घडवून आणली पाहिजे. प्रशिक्षण देणा-या शिक्षण संस्थेमध्ये चांगले शिक्षक नसल्यामुळे आय.टी.आय.कडील यंत्रसामुग्री पडून राहिली आहे त्याकडे लक्ष देण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला पाहिजे.

नंतर श्री.सुबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उपरकर .....

आणि अशा प्रकारे शिक्षणाचे राजकारण होता कामा नये, शिक्षणाचे बाजारीकरण होता कामा नये. शिकेल तो टिकेल असे म्हटले जाते आणि त्यासाठीच आपल्याला शिक्षणाकडे जास्तीत जास्त लक्ष केंद्रित करून, आज त्यात ज्या उणीवा आहेत त्या दूर करून, शिक्षकांवर धाक ठेवून शिक्षणाच्या योजना राबविल्या पाहिजेत. आज बऱ्याच शिक्षकांकडे मोटारसायकली आहेत. त्यामुळे ते वेळेत येथे असतील तर वेळेत दुसरीकडे असतात. बैठकांची कारणे सांगून, तालुक्याच्या ठिकाणी केंद्र स्तरावर प्रत्येक आठवड्याला दोन बैठका असतात, त्यांना उपस्थित राहण्याचे कारण सांगून किंवा पगार आणायला गेलो होतो म्हणून सांगूनही दांड्या मारल्या जातात. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी सांगितल्याप्रमाणे बरेचसे शिक्षक असेही आहेत की, ते अन्य व्यवसाय करीत आहेत. कोणी बांधकाम व्यवसाय करतो तर कोणी झाड तोडीचा व्यवसाय करीत आहेत, कोणी खाजगी शिकवण्या करीत असतात. अशा प्रकारे खाजगी व्यवसाय करणाऱ्या शिक्षकांवर वेळीच आपण कडक कारवाई करणे आवश्यक आहे. तसेच जे शिक्षक गावामध्ये राहत नाहीत, जे खाजगी व्यवसाय करीत आहेत त्यांच्यावर कडक कारवाई करण्याच्या दृष्टीने योग्य त्या उपाय योजना करण्याची गरज आहे. सभापती महोदय, या ठिकाणी मी ज्या सूचना केल्या आहेत त्यांचा विचार करून माननीय मंत्री महोदयांनी त्या अवश्य अमलात आणाव्यात आणि शिक्षकांवर चांगल्या प्रकारे दबाव आणून मुलांना चांगले शिक्षण देण्याचा प्रयत्न करावा एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. जयहिंद, जय महाराष्ट्र.

***

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, या सभागृहामध्ये शिक्षणावर सविस्तरपण चर्चा होत आहे आणि या चर्चेत भाग घेण्यासाठी आपण आम्हालाही न्याय दिला आहे त्याबद्दल प्रथमत: मी आपले आभार मानतो. सभापती महोदय, शिक्षणाचे महत्त्व आता सगळ्यांनाच कळून चुकले आहे. त्याचे महत्त्व पटवून सांगताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगून गेले आहेत की, विद्या, विनयशीलता आणि शीलसंवर्धन ही माझी तीन उपास्य दैवते आहेत. गौतम बुद्धाने आम्हाला शिक्षणाचे महत्त्व पटवून देताना सांगितले आहे की, क्रोधपूर्ण शब्दासारखे दुसरे तीक्ष्णतम शस्त्र नाही, लोभीपणासारखे दुसरे प्राणघातक विष नाही, मनोविकारासारखी दुसरी भयानक आग नाही आणि अज्ञानासारखी दुसरी काळीकुट्ट रात्र नाही. नवीन गोष्ट शिकण्याची ज्याची उमेद गेली तो म्हातारा असे पूज्य विनोबा भावे यांनी आम्हाला सांगितले आहे. डॉ.राधाकृष्णन् यांनी आम्हाला सांगितले की, केवळ बौद्धिक भरारी म्हणजे शिक्षण नव्हे, तर विविध प्रवर्तिय भावना यांना योग्य असे सुसंस्कृत वळण लावणे म्हणजे शिक्षण, शिक्षणातून केवळ साक्षरता निर्माण करावयाची नसून सुंदर माणूस निर्माण करावयाचा आहे. महात्मा जोतिराव फुले यांनी आम्हाला सांगितले आहे की, विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतीविना गती गेली, गती विना वित्त गेले, वित्तविना शूद्र खचले आणि हे सगळे अनर्थ कुणी केले ? तर एका अविद्येने केले. म्हणून माननीय श्री.शरद्चंद्र पवार साहेब त्यांच्या प्रत्येक भाषणामध्ये सांगतात की, एज्युकेशन इज द पॉवर. कोठारी कमिशनने सांगितले आहे की, 'द डेस्टिनी ऑफ इंडिया इज बिईंग सेफड् इन द क्लास रूम..', वर्गावर्गातून या देशाचे नेतृत्त्व घडविण्याचे काम होतं. म्हणूनच या शिक्षण क्षेत्रामध्ये आपल्या राज्यात काय परिस्थिती आहे याचा आपण विचार केला पाहिजे. सुदैवाने दोन्ही शिक्षण मंत्री या सदनामध्ये उपस्थित आहेत. शिक्षण मंत्र्यांवर टीका म्हणून नाही तसेच सत्तेतील आमदार म्हणूनही नाही तर जी सद्यस्थिती आपल्या राज्यात या शिक्षणासंबंधात आहे त्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न आपली दिलगिरी व्यक्त करून करीत आहे.

सभापती महोदय, प्राथमिक शिक्षणाची या राज्यात काय परिस्थिती आहे ? आज राज्यात जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा 75 टक्के आहेत, तर खाजगीमध्ये 25 टक्के आहेत. त्यात जाऊन आपण पाहिले तर राज्यातील जेवढ्या म्हणून जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळा आहेत त्यामध्ये जवळपास 8 हजार शाळा आहेत आणि त्यातील 50 टक्के शाळांमध्ये निम्मे शिक्षक आहेत

..... 3टी 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे .....

आणि शिक्षकांच्या निम्म्या जागा रिक्त आहेत. तसेच 15 टक्के शाळा या एक-शिक्षकी शाळा आहेत. त्याचबरोबर आपण पाहिले तर ग्रामीण भागातील सर्व गोरगरिबांची मुले, पददलितांची मुले या जिल्हा परिषदांच्या शाळांतून शिक्षण घेत असतात. ...

(यानंतर सौ.रणदिवे .... 3यू 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांनी शाळेमध्ये यावे, सगळयांना शिक्षण मिळावे या उदात्त हेतूने शालेय पोषण आहार योजना सुरु केली. ही योजना सुरु करण्यामागील आपला हेतू स्पष्ट होता, अतिशय चांगला होता की, जर ही योजना सुरु केली तर तांदूळ मिळेल या नादाने मुले शाळेमध्ये येऊन बसतील, शाळेमध्ये उपस्थित रहातील आणि शिक्षण घेतील. म्हणून शालेय पोषण आहार योजना सुरु केली. पण त्यामध्ये सुध्दा किती गैरप्रकार झाले हे आपण सर्वांनी पाहिले आहे. सुरुवातीला या योजनेअंतर्गत तांदूळाचे वाटप करण्यात येत असे. त्यामध्ये विद्यार्थ्यांची महिन्याभरातील उपस्थिती पाहून दर महिन्याला एका विद्यार्थ्यांला 3 किलो तांदूळ दिला जात असे. पण या योजनेचा दुरुपयोग झाला. शाळेतील विद्यार्थ्यांची महिन्याभरातील उपस्थिती पाहून तांदुळाचे वाटप करावे असे आदेश होते पण याबाबतीत आमच्या पालकांनी गैरफायदा घेतला. ते बाह्या वर करुन शाळेमध्ये येऊ लागले आणि असे विचारु लागले की,"तुमच्या बापाचा तांदूळ आहे काय ? शासनाने तुम्हाला हा तांदूळ उपलब्ध करुन दिलेला आहे. तुमच्या घरचा तांदूळ नाही, तर तो शासनाच्या मालकीचा आहे. मुलगा शाळेमध्ये येवो अथवा न येवो. परंतु गावामध्ये तांदूळ आलेला आहे, त्यामुळे आम्हाला तो मिळाला पाहिजे. अशी भूमिका आमच्या पालकांनी घेतली. त्यामुळे शाळेमध्ये मुलगा येवो अथवा न येवो, परंतु त्याठिकाणी तांदूळ वाटप करण्याचे काम होऊ लागले. मग शासनाने पुन्हा त्यामध्ये बदल केला की, आता तांदुळाचे वाटप न करता, ते शिजवून देऊ या आणि यामुळे आमच्या सर्व गुरुजनांना आचारी करुन टाकले. आज आम्ही प्रत्येक शाळेमध्ये पाहिल्यावर असे दिसते की, आमचा गुरुजन आचारी झालेला आहे. त्यामुळे शाळेमध्ये शिकविण्याचे काम करण्याचे सोडून त्याला खिचडी शिजवावी लागते. आज शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या तीन हजार, चार हजार आहे आणि शाळेचा जेवढा वेळ आहे, तेवढा वेळ त्या शिक्षकांचा खिचडी शिजविण्यामध्ये जातो. आपल्याला दिसेल की, यामध्ये कितीतरी घोटाळे होत आहेत. काही ठिकाणी विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा होते, बंगलोर येथे आग लागण्याचे प्रकार घडले आहेत. त्यामुळे या योजनेच्या माध्यमातून जेवढा फायदा व्हावयास पाहिजे, तेवढा झाला नाही. उलट शालेय पोषण आहाराच्या माध्यमातून तोटेच होत आहेत. म्हणून माझे प्रामाणिक मत आहे की, हे सगळे बंद केले पाहिजे. याबाबतीत जरी उच्च न्यायालयाचा निर्णय असला तरी सुध्दा शासनाने याबाबतीत स्वयंस्पष्ट भूमिका घेतली पाहिजे. या गोरगरीब मुलांना खऱ्या अर्थाने शिकवावयाचे असेल तर त्यांना तांदूळ देऊ नका.

सभापती : आता सन्माननीय अन्न व पुरवठा राज्यमंत्री नियम 46 अन्वये निवेदन करतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: केंद्र शासनाच्या किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यात करण्यात आलेली गहू खरेदी योजना .

मु.शी.: केंद्र शासनाच्या किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यात करण्यात आलेली गहू खरेदी योजना यासंबंधी माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांचे निवेदन.

श्री.सुनील तटकरे (अन्न व नागरी पुरवठा मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :--

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

. . . .3 यु-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : राज्यातील शिक्षण क्षेत्राची विश्वसनियता संपुष्टात येऊन शिक्षण क्षेत्राची झालेली वाताहात

मु.शी : राज्यातील शिक्षण क्षेत्रातील विश्वसनियता संपुष्टात येऊन शिक्षणक्षेत्राची झालेली वाताहात या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर,दिवाकर रावते नितीन गडकरी, डॉ.दीपक सावंत,सर्वश्री विनोद तावडे, अरविंद सावंत, मधुकर चव्हाण, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री श्रीकांत जोशी, रामनाथ मोते, संजय केळकर वि.प.स.यांचा प्रस्ताव.

(चर्चा पुढे सुरु)

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, शालेय पोषण आहाराची योजना बंद केली पाहिजे. तांदूळ वाटपाची योजना बंद केली पाहिजे. आपल्याला खऱ्या अर्थाने दीनदलित, गोरगरीब विद्यार्थ्यांना शिकवावयाचे असेल तर आज शालेय पोषण आहार योजनेसाठी करोडो रुपये खर्च होतो, त्याऐवजी या योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके दिली पाहिजेत. सन्माननीय शिक्षण मंत्री प्रा.वसंत पुरकेसाहेब यांनी चांगला निर्णय घेतला आणि मोफत पाठ्यपुस्तक योजना सुरुवात केली. पण ती योजना सर्व विद्यार्थ्यांसाठी असली पाहिजे. या विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, लिहिण्यासाठी वह्या, पाटी-पेन्सिल दिली पाहिजे. मुलींना कपडे दिले पाहिजेत. गरीब मुलांना शाळेचा ड्रेस द्यावा. जर ही मुले लांब अंतरावरुन शाळेमध्ये येत असतील तर त्यांना सायकल देण्याची व्यवस्था करावी. जेणेकरुन शालेय पोषण आहारावर जो कोट्यावधी रुपयांचा खर्च होतो, तो सर्व खर्च विद्यार्थ्यांनी शाळेमध्ये यावे, त्यांनी शाळेमध्ये उपस्थित रहावे यासाठी त्यांच्याकरता ज्या उपयुक्त अशा विविध गोष्टी आहेत, त्या उपलब्ध करुन द्याव्यात. अशा प्रकारे शालेय पोषण आहारासाठी जो खर्च होत होता, त्यातून या विद्यार्थ्यांसाठी जो शैक्षणिक खर्च करता येईल आणि त्यासाठी निम्मा खर्च लागेल आणि त्यामुळे शासनाचे लाखो-करोडो रुपये वाचणार आहेत. आपण पाहिले आहे की, शासनाने सर्व शिक्षा अभियान योजनेअंतर्गत चांगला निर्णय घेतला. आपण या योजने अंतर्गत राज्यामध्ये प्रत्येक शाळेला 50 हजार रुपयांचे अनुदान दिले.50 हजार रुपयांमधून तेथील मुलांना कॉम्प्युटरचे शिक्षण मिळाले पाहिजे.कारण आपण पहातो की,देश 21 व्या शतकाकडे वाटचाल करीत असताना प्रत्येक मुलाला कॉम्प्युटर चालविता आला पाहिजे. एक काळ असा होता

. . . .3 यु-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

की, ज्याला लिहीता-वाचता येत होते, त्याला साक्षर असे म्हटले जात असे. पण आजच्या काळामध्ये ज्याला कॉम्प्युटर चालविता येतो, त्यालाच साक्षर म्हटले जाते. म्हणून या मुलांना कॉप्युटर शिकता यावा यासाठी आपण प्रत्येक शाळेला 50 हजार रुपयांचे अनुदान दिले आहे. यामधून काय झाले ? मी यासंदर्भात लक्षवेधी सूचना दिली होती आणि त्यावर सदनामध्ये चर्चा झाली.

यानंतर कु.गायकवाड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे..

सभापती महोदय, या शाळांची आज काय अवस्था आहे ? ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आपण कॉम्प्युटर दिला आहे मात्र ग्रामीण भागात आज वीज नाही. ज्या योजनेकरीता आपण तरतूद करीत असतो, ती योजना सफल होत आहे किंवा नाही याकडे देखील आपण लक्ष दिले पाहिजे. या संदर्भात माझी अशी विनंती आहे की, 50 हजार रुपये आपण देणार आहोत, ती रक्कम राज्यातील प्रत्येक शाळेला मिळाली पाहिजे. तसेच या रकमेमधून केवळ कॉम्प्युटर खरेदीचेच काम होईल अशी व्यवस्था केली गेली पाहिजे.

सभापती महोदय, प्रा. रामकृष्ण मोरे यांनी शिक्षण मंत्री असताना पहिलीपासून शाळेमध्ये इंग्रजी शिकविले जावे असा एक अतिशय चांगला निर्णय घेतला होता. त्यानुसार मुलांना पहिलीपासून इंग्रजी शिकविण्यास सुरुवात झाली. आज ग्रामीण भागातील मुले आई, वडलांना मम्मी आणि डॅडी म्हणू लागली आहेत. इंग्रजी माध्यमातून मुलांना जरी शिकविले तरी देखील त्यांना मराठी आलेच पाहिजे. आता नवीन युगामध्ये प्रवेश करीत असताना मुलांना इंग्रजी भाषा आली पाहिजे. अशा प्रकारचा एक क्रांतिकारी निर्णय शिक्षण क्षेत्रात घेण्यात आला होता. हा निर्णय आाता बऱ्याचशा प्रमाणात यशस्वी देखील झालेला आहे. इंग्रजी शिकवायचे असेल तर तो विषय शिकविण्याकरिता शाळेमध्ये इंग्रजी विषयाचे शिक्षक असले पाहिजे. इंग्रजी माध्यमातून त्यांनी डी.एडचे शिक्षण पूर्ण केलेले असले पाहिजे. परंतु ज्यांनी इंग्रजी माध्यमातून डीएड पूर्ण केलेले आहे, त्यांना आज नोकऱ्या मिळत नाही. आपण मराठी माध्यमातून डी.एड केलेले नाही असे त्यांना सांगितले जाते. त्यामुळे ज्यांनी इंग्रजी माध्यमातून डी.एड केलेले आहे त्यांच्याकरिता 20 टक्के नोकऱ्या राखीव ठेवाव्यात अशी सूचना मी या माध्यमातून करीत आहे. यामुळे इयत्ता पहिलीपासून इंग्रजी विषय शिकविणे हा प्रयोग 100 टक्के यशस्वी होऊ शकेल.

सभापती महोदय, आज शिक्षकांवर अनेक अशैक्षणिक कामे लादली जात आहेत. जनगणना करण्याचे काम शिक्षकांना करावे लागते. तसेच जनावरांची मोजणी करण्याच्या कामाला देखील शिक्षकांनाच जुंपले जाते. कोठलेही काम असले तर ते जिल्हा परिषदेच्या शिक्षकांना करावे लागते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकविण्याचे काम करावयाचे असते याची कोणतीही दक्षता घेतली जात नाही. तरी देखील सध्या काही प्रमाणात शिक्षकांची कामे कमी करण्यात आलेली आहेत. परंतु

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे..

आता त्यांना जी कामे करावी लागत आहेत, ती कामे देखील कमी करण्याची आवश्यकता आहे अशी विनंती मी या ठिकाणी व्यक्त करीत आहे. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. वसंत पुरके यांचे मी अभिनंदन करु इच्छितो. गुणवत्ता विकास कार्यक्रम त्यांनी महाराष्ट्र राज्यामध्ये राबविला. या कार्यक्रमाचे काही जणांनी विरोध केलेला असला तरी देखील हा कार्यक्रम अतिशय चांगला होता असे मी या ठिकाणी सांगू इच्छितो. ग्रामीण भागातील मुलांना लिहिता वाचता आले पाहिजे हा त्यामागील प्रमुख उद्देश होता. पाचवीमधील विद्यार्थ्याला स्वत:चे नाव लिहिता येत नाही. परंतु या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमधील गुणवत्तेचा विकास होण्यास मदत होत आहे. तसेच या योजनेच्या माध्यमातून अधिकाऱ्यांच्या मार्फत जी चुकीची कारवाई होत आहे ती कारवाई थांबविली पाहिजे. चूक झाल्यास आपण वॉर्निंग दिली पाहिजे. एकदा नव्हे तर दोनदा व तीनदा त्याला वॉर्निंग दिली गेली पाहिजे. तीनदा वॉर्निंग देऊन देखील ती व्यक्ती सुधारत नसल्यास आपण त्याच्यावर निलंबनाची कारवाई करु शकतो. परंतु त्याला आपण संधी दिली पाहिजे. परंतु शाळेतील 50 टक्के विद्यार्थ्यांची गुणवत्ता चांगली नसेल तर तेथील शिक्षकांचे वेतन वाढ गुणवत्ता विकास कार्यक्रमाच्या अंतर्गत रोखली जात आहे. असे होता कामा नये. आपण ही गोष्ट थांबविली पाहिजे असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, राज्यातील माध्यमिक शिक्षणासंदर्भात मी आता बोलणार आहे. राज्यामध्ये एकूण माध्यमिक शाळांपैकी 90 टक्के माध्यमिक शाळा या खाजगी संस्थांच्या मालकीच्या आहेत व केवळ 10 टक्के शाळा जिल्हा परिषदेच्या मार्फत चालविल्या जातात. आज आपल्याला माध्यमिक शाळांमधून चांगला रिझल्ट मिळत आहे. याचे प्रमुख कारण असे आहे की, खाजगी शाळांमधून उच्च प्रतीचे शिक्षण दिले जात असते. आज राज्यामध्ये ज्या 10 टक्के शाळा जिल्हा परिषदेमार्फत चालविल्या जात आहेत, त्या बंद केल्या पाहिजेत अशी सूचना मी या ठिकाणी करु इच्छितो. या शाळा का बंद केल्या पाहिजेत ? आपण जिल्हा परिषदेच्या शाळांमधील परिस्थिती पाहिल्यास आपल्या निदर्शनास येईल की, तेथील परिस्थिती अत्यंत वाईट आहे. ग्रामीण विकास विभागाचे माननीय मंत्री एकदा औरंगाबाद येथे गेले होते. तेथे जात असताना, ते एका जिल्हा परिषदेच्या शाळेत गेले. त्या शाळेमध्ये, पहिली ते दहावीपर्यंतच्या 6 तुकडया होत्या. त्यांनी

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे..

मुख्याध्यापकांना प्रश्न विचारला की, विद्यार्थ्यांची संख्या किती आहे, यावर त्यांनी सांगितले, एकूण 18 मुले आहेत. त्यानंतर माननीय मंत्री महोदयांनी त्यांना विचारले, की शाळेत शिक्षकांची संख्या किती आहे ? मुख्याध्यापकांनी सांगितले की, शाळेमध्ये 12 शिक्षक आहेत. मग या शाळेवर तातडीने कारवाई करा असे माननीय मंत्री महोदयांनी आदेश दिला. अशीच परिस्थिती राज्यातील माध्यमिक शाळांची आहे. या शाळांची परिस्थिती अत्यंत खालावत चालली आहे. आज जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिकविण्याकरिता विषयवार शिक्षक उपलब्ध नाहीत.

यानंतर श्री. बरवड..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे .....

मराठीचा शिक्षक असेल तर त्याला हिंदी शिकवावे लागते आणि इंग्रजीचा शिक्षक असेल तर त्याला भूगोल शिकवावा लागतो. कारण माध्यमिकला विषय शिक्षक असल्याशिवाय गुणवत्ता सुधार होत नाही. म्हणून जिल्हा परिषदेच्या ज्या माध्यमिक शाळा आहेत त्या शासनाने त्वरित बंद केल्या पाहिजेत. त्या ठिकाणी जो लाखो रुपये खर्च होतो तो दुसरीकडे वापरला पाहिजे. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, जिल्हा परिषदेच्या शाळा ज्या आहेत त्या ठिकाणी किमान एक शिपाई असला पाहिजे तसेच एक लिपिक असला पाहिजे. त्याची व्यवस्था भविष्यामध्ये केली पाहिजे.

हे राज्य माननीय मंत्रिमहोदय चालवितात की अधिकारी चालवितात हा प्रश्न मला कधी कधी लोकप्रतिनिधी या नात्याने पडतो. कोणतेही काम माननीय मंत्रिमहोदयांकडे घेऊन जातो त्यासंदर्भात मला या ठिकाणी सांगण्यास खेद होतो. गेल्या आठ महिन्यांपासून आम्ही सातत्याने प्रयत्न करीत आहोत. जो जी.आर. काढला जातो, जे आदेश काढले जातात त्याविषयी मी सांगू इच्छितो की, गेल्या जुलै, 2006 ला शिक्षण खात्याने एक निर्णय घेतला. जी शिक्षण सेवक योजना आणलेली होती त्यामध्ये थोडासा बदल केला. ही शिक्षण सेवक योजना अंशत: अनुदानित शाळा आणि विनाअनुदानित शाळांना लागू असणार नाही असे सुधारित आदेश काढले. ते आदेश काढत असताना त्यामध्ये माध्यमिक शिक्षक आणि उच्च माध्यमिक शिक्षक एवढाच उल्लेख केला. आम्ही याबाबत शिक्षण सचिवांना सांगितले तसेच माननीय मंत्रिमहोदयांना सांगितले की, आपल्याकडून यामध्ये चूक झालेली आहे. यामध्ये प्राथमिक शिक्षकांना वगळलेले आहे. प्राथमिक शिक्षकांना ही योजना लागू असली पाहिजे. माननीय मंत्रिमहोदयांनी हे तत्वत: मान्य केले. परंतु मला सांगण्यास खेद होतो. माननीय शिक्षण मंत्र्यांनी त्या फाईलवर सही केली तसेच अधिकाऱ्यांना तोंडी सांगितले की, ताबडतोब आदेश जारी करा. माननीय शिक्षण मंत्र्यांनी सांगून सुध्दा अजूनही आदेश निघालेला नाही. म्हणजे राज्य मंत्रिमहोदय चालवितात की, अधिकारी चालवितात असा प्रश्न कधीकधी पडतो. शिक्षण मंत्री कितीही चांगले असले, ते कितीही कार्यतत्पर असले तरी काय झाले ? राज्याच्या नेत्यांनी तसेच देशाच्या नेतंनी त्यांच्यावर ही जबाबदारी का दिली ? ते ग्रामीण भागातून आलेले आहेत. ते प्राध्यापक म्हणून आलेले आहेत. शिक्षण क्षेत्रामध्ये त्यांनी काम केलेले आहे. म्हणून त्यांना शिक्षण मंत्री केलेले आहे. शिक्षणाचे प्रश्न त्यांना माहीत आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी तीन वेळा घंटा वाजवली आहे. आपण कृपया एक मिनिटामध्ये आपले भाषण संपवावे. मी आपल्याला 17 मिनिटे दिलेली आहेत. मी प्रथम सदस्य झाल्यानंतर मला पहिली सहा वर्षे तीन-तीन मिनिटांचा वेळ मिळत होता.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, मी आपल्याला परत एकदा विनंती करतो. मला आणखी 10 मिनिटे द्यावीत.

सभापती : आपल्याला आणखी दहा मिनिटे मिळणार नाहीत. आपण एकदोन मिनिटांमध्ये आपले भाषण संपवावे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, अशाच पध्दतीचे दुसरे उदाहरण आहे. अशाच पध्दतीचा एक जी.आर.शासनाने विना अनुदानात शाळांमध्ये झालेली शिक्षकांची सेवा होती वरिष्ठश्रेणी आणि निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरण्याच्या बाबतीत काढला. परंतु हे करीत असताना तेथील जे कर्मचारी आहेत त्यांना मागे ठेवले. असे सातत्याने का करतात हे माहीत नाही. कोणी तरी येऊन हात जोडावेत, काही तरी वजन ठेवावे असे वाटत असेल तर माहीत नाही. मी पुन्हा माननीय शिक्षण मंत्र्यांकडे गेलो आणि हा जी.आर. काढत असताना चूक झाली आहे, यामध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा उल्लेख नाही हे सांगितले. त्यावेळी त्यांनी तातडीने संबंधित अधिकाऱ्यांना बोलवून सांगितले की, अशा प्रकारचा निर्णय शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सुध्दा लागू असला पाहिजे याबाबतीत आदेश काढावेत. सहा महिने झाले तरी अजून आदेश कोठे अडकलेले आहेत हे माहीत नाही. माझी माननीय शिक्षण मंत्र्यांना विनंती आहे. आपण जर बाणेदारपणा दाखविला आणि अधिवेशन संपण्यापूर्वी हे दोन्ही आदेश काढले तर मी आपला शतश: आभारी राहीन.

सभापती महोदय, एस.एस.सी. बोर्डाचा विषय गहन झालेला आहे. एस.एस.सी बोर्डाच्या परीक्षेत कॉपीचा सुळसुळाट झालेला आहे. त्यासंदर्भात वर्तमानपत्रात अर्धा पान बातमी येते. टी.व्ही. कॅमेरेवाले त्या ठिकाणची दृश्ये दाखवतात. विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये 10 वी ची शालांत परीक्षा म्हणजे एस.एस.सी. परीक्षा आणि 12वीची उच्च माध्यमिक शालांत परीक्षा म्हणजे एच.एस.सी. परीक्षा या महत्वाच्या परीक्षा आहेत. या परीक्षा मंडळाचा कारभार सुधारला पाहिजे. आज राज्यामध्ये 8 बोर्ड आहेत.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे....

राज्यामध्ये 8 शिक्षण मंडळे आहेत. त्यांच्या कारभारामध्ये डोकावले तर काही ठिकाणी अध्यक्ष नाहीत. या मंडळामार्फत महत्वाच्या परीक्षा घेतल्या जातात, परंतु या मंडळाच्या स्टेअरिंगवर बसण्यासाठी माणूसच नेमलेला नाही. कोल्हापूरच्या मंडळाच्या अध्यक्षांकडे लातूरच्या मंडळाचा चार्ज दिलेला आहे, पुण्याच्या मंडळाच्या अध्यक्षांकडे औरंगाबाद मंडळाचा चार्ज दिलेला आहे. माझी मागणी आहे की, या सर्व मंडळांवर अध्यक्षांची नेमणूक करण्यात यावी. सभापती महोदय, माननीय शिक्षण मंत्र्यांनी पुन्हा मेरिट लिस्ट सुरु केली पाहिजे.

सभापती महोदय, उच्च शिक्षणाबाबत न बोलणे योग्य होणार नाही. आज देशाची लोकसंख्या आणि विद्यापीठांची संख्या याचे प्रमाण विषम असल्याचे दिसून येते. जपानची लोकसंख्या 12 कोटी आहे, तेथे विद्यापीठांची संख्या 684 आहे, यु.एस.ए.ची लोकसंख्या 27 कोटी असून तेथे विद्यापीठांची संख्या 236 आहे, इंग्लंडची लोकसंख्या 6 कोटी असून 127 विद्यापीठे आहेत, जर्मनीची लोकसंख्या 8 कोटी असून 333 विद्यापीठे आहेत आणि भारताची लोकसंख्या 100 कोटी असूनही केवळ 347 विद्यापीठे आहेत. आज उच्च शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांचे वय 17 ते 34 वर्षे आहे असे सांगितले जाते. कॅनडामध्ये उच्च शिक्षण घेणा-यांचे प्रमाण 88 टक्के आहे, यु.एस.ए.मध्ये हे प्रमाण 80 टक्के आहे.....

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी खाली बसावे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, देशातील उच्च शिक्षण घेणा-यांचे प्रमाण वाढविण्यासाठी राज्य शासनाने आणि केंद्र सरकारने प्रयत्न करावेत अशी सूचना करुन मी वेळेअभावी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रतापराव सोनवणे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, शिक्षणासंबंधी नियम 260 चा प्रस्ताव सभागृहात मांडण्यात आला आहे. त्यावर मी माझे विचार मांडण्यासाठी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, शिक्षण हे मानवी जीवन कल्याणाचे व समाज परिवर्तनाचे साधन आहे असे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर बोलत असत. आपल्या देशाला 2020 साली महासत्ता बनण्याचे स्वप्न देणारे तत्कालीन राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांनी असे म्हटले आहे की, "The ignited minds of the youth is most powerful resource of the earth, below the earth and above the earth." फक्त तरुणांची मने प्रज्वलित करण्यासाठी चांगले शिक्षण दिले पाहिजे असे त्यांनी म्हटले होते. शिक्षणाला अनन्य साधारण महत्व आहे. म्हणून या क्षेत्रामध्ये चांगले काम केले पाहिजे असे म्हटले जाते. परंतु या क्षेत्रामध्ये जे काम होत आहे ते समाधानकारक नाही किंवा चिंताजनक आहे असे शिक्षणप्रेमी, शिक्षण तज्ज्ञांनी म्हटले आहे. शिक्षण क्षेत्राचे साधारणपणे 5 स्तर आहेत. पहिला स्तर म्हणजे, शासन-प्रशासन, दुसरा स्तर संस्था चालक, तिसरा स्तर गुरुजन व इतर सेवक वर्ग, चौथा स्तर विद्यार्थी आणि पाचवा स्तर पालकांचा आहे. शासनाचे सध्याचे बदलते शैक्षणिक धोरण आणि त्याची संथ गतीने अंमलबजावणी करणारे प्रशासन यांनी या क्षेत्राला वेठीस धरले आहे असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. शिक्षण खात्याचे प्रमुख माननीय शिक्षण मंत्री आहेत. कोणी तरी शिक्षण मंत्र्यांना गंमतीने शिक्षण जोगी म्हटले आहे. दर दोन वर्षांनी शिक्षण मंत्री बदलतात, त्यामुळे शैक्षणिक धोरण बदलले जाते. प्रत्येक शिक्षण जोगीला या क्षेत्रात क्रांती करावयाची असते. त्या शिक्षण मंत्र्यांकडे भस्म असते आणि ते भस्म विद्यार्थ्यांच्या, पालकांच्या, संस्था चालकांच्या कपाळाला लावून सर्व घटकाला पवित्र करुन मार्गक्रमणा करतात. परंतु यामुळे शिक्षण क्षेत्राला तडे जातात, हादरे बसतात. गेल्या 7-8 वर्षापासून असे जाणवत आहे की, शासनाला शिक्षण क्षेत्राची आपली जबाबदारी कमी करावयाची आहे की काय किंवा ते टाळण्यासाठी वेगवेगळया प्रकारचे प्रयोग शाळांमध्ये राबविले जातात की काय ? विना अनुदान तत्वावरील शाळा, कायम विना अनुदानावरील शाळा, शिक्षण सेवक योजना, आकृतिबंधाच्या योजना असे विविध प्रयोग शासनाकडून होताना दिसतात.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. प्रतापराव सोनवणे....)

परंतु विनाअनुदान तत्व हे कामयस्वरुपी टिकणारे नाही हे सिध्द झालेले आहे. म्हणून हे तत्व चालणार नाही. शहरामध्ये एखाद दुसरी शाळा विनाअनुदान तत्वावर चालू शकते. परंतु ग्रामीण भागामध्ये विनाअनुदान तत्वावर शाळा चालू शकणार नाही. मतांच्या गठ्ठयांचे राजकारण करुन कार्यकर्त्यांना सांभाळण्यासाठी, नातेवाईकांना सांभळण्यासाठी खिरापतीसारख्या शाळा वाटल्या जातात. यामुळे शैक्षणिक वातावरण खराब होते. एक स्तर संस्था चालकांचा आहे. सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी सांगितल्याप्रमाणे महाराष्ट्रातील 90 टक्के शिक्षणाचा भाग हा खाजगी शिक्षण संस्थाचालक चालवित आहेत. या क्षेत्रामध्ये आदर्श काम करणारी मंडळी पुष्कळ आहेत. काही संस्थाचालकांना चांगले काम करावयाचे आहे परंतु शासकीय धोरणामुळे अडचणी निर्माण होतात. काही संस्थाचालकांचे वर्तन हा अभ्यास करण्याचा विषय आहे. ब-याचशा संस्थाचालकांनी हे क्षेत्र आपल्या राजकारणाचे आणि अर्थकारणाचे अड्डे केलेले असून त्यांनी सामाजिक बांधिलकीला मूठमाती दिलेली आहे. अशा शिक्षण संस्थाचालकांवर नियंत्रण कोण ठेवणार हा प्रश्न आहे आणि हे नियंत्रण कोणी ठेवू शकत नाही. यासंदर्भात मी एक उदाहरण देऊ इच्छितो. आपल्या या सभागृहामध्ये शिक्षणाच्या प्रश्नावर चर्चा सुरु होती. आदरणीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी एका प्रश्नाच्या बाबतीत आग्रही भूमिका घेतली होती. माननीय मंत्री महोदय त्यांचे समाधान करु शकत नव्हते. म्हणून सभापती महोदय, आपण असा निर्णय दिला की, माननीय मंत्री महोदय आणि शिक्षक आमदार यांनी आपल्या दालनात येऊन चर्चा करुन मार्ग काढावा. परंतु त्याच वेळी एक सन्माननीय सदस्य उठले आणि म्हणाले की, तुम्ही फक्त शिक्षक आमदारांना बोलावले, पण आम्ही शिक्षण संस्था चालविणारे आमदार आहोत, म्हणजे संस्थाचालक आहोत. तिसरे एक सन्माननीय सदस्य म्हणाले की या सभागृहातील 90 टक्के सदस्य हे शिक्षण संस्थाचालक आहेत आणि ज्या सभागृहामध्ये 90 टक्के संस्थाचालक सदस्य आहेत ते शेवटी संस्थाचालकांचीच बाजू घेणार. हे उदाहरण मी या निमित्ताने देत आहे. एक स्तर गुरुजन वर्ग आणि सेवक वर्गाचा आहे. या पिढीला घडविण्याची, त्यांना चांगले शिक्षण देण्याची प्रमुख जबाबदारी ही गुरुजन वर्गाची आहे. त्यासाठी ते कार्यतत्पर असले पाहिजेत. वक्तशीरपणा, शिस्त आणि

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. प्रतापराव सोनवणे...)

उत्तम वर्तन या आदर्श गोष्टी त्यांनी पाळल्या पाहिजेत संस्कारक्षम वयातील विद्यार्थ्यांचे शिक्षक, प्राध्यापक हे आदर्श असतात. म्हणून गुरुजन वर्गाचे वागणे, त्यांचे चालणे, बोलणे हे आदर्श असले पाहिजे अशी समाजाची अपेक्षा आहे आणि ती रास्तही आहे. परंतु या नाण्याला दोन बाजूही आहेत. गुरुजन वर्गाकडून चांगले शिक्षण अपेक्षित असले तरी त्या कामी त्यांची मानसिकता चांगली राहिली पाहिजे आणि ती चांगली ठेवण्यासाठी त्यांच्या न्याय्य, रास्त, हक्काच्या मागण्या विनासायास मान्य झाल्या पाहिजेत. गुरुजन वर्गाला उत्तम स्थैर्य मिळाले पाहिजे आणि सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे गुरुजन वर्गाला समाजात श्रेष्ठ असा सन्मान मिळाला पाहिजे. पण प्रत्यक्षात मात्र गुरुजनवर्ग व शिक्षकेतर वर्ग हा वेठीला धरला गेला आहे. त्यामुळे उच्च शिक्षण क्षेत्रातील, माध्यमिक शिक्षण क्षेत्रातील, आश्रमशाळा विभागातील कनिष्ठ महाविद्यालयातील, एमसीव्हीसी क्षेत्रातील प्राथमिक शिक्षण क्षेत्रातील आणि इतर सर्वच गुराजन वर्गाचे आणि शिक्षकेतरांचे खूप प्रश्न तयार झालेले आहेत. या प्रश्नाच्या सोडवणुकीकरिता शासन मार्ग काढत नाही हा प्रमुख प्रश्न आहे. विविध स्थरावरचे हे प्रश्न आहेत. उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये शासन, विद्यापीठे, संस्थाचालक व अध्यापक हे प्रमुख घटक आहेत. या चारही घटकांच्या भूमिका आणि जबाबदा-या स्पष्ट होणे गरजेचे आहे. आजच्या परिस्थितीत याबाबत कोणतीही स्पष्टता नसून ब-याच वेळा या घटकांमध्ये विसंवादी असा सूर दिसून येतो.

....नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

श्री. प्रतापराव सोनावणे...

विद्यार्थ्यांच्या हितासाठी या चाहरी घटकांमध्ये सुसंवादी वातावरण तयार होणे आवश्यक आहे व ती काळाची गरज आहे. कनिष्ठ महाविद्यालयांची एक कटूकथा आहे. कनिष्ठ महाविद्यालतयातील शिक्षणस्तर निर्माण होऊन 34 ते 35 वर्षे झाली आहेत. या पूर्ण कालावधीत या स्तरामधील शिक्षकांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष झालेले आहे. कनिष्ठ महाविद्यालये, काही ठिकाणी उच्च महाविद्यालयांकडे तर काही ठिकाणी शाळांकडे जोडलेली आहेत. दोन्ही विभागाचे नियम प्रशासकीय पातळीवर भिन्न असल्यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. सेवाशर्ती, सेवाशाश्वती, शैक्षणिक पात्रता व वेतनश्रेणी, अध्यापन तासिकांची वेळ, कार्यभार निश्चिततेची पध्दत अशा अनेक समस्या आहेत. समान काम, समान पात्रता, समान वेतन या तत्वाला कनिष्ठ महाविद्यालयीन स्तराव हरताळ फासला गेला आहे. या सर्व अन्यायकारक बाबींमुळे मोठा असंतोष तयार होऊन शैक्षणिक वातावरण खराब झाले आहे. खरे तर कनिष्ठ महाविद्यालयातील स्तरांसाठी स्वतंत्र संवर्ग तयार होणे ही काळाची गरज आहे ही बाब शासनाच्या वेळोवेळी लक्षात आणून दिलेली आहे. पाचव्या वेतन आयोगाच्या बाबीत राज्य सरकारी कर्मचारी, निम सरकारी कर्मचारी, माध्यमिक शिक्षक, जिल्हा परिषद शिक्षक यांना दिनांक 1.1.1996 पासून आयोग लागू झाला. कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना हा आयोग दिनांक 1.1.2000 पासून लागू करण्यात आला आहे. ही तफावत अन्यायकारक आहे. माध्यमिक आणि प्राथमिक विभागातील अनेक विषयात शासनाने गोंधळ घालून ठेवलेला आहे. 15 दिवसाचा नैमित्तिक रजेचा विषय चिघळवून ठेवला आहे. वेतनवाढ आणि वेतनश्रेणीतल्या अनियमितता दूर करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे आश्रमशाळेतील सेवकांचे तर प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. आश्रमशाळा प्रामुख्याने दुर्गम भागात, वस्तीपासून दूर, कठीण व अवघड ठिकाणी चालविल्या जातात. आश्रमशाळांमध्ये काम करणारे शिक्षक हें शहरी वातावरणापेक्षा किती तरी वेगळया परिस्थितीत काम करीत असतात. निवासी व्यवस्थेमुळे त्यांचेवर 24 तास काम करण्याची त्या शिक्षकांवर जबाबदारी आहे. खरे तर अशा परिस्थितीत आश्रमशाळा सेवकवृदांना जादा सोयी, सवलती, प्रोत्साहन भत्ता दिला असता तर ती न्याय्य बाब ठरली असती. जादा सोयी सवलती आणि प्रोत्साहन तर दूरच राहिले, पण न्याय्य हक्काच्या सवलती देण्याबाबतीत शासन खळखळ करते. अशा परिस्थितीत आश्रमशाळा कर्मचा-यांना आपले न्याय्य हक्क प्राप्त करुन घेण्यासाठी कधी आंदोलनाचा मार्ग तर कधी न्यायालयाचे दरवाजे

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रतापराव सोनावणे....

ठोठवावे लागतात. विद्यार्थ्यांचा एक स्तर आहे. आधुनिक शिक्षण प्रणालीच्या नावाखाली विद्यार्थ्यांच्या डोक्यात गोंधळ माजविण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. शैक्षणिक धोरण आखताना विद्यार्थ्यांचे भवितव्य घडविण्याच्या दृष्टीने सहजतेने आणि सुलभतेने ज्ञान कसे देता येईल या गोष्टीचा विचार केला जाणे आवश्यक आहे. पण तसे घडत नाही. विद्यार्थी प्रत्यक्षात आपल्या जीवनात सुरुवात करतो, त्यावेळी त्याच्या लक्षात येते की, अनेक नावडीचे विषयांचा अभ्यास त्यांना करावा लागणार आहे. खरे आताचा अभ्यासक्रम काही अंशी कालबाहय झालेला आहे. सदरहू अभ्यासक्रम अपडेट करणे गरजेचे आहे. शासनाने याबाबतीत तातडीने लक्ष घालावे अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, विषयांची पुनरावृत्ती होणार नाही, शक्यतो आपल्या घंटीचा आवाज माझ्या कानावर येणार नाही, याची दक्षता घेत माझे भाषण संपविण्याचा प्रयत्न करणार आहे. रविंद्रनाथ टागोर यांनी असे सांगितले आहे की, शिक्षक हा सदैव विद्यार्थी असला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या अंगी असणारी नम्रता, शालिनता, निर्मळता शिक्षकांच्या अंगी असेल तर तो शिक्षक विद्यार्थ्यांशी एकरुप होऊ शकतो. विद्यार्थ्यांशी तो शिक्षक समरस होऊ शकतो. विद्यार्थ्यांच्या अंत:करणाला भिडण्याची क्षमता शिक्षकाच्या अंगी असू शकते...

यानंतर श्री. कानडे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले...

विद्यार्थी आणि शिक्षक यांचीच जर सांगड घातली गेली तर शेवटी उत्तम प्रकारे या विद्यार्थ्यांचे प्रबोधन शिक्षणाच्या माध्यमातून हा शिक्षक घडवू शकतो. अशी जर गुरुदेव टागोरांची वाणी असेल आणि त्यादृष्टीने आमचे शिक्षक प्रयत्न करीत असतील तर ही गोष्ट अभिनंदनीय आहे. परंतु याबाबतीत शिक्षक कमी पडताना दिसतात याचा गांभीर्याने विचार आदरणीय शिक्षणमंत्र्यांनी करावा ही आग्रही विनंती मी त्यांना करणार आहे. कारण शेवटी झाड हे आपल्या शक्तीनिशी वाढत असते. एखादा विद्यार्थी हा वाकडया-तिकडया रेघोटया मारतो परंतु भविष्यातील तो चित्रकार असू शकतो. एखादे मूल चिखल आणि मातीशी खेळत राहते कदाचित भविष्यातील ते शिल्पकारही असू शकेल. एखाद्या मुलाला बोबडया बोलातून गायनाची उर्मी निर्माण होत असेल आणि तो भविष्यातील उत्तम गवई किंवा गायक असू शकेल. म्हणून भविष्याच्या गर्भामध्ये काय दडले आहे हे आज सांगता येत नाही. परंतु शिक्षणाचा स्पर्श झाल्यानंतर भविष्याच्या गर्भातील सत्य हे बाहेर आणता येऊ शकते. शिक्षणाच्या स्पर्शानंतर दऱ्याखोऱ्यातील या जिवाला शिक्षण नावाच्या शिवाची भेट घडली तर तादाम्य साधले जाऊ शकते आणि परिणामत: ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सुध्दा खांद्यावर निशाण घेऊन या देशाची शान जगामध्ये फडकविण्याची उर्मी निर्माण होऊ शकते एवढी क्षमता आणि ताकद या शिक्षणामध्ये आहे म्हणून या सगळया विषयाकडे गांभीर्याने माननीय मंत्रीमहोदयांनी आणि शासनाने पहावे अशी मी विनंती करतो. शिवाजी विद्यापीठाच्या दिक्षांत समारंभामध्ये स्वर्गीय यशवंतराव चव्हाण असे म्हणाले होते की, मी पाश्चिमात्य राष्ट्रामध्ये फिरुन आलो आणि त्या भागातील विद्यार्थ्यांचा झालेला विकास त्यांच्या शक्तीचा केलेला उपयोग आणि त्या राष्ट्रांचे नंदनवन पाहिल्यानंतर आम्ही फार कमी पडलो आहोत तेव्हा आमच्या या देशातील शक्तीचा उपयोग आम्ही कधी तरी करणार आहोत कि नाही या गोष्टीचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आता येऊन ठेपली आहे. हा विचार जेव्हा स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेब करतात तेव्हा त्यांचे स्वप्न साकार करण्याची जबाबदारी आणि उत्तरदायित्व त्यांच्यानंतर येणाऱ्या त्यांच्या अनुयायांवर पडते. मला असे वाटते की, उत्तम अनुयायी आमचे शिक्षणमंत्री आहेत त्यांनी ते काम करावे. आता मूल्य शिक्षण हा अतिशय महत्वाचा भाग येथे निर्माण झालेला आहे. मातृ देवो भव, पितृ देवो भव, आचार्य देवो भव शेवटी या सगळया मूल्यांचा विचार करण्याची वेळ येऊन ठेपलेली आहे. मी माझ्या आईवरती प्रेम करतो हे एक मूल्य झाले, मी माझ्या वडिलांवर प्रेम करतो हे एक मूल्य झाले, मी माझ्या

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले...

शेजाऱ्यावर प्रेम करतो हे एक मूल्य झाले, या मूल्यांचा विसर अवतीभवतीच्या परिसरामध्ये आणि विद्यार्थ्यांना पडत चालला आहे की काय म्हणून या राज्यामध्ये वृध्दाश्रमाची गरज पडू लागली हे मूल्य शिक्षण जर मुलांच्या मनावरती रुजविले तर कदाचित या विद्यार्थ्यांना आणि या राज्य शासनाला वृध्दाश्रमाची गरज पडणार नाही याची काळजी शेवटी शासनाने घ्यावी अशी आग्रहाची विनंती मी माननीय मंत्रीमहोदयांना करणार आहे. आता मुंबई,पुणे आणि ठाण्यासारख्या ठिकाणी भीक मागून जगणारी मुले पाहिल्यानंतर आश्चर्य वाटल्याशिवाय रहात नाही. भीकेला प्रवृत्त करणारे आणि त्यांच्या माध्यमातून स्वत:चे जीवन सांभाळणारे आणि चालविणारे जे कोणी असतील त्यांना तुरुंगात डांबण्याची गरज आहे. कारण भीक मागून ती मुले अगदी अनवाणी कुठल्या तरी मोटरसायकलच्या किंवा गाडीच्या काचेभोवती फिरत असतात आणि भीक मागतात. यांचा आपण गांभीर्याने विचार करावा. सर्वांगीण शिक्षण हा जो मुद्दा आहे हा इथे लागू पडतो. त्यामुळे या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि ते शिक्षण जर तेथपर्यंत झिरपत गेले तर मला असे वाटते की, माणुसकीचा धर्म जागा करणारे शिक्षण हे आम्ही देत आहोत. लोकांच्या गरजांचे प्रतिबिंब या शिक्षणामध्ये पडावे ही एक अपेक्षा आहे, इच्छा आहे आणि आकांक्षा आहे ती पूर्ण करण्याच्या दृष्टीने आपण निश्चित प्रयत्न कराल अशी आशा सुध्दा आहे. अंत:स्थ प्रेरणांना जागे करणारे शिक्षण हे या विद्यार्थी दशेमध्ये देण्याची गरज आहे. जशी बागेमध्ये फुले फुलत रहावीत तसे शाळेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या झोक्यावर झुलत रहावे आणि आम्ही उघडया डोळयांनी ते पहावे आणि शिक्षणमंत्र्यांच्या डोळयातून सुध्दा आनंदाचे अश्रू यावेत आणि ते पुसण्यासाठी आम्ही सदैव सज्ज असावे कारण हे महाराष्ट्रामध्ये घडते आहे हे आमच्या राज्यकर्त्यांच्या उदार धोरणांचा परिणाम आहे म्हणून हे सगळे होत आहे हे सुध्दा पाहता आले पाहिजे.

नंतर श्री. भोगले

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले.....

आता आई वडिलांचे दुर्लक्ष विद्यार्थ्यांकडे होते. गिरीकंदरामध्ये, आदिवासी भागामध्ये राहणारा विद्यार्थी, त्याच्याकडे दुर्लक्ष होते. घरात अठरा विश्वे दारिद्र्य असल्यामुळे या मुलांकडे लक्ष द्यायला आई वडिलांना वेळ नाही. परिणामी मुले काय खातात, कुठे जेवतात या विवंचनेमध्ये आई वडील नसल्यामुळे पोटाची खळगी भरण्यासाठी अहोरात्र कष्ट करणे हा एकमेव उद्योग त्यांच्यासमोर असतो. त्यामुळे आई वडिलांचे त्यांच्याकडे दुर्लक्ष होत असेल तर आमच्या शिक्षण खात्याने याकडे लक्ष द्यावे अशी आग्रहाची मी विनंती करणार आहे. अंधार फार झाला, पणती जपून ठेवा, शोधात कस्तुरीच्या आहेत पारधी....पारधी म्हणणार नाही त्याऐवजी शिकारी म्हणतो. हरणे जपून ठेवा. तेव्हा या हरणांचा सांभाळ करण्याची जबाबदारी माननीय शिक्षणमंत्र्यांवर आलेली आहे. ती त्यांनी उत्तमप्रकारे पार पाडावी अशी आग्रहाची विनंती करतो. संत वचनांचा अंतर्भाव आपण शिक्षणामध्ये केला पाहिजे. धर्मनिरपेक्ष तत्वावर आधारित संत वचने आहेत. जी या राष्ट्राची उन्नती घडविण्यासाठी उपयुक्त आहेत. त्या संत वचनांचा अंतर्भाव शिक्षणामध्ये केला तर निश्चितपणे त्याचाही उपयोग होऊ शकतो. या लहान मुलांचा बुध्यांक, आकलन शक्ती जास्त असते. 100 टक्के ग्रहण करण्याची शक्ती त्यांच्यात असल्यामुळे पूर्णवेळ शाळेत अडकवून ठेवणे चुकीचे ठरेल. गुरांढोरांना ज्याप्रमाणे कोंडवाड्यात ठेवतो तशाप्रकारे विद्यार्थ्यांना सकाळपासून संध्याकाळपर्यंत शाळेत डांबून ठेवणार असू तर त्यांचा शारीरिक विकास होणार नाही. त्यांना हिंडू द्या, त्यांना बागडू द्या, त्यांना खेळून थकू द्यावं. ज्याप्रमाणे एखादी उदबत्ती पेटल्यानंतर सुगंध दरवळतो, तसे विद्यार्थी शारिरीकदृष्टया सशक्त ठरले तर त्यांचे मन खंबीर राहू शकेल. संतांनी सांगितले आहे की, "कोण पुसे अशक्तला, रोगी बराडीसे दिसे, कळा नाही, कांती नाही, युक्ती बुध्दी दुरावली." ज्यांचे शरीर उत्तम नाही तो काहीही करु शकत नाही. कुरुक्षेत्रावर भगवद्गीता सांगणारा श्रीकृष्ण बलवान होता, कणखर होता. म्हणूनच त्याला ते शक्य झाले. या ठरावाचा विचार केला तर मला वाटते, या विद्यार्थ्यांच्या एकाग्रतेला प्रोत्साहन देण्यासाठी शिक्षण विभागाने विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे. त्यासाठी अनुभवी शिक्षक तेथे असणे आवश्यक आहे. हे शिक्षक शिकवतात की मुले शिकवितात असा प्रश्न विद्यार्थ्यांच्या मनामध्ये निर्माण झाला तर यात चुकीचे काय आहे? लहान मुले विद्यार्थ्यांसमोर शिकवित असतात, त्यांना कळत नाही, त्यांना माहिती आहे की, शिकविणारा विद्यार्थी आहे. त्यामुळे हे समीकरण बदलण्यासाठी जो प्रौढ आहे,

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले.....

उच्च पदवी संपादन केली आहे असे प्रशिक्षणार्थी त्यांच्या अनुभवाने या सगळ्या विद्यार्थ्यांसमोर गेले तर त्यांचे मानसशास्त्र या शिक्षकांना कळेल. ते आपल्या अनुभवाचे गाठोडे या मुलांसमोर रिते करतील. परिणामी मुलांच्या बुध्दीचा विकास होईल आणि शिक्षण त्यांच्यापर्यंत झिरपेल. पूर्वी शिक्षकांबद्दल आदर होता. समोरुन एखादा शिक्षक आला आणि मुलांनी पाहिले तर मुले दुर्लक्ष करायची किंवा पाठमोरे होऊन मागे निघून जायची. आता समोरुन शिक्षक आला तर त्याला शेकहॅण्ड करण्याची त्यांची तयारी असते. नंतर हॉटेलमध्ये बोलू, त्यानंतर टपरीवर थांबू हा जो शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये सुखाचा संवाद चालतो, हा संवाद का चालतो याचा विचार शिक्षकांनी करण्याची गरज आहे. पूर्वी आणि आता साम्य एकच आहे. आमच्या काळात छडीचा उपयोग फार मोठया प्रमाणात केला जायचा. आता छडीचा उपयोग नाही आणि हाताचाही उपयोग नाही. दोन्हीही गोष्टी दृष्टीसमोर ठेवून धोरण पुढे आले. ते धोरण म्हणजे पूर्वी छडीवर ग्रँट नव्हती. आताही ग्रँट नाही. एक पाहिले तर शिक्षकांबाबत गांभीर्याने विचार करावा तेवढा थोडाच आहे. शिक्षण संस्थांमध्ये काम करणारा शिक्षक, त्याची अवस्था अतिशय वाईट आहे. निवडणुकीच्या काळात आपल्या नेत्याची सगळी प्रचाराची धुरा शिक्षकांना सांभाळावी लागते. त्यावर बंधन आणता आले तर जरुर आणले पाहिजे. लोकशाहीमध्ये आज कारण नसताना जे काम शिक्षकांना करावे लागते यासारखा त्यांच्यावर दुसरा अन्याय नाही. याच्याही पलिकडे शिक्षक त्यांच्या पतसंस्थांच्या निवडणुकांमध्ये सहभागी होतात. ज्या प्रचारतंत्राचा अवलंब करतात. त्यावेळी हे शिक्षक आहेत का? असा प्रश्न पडल्याशिवाय राहणार नाही.

(नंतर श्री.खर्चे....

अशुद्धीरित प्रत / शोधनासाठी नाही

प्रा. सुरेश नवले .....

त्यामुळे शिक्षकांच्या विषयी आचारसंहिता निर्माण करीत असतांना ही शुध्द आचारसंहिता आचार, विचार आणि उच्चार ही संस्कृती शिक्षकांच्या जीवनात असावी यासाठी शिक्षण खात्याने प्रयत्न करावेत, त्यासाठी प्रयत्नशील असावे आणि शेवटी घर नवीन बांधले पाहिजे....माननीय शिक्षण मंत्र्यांना अभंग व कविता यामध्ये अतिशय रस आहे. शेवटी त्या संत वचनांचा अंतर्भाव त्यांच्या जिव्हाग्रावरती असल्यामुळे "घर नव्याने बांधले पाहिजे, जुनी जळमटे जाळली पाहिजे" यादृष्टीने आपण प्रयत्नशील रहावे एवढी आग्रहाची विनंती करतो आणि मी आपली रजा घेतो.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी यांनी जो प्रस्ताव या ठिकाणी आणलेला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, या विषयावर सभागृहात खूप गांभीर्याने चर्चा झालेली आहे. अनेकांनी आपली मते मांडली आहेत, आपले अनुभव सांगितलेले आहेत. हे सर्व सांगत असतांना काही जण शिक्षकांच्या विरोधात बोलले, शिक्षकांच्या चुका दाखविण्याचा प्रयत्न केला, प्रशासनाच्या चुका दाखविण्याचा प्रयत्न या ठिकाणी झाला त्याचप्रमाणे अधिकाऱ्यांच्याही चुका दाखविण्याचा प्रयत्न झाला आणि कोण किती कमी पडतो, कोणाच्या कामामध्ये कशा कशा त्रुटी आहेत यासंदर्भात विवेचन देखील या ठिकाणी झाला. या सगळया चर्चेतून मला असे वाटते की, आपल्याला कोणालाही दोष देऊन शिक्षा करावयाची नाही पण या चांगल्याचर्चेतून शासनाला किती बोध घेता येईल काय आणि या शिक्षण क्षेत्रात नाविण्यपूर्ण किंवा क्रांतिकारी निर्णय घेता येईल काय यादृष्टीने ही चर्चा अत्यंत महत्वपूर्ण आणि उपयोगी ठरणार आहे.

सभापती महोदय, एका गोष्टीचा मी येथे जाणीवपूर्वक उल्लेख करणार आहे. माननीय शिक्षण मंत्र्यांच्या प्रती मी जाणीवपूर्वक आदर व्यक्त करतो. काहीही असो पण त्यांच्या मनात खऱ्या अर्थाने तळमळ आहे. जरी त्यांनी शिक्षकांना चोपले, शिक्षकांवर आसूड ओढले, शिक्षकांना दोषी धरले, शिक्षक मोटरसायकलीवरुन फिरतात, एलआयसीच्या पॉलिसीज काढतात, इरसाल नमुने कसे कसे भेटले अशा प्रकारे सगळे वर्णन शिक्षकांच्या बाबतीत केले. एवढे असून सुध्दा मी त्यांना दोष देणार नाही, कारण खऱ्या अर्थाने माननीय शिक्षमंत्र्यांना मनापासून तळमळ आहे. या महाराष्ट्रात गोरगरिबांच्या मुलांना शिक्षण मिळावे, जे शिक्षणापासून वंचित आहेत त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणावे आणि हे देण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, अधिकारी, प्रशासन अथवा शिक्षक असतील यासर्वांनी आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडावी असा त्या पाठीमागे माननीय शिक्षण मंत्र्यांचा उद्देश आहे, म्हणून खऱ्या अर्थाने मी त्यांचे मनापासून कौतुक करतो.

महोदय, डी.एड. झालेल्या शिक्षकांना पूर्वी अन्य क्षेत्रात नोकरी मिळत नव्हती म्हणून ते शिक्षकी पेशाकडे वळतात असे माननीय मंत्री महोदयांचे म्हणणे असले तरी तशी परिस्थिती आता नसून आता जी स्ट्रीम आहे, बारावी झाल्यानंतर या मुलांना 72, 75 अथवा 80 टक्के मार्क्स

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते.....

देखील डी.एड. साठी प्रवेश मिळत नाही. एवढे मार्क मिळवून देखील बारावी झालेल्या मुलांचा डी.एड. साठी नंबर लागत नाही. वास्तविक एवढे मार्क्स मिळविल्यानंतर डी.एड. मध्ये प्रवेश घेणाऱ्या मुलांना हे माहीत असते की, बारावीनंतर डी.एड. झाल्यानंतर अन्य कुठल्याही क्षेत्रात जाण्याची संधी नाही. खऱ्या अर्थाने करियर करण्याच्या दृष्टीनेच ते डी.एड. करण्याचा प्रयत्न करतात. पण आज या डी.एड. च्या संदर्भात, शिक्षकांच्या संदर्भात, शिक्षणाच्या संदर्भात, डी.एड. च्या प्रवेशाच्या संदर्भात डी.एड. झालेल्या विद्यार्थ्यांच्या, प्रशिक्षणार्थींच्या संदर्भात एक प्रकारचा वाद निर्माण झालेला आहे व यातून खऱ्या अर्थाने मार्ग काढण्याची गरज आहे. जसे इतर कोर्सेसच्या संदर्भात तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी सीईटी असते तशी सीईटी डी.एड. साठी सुध्दा सीईटी करता येईल काय याचाही गांभीर्याने विचार करुन धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. जुन्या पध्दतीतून डी.एड. झालेले आणि आदिवासी योजना लागू केल्यानंतर झालेले डी.एड. यांच्यामध्ये वाद निर्माण झालेला आहे. मग लोकप्रतिनिधी, सभागृह अथवा अन्य पदाधिकारी असोत यांच्या माध्यमातून जुन्या डी.एड. धारकांच्या बाजूने तसेच नवीन एखाद्या विषयाच्या संदर्भात एखादा सुवर्ण मध्य काढता येईल काय आणि या दोघांनाही न्याय देण्याच्या दृष्टीने आपल्याला विचार करता येईल काय, याचाही विचार होण्याची गरज आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .....

गुणवत्ता वाढवणे हे जरी शिक्षकांवर अवलंबून असले तरी ख-या अर्थाने इन्फ्रास्ट्रक्चर वाढविण्याची नितांत आवश्यकता आहे. मग शाळेमधील शिक्षकांची संख्या वाढवणे, वर्ग खोल्या वाढवणे, अर्थसंकल्पात शिक्षणावर आज 2.14 टक्के तरतूद आहे ती तरतूद वाढवण्याची आवश्यकता आहे, ख-या अर्थाने शिक्षणावर 6 ते 7 टक्के तरतूद होण्याची आवश्यकता आहे. शिक्षण विभाग वेगवेगळ्या प्रकारच्या 30 योजना राबवत आहे परंतु या योजना ख-या अर्थाने राबवल्या जात आहेत काय याचेही पुनर्विलोकन करण्याची आवश्यकता आहे. या ठरावाच्या निमित्ताने शालांत केंद्रातील कॉपी प्रकरण असेल, केंद्रावर होणारे अजून काही गैरप्रकार असेल, एचएससी किंवा एसएससी परीक्षेत घडलेले काही गैर प्रकार असतील. बनावट उत्तर प्रक्रियेचे प्रकरण या सभागृहात चर्चेला आलेले आहे. मी माननीय मंत्रीमहोदयांना विनंती करणार आहे की, परीक्षेच्या संदर्भात, परीक्षा कंडक्ट करण्याच्या संदर्भात, परीक्षा पध्दतीच्या संदर्भात कॉपीचा जो प्रकार आहे तो अत्यंत निदंनीय आहे. यामध्ये कोण दोषी आहे, यामध्ये संस्था चालक दोषी आहे काय, अधिकारी दोषी आहे काय, केंद्र संचालक दोषी आहे काय, शिक्षक दोषी आहे काय यासंदर्भात खोलवर जाऊन दोषी व्यक्तींची चौकशी होण्याची आवश्यकता आहे असे जर झाले तर हे प्रकार आपल्याला भविष्यात टाळता येतील.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये कायम विना अनुदानित धोरणाचा कंलक लागलेला आहे तो ख-या अर्थाने दूर होण्याची आवश्यकता आहे. मी ग्रामीण भागातील जिल्हापरिषदेच्या शाळेत शिक्षण घेतलेला आमदार आहे. ज्याचे जळते त्याचे कळते. शिक्षणाच्या संदर्भात अन्य सदस्यांनी आपल्या भावना जरी व्यक्त केल्या असल्या तरी महाराष्ट्रासारख्या राज्यामध्ये ज्या ठिकाणी बहुसंख्य मुले जिल्हा परिषदेच्या किंवा खाजगी शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत अशा शाळांना कायम विना अनुदानित धोरण राबवणे योग्य नाही. आपण दोन वर्षे शाळा दिलेल्या नाहीत. कोणत्याही विद्यार्थ्याला शाळेत प्रवेश मिळाला नाही असे आपल्याला एक तरी उदाहरण माहिती आहे काय? आपल्याला या राज्यात धोरणात्मक निर्णय घ्यावा लागणार आहे. या राज्याचे माजी सन्माननीय शिक्षण मंत्री श्री. मधुकरराव चौधरी साहेबांनी शिक्षणाच्या संदर्भात क्रांतिकारक निर्णय घेतले होते. त्यामुळे माझी माननीय शिक्षण मंत्र्यांना विनंती आहे की, आपणही शिक्षणाच्या संदर्भात गांभीर्याने

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .....

विचार करुन चांगले क्रातिकारक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. कायम विना अनुदानित तत्व आपल्या राज्यात टिकू शकणार नाही त्यामुळे या धोरणाचा माननीय मंत्रीमहोदयांनी फेरविचार करण्याची आवश्यकता आहे. या राज्यामध्ये एका शाळेतील शिक्षक पुरणपोळी खात आहे तर दुस-या शाळेतील शिक्षक उपाशीपोटी काम करीत आहे अशी कायम विना अनुदानित शाळांची अवस्था आहे. या शाळा कशा चालणार, शाळेतील शिक्षकांना पगार कसे मिळणार, इन्फ्रास्ट्रक्चर कसे उभे करणार आणि त्यातल्यात्यात माझा बोलण्याचा रोख हा मराठी माध्यमांच्या शाळांच्या संदर्भात आहे. ज्यांच्याकडे पैसे आहेत त्यांची मुले इंग्रजी शाळेत शिकतील. परंतु मराठी माध्यमांच्या शाळा कायम विना अनुदानित तत्वावर चालू शकणार नाहीत. सन्माननीय मंत्रीमहोदयांच्या देखील काही शाळा आहेत. आपल्या शाळेतील शिक्षकांना पूर्ण पगार दिला जातो आहे काय? सन्माननीय सदस्य श्री. वसंत पवार साहेब हे एका मोठया शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आहेत. माझ्या भावाचा मुलगा त्यांच्या शाळेत शिक्षक म्हणून काम करीत होता. आठ वर्षात ते दोन हजार रुपयांपेक्षा जास्त पगार देऊ शकले नाहीत. कायम विनाअनुदानित शाळेत संस्थाचालक पगार देऊ शकत नाही. जर या शाळा वर्षानुवर्षे काय विनाअनुदानित राहिल्या तर आपल्या बरोबर काम करणा-या, अनुदानित शाळेतील शिक्षकांनी उपाशीपोटी राहायचे का? आज या शिक्षकांचे संसार उद्ध्वस्त होत आहेत. त्यामुळे कायम विना अनुदानित धोरणाच्या संदर्भात पुन्हा विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, जसे शिक्षणावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे तसेच स्पोर्टस्कडे सुध्दा लक्ष देण्याची आवश्यकता आहे. मला एक बातमी वाचावयास मिळाली आहे की, माननीय शिक्षण मंत्र्यांच्या अपरोक्ष माननीय पुरके साहेबांची परस्पर सही करुन मागील वर्षी 34 लक्ष आणि या वर्षी 18 लक्ष रुपये काढलेले आहेत त्यामुळे असे प्रकार घडले असतील तर अशा प्रकारांची गाभीर्यपूर्वक नोंद घेण्याची आवश्यकता आहे. आदिवासी उपयोजनेतील शाळांच्या बाबतीत धोरणात्मक निर्णय झालेला आहे. अनेकवेळा माननीय मंत्रीमहोदयांनी सभागृहात उत्तर दिलेले आहे की, अशा प्रकारच्या शाळाच नाही. परंतु ठाणे जिल्हयातील अनेक शाळांना 6-6,-7 वर्षे झालेली आहेत 99 टक्के विद्यार्थी, 96 टक्के विद्यार्थी आदिवासी हायस्कूल वळवंडा तालुका जव्हार, बालक मंदिर संस्था शिरगाव बालक मंदिर विद्यालय येथे 154 पैकी 106 मुले आदिवासी आहेत.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. एका शाळेत तर 98 टक्के विद्यार्थी आदिवासी आहेत. त्या शाळेचा निकाल 85 टक्के वा 96 टक्के लागतो.या शाळेला आठ वर्षे होऊनही अनुदान मिळत नसेल तर ती गंभीर बाब आहे या संदर्भात आदिवासी भागातील शाळांना पाच वर्षा नंतर अनुदान देण्यात येईल अशा प्रकारे शासनाने धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे.त्या धोरणाची अंमलबजावणी शासनाने करावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा या ठिकाणी मांडावयाचा आहे. रोजगार हमी योजनेसाठी सर्व शिक्षकांकडून व्यवसाय कर गोळा करण्यात येत असून आता रोजगार हमी योजनेसाठी या व्यवसाय करातून पैसे घेण्याचे बंद करण्यात आलेले आहे. तेव्हा शिक्षण क्षेत्रात काम करणा-या कर्मचा-यांकडून जो व्यवसाय कर गोळा करण्यात येणार आहे तो व्यवसाय कर विना अनुदान तत्वावरील शाळांसाठी वर्ग करता येईल काय व त्या कामासाठी या निधीचा वापर करता येईल काय याचा शासनाने विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, मद्यावरील कर वाढविण्यात आला होता तो कमी करण्यासबंधी शिफारस करण्यात आली असल्याची बातमी मध्यंतरी मी वर्तमानपत्रातून वाचली होती मला असे सांगावयाचे आहे की, हा कर कमी करता कामा नये. उलट हा कर वाढविण्यात आला पाहिजे. मद्य प्राशन कोण करतो ?. ज्याच्याकडे भरपूर पैसे आहेत तेच लोक मद्य प्राशन करीत असतात. त्यांच्याकडून दोन रुपया ऐवजी चार रुपये कर वसूल करण्यात यावा आणि हा कर विना अनुदानाकडे वळविण्यात यावा असे मला सांगावयाचे आहे

सभापती महोदय, आपण सर्वांना मोफत शिक्षण दिलेले आहे. दहावी पर्यंत सर्व विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण दिले आहे. त्याचबरोबर बारावी पर्यंत मुलीना मोफत शिक्षण दिलेले आहे . त्यामुळे ज्यांच्याकडे खरोखर पैसे नाहीत, जे खरोखर गरीब आहेत त्यांच्या मुलांना मोफत शिक्षण देण्याची नितांत गरज आहे तसेच, त्याना अन्य सुविधा देण्याची गरज आहे. परतु जे काही प्रमाणात पैसे भरु शकतात, जे अफॉर्ड करु शकतात त्यांच्या बाबतीत मोफत शिक्षण द्यावयाचे किंवा नाही याचा फेर विचार करण्याची गरज आहे. तेव्हा याबाबत फेर विचार करण्यात यावा असे मला सांगावयाचे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, यानंतर मला व्यावसायिक शिक्षणाबद्दल बोलावयाचे आहे. व्यावसायिक शिक्षणाकडे लक्ष देणे गरजेचे आहे . त्याचप्रमाणे आदिवासी विभागाच्या शाळा, सामाजिक न्याय विभागाच्या शाळा, तंत्र शिक्षण विभागाच्या शाळा, शालेय शिक्षण विभागाच्या आणि ग्राम विकास विभागाच्या शाळा या राज्यात चालविण्यात येतात. प्रत्येक विभागाची ध्येय धोरणे वेगळी आहेत, प्रत्येकाचे नियंत्रण वेगळे आहे, प्रत्येकाचे निर्णय वेगवेगळे आहेत तेव्हा सर्व विभागाच्या शाळा एकाच छत्राखाली आणता येतील काय याचादेखील विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, ग्रामीण भागातील शाळांमध्ये संगणक देण्यात आलेले आहेत. 29 मार्चला त्या संबंधीचा जी.आर. काढलेला असून ज्या शाळांना आपण संगणक देणार आहात त्यात प्रामुख्याने ग्रामीण भागातील शाळाना संगणक देण्याच्या दृष्टीने विचार करण्यात यावा असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, विद्यार्थ्यांच्या होणा-या आत्महत्या हा अत्यंत गंभीर आणि चिंतेचा विषय आहे.आज विद्यार्थी आत्महत्या का करीत आहे ? त्यांच्यावर टेन्शन व प्रेशर आहे तसेच अभ्यासाचा ताण आहे.त्यामुळे त्यांची आज मानसिकता बदलली आहे तेव्हा या बाबतीत त्यांचे कौन्सिलीग होण्याची गरज आहे.प्रत्येक शाळा शाळामध्ये विद्यार्थ्यांचे कौन्सिलीग करण्याची सोय करता येईल काय याचा विचार करण्यात आला पाहिजे.

(वेळ संपल्याची घंटी

वाजविण्यात आली)

सभापती महोदय, एक मिनिटात मी माझे भाषण संपवितो.या ठिकाणी खाजगी शाळेतील कर्मचा-यांची सेवा शर्ती नियमावलीमध्ये बदल करणारा ड्राफट तयार करण्यात आला आहे. आज मी श्री.ज.मो.अभ्यंकर यांचे स्टेटमेन्ट वर्तमानपत्रातून वाचले आहे त्यांनी असे सांगितले की अशा प्रकारे नियमावलीमध्ये बदल करणारा ड्राफट तयार करण्यात आला होता परंतु त्यात आणखी बदल करण्यात आलेले आहेत . तेव्हा या नियमावलीमध्ये नक्की कोणता बदल करण्यात येणार आहे या संदर्भात सभागृहात सांगण्यात आले पाहिजे. त्यासाठी हा विषय या ठिकाणी आणून त्यावर सविस्तर चर्चा करावी, शिक्षक प्रतिनिधींना विश्वासात घ्यावे असे मला सांगावयाचे आहे. अन्यथा बहुमताच्या जोरावर शासन ही नियमावली मंजूर करुन घेईलच. परतु त्या संदर्भात आमचे काय म्हणणे आहे हे तरी ऐकून घ्यावे अशी माझी शासनला विनंती करावयाची आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

सभापती महोदय, यानंतर मी शेवटचा एक मुद्दा मांडणार आहे. या नियमावलीमध्ये खूप गंभीर स्वरुपाची कलमे घालण्यात आलेली आहेत. शिक्षकांना वेठबिगार करणारी कलमे 1981 च्या सुधारित नियमावलीमध्ये आहेत. आरक्षणाच्या तरतुदीमध्ये गेल्या 26 वर्षात कोणताही बदल करण्यात आला नाही आज देखील 34 टक्केच आरक्षण आहे तेव्हा हा बदल करण्यात येणार आहे किंवा नाही.? संगणक साक्षरतेच्या दृष्टीने या नियमावलीत बदल होण्याची आवश्यकता होती शिक्षण संक्रमण नावाचे मासिक प्रत्येक शिक्षकाकडे जाण्याची आवश्ययकता होती.जीवन विकास मासिक प्रत्येक शिक्षकाकडे जाण्याची आवश्यकता होती.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी भाषण संपवावे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय मी अर्ध्या मिनिटामध्ये माझे भाषण संपवितो.

सभापती : यापूर्वी देखील थोडक्यात भाषण संपवितो असे आपण म्हटले होते

श्री.रामनाथ मोते : शिक्षकांमध्ये वाचनाची गोडी निर्माण होण्यासाठी व शिक्षकांनी अभ्यास करण्यासाठी त्यांना काही मासिके दिली गेली पाहिजेत या संदर्भात नवीन नियमावलीमध्ये कलमे टाकावयास पाहिजेत. व ती बंधनकारक केली पाहिजेत आणि ख-या अर्थाने शिक्षकांचे मूल्यमापन केले पाहिजे. जे चांगले आहे त्याला चांगले म्हटले पाहिजे त्याचप्रमाणे शिक्षकामध्ये काही दोष असतील वा त्रृटी असतील तर त्याही आम्हाला सांगण्यात आल्या पाहिजेत. परंतु त्या वेगळया पध्दतीने आम्हाला सांगितल्या पाहिजेत केवळ धोपटावयाचे म्हणून केवळ शिक्षकांनाच न धोपटता अन्य काही घटकही त्याला जबाबदार आहेत त्याचा विचार व्हावयाला पाहिजे. वेळे अभावी मला संगळेच मुद्दे याठिकाणी मांडता आलेले नाहीत परंतु आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपल्याला धन्यवाद देऊन मी माझे भाषण संपवितो.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

नंतर श्री.सुंबरे

श्री. मुझफ्फर हुसेन (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सदनामध्ये नियम 260 अन्वये 'शिक्षण' या विषयावर अडीच तासांची सर्वंकष चर्चा उपस्थित झालेली आहे. परंतु या विषयावर चर्चेसाठी अडीच तास ही फार कमी वेळ आहे. तरीही या ठिकाणी चर्चेला सुरूवात झाली आणि त्या चर्चेमध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेऊन आपापली मते थोडक्यात मांडली आहेत. सभापती महोदय, या शिक्षणाच्या संदर्भात बोलावयाचे तर कन्फ्यूजन, कमोशन, नॉन-परफॉर्मन्स प्रिव्हेल्स इन एज्युकेशन असे म्हटले तर ते गैर ठरणार नाही. अशा परिस्थितीत रोज जीआर काढणे, रोज अध्यादेश काढणे, कोणाची बदली करणे, कोणाला निलंबित करणे, कोणाला परवानगी द्यायची, कोणाला ती नाकारायची, कोणाला काही ठराविक काळासाठी परवानगी द्यायची, ग्रँट किती द्यायची एवढ्या पुरतेच या विभागामध्ये काम होत राहिले आहे, निर्णय होत राहिले आहेत. असे केल्यावर शिक्षणाच्या बाबतीत आपल्याला पाहिजे तसे रिझल्टस् केव्हाही मिळू शकत नाहीत हे उघड सत्य आहे. सभापती महोदय, कोणत्याही देशाच्या प्रगतीमध्ये तेथील शिक्षण हा त्या देशाचा पाया असतो. खरे म्हणजे कोणत्याही देशाचा जीडीपी किती आहे यापेक्षाही त्या देशामध्ये साक्षरतेचे प्रमाण किती आहे त्यावर तेथील प्रगती अवलंबून असते. योगायोगाने सोशॅलिझम, कम्युनिझमच्या माध्यमातून आपण आता कॅपिटलिझमकडे चालावयास लागलो आहोत. त्यामुळे अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी अमेरिका, युरोप, जपान, चीन इत्यादी देशांची उदाहरणे येथे दिली. खरे म्हणजे या भारत वर्षामध्ये आर्य आले तेव्हा जगात सर्वात जास्त शिक्षण हे आपल्याच देशामध्ये होते. सनातन धर्म, द्रविडस् हे तेव्हा येथे होते. त्यावेळी आर्यनस्ना वाटले की, आम्ही शिक्षणामध्ये खूप मागे आहोत. परंतु त्या काळात गुरूकुल पद्धतीतून वेगवेगळ्या प्रकारे या देशात शिक्षण दिले जात होते. परंतु आज येथे अमेरिकेचे उदाहरण दिले जाते आणि तेथील शिक्षणपद्धती या देशात आणली गेली. सर्व उच्च व तंत्र शिक्षण देखील अमेरिकन धर्तीवर येथे आणले आहे. परंतु अमेरिकेमध्ये आज 27 टक्के लोक असले तरी त्यातील मूळ रेड इंडियन्स होते आणि बाकीचे सगळे इतर देशातील स्थलांतरित होऊन राहिलेले आहेत. त्यांना त्यावेळी कोणत्याही प्रकारचे शिक्षण नव्हते. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनीची देखील तीच परिस्थिती होती. परंतु या सगळ्यांनी जीडीपीच्या माध्यमातून आपली प्रगती केली नाही तर शिक्षणाच्या बाबतीत देखील त्यांनी प्रगती केली. योगायोगाने स्वातंत्र्यानंतर आपण शिक्षणाच्या बाबतीत खूप चांगले निर्णय घेतले. या

..... 4एफ 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन .....

देशातील प्रत्येक नागरिक, प्रत्येक मूल शिक्षित झाले पाहिजे असा निर्णय आपण घेतला. त्यासाठी सर्व जबाबदारी शासनाने स्वीकारली. परंतु मागील 25 वर्षामध्ये आपण कोठे तरी भरकटलो, मार्ग चुकलो. नॉन अकौंटिबिलीटी, परफॉर्मन्स इत्यादीच्या बाबतीत आपण तातडीने आणि ताकदीने निर्णय घेऊ शकलो नाही. सभापती महोदय, या सदनातील असे अनेक सदस्य आहेत की जे शिक्षण क्षेत्रात मोठ्या स्थानावर आहेत, पण तरीही शिक्षणाच्या बाबतीत अकौंटिबिलिटी आणली जात नाही, ती आणण्याची आवश्यकता आहे. म्हणूनच 'शिक्षण' या विषयावर चर्चा करण्यासाठी अडीच तासांची वेळ ही फार अपुरी आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही. मी तर असे म्हणेन की, या राज्याचे एकूणच शिक्षणाच्या बाबतीत धोरण ठरविण्यासाठी एक विशेष अधिवेशन बोलाविले गेले पाहिजे. राज्यातील पुढील 25 वर्षात प्राथमिक शिक्षण कोणत्या दर्जाचे असेल, त्यात राज्य शासनाची भूमिका काय राहणार आहे, लोकप्रतिनिधींची भूमिका काय राहणार आहे यावर चर्चा होऊन निश्चित असे धोरण ठरविले गेले पाहिजे. अन्यथा अडीच तासांची चर्चा, लक्षवेधी सूचना, तारांकित प्रश्न इत्यादी द्वारा चर्चा या होतच राहतील आणि यातून कोणताही समाज, कोणताही देश वा राज्य प्रगती गाठू शकणार नाही. आज ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षण पाहिले तर गळतीचे प्रमाण 60-70 टक्के आहे, याला कोण जबाबदार आहे ? शासनाचे मागील पाच वर्षांचे अर्थसंकल्प पाहिले तर शिक्षणासाठी कधी 14 टक्के, कधी 12 टक्के, कधी 13 टक्के बजेट दिलेले आहे. याला कोण जबाबदार आहे ? जिल्हा परिषदा, नगर परिषदा, महानगरपालिका कोट्यवधी रूपये शिक्षणासाठी खर्च करीत असतात पण त्या ठिकाणी देखील पाहिजे तसे शिक्षण दिले जात नाही, याला जबाबदार कोण आहे ?

(यानंतर सौ. रणदिवे ..... 4जी 1 ..

अशुद्धारित प्रत / अशुद्धरित्रांसाठी नाही

श्री.मुजफ्फर हुसेन . . . .

याला शासन जबाबदार आहे ? शिक्षक जबाबदार आहेत ? लोकप्रतिनिधी जबाबदार आहेत ? ही जबाबदारी ठरविली पाहिजे, अकाऊंटॅबिलीटी ठरविली पाहिजे. शिक्षकांच्या परफॉर्मन्स वरुन अकाऊंटॅबिलीटी ठरली पाहिजे आणि जोपर्यंत हे ठरविण्याची ताकद आपल्यामध्ये आणत नाही, पॉलिसी आणत नाही, याबाबतीत निर्णय घेत नाही, तोपर्यंत आपण शिक्षणाचा दर्जा सुधारु शकणार नाही.

सभापती महोदय, हा विषय पाच मिनिटांमध्ये मांडण्यासारखा नाही. शेवटी मी एकच उदाहरण देऊ इच्छितो की, इस्लाम धर्मामध्ये प्रोफेट महम्मद यांनी 1500 वर्षापूर्वी सांगितले होते की, तुम्हाला शिक्षणासाठी चायनाला जावे लागले तरी जा. तेथे जाऊन शिक्षण मिळवा. पण योगायोगाने यामध्ये नॉन को-ऑर्डीनेशन असल्यामुळे काय घडते ? तर शिवाजी युनिव्हर्सिटी, कोल्हापूर येथे एम.ए. इंग्रजी च्या पेपरात ब्रिटिश साहित्यिक Thomas Carlyle यांनी प्रोफेटच्या बद्दल अपमानास्पद शब्द वापरले आहेत. ज्या व्यक्तीने, ज्या प्रोफेटनी एका समाजाला 1500 वर्षापूर्वी सांगितले की, तुम्हाला शिक्षणासाठी तीन हजार कि.मी.अंतरावर असलेल्या चायनामध्ये जावयाचे असेल तर जावे, म्हणजे त्यांच्या बोलण्याचा अर्थ असा होता की, तुम्हाला शिक्षणासाठी काहीही करावे लागले तरी ते करा. अशा प्रोफेटच्या बाबतीत अपमानास्पद शब्द वापरणे आणि त्याबद्दल शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्यांनी किंवा शासनाने नोंद न घेणे हे चूक आहे. अशी हजारो उदाहरणे आपल्याकडे घडत आहेत. प्रत्येक समाजामध्ये घडत आहे, पण त्याबाबतीत कोणत्याही प्रकारची अंमलबजावणी होत नाही. सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी देखील सांगितले की, माननीय मंत्री महोदयांनी आदेश देऊन सहा महिने, आठ महिने झाले तरी सुध्दा त्याची अंमलबजावणी झालेली नाही ही दु:खाची बाब आहे. म्हणून माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, त्यांनी शिक्षण या विषयाच्या संबंधातील प्रश्नांबाबत चर्चा करण्यासाठी विशेश अधिवेशन बोलाविण्याची हिंमत दाखवावी आणि महाराष्ट्र राज्याच्या प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत, उच्च तंत्रशिक्षणाच्या बाबतीत पुढील 25 वर्षासाठी एक पॉलिसी डिसीजन घ्यावा. एवढेच मला यानिमित्ताने सांगावयाचे आहे. धन्यवाद.

. . . .4 जी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी याठिकाणी शिक्षणासारख्या महत्वाच्या विषयाबाबत माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्राची भावी पिढी कशी असावी ? किती शिक्षण घेतली असावी ? कशी घडलेली असावी ? या अनुषंगाने सदनामध्ये शिक्षणाच्या संदर्भातील प्रस्तावाबाबत चर्चा सुरु आहे. वास्तविक पाहता महाराष्ट्रातील भावी पिढी घडविणाच्या दृष्टीने महत्वाच्या असणाऱ्या विषयाला महाराष्ट्र शासन प्राधान्य देण्यास तयार नाही असे मला खेदाने नमूद करावेसे वाटते. महाराष्ट्र शासन राज्याच्या एकूण उत्पन्नाच्या केवळ दोन टक्के प्रोव्हीजन शिक्षणासारख्या महत्वाच्या विषयासाठी करीत आहे. आता यावर्षीचे बजेट सादर झाले आहे. पण माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, कमीतकमी पुढच्या वर्षी पासून तरी बजेटमध्ये पुरेशी तरतूद करण्यात यावी. यावर्षी राज्याच्या उत्पन्नाच्या जवळजवळ अडीच टक्क्यापर्यंत प्रोव्हीजन केली आहे, परंतु पुढच्या वर्षी ही तरतूद पाच ते सात टक्क्यापर्यंत करावी.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, मी एका गोष्टीबाबत खुलासा करु इच्छितो की, यासाठी राज्याच्या उत्पन्नाच्या जवळजवळ 20 ते 22 टक्के प्रोव्हीजन आहे. त्यामुळे ही आकडेवारी दुरुस्त करण्यात यावी. कमिशनने सांगितले आहे की, संपूर्ण देशाच्या तुलनेमध्ये ही तरतूद सहा टक्के असली पाहिजे. परंतु तो वेगळा भाग आहे.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, या विभागासाठी पाच ते सात टक्के तरतूद करणे आवश्यक आहे. तरच याठिकाणी या विषयाच्या संदर्भात दोन दिवस झालेल्या चर्चेच्या निमित्ताने जे प्रश्न उपस्थित झाले आहेत, त्यांना न्याय देण्यासाठी, ते प्रश्न सोडविण्यासाठी मदत होऊ शकेल.

सभापती महोदय, शासनातर्फे शालेय पोषण आहार या योजनेच्या माध्यमातून अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना आहार देतो. परंतु सध्या शालेय पोषण आहार योजना म्हणजे भ्रष्टाचाराचे मोठे कुरण झालेले आहे. यातील भ्रष्टाचार निपटून काढण्यासाठी कडक उपाययोजना करणे आवश्यक आहे. परंतु यामध्ये एक तफावत आहे आणि ती म्हणजे एकाच शाळेतील अनुदानित तुकडी मधील विद्यार्थ्यांना या योजनेअंतर्गत आहार दिला जातो, परंतु त्याच शाळेतील ज्या विना अनुदानित तुकडया आहेत, त्यातील विद्यार्थ्यांना मात्र आहार दिला जात नाही. अशा प्रकारे एकाच शाळेमध्ये दुजाभाव असणे बरोबर नाही. ही आपली भावी पिढी आहे आणि ती सुदृढ झाली पाहिजे. म्हणून माझी विनंती आहे की, सर्व विद्यार्थ्यांना, मग ते अनुदानित तुकडीमधील असोत किंवा विना

. . . .4 जी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे . . ..

अनुदानित तुकडीमधील असोत, त्या शाळेतील सर्व मुलांना पोषण आहार दिला पाहिजे अशी माझी आग्रहाची मागणी आहे.

सभापती महोदय, वस्ती शाळांच्या बाबतीत सांगावयाचे तर 200 लोकसंख्या असलेल्या ठिकाणी दीड कि.मी.च्या परिसरामध्ये एक वस्ती शाळा असली पाहिजे असा शासनाने निर्णय घेतलेला आहे.

यानंतर कु.गायकवाड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे ..

सन 2006-07 मध्ये जवळजवळ 8765 आश्रम शाळा होत्या. त्यांचे प्रमाण आता घटले असून सन 2007-08 मध्ये 8665 आश्रम शाळा आहेत. म्हणजेच 100 आश्रम शाळा कमी झालेल्या आहेत. या शाळांमधील विद्यार्थी कमी झालेले आहेत. या शाळांमध्ये शिकविणारे जे शिक्षक आहेत त्यांना केवळ 1665 रुपये इतके वेतन देण्याचे शासनाने मान्य केलेले आहे.

सभापती महोदय, राज्यातील वाडया,पाडया, वस्त्यांमध्ये राहणारे लोक हे गरीब आहेत. त्यामुळे ग्रामीण भागामध्ये, पाडयांमध्ये राहणारे, भटक्या जमातीतील लोकांची मुलेच या आश्रम शाळांमध्ये जातात. या शाळांमध्ये गावातील कुलकर्णी, देशपांडे यांची मुले जात नाहीत. या मुलांना शिकविण्याकरिता कमी पगार असलेल्या, अर्धपोटी असलेल्या शिक्षकाला पाठविले जात आहे. गावातील जी मंडळी आहेत त्यांच्या मुलांना शिकविण्याकरिता मात्र भरपेट पगार असणाऱ्या शिक्षकाला पाठवितात. या शाळांमधून ही मुले काय शिकणार आहेत ? माझे असे मत असे आहे की, सर्व विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिक्षणाची क्वालीटी ही सारखीच असली पाहिजे. त्यांच्यामध्ये दुजाभाव करता कामा नये. शिक्षक हा शिक्षकच आहे. जी मुले आश्रम शाळेत शिकणार आहेत, त्यांना शिकविण्याकरिता, कमी पगार असलेल्या अर्धपोटी शिक्षकाला पाठविल्यास तो आपल्या संसाराच्या विवंचनेमध्ये, शाळेतील मुलांना काय शिकविणार आहे ?

सभापती महोदय, सन्माननीय उपमुख्यमंत्री यांनी फेब्रुवारी महिन्यात असे सांगितले होते की, या राज्यातील वस्ती शाळांचा प्रश्न सोडविला जाणार आहे. परंतु हा प्रश्न अद्यापी देखील सोडविण्यात आलेला नाही. आता नवीन शैक्षणिक वर्ष जून महिन्यापासून सुरु होणार आहे. या वर्षी तरी हा प्रश्न सोडवून तेथील विद्यार्थ्यांना न्याय मिळवून दिला जाईल अशी विनंती मी या माध्यमातून आपल्याकडे करीत आहे. या करिता आपल्याला एक अभ्यासगट नेमता येईल. एका अभ्यासगटाचा अहवाल मागच्याच वर्षी प्राप्त झालेला आहे. या अहवालामध्ये ज्या सूचना केलेल्या आहेत, त्याबाबत शासनाने काहीही कार्यवाही केली नाही. या शिफारशी लागू कराव्यात अशी विनंती मी करीत आहे.

सभापती महोदय, ग्रामीण भागामध्ये, मुलीचे गळतीचे प्रमाण भयावह आहे. विद्यार्थ्यांची शाळेतील गळती ही एक सामाजिक समस्या आहे. मी ज्या ज्या गावात जातो, तेथे कार्यकर्त्यांच्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे ..

घरी चहा घेत असताना, मी त्या घरातील मुलीला बोलावितो व तिला विचारतो, तू कितव्या इयत्तेमध्ये शिकत आहेस ? मी सातवीपर्यंत किंवा आठवीपर्यंत शिकले आहे असे ती मुलगी सांगते. त्यानंतर तू पुढे का शिकली नाहीस असे मी तिला विचारतो. आमच्या गावातध्ये 7 वीपर्यंत शाळा आहे, किंवा 8 वी पर्यंत शाळा आहे असे त्या मुली सांगतात. सातवीपर्यत शाळा गावात असल्यामुळे त्यानंतरचे शिक्षण घेण्याकरिता आई, बाबा शेजारील गावामध्ये पाठवित नाहीत. माननीय मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, मुलींची शाळेतील गळती ही एक गंभीर समस्या आहे. 17 -18 या वयोगटातील वयात आलेल्या मुलींना एकटीला शेजारच्या गावामध्ये पाठविण्यास त्यांचे पालक तयार नसतात. मुलींना बाहेरच्या गावात एकटयाने पाठवितानां पालकांची अवस्था कशी होत असेल याची कल्पना आई किंवा बाप झाल्याशिवाय येणार नाही. त्यामुळे याबाबत आपण एक अभ्यासगटाची स्थापना करुन या समस्येमधून मार्ग कसा काढता येऊ शकेल याबाबत विचार केला पाहिजे. या संदर्भात शासनाने एक कमिटी तयार केली पाहिजे. या कमिटीमध्ये काही महिला सन्माननीय सदस्यांची नियुक्ती करावी. या शाळांमधील मुलांच्या पालकांच्या काय समस्या आहेत, त्यांच्या समस्येमधून कशा प्रकारे मार्ग काढता येऊ शकतो याचा विचार केला पाहिजे. एका गावातील साधारण 10-15-20 मुलींचा गट करुन त्यांना एकत्र बाहेरच्या गावात शाळेमध्ये जाण्याकरिता काही सोय आपल्याला करता येणे शक्य आहे काय याचा आपण विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, दारिद्रय रेषेखालील मुलींना सायकल देण्याची शासनाची एक योजना आहे. आपण सर्वच मुलींना सायकल दिली तर सर्व मुली एकत्रपणे जथ्याने बाहेरील गावातील शाळेमध्ये जाऊ शकतील व या उपाययोजनेमुळे मुलींचे शाळांमधील गळतीचे प्रमाण देखील कमी होऊ शकेल.

सभापती महोदय, राज्यामध्ये 525 आश्रम शाळांपैकी 295 प्राथमिक आश्रम शाळा सुरु केलेल्या आहेत. भटक्या व विमुक्त जमातीच्या मुलांना शिकविण्याकरिता आश्रम शाळांची निर्मिती करण्यात आली होती. या मुलांना शिक्षण दिले जावे हा यामागील कन्सेप्ट होता. या शाळा चालविणारे संस्था चालक कोण आहेत ? सर्व धनदांडग्या कुटुंबांची या आश्रम शाळांच्या संस्थांवर

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे ..

मक्तेदारी असते. माझा असा स्पष्ट आरोप आहे की, या संस्था चालकांना चरण्याकरिता कुरण देण्यासाठी आश्रम शाळा सुरु करण्यात आलेल्या आहेत. माझी अशी मागणी आहे की, अल्प संख्यांकांकरिता ज्या शाळा सुरु केल्या जातात, त्या शाळांमध्ये, अल्प संख्यांकाचेच मॅनेजमेंट असले पाहिजे. ती शाळा चालविणारे हे देखील अल्पसंख्यांकच असले पाहिजे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे .....

तशीच अट या ठिकाणी सुध्दा लागू केली पाहिजे. विमुक्त जाती आणि भटक्या जमातीच्या ज्या आश्रमशाळा आहेत त्या ठिकाणी विमुक्त जाती आणि भटक्या जमातीचे संचालक दिले तर आमची मुले शिकत आहेत अशा आत्मियतेने ते मुलांना शिकवतील आणि यामध्ये जो भ्रष्टाचार चालू आहे तो बंद होईल. असे केले तरच मुले शिकतील. या आश्रमशाळांमध्ये तीन तीन महिने पगार दिला जात नाही. सांगली जिल्ह्यामध्ये जेवढ्या आश्रमशाळा आहेत त्या ठिकाणी गेल्या तीन महिन्यांपासून पगार दिलेला नाही. मी त्या आश्रमशाळांच्या शिक्षकांशी बोललो. आपल्या राज्याचे बजेट शिलकीचे आहे. आपल्याकडे पैसे आहेत असे असताना त्या शिक्षकांचा पगार का दिला जात नाही ? या आश्रमशाळांचा तीन तीन महिन्यांचा जो पगार व्हावयाचा बाकी आहे तो तातडीने द्यावा अशी मी विनंती करतो. गेल्या वर्षी आश्रमशाळांना जोडून कनिष्ठ महाविद्यालये देण्याचा निर्णय शासनाने घेतला. त्यासाठी जवळजवळ 50 आश्रमशाळांची निवड केली. ज्या ठिकाणी दहावीपर्यंत आश्रमशाळा आहे त्या ठिकाणी अकरावी आणि बारावीचे वर्ग देण्याचा निर्णय झाला. गेल्या वर्षी निर्णय घेऊन सुध्दा तो निर्णय लालफितीमध्ये अडकलेला आहे. त्यामुळे एका शैक्षणिक वर्षात पाच हजार विद्यार्थ्यांचे नुकसान झाले. आपण ज्या 50 आश्रमशाळांची निवड केलेली आहे त्या ठिकाणी या शैक्षणिक वर्षापासून तरी याबाबत मान्यता देणार काय ? शासनाने त्या ठिकाणी मान्यता द्यावी अशी माझी आग्रहाची मागणी आहे.

सभापती महोदय, मागासवर्गीयांच्या ज्या आश्रमशाळा आहेत त्यांना केंद्र शासनाने अनुदान देण्याची घोषणा केली. महाराष्ट्रामध्ये अशा केंद्र शासन अनुदानित मागासवर्गीय आश्रमशाळांमध्ये 50 हजार विद्यार्थी शिकत आहेत. केंद्राने आता हात वर केले. त्यामुळे या 50 हजार विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले आहे. मागच्या वर्षी या विषयावर लक्षवेधी सूचना आली होती. केंद्र शासनाने या अनुदानित आश्रमशाळांना अनुदान नाकारण्याचे कारण असे दिले आहे की, महाराष्ट्रातील शिक्षणाचा दर्जा उंचावलेला असल्यामुळे आणि त्या निकषामध्ये बसत नसल्यामुळे अशा ज्या आश्रमशाळा सुरु आहेत त्यांना अनुदान देऊ शकणार नाही. त्यामुळे जवळजवळ 50 हजार विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात आहे. माझी शासनाला विनंती आहे की, केंद्र शासनाच्या ज्या आश्रमशाळा आहेत त्या आपण ताबडतोब दत्तक घ्याव्यात आणि इतर शाळांना जसे अनुदान लागू

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

श्री. प्रकाश शेंडगे .....

करतो त्याप्रमाणे त्यांना अनुदान देऊन त्या आश्रमशाळा व्यवस्थित चालवून त्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना न्याय द्यावा अशी मी आग्रहाची मागणी करतो.

सभापती महोदय, मेंढपाळांचे कळप वर्षानुवर्षे भटकत असतात. त्यांच्या मुलांना शिक्षण देण्याच्या बाबतीत आजपर्यंत महाराष्ट्रामध्ये विचार केला गेला नाही. माझी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे. मेंढपाळांचे कळप घेऊन जाण्याचे मार्ग निश्चित असतात. त्यांच्या कळपांबरोबर 100 ते 200 घोडे असतात. ते त्यांच्या पाली उभारतात. त्यांचे संसार उघड्यावर असतात. त्यांच्या आयुष्यामध्ये थोडाफार प्रकाश आणण्यासाठी एखाद्या बसमध्ये फिरती शाळा, मोबाईल शाळा सुरु केली तर मेंढपाळांच्या मुलांना खरोखर न्याय मिळेल. ही छोटी मागणी आहे. ही मागणी जास्त खर्चिक नाही. शासनाने ही मागणी मान्य करावी अशी मी या शिक्षणाच्या संदर्भातील प्रस्तावाच्या निमित्ताने आग्रहाची विनंती करतो. कराड येथील मेंढपाळाचा मुलगा श्री. सुहास काकरे याने आय.टी.आय.मध्ये कसाबसा प्रवेश मिळविला आणि चांगल्या गुणांनी पास झाला. आज त्याने अमेरिकेतील आकाश पादाक्रांत केलेले आहेत. अमेरिकेच्या एअरफोर्सला लागणारे मेजर मटेरियल पुरवठा करण्याचा कारखाना त्याने अमेरिकेमध्ये काढलेला आहे. ज्यावेळी महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री अमेरिकेला जातात त्यावेळी तो मेंढपाळाचा मुलगा त्यांना घेण्यासाठी कार घेऊन येत नाही तर त्यांना घेण्यासाठी विमान घेऊन उभा असतो. त्याने अमेरिकेतील आकाश पादाक्रांत केलेले आहे. अशी जी मेंढपाळांची मुले आहेत त्यांना संधी दिली तर उद्या ते देश पादाक्रांत केल्याशिवाय राहणार नाहीत.

सभापती महोदय, मांडण्यासारखे बरेच विषय आहेत परंतु वेळेच्या अभावी मी जास्त मुद्दे मांडू शकत नाही. फक्त एकच मुद्दा मांडतो. सांगली जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ज्या शाळा आहेत त्यामधील जवळजवळ 50 शिक्षक हे तुकड्या कमी झाल्यामुळे जादा झालेले आहेत.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे.....

शिक्षक बसून पगार घेत आहेत. तुकडया कमी झाल्यामुळे तेथे जादा शिक्षक आहेत. हे शिक्षक आमच्या वस्ती शाळांमध्ये पाठविले तर आमची मुले शिकतील. सभापती महोदय, वेळेअभावी मी माझे भाषण येथेच संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, या महाराष्ट्रातील 10 कोटी जनतेशी संबंधित असलेला अत्यंत महत्वाचा असा हा शिक्षण विषय आहे. या विषयावर नियम 260 अन्वये प्रस्ताव मांडण्यात आला आहे त्यावर मी माझे मत मांडत असताना केवळ मुद्देच मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, मी माननीय शिक्षण मंत्र्यांची महाराष्ट्र टाईम्समध्ये आलेली मुलाखत वाचली, चांगली मुलाखत होती, माननीय श्री.पुरके यांचा फोटो चांगला होता. भविष्यात शिक्षणाच्या प्रगतीचा महाराष्ट्राचा फोटो चांगला असेल त्याकडे राज्यातील जनतेचे लक्ष लागले आहे. सभापती महोदय, मी प्रथम दोन प्रकरणे याठिकाणी मांडत आहे. दापोली तालुक्यामध्ये जी दोन प्रकरणे उघडकीस आली आहेत त्याची माहिती मला कालच उपलब्ध झाली. परीक्षा पेपरच्या गठ्ठयात प्रचाराचे पेपर्स सापडले आहेत ही बाब मी माननीय शिक्षण मंत्र्यांच्या निदर्शनास आणून देतो. त्याबाबत माननीय शिक्षण मंत्री कारवाई करतील अशी मला खात्री आहे. या घटनेचा पंचनामा इ ालेला आहे, परीक्षा पेपर्सच्या गठ्ठयात पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीच्या प्रचाराची पत्रके सापडली आहेत. आदर्श केंद्र शाळा, जालगाव याठिकाणी वार्षिक परीक्षेच्या पेपर्सचे गठ्ठे आल्यानंतर ते फोडण्यात आले. त्यामध्ये पुण्याच्या पदवीधर मतदार संघातील निवडणुकीची आव्हान पत्रके सापडली आहेत. पुणे मतदार संघातून राष्ट्रवादी कॉंग्रेसचे श्री.राजेश विलासराव पाटील निवडणूक लढवित आहेत. त्यांच्या निवडणुकीची ती पत्रके आहेत.

दुसरे प्रकरण दापोली तालुक्यातील गोखले केंद्र शाळेचे असून वार्षिक परीक्षा प्रश्न संचामध्ये पुणे विभाग निवडणूक, 2008 बाबतची आव्हान पत्रके इतिहास, नागरिक शास्त्राच्या पेपर्सच्या गठ्ठयात सापडली आहेत. त्याबाबत कारवाई करणे आवश्यक आहे. एका बाजूला परीक्षांचे गठ्ठे गहाळ होत आहेत आणि दुस-या बाजूला परीक्षांच्या पेपर्सच्या गठ्ठयात निवडणुकीच्या प्रचाराचे साहित्य सापडते ही गोष्ट शिक्षणासारख्या क्षेत्राबाबत गंभीर आहे. शिक्षण या विषयामध्ये असे प्रकार होता कामा नये. सभापती महोदय, शिक्षण या विषयावर बोलताना अनेक महामानवांची उदाहरणे दिली गेली. त्यांनी समाजाला केलेल्या मार्गदर्शनाचा उल्लेख करण्यात आला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शिका, संघटित व्हावा, संघर्ष करा असे म्हटले होते. स्वामी

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

श्री.संजय केळकर.....

विवेकानंद यांनी असे म्हटले होते की, शिक्षण असे द्यावे की तो माणूस समाजात ताठ मानेने उभा राहू शकला पाहिजे, शिक्षणामुळे चारित्र्यवान माणूस तयार झाला पाहिजे, तो स्वत:च्या पायावर उभा राहिला पाहिजे, तो ज्ञानी झाला पाहिजे, त्याचे ज्ञान सांस्कृतिक ज्ञानावर आधारित असले पाहिजे. परंतु ख-या अर्थाने असे शिक्षण महाराष्ट्रातील लोकांना मिळते काय ? आज 36 हजार शाळांपैकी 33 हजार शाळांना भिंती नाहीत आणि 43 हजार शाळांमध्ये प्रसाधनगृहे नाहीत, 1 लाख मुले शाळाबाहय आहेत. मी आज जरी शहरामध्ये रहात असलो तरी माझे प्राथमिक शिक्षण खेडेगावामध्ये झालेले आहे. कोकणातील अनेक दुर्गम भागामध्ये भेट देण्यासाठी जातो त्यावेळी शहरी व ग्रामीण भागामध्ये किती विषमता आहे ती लक्षात येते. एका बाजूला शहरी भागातील मुलांमध्ये इंग्रजी विषयाबद्दल न्यूनगंड निर्माण झाला आहे. महानगरपालिकेच्या शाळेत मुले जात नाहीत, त्यामुळे महानगरपालिकांच्या, जिल्हा परिषदांच्या शाळा बंद पडत आहेत. प्रत्येकाला असे वाटते की, आपल्या मुलाने इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये गेले पाहिजे.

नंतर श्री.शिगम

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. संजय केळकर....)

आपण सीबीएसई किंवा आयसीएसई शाळेत गेलो तरच आपण मोठे होऊ शकू अशा प्रकारची मानसिकता आणि विषमता समाजामध्ये निर्माण झाल्यामुळे ज्यांची ऐपत नाही असे पालक सुध्दा कर्ज काढून आपल्या पाल्यांना इंग्रजी शाळामध्ये पाठवतात. सभापती महोदय, मी आणि सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते आम्ही शहापूर येथील जिल्हा परिषदेच्या शाळेला भेट दिली होती. त्या शाळेमध्ये विद्यार्थ्याऐवजी गुरे बसलेली दिसून आली. वर्गात पाणी होते. शाळेची दुरुस्ती झालेली नव्हती, छप्पर नव्हते. अशा प्रकारच्या शाळातून आपण पुढची पिढी कशी घडविणार हा प्रश्न आहे. 2020 सालामध्ये हिंदुस्थान हा जागतिक महासत्ता बनविण्याची स्वप्ने आपण पहात आहोत. ती प्रत्यक्षात कशी अवतारणार हा प्रश्न आहे. राजापूरच्या जिल्हा परिषदेच्या शाळेची पाहणी करण्यासाठी मी गेला असता त्या शाळेतील शिक्षकांनी माझा हात धरला आणि म्हणाले की, पुढे जाऊ नका. मी पाहिले तर एका खांबावरच त्या शाळेचा डोलारा उभा होता आणि येणा-या पावसाळयामध्ये तो डोलारा कधीही पडू शकेल अशी त्या शाळेची परिस्थिती होती. त्या शाळेमध्ये आजूबाजूच्या वाड्या वस्त्यातील, पाडयातील 350 ते 400 मुले शिक्षण घेण्यासाठी येतात. अतिवृष्टीमुळे कुठे छप्पर तुटलेले, कुठे कौले उडालेली अशा प्रकारे या शाळा उद्ध्वस्त झालेल्या आहेत. अतिवृष्टीमध्ये शेतक-यांचे, व्यापा-यांचे नुकसान झाले तर शासन त्यांना मदत करते. परंतु शाळांचे नुकसान झाले तर त्याबाबतीत मदत करता येत नाही अशा प्रकारचा जी.आर.आहे. म्हणून अतिवृष्टीमध्ये शाळांचे नुकसान झाले असेल, त्यांची पडझड झाली असेल तर त्याबाबतीत शासनाने तातडीने मदत करुन त्या शाळा अद्ययावत करण्यासंबंधी जी.आर.मध्ये अंतर्भात करावा अशा प्रकारची मागणी मी या निमित्ताने करीत आहे. मला आठवते की 1967 सालामध्ये तत्कालीन शिक्षण मंत्री श्री. मधुकरराव चौधरी यांनी एक चांगला निर्णय घेतला. ग्रामीण भागातील मुलांना चांगले शिक्षण मिळाले पाहिजे, त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास झाला पाहिजे, त्यांचा सर्वांगिण विकास झाला पाहिजे, त्यांच्यातूनच प्रशासकीय अधिकारी निर्माण झाले पाहिजेत, नेतृत्व गुण निर्माण झाले पाहिजे यासाठी महाराष्ट्रामध्ये चिखलदरा, सातारा, नाशिक, अमरावती या चार ठिकाणी गव्हर्नमेंट पब्लिक स्कूल स्थापन केले. सभापती महोदय, मी स्वत: नाशिकच्या गव्हर्नमेंट पब्लिक स्कूलमध्ये 6 वर्षे शिक्षण घेतलेला विद्यार्थी आहे. 1967 ते 1974 या कालावधीत या गव्हर्नमेंट पब्लिक स्कूलमधून

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. संजय केळकर....)

शिक्षण घेतलेले विद्यार्थी जेव्हा गेट टुगेदर घेतात त्यावेळी त्यांच्यामध्ये अनेक उच्चपदस्थ प्रशासकीय अधिकारी असतात, आर्मी मधील अधिकारी असतात, अन्य मोठमोठया कंपन्यामधील एक्झिक्युटीव्ह पदावरचे अधिकारी असतात. अशा गव्हर्नमेंट पब्लिक स्कूलची अवस्था आज अत्यंत दयनीय आहे. मी स्वत: खेडेगावात राहात होतो आणि एन्ट्रन्स एक्झाम देऊन नाशिकच्या गव्हर्नमेंट पब्लिक स्कूलमध्ये शिक्षण घेतलेले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या दृष्टीकोनातून ह्या शाळा काढण्यात आल्या. परंतु आज मात्र या शाळांची अवस्था फार वाईट आहे. एमएससी,एमएड झालेले शिक्षक त्या शाळेतील विद्यार्थ्यांना शिकवितात. या शाळांची माननीय मंत्री महोदयांनी पहाणी करावी आणि त्या शाळा पुनरुज्जीवित कराव्यात जेणेकरुन त्या शाळेमधून उद्याची प्रशासनातील माणसे, नेतृत्व गुण असलेली माणसे निर्माण होतील.

सभापती महोदय, 10 वी 12 वी परीक्षांच्या वेळी आपण वर्तमानपत्रातून अशा बातम्या वाचतो की अमूक एका 10वीच्या विद्यार्थ्याने परीक्षेपूर्वी आत्महत्या केली, निकालानंतर आत्महत्या केली. 12वीच्या विद्यार्थ्याने परीक्षेपूर्वी आत्महत्या केली, निकालानंतर आत्महत्या केली. विद्यार्थ्यांच्या या मानसिकते मागे अनेक कारणे आहेत. विद्यार्थ्यांचा आयक्यू म्हणजे इंटेलिजण्ट कोशण्ट बदलता येत नसला तरी त्यांचा ईक्यू म्हणजे इमोशनल कोशण्ट घडविता येतो. अमेरिकेमध्ये आणि भारतामध्ये देखील या विषयावर संशोधन झालेले आहे. माझा धाटका भाऊ हा एम.डी.पेडियाट्रिक आहे. त्याने अमेरिकेतून सर्टिफिकेटही मिळविलेले आहे. एक सामाजिक बांधिलकी म्हणून मानसिक बळ वाढविण्याच्या संदर्भात तो काम करतो. मला हे सांगावयाचे आहे की, विद्यार्थ्याचा इमोशन कोशण्ट आपणाला वाढविता येतो. आपल्याला उद्याची संस्कारक्षम आणि ध्येयवादी पिढी घडवायची असेल तर त्यासाठी त्यांचा इक्यू वाढविला पाहिजे.

...नंतर श्री. गिते....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री. संजय केळकर...

सभापती महोदय, मला असे वाटते की, शासनाने यासंदर्भात कौन्सिलींग करण्याची व्यवस्था निर्माण केली तर या मुलांमधील इ.क्यू. वाढण्यास निश्चितपणे मदत होईल. म्हणून कौन्सिलींगची व्यवस्था निर्माण करण्यात यावी अशी माझी शासनास विनंती आहे.

सभापती महोदय, पुस्तकात चुकीचा इतिहास छापला गेला अशा प्रकारच्या बातम्या आपण वेगवेगळया वृत्तपत्रातून वाचतो. चुकीच्या इतिहासाच्या बाबतीत अनेक वेळा सभागृहात चर्चा झालेली आहे. मी संगमेश्वर येथे गेलो होतो. त्या ठिकाणी एका विस्तार अधिका-याला विचारले गेले होते की, शिवाजी महाराजांनी अफझलखानाचा वध कसा केला? त्या बाबतीत विस्तार अधिका-यांनी सांगितले की, शिवाजी महाराजांनी अफझलखानाला खूप गुदगुल्या केल्या आणि त्यामुळे अफझलखानास हसू आवरले गेले नाही, त्यात त्यांचा मृत्यू झाला. सभापती महोदय, मी जी माहिती सांगितली ती सत्य आहे. यासंदर्भात संबंधित अधिका-याची चौकशी झाली. त्या अधिका-यावर कारवाई केली गेली. चुकीचा इतिहास पुस्तकात द्यावयास लागलो तर खरा इतिहास लोकांच्या डोळयासमोर येणार नाही. पूर्वीच्या इतिहासाची स्फूर्ती कोणाकडून आणि कशा प्रकारे घेणार हा एक मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. या गंभीर गोष्टीकडे देखील शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, या राज्यात सी.बी.एस.ई. शाळा कार्यरत आहेत. या शाळांचे संस्था चालक खूपच मग्रुरीमध्ये असतात. या संस्था चालकांना खूप माज आला आहे. सदर संस्था चालक हे स्वतंत्र संस्थान म्हणून या शाळा चालवितात. या संस्था विद्यार्थ्यांकडून वाटेल तेवढी फी घेतात. सी.बी.एस.ई.च्या शाळांमध्ये गर्भ श्रीमंताचीच मुले शिक्षणासाठी जातात. या संस्थेतील मुलांना अपघात होऊ नये म्हणून त्या संस्थेच्या परिसरात ठराविक वेळेला वाहतूक पोलीस असतात. जिल्हा परिषद आणि महानगरपालिकांच्या शाळा आहेत, त्या शाळांच्या समोर कधीही वाहतूक पोलीस उपस्थित नसतात. जिल्हा परिषदा आणि महानगरपालिकांमधील शाळेतील विद्यार्थ्यांना अपघात झाला तरी चालेल, त्या विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारचे प्रोटेक्शन दिले जात नाही. सी.बी.एस.ई.शाळेतील विद्यार्थ्यांना मात्र चांगल्या प्रकारे प्रोटेक्शन दिले जाते. ही विषमता दूर करण्याची आवश्यकता आहे. सी.बी.एस.ई.शाळांवर कोणाचेही नियंत्रण नाही. या संस्थांमधील शाळांमध्ये राष्ट्रगीत, वंदेमातरम् गायले जात नाही. 15 ऑगस्ट, 26 जानेवारी हे राष्ट्रीय सण

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश केळकर...

साजरे केले जात नाहीत. या शाळांमध्ये मराठी भाषा शिकविली गेली पाहिजे यासंबंधीची सक्ती त्यांच्यावर घातली जात नाही. या संस्थेतील शाळांमध्ये मराठी भाषा शिकविणे सक्तीचे करावे अशी माझी मागणी आहे. गुणवत्तेच्या नावाखाली प्रचंड अशी फी विद्यार्थ्यांवर आकारली जाते. या संस्थांवर शासनाच्या माध्यमातून अंकुश ठेवण्याची आवश्यकता आहे. या संस्थांवर शासनाने अंकुश ठेवला नाही तर शाळा चालकांची मस्ती कमी होणार नाही. शिक्षण विभागातील अधिका-यांना हे संस्थाचालक जुमानत नाही. म्हणून शासनाने त्यांच्यावर अंकुश ठेवावा अशी माझी या निमित्ताने मागणी आहे.

सभापती महोदय, इयत्ता दहावी आणि इयत्ता बारावीची परीक्षा सुरु होते. त्यावेळी विद्यार्थी कॉपी करतात अशा पध्दतीचे फोटो प्रत्येक वृत्तपत्रात छापून येतात. दूरदर्शनच्या बातम्यामध्ये कॉपी कशी करण्यात येत आहे या संबंधीचे वृत्त दाखविले जाते. या बातम्या ऐकून आणि वाचून खरोखरच मनाला वाईट वाटते. महाराष्ट्र हे प्रगतशील राज्य आहे. देशाला पुढे घेऊन जाणारे हे राज्य आहे. अशा प्रगत राज्यात कॉपीची भरमसाठ प्रकरणे उघडकीस येतात. सदरहू कॉपी प्रकरणे बंद करण्याच्या अनुषंगाने शासन कठोर पाऊले उचलणार आहे की नाही असा प्रश्न निर्माण झाला आहे. या राज्यात कॉपी प्रकरावर पूर्णपणे बंदी यावी यासाठी शासनाने कठोरपणे पाऊले उचलावीत अशी देखील माझी या निमित्ताने मागणी आहे.

. सभापती महोदय, प्रत्येक तालुक्यात एक अनुदानित महाविद्यालय असावे अशा प्रकारचा शासनाचा निर्णय आहे. परंतु या निर्णयाची अंमलबजावणी शासनाकडून होत नाही. ठाणे जिल्हयातील अनेक महाविद्यालये आपल्या निदर्शनास आणून देऊ शकतो. ठाणे जिल्हयातील प्रत्येक तालुक्यातील एका महाविद्यालयास अनुदान प्राप्त झाले नाही तर त्या ठिकाणी महाविद्यालय चालविणे शक्य होणार नाही. प्रत्येक तालुक्यात एक अनुदानित महाविद्यालय असले पाहिजे असे शासनाचे धोरण आहे, त्या धोरणाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी अशा प्रकारची मागणी करतो. सभापती महोदय, आपण मला बोलण्यासाठी संधी उपलब्ध करुन दिली त्याबद्दल आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : या प्रस्तावावर सगळे वक्ते बोलून झाले आहेत. मी मघाशी निर्णय देताना सांगितले होते की, या प्रस्तावावर सर्व वक्ते बोलतील आणि माननीय मंत्र्यांची उत्तरे देखील आजच होतील. आता रात्रीचे 8.30 वाजले आहेत. या प्रस्तावावर शालेय शिक्षण मंत्री आणि उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे राज्यमंत्री यांची उत्तरे व्हावयाची आहेत. उत्तराचे भाषण संपल्यानंतर सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या दोन,तीन प्रश्नाची उत्तरे माननीय मंत्र्यांकडून दिली जातील. माननीय मंत्र्यांची उत्तराची भाषणे पूर्ण झाल्यानंतर होणारी प्रश्नोत्तरे यासाठी किमान दीड ते दोन तासाचा वेळ लागेल. म्हणून उद्या प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर, फॉर्मल बिझिनेस झाल्यानंतर माननीय शालेय शिक्षण मंत्री आणि उच्च शिक्षण राज्यमंत्री यांच्या उत्तरांच्या भाषणासाठी वेळ राखून ठेवतो. उद्या या प्रस्तावावर कोणाही सदस्यांना बोलण्यासाठी मी परवानगी देणार नाही.

यानंतर श्री. कानडे...

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती....

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. आजच्या कामकाजपत्रिकेवरील 'मुंबई शहराच्या समस्या' याबाबतचे दोन्ही प्रस्ताव बुधवार, दिनांक 23 एप्रिल, 2008 रोजी सकाळी 10.00 ते 12.30 या वेळेत विशेष बैठकीत एकत्रितरित्या चर्चेस घेतले जातील. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे ही चर्चा सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार सुरु करतील, त्यानंतर श्री. संजय दत्त बोलतील व त्यानंतर अन्य सदस्य बोलतील. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता सुरु होईल. विशेष बैठकीत चर्चा व उत्तर अपूर्ण राहिल्यास सदरहू बाब नियमित बैठकीत पुन:श्च घेण्यात येईल.

उद्या मंगळवार, दिनांक 22.4.2008 रोजी सकाळी 10.00 ते दुपारी 12.00 या वेळेत सभागृहाची विशेष बैठक होईल. या बैठकीत प्रलंबित अर्धा-तास चर्चा घेण्यात येतील. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.15 वाजता सुरु होईल. या बैठकीत 'ग्लोबल वॉर्मिंग' संबंधातील प्रस्तावावर चर्चा होईल. त्या अगोदर आजचा जो प्रस्ताव आहे त्यावर सन्माननीय मंत्रीमहोदयांचे उत्तर होईल. त्यानंतर "ग्लोबल वॉर्मिंग" च्या प्रस्तावावर चर्चा होईल. हा प्रस्ताव सत्तारुढ तसेच विरोधी पक्ष सदस्यांच्या नावे असेल आणि सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत चर्चेची सुरुवात करतील.

सभा□हापुढील □म□ज संपलेले आहे. सभा□हाची बैठ□ आता स्था□ित होऊ□ उद्या मंगळवार, दि□ां□ 22 एप्रिल, 2008 रोजी स□ाळी 10.00 वाजता पु□ः भरेल.

(सभा□हाची बैठ□ रात्री 8 वाजू□ 32 मि□िटां□ी, मंगळवार, दि□ां□ 22 एप्रिल, 2008 रोजीच्या स□ाळी 10.00 वाजेपर्य□त स्था□ित झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही